# मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था मर्यादित पुणे : वित्तीय कामगिरीचा अभ्यास

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत

एम्.फिल.(अर्थशास्त्र) या पदवीसाठी सादर केलेला प्रबंध


: संशोधक:

सौ. किशोरी भानुदास कुलाळ

: मार्गदर्शक:

डॉ. ज्योती पाटील


जून- २०१६

# प्रतिज्ञापत्र

मी, सौ. किशोरी भानुदास कुलाळ प्रतिज्ञापूर्वक प्रमाणित करते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्या शाखांतर्गत अर्थशास्त्र विषयातील एम्.फिल्. पदवीसाठी **'मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था मर्या. पुणे : वित्तीय कामगिरीचा अभ्यास'** या विषयावर डॉ. ज्योती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूर्वक हा शोधप्रबंध लिहून पूर्ण केला आहे.

हे संशोधन स्वतंत्र व नवे असून यापूर्वी ते कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेले नाही.

ठिकाण : पुणे

दिनांकः

**संशोधक**

**सौ. किशोरी भानुदास कुलाळ**

# ऋणनिर्देशन

'मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था मर्या. पुणे : वित्तीय कामगिरीचा अभ्यास' या विषयावरील शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या एम्.फिल्. पदवी परीक्षेसाठी सादर करताना आनंद होत आहे.

एम्.फिल्. पदवीसाठी प्रवेश घेण्यापूर्वी बी.ए. व एम्.ए. या पदव्या घेताना अर्थशास्त्र विषयाचा अभ्यास करण्याचा योग आला. एम्.ए. पदवी नंतर पुढील शिक्षण आपण करु शकणार नाही ही मनाची ठाम भूमिका तयार झाली होती. तरीही पुढील शिक्षण घेण्याविषयी मनात ज्योत प्रज्ज्वलित होत होती. एम्.फिल्. किंवा पीएच्.डी. साठी संशोधन करावे लागते. त्याला खूप वेळ लागतो. संशोधनाचा अभ्यास वेळेत पूर्ण होईल की नाही असे विचार मनात यायचे. त्यामुळे पुढील प्रवेशासाठी मन धजावत नव्हते.

मी ज्या शाळेत शिक्षिकेची नोकरी करते, ती शाळा टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या समोरच आहे. एक दिवस वर्तमानपत्रातील एम्.फिल्., पीएच्.डी. प्रवेशाची टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची जाहिरात वाचनात आली. अन् एम्.फिल्. साठी प्रवेश घेण्याचे मी निश्चित केले. शाळा आणि विद्यापीठ जवळ असल्याने फारशी अडचण भासणार नाही असेही वाटून गेले.

एम्.फिल्. पदवीसाठी प्रवेश घेतल्यानंतर संशोधनासाठी कोणता अभ्यास विषय निवडावा असा प्रश्न मला पडला होता. माझ्या मार्गदर्शिका डॉ.ज्योती पाटील या एम्.फिल्. विषयाचे कोर्स वर्क्ससाठी मार्गदर्शन करत असताना, मी त्यांना माझ्या संशोधनासाठी मार्गदर्शन करण्याची विनंती केल्याबरोबर त्यांनी लगेच होकार दिला. संशोधनासाठी काही विषय माझ्यासमोर होते. ते त्यांना सांगितले. त्या विषयांवर चर्चा झाल्यानंतर डॉ.ज्योती पाटील यांनी 'मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था मर्या. पुणेः वित्तीय कामगिरीचा अभ्यास' या विषयाला मान्यता

दिली. त्यानुषंगाने संदर्भ साहित्याचे वाचन करण्यास सांगून संशोधनासाठी प्रोत्साहन दिले. वेळोवेळी आपला अमूल्य वेळ खर्च करुन त्यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. त्याचबरोबर संदर्भ शोधण्यासही मदत केली. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच हा शोध प्रबंध पूर्णत्वाला जाऊ शकला.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.प्रवीण जाधव यांनी वेळोवेळी ज्या सूचना केल्या त्याचाही अभ्यासासाठी उपयोग झाला. तसेच डॉ. अविनाश कुलकर्णी व श्री बोडके (सहकार प्रशिक्षण केंद्र पुणे) यांनी केलेल्या सहकार्यामुळे अभ्यासाला गती मिळाली. त्यांच्या स्नेहपूर्ण ऋणात राहायला मला नक्कीच आवडेल.

'मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था मर्यादित, पुणे' या संस्थेच्या संचालक मंडळाने संदर्भ साहित्य उपलब्ध करुन दिले. तसेच अध्यक्ष श्री.भानुदास कुलाळ, सेक्रेटरी श्री.विठ्ठल शेवते, श्री.सुधीर दाते, व्यवस्थापक श्री.महादेव शिंदे, लेखनिक श्री.संजय उत्तेकर व संचालक मंडळातील प्रतिनिधी श्री.प्रल्हाद झरांडे, श्री.काकासाहेब राजपुरे, श्री.श्रीरंग पिंगळे, सौ.अनुपमा रासकर, सौ.सुवर्णा धुमाळ, श्रीमती शारदा हगवणे, सौ.शीला ताकवले यांच्याशी वेळोवेळी केलेल्या चर्चेची अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण मदत झाली. त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

अभ्यास साधने मिळवण्यासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथालयातील ग्रंथपाल सौ. सुरेखा बेलसरे, सौ.शर्मिला बोराडे यांनी केलेली मदत तसेच गोखले इन्स्टिट्यूटचे ग्रंथालय, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय या ग्रंथालयातील ग्रंथपालांनी केलेली मदत महत्त्वाची वाटते. त्यामुळे संदर्भ साधने सहजपणे उपलब्ध होऊ शकली. त्याबद्दल त्यांचे आभार.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील एम्.फिल्. वर्गाच्या मैत्रिणी कु.सोनाली कांबळे, कु.कविता देशमुख यांनी वेळोवेळी सहकार्य केले. तसेच सौ.रेश्मा मोरे या

मैत्रिणीने इंग्रजीतील मजकूर अनुवादित करण्यास मदत केली. त्यांचीही मी शतश: ऋणी आहे.

सदर पतसंस्थेचे लेखापरिक्षक श्री.विकास बाणखेले यांच्याशी पतसंस्थेच्या आर्थिक बाबींविषयी चर्चा केली. त्यामुळेच पतसंस्थेच्या आर्थिक स्थितीविषयी जाणून घेणे सुलभ झाले. त्यांचीही मी ऋणी राहील.

तिर्थरुप श्री.दत्तात्रय माने व मातु:श्री सौ.कल्पना माने यांची वात्सल्यपूर्ण कृपादृष्टी, मुलांनी उत्तम शिक्षण घ्यावे यासाठी त्यांची चाललेली धडपड तसेच माझे सासरे श्री.अमृता कुलाळ, सासू सौ.मंजुळा कुलाळ यांनी स्वत:च्या मुलीप्रमाणे शिक्षण घेण्यासाठी दिलेले प्रोत्साहन व पाठबळ यामुळेच माझे प्रयत्न सफल झाले. त्यांचेही आशीर्वाद सदैव पाठीशी आहेत.

महाराष्ट्रीय मंडळाचे श्री.धनंजय दामले व मा.मुख्याध्यापिका सौ.निला पेठे, सौ.आरती गायकवाड यांचेही सहकार्य संस्मरणीय आहे.

माझे पती श्री.भानुदास कुलाळ, मुलगा चि. सारंग याचा सहयोग व पाठिंबा या प्रबंधाच्या पूर्णत्त्वास लाभला.

हा शोध प्रबंध अभ्यासकांना, वाचकांना उपयुक्त ठरला तर माझ्या संशोधनाचे प्रबंध लेखन सफल झाल्याचा आनंद मला होईल, ही नम्र अपेक्षा.

**सौ.किशोरी भानुदास कुलाळ**
**संशोधक**

# अनुक्रमणिका


**प्रकरण पहिले** **१–३५**

**सहकारी चळवळीचा इतिहास**

**प्रस्तावना** **२**

१.१ सहकार अर्थ २

१.२ सहकाराची वैशिष्ट्ये २

१.३ सहकाराची गरज ५

१.४ सहकाराचे महत्त्व ५

१.५ सहकाराची तत्त्वे ६

१.६ जागतिक सहकारी चळवळीचा इतिहास १५

१.७ आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना १६

१.८ भारतातील सहकारी चळवळीचा इतिहास १७

१.९ स्वातंत्र्यपूर्व काळ १८

१.१० सहकार कायदा १९०४ १९

१.११ सहकार कायदा १९१२ २०

१.१२ मॅक्‌लेगन समिती २०

१.१३ अनियोजित विस्ताराचा कालखंड (१९१९ ते १९२९) २०

१.१४ एकत्रिकरण व पुन:र्रचनेचा कालखंड (१९३० ते १९३८) २२

१.१५ पुनर्विकासाचा कालखंड (१९३९ ते १९४६) २३

१.१६ स्वातंत्र्योत्तर कालखंड २४

१.१७ नियोजनपूर्व काळ २४

१.१८ नियोजनकाळातील सहकारी चळवळ २५

१.१९ समारोप ३२

संदर्भ ३३

| | | |
|---|---|---|
| **प्रकरण दुसरे** | | **३६–५२** |
| | **महाराष्ट्रातील सहकारी चळवळ** | |
| | **प्रस्तावना** | **३७** |
| २.१ | सहकारी चळवळीतील महाराष्ट्राचे स्थान | ३७ |
| २.२ | महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे स्वरुप | ३९ |
| २.३ | महाराष्ट्रातील सहकारी पतपुरवठा संस्थांची रचना | ४४ |
| २.४ | समारोप | ५१ |
| | संदर्भ | ५२ |
| **प्रकरण तिसरे** | | **५३–६७** |
| | **संशोधन पद्धती** | |
| | **प्रस्तावना** | **५४** |
| ३.१ | संशोधनाचा विषय | ५५ |
| ३.२ | संशोधनाची गरज | ५६ |
| ३.३ | संशोधनाची व्याप्ती | ५६ |
| ३.४ | संशोधनाची उद्दिष्ट्ये | ५७ |
| ३.५ | संशोधनाची गृहितके | ५७ |
| ३.६ | संशोधन पद्धती | ५८ |
| ३.७ | तथ्य संकलन पद्धती | ६० |
| ३.८ | नमुना निवड | ६१ |
| ३.९ | विश्लेषण पद्धती | ६२ |
| ३.१० | संशोधनाची मर्यादा | ६४ |
| ३.११ | प्रकरण नियोजन | ६४ |
| ३.१२ | समारोप | ६७ |
| | संदर्भ | ६७ |

**प्रकरण चौथे** **६८-१००**

**साहित्याचा आढावा, सैद्धांतिक पार्श्वभूमी**

**प्रस्तावना** **६९**

४.१ संदर्भ साहित्याचा आढावा ६९

४.२ सैध्दांतिक पार्श्वभूमी ८९

४.३ समारोप ९८

संदर्भ ९९

**प्रकरण पाचवे** **१०१-११९**

**पुणे जिल्ह्याची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी**

**प्रस्तावना** **१०२**

५.१ पुणे जिल्ह्याचे स्थान व प्राकृतिक रचना १०२

५.२ खनिजे १०३

५.३ नद्या १०३

५.४ प्रशासकीय विभाग १०४

५.५ हवामान व पर्जन्यमान १०५

५.६ शैक्षणिक, सांस्कृतिक , ऐतिहासिक व पर्यटन स्थळे १०५

५.७ लोकसंख्या १०७

५.८ लोकसंख्येची घनता १०७

५.९ नागरी व ग्रामीण लोकसंख्या १०८

५.१० जिल्हा उत्पन्न अंदाज १०९

५.११ पुणे जिल्ह्यातील बाजारपेठा ११०

५.१२ स्थानिक स्वराज्य संस्था ११०

५.१३ बँका ११०

५.१४ पिकांचे स्वरुप १११

५.१५ मुख्य पिकांचे उत्पादन ११२

५.१६ जमिनीचा वापर ११२

५.१७ सिंचन ११३

५.१८ जमीन धारणा ११४

५.१९ सहकार ११४

५.२० उद्योग ११५

५.२१ वार्षिक योजना ११६

५.२२ समारोप ११८

संदर्भ ११८

**प्रकरण सहावे १२०–१९३**

**मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची सद्य:स्थिती**

**प्रस्तावना १२१**

६.१ मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची स्थापना १२१

६.२ मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची विहित पद्धतीने नोंदणी १२३

६.३ मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची स्थापना कार्यक्षेत्र १२३

६.४ मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची उद्दिष्टे १२४

६.५ संघटनात्मक रचना १२५

६.६ सभासद १२८

६.७ भागभांडवल १३२

६.८ कर्जपुरवठा १३७

| | | |
|---|---|---|
| ६.९ | ठेवी | १४१ |
| ६.१० | उभारलेले कर्ज | १४५ |
| ६.११ | अन्य बँकांमधील गुंतवणूक | १४९ |
| ६.१२ | कर्ज वसुली व थकबाकी | १५२ |
| ६.१३ | उत्पन्न – खर्च व नफा | १५३ |
| ६.१४ | नफ्याची विभागणी व लाभांश | १६१ |
| ६.१५ | स्वनिधी | १६५ |
| ६.१६ | लेखापरिक्षण (ऑडिट) | १६६ |
| ६.१७ | लेखापरिक्षणाच्या निर्धारित निकषांप्रमाणे मूल्यमापन | १६८ |
| ६.१८ | सी डी रेशो (ठेव कर्जाचे प्रमाण) | १८७ |
| ६.१९ | आधुनिकीकरण | १९० |
| ६.२० | समारोप | १९१ |
| | संदर्भ | १९२ |
| **प्रकरण सातवे** | | **१९४–२१४** |
| | **निष्कर्ष गृहितकांची पडताळणी व शिफारशी** | |
| | **प्रस्तावना** | **१९५** |
| ७.१ | निष्कर्ष | १९६ |
| ७.२ | गृहितकांची पडताळणी | २०५ |
| ७.३ | शिफारशी | २१२ |
| ७.४ | समारोप | २१४ |
| | **संदर्भ ग्रंथ सूची** | **२१५–२१८** |
| | ❖ पुस्तके | २१६ |
| | ❖ एम.फिल/पीएच.डी. प्रबंध सूची | २१६ |
| | ❖ शासकीय अहवाल व परिपत्रके | २१८ |
| | ❖ इतर अहवाल | २१८ |

**परिशिष्ट** **२१९-२३१**

❖ सभासद शाळांची यादी २१९

❖ सहकार आयुक्त व निबंधक महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे २९ एप्रिल २०१० चे परिपत्रक २२७

## आकृती, तक्ते व आलेख

### आकृती

२.१- महाराष्ट्रातील सहकारी पतपुरवठा संस्थांची रचना ४४

### तक्ते :

| | | |
|---|---|---|
| २.१ | महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती | ४१ |
| २.२ | महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती (क्षेत्रनिहाय) | ४३ |
| ६.१ | कायम सभासद | १३० |
| ६.२ | वसूल भागभांडवल | १३४ |
| ६.३ | कर्जपुरवठा | १३९ |
| ६.४ | ठेवी | १४३ |
| ६.५ | उभारलेले कर्ज (उचललेले कर्ज) | १४७ |
| ६.६ | गुंतवणूक | १५० |
| ६.७ | उत्पन्न | १५४ |
| ६.८ | खर्च | १५७ |
| ६.९ | नफ्याची स्थिती | १५९ |
| ६.१० | लाभांश म्हणून वाटलेली रक्कम | १६३ |
| ६.११ | लेखापरीक्षक | १६७ |
| ६.१२ | स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | १६९ |
| ६.१३ | स्वनिधीमधील वाढीचे शेकडा प्रमाण | १७२ |

६.१४ ठेवींमधील वाढीचे शेकडा प्रमाण १७५
६.१५ निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण १७८
६.१६ व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण १८१
६.१७ ठेवीचे गुंतवणूकीशी शेकडा प्रमाण १८३
६.१८ थकबाकीचे शेकडा प्रमाण १८६
६.१९ सी डी रेशो (ठेव कर्जाचे प्रमाण) १८९

**आलेख :**

६.१ कायम सभासद १३१
६.२ वसूल भागभांडवल १३५
६.३ कर्जपुरवठा १४०
६.४ ठेवी १४४
६.५ उभारलेले कर्ज (उचललेले कर्ज) १४८
६.६ गुंतवणूक १५१
६.७ उत्पन्न १५५
६.८ खर्च १५८
६.९ नफ्याची स्थिती १६०
६.१० लाभांश म्हणून वाटलेली रक्कम १६४
६.११ स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण १७०
६.१२ स्वनिधीमधील वाढीचे शेकडा प्रमाण १७३
६.१३ ठेवींमधील वाढीचे शेकडा प्रमाण १७६
६.१४ निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण १७९
६.१५ व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण १८२
६.१६ ठेवीचे गुंतवणूकीशी शेकडा प्रमाण १८४
६.१७ थकबाकीचे शेकडा प्रमाण १८७

# प्रकरण पहिले

## सहकारी चळवळीचा इतिहास

**प्रस्तावना**

१.१ सहकार अर्थ

१.२ सहकाराची वैशिष्ट्ये

१.३ सहकाराची गरज

१.४ सहकाराचे महत्त्व

१.५ सहकाराची तत्त्वे

१.६ जागतिक सहकारी चळवळीचा इतिहास

१.७ आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना

१.८ भारतातील सहकारी चळवळीचा इतिहास

१.९ स्वातंत्र्यपूर्व काळ

१.१० सहकार कायदा – १९०४

१.११ सहकार कायदा – १९१२

१.१२ मॅक्लेगन समिती

१.१३ अनियोजित विस्ताराचा कालखंड (१९१९ ते १९२९)

१.१४ एकत्रिकरण व पुन:र्रचनेचा कालखंड (१९३० ते १९३८)

१.१५ पुनर्विकासाचा कालखंड (१९३९ ते १९४६)

१.१६ स्वातंत्र्योत्तर कालखंड

१.१७ नियोजनपूर्व काळ

१.१८ नियोजन काळातील सहकारी चळवळ

१.१९ समारोप

संदर्भ

# प्रकरण पहिले

# सहकारी चळवळीचा इतिहास

## प्रस्तावना

सहकारी तत्त्व हे मानवी संस्कृती इतकेच पुरातन असून जगातील सर्व प्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये सहकाराने आपला ठसा उमटवला आहे. भारतासारख्या देशातही लोकशाही समाजवाद, समाजरचना अधिक बळकट करण्यासाठी सहकार हे एक प्रभावी माध्यम म्हणून उपयोगात आले आहे. त्यामुळेच या विषयाची पार्श्वभूमी समजावून घेण्यासाठी सहकारी चळवळींचा इतिहास जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. या प्रकरणात सहकारी चळवळीचे स्वरुप, सहकाराची भूमिका, सहकाराची तत्त्वे, आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहकारी चळवळीची भूमिका तसेच भारतातील सहकारी चळवळीतील बदल याविषयी थोडक्यात आढावा घेतला आहे.

## १.१ सहकार अर्थ

सहकार म्हणजे समाजातील अनेक लोकांनी सर्वांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी एकत्र येऊन काम करणे होय. सहकारात लोकांना स्वत:च्या ज्या गरजा वैयक्तिकरित्या पूर्ण करता येत नाहीत त्या परस्परसहकार्याने पूर्ण करता येतात. ‘सहकार म्हणजे समाजातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन एकमेकांच्या मदतीने आपल्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी स्थापन केलेली संस्था होय.’[१]

## १.२ सहकाराची वैशिष्ट्ये

वेगवेगळे सहकार तज्ञ, विविध संघटनांनी सहकाराबाबत मांडलेल्या मतांवरुन सहकाराची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतात.

१.२.१ **सहकार ही एक संघटना :** समान उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून व्यक्ती आणि संस्था एकत्र येऊन सहकाराच्या तत्त्वावर संघटना स्थापन

करतात. ज्यामध्ये भांडवलापेक्षा व्यक्ती आणि सदस्यांना अधिक महत्त्व असते.

१.२.२ **समान अधिकार :** सहकारामध्ये सर्व सभासद व्यक्ती आणि संस्थांना समान अधिकार देण्यात आलेला असतो. तेथे कोणीही लहान अगर मोठा नसतो.

१.२.३ **सामाजिक कल्याणाचे उद्दिष्ट:** सामाजिक कल्याण साधणे हे सहकाराचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

१.२.४ **लोकशाही पद्धतीने कारभार :** सहकारी संस्थांचा कारभार हा लोकशाही पद्धतीने चालतो. येथे संस्थेचा कोणताही सभासद लोकशाही पद्धतीने पदाधिकारी होऊ शकतो.

१.२.५ **स्वहिताबरोबर सामाजिक हित :** सभासदांच्या हिताबरोबरच सामाजिक हित साधणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट असते.

१.२.६ **दुर्बल घटकांच्या संस्था :** समाजातील दुर्बल घटक एकत्र येऊन परस्पर सहकार्याने सहकारी संस्थांचा विकास करतात.

१.२.७ **ऐच्छिक सभासदत्त्व :** समान दर्जा असणाऱ्या व्यक्ती स्वखुशीने एकत्र येऊन संस्था स्थापन करतात. कोणत्याही व्यक्तीवर सभासद होण्यास दबाव आणला जात नाही.

१.२.८ **व्यापारी तत्त्वावर स्थापना :** या संस्थांचे सभासद स्वेच्छेने एकत्र आलेले असतात व स्वहिताबरोबर समाजहिताचाही विचार करतात. परंतु या संस्था धर्मदाय संस्थाप्रमाणे इतरांच्या आर्थिक सहकार्यावर चालत नाहीत. तर या संस्था जो व्यवसाय करतात त्यामध्ये तोटा होऊ नये याची काळजी घेतात. थोडक्यात या संस्था व्यापारी दृष्टीनेही विचार करतात.

१.२.९ **ना नफा ना तोटा या तत्त्वांवर सेवा :** सहकारी संस्था आपल्या सभासदांना सेवा पुरविण्यासाठी स्थापन झालेल्या असतात. मग आपल्याच सभासदांकडून त्या नफा कसा घेणार? फक्त पुरविलेल्या सेवेची किंमत वसूल व्हावी एवढीच मर्यादित अपेक्षा असते.

१.२.१० **मध्यस्थींना स्थान नाही :** सहकारी संस्थांच्या कारभारात मध्यस्थी किंवा दलालांना स्थान दिले जात नाही. सहकारी संस्था या स्वत: उत्पादक व उपभोक्ता यातील दुवा म्हणून काम करतात. त्यामुळेच संस्थेच्या सभासदांना कमीत कमी किंमतीत वस्तू आणि सेवा पुरविल्या जातात.

१.२.११ **बाह्य व्यक्तींचा हस्तक्षेप नाही :** सहकारी संस्थांचा कारभार (राज्य) सरकारच्या नियमानुसार व सभासदांनी ठरविलेल्या ध्येयधोरणांनुसार चालतो. या कारभारात बाहेरील व्यक्तींचा हस्तक्षेप मान्य केला जात नाही.

१.२.१२ **परस्परांस सहकार्य करण्याची भावना :**परस्परांच्या सहकार्यावरच आर्थिक प्रश्नांची सोडवणूक होऊ शकते. कोणाचेही शोषण न करता सर्वांनी एकमेकांना सहकार्य करावे ही भावना सहकारी संस्थामार्फत रुजविली जाते.

१.२.१३ **निकोप आणि विधायक स्पर्धा :** भांडवलशाही संस्थांचा मुख्य उद्देश हा अधिकाधिक नफा मिळवणे हा असल्याने भांडवलशाही संस्थांमध्ये गळेकापू स्पर्धा दिसून येते. याउलट सहकारी संस्था सभासदांच्या हिताबरोबरच समाजहिताकडेही लक्ष देतात. 'जगा आणि जगू द्या' हे त्यांचे तत्त्व असते. सहकारी संस्थांमधील स्पर्धा ही नेहमी निकोप आणि विधायक असते.

१.२.१४ **एक प्रकारची सामाजिक आणि आर्थिक चळवळ :** सहकारी संस्था स्थापन करताना दुर्बल घटक एकत्र येऊन संस्थांची स्थापना करतात. समाजातील या संस्थांमुळे दुर्बल घटकांची आर्थिक परिस्थिती सुधारते. त्यांचे समाजातील स्थान उंचावण्यास मदत होते. म्हणजेच सहकारी संस्थामुळे आर्थिक आणि सामाजिक विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो.[२]

## १.३ सहकाराची गरज

'एकमेका सहाय्य करु। अवघे धरु सुपंथ' या उक्तीप्रमाणे एकमेकांना मदत करणे म्हणजेच सहकार. सहकार्य ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे. अगदी माणूस रानटी अवस्थेत असतानापासून मानवाच्या व्यवहारातून सहकार जाणवतो. उदा.टोळी करुन राहणे, एकत्रित शिकारीला जाणे या प्रत्येक हालचालींमधून मानवाची नैसर्गिक सहकार्याची भावना दिसून येते. तसेच प्राणी, पक्ष्यांमध्येही सहकार्याची भावना दिसून येते. मुंग्या आणि मधमाशांचे जीवन तर स्वाभाविक व उत्स्फूर्त सहकाराचे उत्तम उदाहरण आहे.

आपण एकमेकांस सहाय्य केले तर कोणतेही काम त्वरित आणि चांगल्या प्रकारे पूर्ण करता येते, म्हणून मानवामध्ये सहकार्याची भावना वाढीस लागणे सर्वांच्या हिताचे आहे. तरच माणूस त्याचे दैनंदिन जीवन सुखमय, सुकर करु शकेल आणि मानवी जीवनाची विकासाच्या दिशेने वाटचाल होईल.[३]

## १.४ सहकाराचे महत्त्व

सहकार हे आर्थिक विकासाचे एक साधन आहे. नियोजनकारांनी देशाच्या आर्थिक विकासासाठी सहकाराचा अंगीकार केला. सहकारी संस्थांचा देशाच्या आर्थिक विकासामध्ये महत्त्वाचा सहभाग आहे. सहकाराचे महत्त्व सहकारापासून मिळणाऱ्या आर्थिक व सामाजिक फायद्यावरुन लक्षात येते.

कमी किंमतीत उत्कृष्ट दर्जाच्या वस्तूंचा पुरवठा करणे, सावकारी पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता, संपत्तीचे समान वाटप, उत्पादन व उत्पन्नात वाढ, मक्तेदारीस प्रतिबंध, मध्यस्थ, दलाल व व्यापारी यांचे उच्चाटन, शेती क्षेत्राचा विकास, औद्योगिक क्षेत्रांचा विकास, रोजगार निर्मितीस सहाय्य, लोकांच्या राहणीमानात सुधारणा, शेतीपूरक व्यवसायांना चालना, शेतीमालास योग्य भाव मिळणे शक्य होते. निर्यातीस प्रोत्साहन मिळून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. असे आर्थिक फायदे सहकारी क्षेत्रामुळे मिळतात.

सहकाराने सामाजिक लाभही होतात. सहकारामुळे परस्पर सहाय्यातून स्वयंसाहाय्य साधत स्व-सामर्थ्याची जाणीव सभासदांना होते. समस्यांची सामुदायिकपणे सोडवणूक करणे, व्यवसायाचा मालकी हक्क मिळतो. सामाजिक बदल घडून येतात. लोकशाहीचे शिक्षण मिळते. शिक्षणाच्या प्रचारास उत्तेजन मिळते. सभासदांमधील नेतृत्त्व गुणांचा विकास होतो.

सहकारी संस्थांच्या निर्मितीमुळे मक्तेदारी पद्धतीस आळा बसतो. तसेच उद्योजकांमधील गळेकापू स्पर्धेस पायबंद घालता येतो. सहकारी चळवळ ही समाजाच्या आर्थिक प्रगतीसाठी आणि समाजातील दुर्बल घटकांना आर्थिक न्याय देण्यासाठी प्रयत्नशील असते.[४]

## १.५ सहकाराची तत्त्वे

सहकार चळवळीची उद्दिष्टे गाठण्यासाठी सहकाराची तत्त्वे समजून घेणे महत्त्वाचे ठरते. किंबहुना सहकार चळवळीचे यश-अपयश हे सहकारी तत्त्वांची योग्य समज आणि त्यांची अंमलबजावणी कशी झाली यावरच अवलंबलेले आहे. सहकारी संस्थांचे कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी काही मार्गदर्शक नियम तयार केलेले असतात आणि या नियमांनाच सहकाराची तत्त्वे म्हणतात.

शास्त्रज्ञ जी म्लाडेन्झ यांच्या मते सहकाराच्या पद्धतींचे तीन प्रकारात वर्गीकरण करता येईल.

१. रॉश्डेल पद्धती २. रायफझन पद्धती ३. शुल्झ डेलिश पद्धती

या तीनही पद्धती एकमेकांपासून पूर्णपणे वेगळ्या आहेत. या तीनही पद्धतींनी ग्राहक, शेतकरी व व्यापारी वर्गांच्या सहकारी संस्थांबाबत जे नियम मांडले त्या नियमांना सहकाराची तत्त्वे म्हणता येईल.

इंग्लंडमधील रॉश्डेल येथे औद्योगिक क्रांतीनंतर गरीब विणकरांना एकत्र येण्याची संधी मिळाली आणि या विणकरांनी जीवनावश्यक वस्तू स्वस्त मिळाव्यात म्हणून सन १८४४ मध्ये ग्राहक सहकारी संस्थेची स्थापना केली. त्या ग्राहक सहकारी संस्थेच्या संचालनासाठी त्यांनी नियम केले आणि या नियमांनाच पुढे सहकाराची तत्त्वे म्हणून मान्यता मिळाली.

१९ व्या शतकात जर्मनीमध्ये शेतकरी व शेतमजूरांची कर्जबाजारीपणाची समस्या गंभीर झाली होती. याच काळात रायफझन यांनी शेतकरी वर्गाला चालना मिळण्यासाठी शेतकरी शेती क्षेत्रात सहकारी सोसायट्यांची स्थापना केली आणि या सोसायट्यांच्या कामकाजासंदर्भात जे काही नियम केले होते त्या नियमांनाच रायफझनची तत्त्वे असे म्हणण्यात आले.

तसेच शहरी भागातील जनतेची आर्थिक गरज पूर्ण करण्यासाठी शुल्झ यांनी शहरी भागात सहकारी तत्त्वांवर नागरी बँक स्थापन केली आणि या बँकेचे व्यवस्थापन सुरळीत चालण्यासाठी जी नियमावली तयार करण्यात आली त्या नियमांनाच शुल्झ डेलिशची सहकाराची तत्त्वे म्हणतात.

अशाप्रकारे रॉश्डेल, रायफझन व शुल्झ डेलिश यांची सहकाराची तत्त्वे तत्कालीन परिस्थितीला अनुसरुन होती. पुढे सहकारी चळवळीचा विकास होत असताना या तत्त्वांमध्ये बदल करण्याची गरज आहे का? याची पाहणी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने १९६४ साली सहकार तज्ञ

श्री.द.गो.कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीने सहकारी तत्त्वांची पुनर्मांडणी करुन सन १९६६ मध्ये आपला अहवाल सादर केला व त्यानुसार सहकाराची खालील तत्त्वे मांडण्यात आली.

### १.५.१ ऐच्छिक व खुले सभासदत्त्व

याचा अर्थ सहकारी संस्थेचे सभासदत्त्व सर्व व्यक्तींना ऐच्छिक व खुले असावे. संस्थेचे सभासदत्त्व स्विकारण्याबाबत कोणावरही सक्ती केली जाऊ नये. तसेच लिंग, जात, धर्म यांचा विचार केला जाऊ नये. तसेच एखाद्या व्यक्तीला सभासदत्त्व रद्द करुन घ्यावेसे वाटल्यास त्याबाबत त्या व्यक्तींवर कोणत्याही प्रकारचे दडपण येऊ नये. मात्र जी व्यक्ती संस्थेच्या ध्येयाच्या विरोधात काम करत असेल तर अशा व्यक्तीस संस्थेचे सभासदत्त्व नाकारणे किंवा रद्द करणेच उचित ठरते. तसेच स्वार्थी व चारित्र्यहिन व्यक्तींमुळे संस्थेच्या ध्येय, उद्दिष्टांना धोका पोहचत असल्यास अशा व्यक्तींना सभासदत्त्व नाकारता येते. समान गरजा आणि उद्दिष्टे असणाऱ्या व्यक्तींनी एकत्र येऊन संस्था स्थापन करणेच अपेक्षित असते.[५]

### १.५.२ लोकशाही व्यवस्थापन

सहकारी संस्थेच्या सभासदांमधून लोकशाही पद्धतीने जे सभासदनिवडून जातील अशा निवडून आलेल्या संचालकांमार्फत संस्थेच्या कारभारावर देखरेख ठेवली जाईल. तसेच प्रत्येक सभासदास व्यक्ती म्हणून प्रत्येकी एकच मत देण्याचा अधिकार आहे. मतदान करताना व्यक्तीला स्वत:च मतदान करावे लागते. त्यासाठी कुणासही प्रतिनिधी म्हणून पाठवता येत नाही. मताधिकाराचा व्यक्तीने खरेदी केलेल्या भागभांडवलांशी किंवा त्याच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीशी संबंध नसतो. संस्थेचा कारभार करताना संचालक मंडळास सर्वसाधारण सभेकडून त्याबाबतचे अधिकार मिळाले पाहिजेत. संस्थेच्या कारभाराबाबतचा कोणताही निर्णय बहुमताने मंजूर झाला पाहिजे. सहकारी संस्थेचा दैनंदिन कारभार संचालक मंडळ पाहत असले तरी त्याबाबतची माहिती मिळविण्याचा अधिकार प्रत्येक सभासदास असतो. तो आवश्यक कागदपत्रांची

पाहणी करु शकतो. संस्थेच्या कारभाराविषयी सभासदांना माहिती पुरविण्याची जबाबदारी ही व्यवस्थापकीय समितीची असते. तसेच संस्थेच्या कारभाराच्या दृष्टीने सर्व सभासदांना शिक्षण देण्याची जबाबदारीही सहकारी संस्थेची असते[६].

### १.५.३ भांडवलावर मर्यादित व्याज

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत वर्गसंघर्ष निर्माण करणारे विष म्हणून भांडवलाचा उल्लेख केला जातो. कारण भांडवलशाही अर्थव्यवस्थेत व्यक्तीपेक्षा भांडवल श्रेष्ठ असल्याने अन्याय, पिळवणूक, विषमता वाढीस लागते. याउलट सहकारी अर्थव्यवस्थेत व्यक्ती महत्वाची असते. भांडवलास मात्र दुय्यम स्थान असते. कारण सहकार चळवळीत भांडवलावर संपूर्ण नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. म्हणूनच सहकार चळवळ प्रणेत्यांनी भांडवलावर व्याज देऊ नये असे मत मांडले. परंतु व्यावहारिकदृष्ट्या बिनव्याजी भांडवल गोळा करणे अशक्य होते. तेव्हा आवश्यकता म्हणून व्याज द्यावे अशी भूमिका अनुभवातून सहकार तज्ञांनी घेतली. कारण भांडवल हा अत्यंत महत्त्वाचा उत्पादक घटक आहे. तेव्हा भांडवल गोळा करण्यासाठी व्याज देण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. लॅम्बर्ट यांच्या मते सहकार तत्त्वानुसार व्याज देणे योग्य नाही तसेच बचत वाढविण्यासाठी व्याज दिले जात नाही तर फक्त आवश्यकतेपोटी व्याज दिले जाते.

यासंदर्भात प्रा.डी.जी.कर्वे यांचे विचार मार्गदर्शक आहेत, त्यांच्या मते,''सहकारी संस्था या आपल्या सभासदांकडून किंवा इतर व्यक्तींकडून कर्जाऊ रक्कम घेत असल्यास आणि त्यावर योग्य व्याजाच्या दराने मोबदला देत असल्यास सहकार मूल्याचा त्याग केला असे समजण्याचे कारण नाही. कारण कोणत्याही सहकारी व्यवसायात भांडवलाची मागणी सतत वाढणार आहे आणि ते मिळविण्यासाठी व्याज देणे आवश्यक ठरणार आहे.''

सारांश, व्याज देणे आवश्यक असले तरी ते मर्यादित असावे हा विचार मान्य झाल्याचे दिसते. परंतु मर्यादित व्याज म्हणजे काय? ते कसे ठरवितात? असे

अनेक प्रश्न उपस्थित होतात. कारण 'मर्यादित व्याज' या शब्दाचा निश्चित अर्थ सांगता येत नाही. परंतु भांडवलावर व्याज देताना काही बाबींचा विचार करणे आवश्यक ठरते.

अ) सहकारी संस्थेत नफा मिळविण्याची प्रवृत्ती वाढणार नाही म्हणून मर्यादित व्याज.

ब) भांडवलाचे वर्चस्व वाढणार नाही म्हणून मर्यादित व्याज.

क)आर्थिक विषमता वाढणार नाही म्हणून मर्यादित व्याज.

यावरुन असा निष्कर्ष निघतो की, सहकारी संस्थांनी मर्यादित का होईना व्याज दिले पाहिजे तरच भांडवलपुरवठा होऊ शकेल. पण सन १९६६ मधील आय.सी.ए.कमिशनने स्पष्ट मत व्यक्त केले की,'व्याज दिले पाहिजे हे मान्य सहकार तत्त्व नाही. या तत्त्वानुसार व्याज द्यायचे झाल्यास ते मर्यादित व निश्चित असावे.''[७]

### १.५.४ अधिक्याचे लाभांशाचे न्याय वाटप

सहकारी संस्थेने प्रामुख्याने आपल्या सभासदांशीच व्यवहार करावेत अशी अपेक्षा असते. भांडवलशाहीप्रमाणे फक्त नफा मिळविणे हा सहकारी संस्थांचा मुख्य उद्देश नसून सभासदांना व एकूण समाजाला सेवा देणे हा उद्देश असतो. असे असूनसुध्दा सहकारी संस्थेला आपल्या व्यवहारातून नफा मिळतो. सहकारी संस्था नफा मिळावा म्हणून व्यवसाय करीत नसतात. म्हणून सहकारी संस्थेला झालेला नफा 'नफा' न म्हणता त्याला 'वाढावा' किंवा 'आधिक्य' या नावाने संबोधतात. वर्षाच्या शेवटी सहकारी संस्थांचा आवश्यक तो खर्च भागवून जी शिल्लक राहते, त्याची विभागणी कशी करावी याविषयी रोश्डेल तत्त्व आदर्श तत्त्व मानले जाते. या तत्त्वाप्रमाणे 'सहकारी संस्थेने आपल्या नफ्याची रक्कम सर्व सभासद ग्राहकांच्यात त्यांनी सहकारी संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात विभागली जाते.' हे आधिक्य लाभांशाच्या स्वरुपात सभासदांना दिले जाते. हा लाभांश दर सर्वसाधारणपणे १५ टक्के पर्यंत असतो.[८]

### १.५.५ सहकारांतर्गत सहकार

सहकार्याची भावना केवळ लोकांमध्येच निर्माण होऊन चालत नाही तर ती सहकारी संस्थांमध्ये देखील असली पाहिजे. सहकाराच्या विकासासाठी सहकारी संस्थांमध्ये परस्पर सहकार्य असते यालाच सहकारांतर्गत सहकार म्हणतात.

काही सहकारी संस्था नफा मिळविणे, राजकीय व इतर हितसंबंधातून आपापसात स्पर्धा करतात व त्यातून गळेकापू स्पर्धेची प्रवृत्ती वाढत जाते. अशी स्पर्धा सहकाराच्या विनाशास कारणीभूत ठरणारी असते. म्हणून सहकारी संस्थांमध्ये सहकार्याची भावना वाढीस लागणे आवश्यक असते. सर्व सहकारी संस्थांनी स्थानिक, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर एकमेकांस सहकार्य केले पाहिजे, तरच सहकाराची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आणि सहकाराच्या विकासासाठी त्याचा उपयोग होईल.[९]

## १.५.६ रोखीचा व्यवहार

रोश्डेलच्या सहकारी तत्त्वानुसार रोखीचे व्यवहार तत्त्व म्हणून स्विकारले होते. जेव्हा सभासदांना वस्तू व सेवा उधारीने पुरविल्या जातात तेव्हा त्यांच्याकडून त्यांच्या उत्पन्नापेक्षा जास्त प्रमाणात वस्तू व सेवांची मागणी होते. त्यामुळे सभासदांकडून वस्तूची किंमत वेळेवर वसूल होत नाही आणि त्याचाच परिणाम म्हणून सहकारी संस्थांची आर्थिक परिस्थिती खालावते. तसेच उधारीच्या व्यवहारामुळे मागणीचे प्रमाण वाढत जाते आणि वस्तू व सेवांच्या किंमती वाढू लागतात व अर्थव्यवस्थेत अस्थैर्य निर्माण होते. परिणामी उधारीच्या व्यवहारामुळे अनेक संस्था बुडित निघाल्याची उदाहरणे आहेत. सन १९६६ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने 'रोखीचे व्यवहारतत्त्व अनावश्यक तत्त्व आहे' म्हणून म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या अधिवेशनात तज्ञांनी मांडलेल्या मतानुसार सामान्य माणसास काही वस्तू रोख पैसे देऊन विकत घेणे शक्य नसते. त्यामुळे अशा व्यक्तींना उधारीने वस्तू

दिल्याने त्याची गरज भागू शकते आणि सभासदाचे हित पाहणे हे सहकारी संस्थेचे कर्तव्य आहे.'[१०]

### १.५.७ राजकीय व धार्मिक तटस्थता

राजकीय व धार्मिक तटस्थता हे एक महत्त्वाचे तत्त्व सहकारामध्ये मानले जाते. सहकारी संस्था ही एक ऐच्छिक संघटना असून संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो. प्रत्येक सहकारी संस्थेने स्वत:ला राजकारण व धर्म यांपासून अलिप्त ठेवले पाहिजे असे हे तत्त्व सांगते. सहकारी संस्थांमध्ये जर राजकारण व धर्म यांचा शिरकाव झाला तर सभासदामध्ये मतभेद निर्माण होऊन कालांतराने संस्था बंद पडतील आणि म्हणूनच सहकारी संस्था या धर्म व राजकीय पक्षापासून अलिप्त असल्या पाहिजे. तरच संस्थेचा विकास होण्यास मदत होईल.[११]

### १.५.८ सहकार शिक्षण

सहकारी संस्था ही प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनी एकत्र येऊन स्थापन केलेली असते. त्यामुळे यामधील बहुतांश सभासद हे अशिक्षित असतात. म्हणून सहकारी संस्थांनी आपल्या सभासदांना सहकाराची तत्त्वे, उद्देश, मूल्ये, उपविधी, संस्थेचे व्यवहार, सहकार कायदा इत्यादींची माहिती व्हावी यासाठी सहकाराचे शिक्षण देणे आवश्यक ठरते. यासाठी सहकारी संस्थांनी सभा, व्याख्यान, कार्यशाळा घेऊन सभासद, सेवक, पदाधिकारी, संचालक आणि सामान्य जनता अशा विविध घटकांना सहकारी संस्थेच्या कारभाराविषयी माहिती, सहकाराचे फायदे, संस्थेचे व्यवहार, सहकार कायदा याविषयी माहिती देण्यासाठी सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची तरतूद करणे आवश्यक असते.

रोश्डेल प्रणेत्यांनी या तत्त्वाला विशेष महत्व दिले होते. तसेच नफ्यातील २.५ टक्के रक्कम सहकाराच्या शिक्षणावर खर्च करण्याची तरतूद ही १८५३ च्या कायद्यात करण्यात आली आणि म्हणून सहकारी शिक्षण हे एक मुलभूत तत्त्व मानले गेले आहे.[१२]

### १.५.९ स्वावलंबन

सहकारी संस्थेने आपल्या सभासदांना स्वावलंबी होण्यासाठी मदत केली पाहिजे. प्रा.द.गो.कर्वे यांच्या मते, ‘‘स्वावलंबन आणि परस्परांना सहकार्य करणे यात सहकारी चळवळीचा खरा अर्थ आहे. सहकारी संस्थांचे बहुतेक सभासद आर्थिकदृष्ट्या दुर्बल असतात. त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी सहकारी संस्थेची मदत आवश्यक असते. तसेच संस्था भांडवलाबाबत स्वावलंबी झाली पाहिजे. जी संस्था स्वत: स्वावलंबी बनते ती आपल्या सभासदांना स्वावलंबी बनवण्यासाठी मदत करु शकते. ’’[१३]

### १.५.१० सेवा तत्त्व

सहकारी संस्थेचे व्यवहार हे ‘ना नफा ना तोटा’ या तत्त्वावर चालतात. आपल्या सभासदांचे आर्थिक कल्याण करणे एवढाच हेतू सहकारी संस्थांचा असतो. त्यासाठी या संस्था कमीत कमी किंमतीत चांगल्या प्रकारच्या वस्तू पुरवण्याचा प्रयत्न करतात. सहकारी संस्था ‘ना नफा ना तोटा’ या तत्त्वावर चालत असल्या तरीही संस्थेचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी आणि संस्थेच्या विकासाच्या योजना राबविण्यासाठी संस्था काही प्रमाणात नफा मिळवित असतात. परंतु नफा मिळविताना ग्राहकांची पिळवणूक होणार नाही हे विचारात घेतले जाते.[१४]

### १.५.११ काटकसरीचे तत्व

हे तत्त्व प्रामुख्याने पतपुरवठा व सहकारी संस्थांना लागू पडते. कारण प्रत्येक सभासदास काटकसरीचे व बचतीचे महत्त्व पटल्याशिवाय सहकारी संस्थेजवळ पैसा साठणार नाही. संस्थेजवळील बचत वाढल्याशिवाय संस्थेला आपल्या सभासदांना मदत करता येणार नाही. काटकसर या शब्दाचा अर्थ म्हणजे आपले व्यवहार हे पूर्वनियोजित व काटकसरीचे असावेत. तसेच अनावश्यक खर्च टाळणारे असावेत.[१५]

### १.५.१२ सामाजिक मालकी

सहकारी संस्था ही जरी तिच्या सभासदांच्या मालकीची असली तरी कोणत्याही एका सभासदास या संस्थेच्या मालमत्तेवर आपला वैयक्तिक अधिकार सांगता येत नाही. सहकारी संस्थेची मालमत्ता ही सर्व सभासदांच्या मालकीची म्हणजेच समाजाच्या मालकीची असते. म्हणजेच सहकारी संस्थेच्या मालमत्तेवर तिच्या सभासदांचा अधिकार असला तरी तो अतिशय मर्यादित प्रमाणात असतो.[१६]

### १.५.१३ प्रामाणिक व्यवहार

प्रामाणिक व्यवहाराशिवाय कोणतीही व्यक्ती आणि संस्था विकासाच्या दिशेने वाटचाल करु शकत नाही. सहकारी संस्थेचा कारभार निवडून दिलेल्या संचालकामार्फत केला जातो. संचालकांच्या मदतीस सेवक वर्गही असतो. संस्थेच्या सभासदांनी संस्थेच्या संचालकांवर विश्वास व्यक्त केलेला असतो आणि संस्थेचे कामकाज करताना त्या विश्वासाला तडा जाणार नाही याची खबरदारी घ्यावी लागते. कारण ज्या संस्थेचा व्यवहार प्रामाणिकपणे होतो त्याच संस्थेचा विकास चांगल्या रितीने होतो.[१७]

### १.५.१४ एकता व बंधुभाव

सहकारी संस्थेच्या विकासासाठी संस्थेच्या सभासदांमध्ये एकता व बंधुता या मूल्यांची जोपासना झाली पाहिजे. तरच संस्थेचा विकास होऊ शकतो. अन्यथा या मूल्यांअभावी सभासदांमध्ये गटबाजीचे राजकारण चालू राहते आणि संस्थेच्या विकासापेक्षा गटाचे हित सांभाळले जाते.[१८]

### १.५.१५ स्वायत्तता

प्रत्येक संस्थेला आपल्या व्यवहारांबाबतचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असते. संस्थेचे काही व्यवहार असे असतात की संस्थेच्या आर्थिक फायद्याकरीता त्वरीत निर्णय घ्यावे लागतात आणि हे निर्णय घेण्याचा अधिकार संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना असला पाहिजे तरच संस्थेचे हित सांभाळले जाईल.[१९]

### १.५.१६ प्रसिध्दी तत्त्व

सहकारी संस्थेच्या विकासासाठी केवळ भागभांडवल असून चालत नाही तर त्याबरोबरच या संस्थांच्या विकासासाठी जनतेचा विश्वास संपादन करावा लागतो. त्यासाठी संस्थेच्या व्यवहारामध्ये पारदर्शकता हवी. संस्थेच्या व्यवहारांची माहिती जनतेपर्यंत पोहोचायला हवी. म्हणून सहकारी संस्थांचे व्यवहार वेळोवेळी प्रसिध्द झाले पाहिजेत. त्यामध्ये संस्थेच्या संचालकांची व सभासदांची नावे, भागभांडवल, घेतलेले कर्ज, नफा-तोटा इत्यादी प्रसिध्दीमुळे संस्थेच्या सेवक व संचालक मंडळावर आपोआप दडपण निर्माण होते. परिणामी संस्थेची विकासाच्या दिशेने वाटचाल होऊ शकते. म्हणूनच सहकारी संस्थांच्या व्यवहाराची माहिती वेळोवेळी प्रसिध्द झाली पाहिजे.[२०]

## १.६ जागतिक सहकारी चळवळीचा इतिहास

भांडवलशाहीचा उगम युरोप खंडामध्ये १८ व्या शतकात झाला. याचे कारण १८ व्या शतकात झालेली औद्योगिक क्रांती होय. परिणामी उत्पादन वाढले, बाजारपेठांचा विस्तार झाला. औद्योगिकरणामुळे भांडवलशाहीचा विस्तार झाला. भांडवलशाहीच्या नफेखोरी प्रवृत्तीमुळे ग्राहकांचे शोषण होऊ लागले. वस्तूंचा दर्जा, किंमत पुरवठा याबाबत ग्राहकांची पिळवणूक होऊ लागली. यावर उपाय शोधण्याचे प्रयत्न सुरु झाले. त्यातूनच समान हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी पुढे येऊन परस्पर सहकार्यातून समान हित साध्य करण्यासाठी सहकाराचा आधार घेतला.

इंग्लंड, जर्मनी, चीन, जपान, स्वीडन, डेन्मार्क, कॅनडा, इटली, आयर्लंड, इस्त्रायल अशा विविध राष्ट्रांमध्ये सहकारी चळवळ सुरु झाली. औद्योगिक क्रांतीच्या सुमारास सहकारी चळवळीचे बीज सर्वप्रथम इंग्लंडमध्ये रोवले गेले. इंग्लंडमध्ये १९ व्या शतकात रॉबर्ट ओवेन यांनी कामगारांच्या ग्राहक सहकारी संस्था स्थापन केल्या

म्हणून रॉबर्ट ओवेन यांना 'सहकारी चळवळीचे पितामह' मानले जाते. इंग्लंडमधील सहकारी चळवळीला रोश्डेल प्रणेते असे म्हटले जाते. कारण इंग्लंडमधील रॉश्डेल येथील विणकरांनी एकत्र येऊन ऑगस्ट १८४४ मध्ये सहकारी तत्त्वावर आधारित 'रॉश्डेल इक्वीटेबल पायोनिअर्स सोसायटी' या संस्थेची स्थापना केली.

याच कालखंडात जर्मनीमध्ये सहकारी पतपुरवठा चळवळ सुरु झाली. तसेच या काळात कॅनडा, चीन या देशामध्येदेखील शेती सहकारी संस्थांच्या माध्यमातून सहकारी चळवळ सुरु झाली. रशियामध्ये 'सामुदायिक शेती' चा विकासही याच सुमारास झाला. डेन्मार्क या देशात दुग्ध सहकारी संस्थांच्या स्थापनेतून सहकारी चळवळ सुरु झाली. स्वीडनमध्ये ग्राहक सहकारी संस्था तर जपानमध्ये शेती संस्थांच्या स्थापनेतून सहकारी चळवळीस सुरुवात झाली.[२१]

## १.७ आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना

आंतराष्ट्रीय सहकारी संघटना (International Co-operative Alliance) ही विविध देशातील सहकारी संघाचा महासंघ आहे. १८९५ मध्ये लंडन येथे या महासंघाची स्थापना झाली. सहकारी तत्त्वांचे पालन करणाऱ्या सहकारी संस्थांचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्त्व करणे, सहकार चळवळीस प्रेरणा देणे, सहकार तत्त्वे व पद्धतीचा प्रसार करणे, जागतिक स्तरावर सहकारी संस्थांचे संबंध सुदृढ करणे, सहकारी संस्थांच्या हितसबंधांचे रक्षण करणे, शांतता व सुरक्षेसाठी सहकाराच्या माध्यमातून प्रयत्न करणे, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी मदत करणे इत्यादी उद्देशाने या महासंघाची स्थापना करण्यात आलेली आहे.

सहकारी बँका, विमा संस्था, ग्राहक सहकारी संस्थांच्या घाऊक संस्था, इतर सहकारी संस्थांचे राष्ट्रीय संघ, सहकारी संस्थांचे प्रादेशिक संघ इत्यादी संस्थांना या महासंघाचे सभासदत्त्व दिले जाते.

सर्वसाधारण सभांचे आयोजन करणे, सहकार चळवळीचा अभ्यास करणे, जगातील सर्व देशात प्रतिनिधी पाठविणे, सहकार प्रशिक्षणास प्रोत्साहन देणे, सहकार चळवळीच्या समस्यांचा अभ्यास करणे, संयुक्त राष्ट्र संघटनेला सहकार्य करणे इत्यादी कार्ये या संघटनेमार्फत केली जातात.[२२]

## १.८ भारतातील सहकारी चळवळीचा इतिहास

भारतात इतर देशांप्रमाणेच सहकाराचा प्रारंभ ग्रामीण जनतेच्या दारिद्र्यातून व पिळवणुकीतून झाला. देशातील शेतकऱ्यांचा कर्जात जन्म, कर्जात जीवन, कर्जात मृत्यू अशी अवस्था होती. कारण ब्रिटन मधील औद्योगिक क्रांतीचे परिणाम, वसाहत असलेल्या भारतापर्यंत तात्काळ पोहोचले. ब्रिटनमधील कारखान्यातील वस्तू भारताची बाजारपेठ काबीज करीत होत्या व येथील लघु व कुटीर उद्योग क्षीण होत होते. अगोदरच निकृष्ट शेती व त्यातून शेतीवरील भार वाढत होता. ग्रामीण भागात सावकारांचे वर्चस्व वाढत होते. सावकारांकडे जमीन गहाण पडत होती. आपल्याच जमिनीवर शेतकरी मजूर म्हणून राबत होते. ग्रामीण भागात नैराश्य व दैववाद वाढीस लागला होता.

ही समस्या हलकी करण्याच्या दृष्टीने १८८३ मध्ये 'जमीन सुधारणा कायदा' आणि १८८४ मध्ये 'शेतकरी कर्ज कायदा' पास करण्यात आले. परंतु शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाची समस्या सोडविण्यासाठी ते अपुरे वाटू लागले. या दरम्यानच्या काळात भारत सरकारच्या काही अधिकाऱ्यांनी इजिप्तच्या शेतकी बँकांचा अभ्यास करुन त्या धर्तीवर भारतात शेतकी बँक स्थापन करण्याची शिफारस केली. भारतामध्ये शेतीच्या विकासासाठी स्वतंत्र बँकेची स्थापना केली पाहिजे या विचारास बळकटी येत होती. १८८२ मध्ये सर फ्रेडरिक निकोलसन यांनी मद्रास प्रांतात शेतकी बँक स्थापन करण्याची शिफारस केली होती. त्याचवेळी जर्मनीमध्ये रायफझन यांनी सहकारी पद्धतीवर पतपेढ्या सुरु केल्या होत्या. याचकाळात आय.सी.एस.अधिकारी मि.ड्यूपेरनैक्स यांनी उत्तर भारतात ग्रामीण बँकेचा प्रयोग केला. यावर आधारित

Peoples Bank for Northern India हे पुस्तक लिहिले. परिणामी ग्रामीण पतपुरवठ्याच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले गेले.

त्यानंतर १९०० सालात सर एडवर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने सहकारी पद्धतीवरच पतपेढ्या स्थापन करण्यात याव्यात अशी शिफारस केली होती. त्याच शिफारशीच्या आधारे १९०४ मध्ये 'को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटीज ॲक्ट' पास करण्यात आला आणि भारतात सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. त्यानंतर भारतात विविध सहकारी संस्था उदयास आल्या. दुसऱ्या महायुध्दाच्या दरम्यान सहकारी चळवळीला गती प्राप्त झाली.

सहकारी संस्थांची वाढ होत गेली, असे असले तरी स्वातंत्र्यपूर्व काळात सहकारी चळवळीच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले नाहीत. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सहकारी चळवळीला विकासाचे साधन म्हणून महत्त्व प्राप्त झाले. भारताने आर्थिक नियोजनाच्या काळात सहकारी चळवळीचा योजनाबद्ध विकास करण्याचा प्रयत्न केला. आणि सहकारी चळवळीच्या विकासाला खास दिशा दिली.[२३]

## १.९ स्वातंत्र्यपूर्व काळ

भारतातील सहकार चळवळीचा अभ्यास करताना स्वातंत्र्यपूर्वकाळ व स्वातंत्र्योत्तर काळ या दोन भागांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

सरकारने सन १८७५ मध्ये शेतकऱ्यांच्या आर्थिक पाहणीसाठी डेक्कन बंड आयोगाची स्थापना केली होती. त्यानुसार सरकारने १८७९ मध्ये डेक्कन सहकारी मदत कायदा शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्याच्या उद्देशाने संमत केला. १८८३ मध्ये सरकारने शेती सुधारणा कर्ज कायदा करुन शेतकऱ्यांना वार्षिक ६ टक्के दराने दीर्घकालीन पतपुरवठा करण्याची तरतूद केली. सन १८८४ मध्ये शेतकरी कर्ज कायदा संमत केला. या कायद्याद्वारे शेतकऱ्यांना अल्पकालीन कर्जपुरवठा करण्याची तरतूद करण्यात आली. मुंबई प्रांतातील बडोदा येथे भारतातील पहिली सहकारी संस्था ५ फेब्रुवारी १८८९ रोजी स्थापन झाली. प्रा. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांनी 'अन्योन्य

साहाय्यकारी संस्था' या नावाने पहिली पतपुरवठा संस्था स्थापन केली. सर फ्रेडरिक निकोलसन अहवाल (१८९२), ड्युपरनैक्स अभ्यास १९००, एडवर्ड लॉ समिती (१९०१) व दुष्काळ समिती अहवाल १९०१ इत्यादी अहवाल व अभ्यासगट यांच्या शिफारशींवरुन सरकारने सहकारी पतपुरवठा संस्थांसाठी पहिला सहकार कायदा १९०४ मध्ये संमत केला.[२४]

## १.१० सहकार कायदा-१९०४

ब्रिटीश सरकारने भारतातील सहकारी चळवळीस मूर्त स्वरुप देणारा पहिला सहकारी कायदा सर एडवर्ड लॉ यांच्या अहवालाच्या आधारे १९०४ मध्ये संमत केला. शेतकरी, शेतमजूर, दुर्बल घटकांतील व्यक्तींना विकासाची संधी मिळावी म्हणून या कायद्यात तरतूदी केल्या होत्या. त्यामुळे सहकारी संस्थांच्या स्थापनेस प्रेरणा मिळाली. १९०७ मध्ये भारतात एकूण ८४३ सहकारी सोसायट्या स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यांची सभासद संस्था ९०.८४ हजार होती तर खेळते भांडवल २३.७२ लक्ष रुपये होते. या टप्प्यांच्या शेवटच्या वर्षात म्हणजे १९११ साली सोसायट्यांची संख्या ५३२१ झाली तर त्यांचे सभासद ३०५.०६ हजार इतके वाढले आणि भाग भांडवलात २०३.०५ पर्यंत वाढ झाली. १९०४ या कायद्याने पतपुरवठा करणाऱ्या सोसायट्यांनाच मोठ्या प्रमाणात संरक्षण दिले होते. या काळात पतपुरवठा करणाऱ्या सहकारी सोसायट्यांना मदत करणारी एकही मध्यवर्ती बँक स्थापन करण्यात आलेली नव्हती. तसेच सहकारी सोसायट्यांचे सोयीसाठी ग्रामीण व शहरी असे वर्गीकरण करण्यात आले होते. या कायद्याप्रमाणे सहकारी सोसायट्यांची हिशेबतपासणी करण्याचा अधिकार सहकारी निबंधकास देण्यात आला होता. तसेच स्टॅम्प ड्यूटी, नोंदणी फी, इत्यादींमध्ये सूट दिली होती आणि प्राप्तीकर कायद्यातून या सोसायट्यांना वगळण्यात आले होते.[२५]

## १.११ सहकार कायदा – १९१२

१९१२ साली सरकारने दुसरा सहकारी कायदा पास केला. हा कायदा व्यापक स्वरुपाचा होता. या कायद्यानुसार सहकारी तत्त्वावर खरेदी-विक्री संस्था, बँका, गृहनिर्माण संस्था इत्यादी सहकारी संस्थांची स्थापना करण्यास परवानगी देण्यात आली. परिणामी सहकाराचे क्षेत्र व्यापक बनले. १९१२ मध्ये भारतातील सहकारी संस्थांची संख्या ८१७७ इतकी होती. तर त्यांचे सभासद ४.७ लक्ष इतके होते तर त्यांचे भाग भांडवल ३३५.७ लक्ष रुपये इतके होते. सन १९१८ मध्ये सोसायट्यांची संख्या २५१९२ इतकी झाली. सभासद संख्या १०.९ लक्ष इतकी झाली. खेळते भांडवल हे ७६०.०९ लक्ष इतके झाले. १९०४ च्या कायद्यातील उणिवा दूर करुन १९१२ चा कायदा करण्यात आला होता. या कायद्यानुसार सहकारी सोसायट्यांची मध्यवर्ती बँकेची स्थापना करण्याची शिफारस केली गेली. तसेच कोणत्याही सभासदास सहकारी संस्थेच्या एकूण भागभांडवलापैकी जास्तीत जास्त भागभांडवल किंवा १००० रुपयापर्यंतचे भागभांडवल खरेदी करता येईल. तसेच १९०४ च्या कायद्यामध्ये सहकारी सोसायट्यांच्या नोंदणीसाठी करण्यात आलेली सक्ती या कायद्याने रद्द करण्यात आली. तसेच सर्व सोसायट्यांना नोंदणी फी, स्टॅम्प ड्युटी माफ करण्यात आली. त्यांना प्राप्तीकर कायद्यातून वगळण्यात आले. १९१२ च्या सहकार कायद्यामुळे सहकारी संस्थांच्या संख्येत वेगाने वाढ होत गेली.[२६]

## १.१२ मॅक्लेगन समिती

भारतातील सहकारी संस्थांचा विकास योग्य दिशेने होत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी १९१४ साली केंद्र सरकारने सर एडवर्ड मॅक्लेगन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने आपला अहवाल १९१५ मध्ये सादर केला. या अहवालात प्रथम भारतातील सहकारी चळवळींचे दोष दाखवून दिलेले आहेत व ते दोष दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविलेल्या आहेत.

मॅक्लेगन समितीला भारतीय सहकार चळवळीत पुढील दोष आढळून आले.

भारतातील सहकारी चळवळ नुकतीच १९०४ मध्ये सुरु झाली आणि संस्थांच्या निकोप विकासाचा विचार न करता घाईगर्दीने अनेक सहकारी संस्था स्थापन झाल्या, बहुतेक सहकारी संस्था सरकारच्या मदतीने आणि पुढाकाराने स्थापन करण्यात आलेल्या आहेत. सहकारी संस्थाच्या कारभारात पक्षपातीपणा आढळून येतो. गरीबांना प्रतिनिधीत्व नाही, ठेवी गोळा करण्यात अपयश, सेवाभावनेचा अभाव, सहकारी संस्थांच्या कारभारात गैरव्यवहार आढळून आले.

हे दोष दूर करण्यासाठी मॅक्लेगन समितीने केलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे

१. प्रत्येक गावाकरीता एक सहकारी संस्था असावी.
२. सहकारी तत्त्वांची माहिती होण्यासाठी सभासदांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी.
३. सभासद निवडताना प्रामाणिक व गरजू सभासदांची निवड करावी.
४. संस्थेच्या सभासदांनाच कर्जपुरवठा करावा.
५. संस्थांनी उत्पादक कार्यासाठीच कर्जपुरवठा करावा.
६. कर्ज देताना कर्जदार सभासदांवर कर्जाच्या उपयोगाबाबत जबाबदाऱ्या टाकाव्यात.
७. सभासदाची कर्ज परतफेडीची क्षमता व प्रामाणिकपणा लक्षात घेऊन कर्ज द्यावे.
८. कर्जाचा दुरुपयोग करणाऱ्या सभासदाचे कर्ज परत घ्यावे.
९. सभासदांना बचत व काटकसरीचे तत्त्व अनुसरण्यास प्रवृत्त करावे.
१०. मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वांचा अवलंब करावा.
११. ठेवी गोळा कराव्यात.
१२. राखीव निधीची निर्मिती करावी.
१३. हिशोब तपासणी करावी.
१४. प्राथमिक सहकारी संस्थेने माध्यमिक सहकारी संस्थेचे सभासदत्त्व स्विकारावे.
१५. सहकारी संस्थेची रचना तीन स्तरीय असावी. प्राथमिक सहकारी संस्था-संघ-जिल्हा मध्यवर्ती बँक.

१६. प्रत्येक राज्यात राज्य सहकारी बँकेची स्थापना करावी.[२७]

## १.१३ अनियोजित विस्ताराचा कालखंड(१९१९ ते १९२९)

पहिल्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर १९१९ च्या मॉन्टफोर्ड सुधारणा कायद्यांतर्गत राज्यांना १९१२ च्या कायद्याचे पालन करणे किंवा आपल्या राज्यांसाठी स्वतंत्र कायदा करण्याचे स्वातंत्र्य दिले. मुंबई प्रांताचा सहकार कायदा १९२५ मध्ये संमत झाल्याने सहकार हा विषय प्रांत सरकारकडे आला. त्यानंतर बंगाल, ओरिसा, मद्रास, बिहार या प्रांतांनी सहकार क्षेत्रासाठी आपल्या राज्यापुरते स्वतंत्र कायदे केले. याच काळात सहकारी पतपुरवठा संस्था, शेती सहकारी संस्था अशा संस्थांची सुरुवात झाली.

या कालखंडात भारतात एकूण ८७,९९१ सहकारी पतपुरवठा संस्था होत्या. त्यांची सभासद संख्या ३०.०४ लाख तर खेळते भांडवल ३२.३८ कोटी रुपये होते. बिगर पतपुरवठा संस्थांची संख्या ९,७६१ होती. सभासद संख्या ९.९२ लाख तर खेळते भांडवल १३.६३ लाख रुपये होते.

१९२८ मध्ये रॉयल कमिशनची स्थापना करण्यात आली. या कमिशनने शेतीच्या विकासात सहकारी संस्थांचा कितपत उपयोग होईल याचा अभ्यास केला आणि भारतीय शेतीचा आणि ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी भारतात सहकारी चळवळीचा विकास केला पाहिजे आणि जर भारतातील सहकारी चळवळीस अपयश आले, तर भारताच्या ग्रामीण भागांच्या विकासाची अपेक्षाच मावळेल असे या कमिशनचे मत होते.[२८]

## १.१४ एकत्रिकरण व पुनर्रचनेचा कालखंड(१९३०-१९३८)

इ.स.१९२९ मध्ये जागतिक महामंदी आली. त्यामुळे भारतातील सहकार चळवळीची थोडी पिछेहाट झाली. सभासदांच्या आर्थिक दुरावस्थेमुळे देणी थकली आणि बिहार, ओरिसा व बंगाल मधील सहकारी चळवळ धोक्यात आली. सहकारी चळवळीची पुनर्रचना करण्यासाठी ज्या विविध समित्या नियुक्त केल्या होत्या. त्यांच्या

शिफारशीनुसार भारतात रिझर्व्ह बँकेची स्थापना १९३५ मध्ये करण्यात आली. या बँकेने शेती पतपुरवठा विभाग सुरु केला. सहकार चळवळीस मदत करणे हे या विभागाचे मुख्य कार्य होते.

सहकार चळवळीच्या इतिहासात पहिल्यांदाच शेती पतपुरवठा संस्थांची संख्या कमी झाली. १९३०-३१ मध्ये ९३५१२ संस्था होत्या. १९३३-३४ मध्ये ९२,२९६ संस्था होत्या. या कालखंडातील महत्त्वाची बाब म्हणजे कर्जवाटप पद्धतीचे कडक तपासणी व पर्यवेक्षण करण्यात आले. थकीत कर्जे वसूल करण्याचा प्रयत्न करण्यात आला. याचा चांगला परिणाम झाल्यामुळे १९३७ मध्ये रिझर्व्ह बँकेने बहुउद्देशीय सहकारी संस्थांची स्थापना करण्यावर भर दिला. कारण याच संस्था शेतकऱ्यांचे जीवनमान बदलू शकतील असा रिझर्व्ह बँकेचा विश्वास होता.[२९]

## १.१५ पुनर्विकासाचा कालखंड (१९३९-१९४६)

सप्टेंबर १९३९ मध्ये दुसरे महायुध्द सुरु झाले आणि शेतमालाच्या (वस्तूंच्या) किंमती वेगाने वाढू लागल्या. अर्थव्यवस्थेमध्ये तेजी आली. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली. सहकारी संस्थांची थकीत कर्जे वसूल होऊ लागली. याचा सहकार चळवळीवर अनुकूल परिणाम झाला. या कालावधीत सहकारी संस्थांची संख्या ५० हजारांनी वाढून ती १,८२,००० पर्यंत पोहोचली. सभासद संख्या ५३.७ लाखावरुन ९१.६ लाखावर पोहोचली. तर खेळते भांडवल १०६.४७ कोटी रुपयांवरुन १९४ कोटी रुपयापर्यंत वाढले. या काळात ग्राहक सहकारी संस्था, औद्योगिक सहकारी संस्था व बिगर पतसंस्थांचा विशेष विकास झाला. ग्रामीण भागातसुध्दा बहुउद्देशीय संस्थांचा विकास झाला.

१९४४ साली केंद्र सरकारने प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली, कृषी अर्थपुरवठा समिती नियुक्त केली. या समितीने अभ्यास करुन अशी शिफारस केली की, कृषी पतपुरवठ्यासाठी सहकारी संस्था उत्कृष्ट उपाय असून शासनाने अशा संस्थांना आर्थिक मदत केली पाहिजे तसेच कृषी कर्जपुरवठा महामंडळ स्थापन करावे.

१९४५ साली सरकारने श्री.आर.जी.सरैय्या यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी नियोजन समिती नियुक्त केली. सहकार विकासाची योजना आखून अहवाल सादर करण्याची जबाबदारी या समितीवर होती आणि या समितीने १९४६ साली पुढील १० वर्षासाठीचा सहकार विकासाचा कार्यक्रम सादर केला.[३०]

## १.१६ स्वातंत्र्योत्तर कालखंड

भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर संतुलित आर्थिक विकासाच्या अनुषंगाने पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक विकासाचा पाया रचण्यास सुरुवात केली. भारताने समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचे धोरण स्वीकारल्याने सहकारी चळवळ अधिक समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर केंद्र सरकारने देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाला प्राधान्य दिले. १९४८ च्या औद्योगिक धोरणामध्ये सहकारी संस्थांच्या स्थापनेस प्रोत्साहन देण्याचा उल्लेख करण्यात आला. भारत हा कृषीप्रधान देश व मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागात वसलेली लोकसंख्या यामुळे कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सहकार चळवळीची भूमिका महत्त्वाची बनली. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सहकाराचा विकास हा नियोजनपूर्व काळ व नियोजन काळ अशा दोन भागात अभ्यासता येईल.

## १.१७ नियोजनपूर्व काळ

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर केंद्र सरकारने सहकार चळवळ भक्कम करण्याचे ठरविले. कृषी आणि उद्योग क्षेत्राचा विकास करण्यासाठी नियोजनबद्ध आर्थिक विकासाचा कार्यक्रम आखण्याचा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी १ एप्रिल १९५० पासून पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून करण्यात आली. १५ ऑगस्ट १९४७ ते ३१ मार्च १९५० हा नियोजनपूर्व काळ होय. या काळात सरकारने पहिले औद्योगिक धोरण १९४८ ला जाहीर करुन सहकारी क्षेत्रासाठी काही उद्योग राखून ठेवले. १९४९ साली ग्रामीण भागात बँकेच्या सोयी उपलब्ध करुन बँकींग व्यवहारात सुधारणा घडवून आणणे याबाबत शिफारस

करण्यासाठी श्री.पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांचे अध्यक्षतेखाली ग्रामीण व बँकींग चौकशी समिती नेमली. १९४९ साली रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. या काळात सहकारी चळवळीबाबत सरकारने उदार धोरण स्वीकारुन सहकारी संस्थांना अनुदान दिले.[३१]

## १.१८ नियोजन काळातील सहकारी चळवळ

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सरकारने पंचवार्षिक योजना आखल्या. देशाच्या आर्थिक विकासाचे महत्त्वाचे साधन म्हणून सहकाराला आर्थिक विकासात महत्त्वाचे स्थान देण्यात आले. सहकाराच्या विकासाकरीता सरकारने योजनाबद्ध कार्यक्रम आखले. अनेक तज्ञ समित्या नेमल्या. १९५१ मध्ये ए.डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली 'अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती' नेमली. विविध क्षेत्रांतील सहकारी संस्थांचा विकास सरकारी नियंत्रणाखाली व मार्गदर्शनाखाली आणण्याचे धोरण सरकारने स्वीकारले आणि पंचवार्षिक योजनांच्या आधारे भारतीय सहकार चळवळीचा विकास होत गेला.

### १.१८.१ पहिली पंचवार्षिक योजना (१९५०-५१ ते १९५५-५६)

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्याचा अर्थ भारतीय जनतेने देशाचा अधिक विकास व जास्तीत जास्त लोकांचे कल्याण असा घेतला होता. नियोजनबद्ध आर्थिक विकासासाठी सहकार चळवळ एक महत्त्वाचे साधन होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेची सुरुवात १९५०-५१ मध्ये झाली. पहिल्या योजनेची खालील वैशिष्ट्ये मांडता येतील.

१. ग्रामीण भागातील ग्रामपंचायती आणि सहकारी संस्था यांच्या कार्यात समन्वय प्रस्थापित करणे.

२. सभासदांच्या गरजा भागविण्यासाठी प्रत्येक खेड्यात सहकारी संस्था स्थापन करण्यावर भर देणे.

३. सहकार चळवळीच्या विकासासाठी पुरेसा प्रशिक्षित सेवकवर्ग निर्माण करण्यावर भर देणे.

४. शेतमालाला योग्य (भाव) दर मिळावा म्हणून सहकारी विपणन संस्थांच्या विकासावर भर देणे.

५. सहकारी ग्राहक भांडाराची स्थापना करणे.

६. बहुउद्देशीय सहकारी संस्थांची संकल्पना साकार करण्यासाठी सामुदायिक सहकारी शेतीचा प्रयोग अमलात आणणे. सहकारी शेती संस्था स्थापण्यामध्ये राज्यात महत्त्वाची भूमिका पार पाडण्याच्या गरजेवर भर देणे.

७. सामुदायिक विकासामध्ये सहकार तत्त्व अमलात आणणे.

८. योजनेअखेर ५० टक्के खेडी व ३० टक्के ग्रामीण लोकसंख्या ही सहकारी क्षेत्राखाली आणणे.[३२]

## १.१८.२दुसरी पंचवार्षिक योजना (१९५५-५६ ते १९६०-६१)

समाजवादी समाजरचना निर्माण करणे हे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट होते. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सहकार हे महत्त्वाचे साधन मानण्यात आले आणि त्यामुळे दुसऱ्या योजनेत सहकार क्षेत्राला अधिक महत्त्व दिले गेले. त्यामुळे सहकाराचे क्षेत्र वाढविणे हे दुसऱ्या योजनेतील एक महत्त्वाचे राष्ट्रीय धोरण होते.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सहकाराच्या विकासासाठी ५७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. तसेच ग्रामीण भागात कर्जवाटपाचे उद्दिष्ट पुढीलप्रमाणे आखले होते. अल्पमुदतीचे कर्ज १५० कोटी रुपये, मध्यम मुदतीचे कर्ज ५० कोटी रुपये, दीर्घ मुदतीचे कर्ज २५ कोटी रुपये.

दुसऱ्या योजनेची खालील वैशिष्ट्ये मांडता येतील.

१. सहकारी क्षेत्राच्या विकासाचा एकात्मिक कार्यक्रम तयार करुन सहकारी क्षेत्राची व्याप्ती वाढविण्यात आली.

२. सहकाराच्या विस्तारामध्ये विपणन, भांडार, गोदाम इत्यादी संकल्पनांचा विचार करण्यात आला.

३. मोठ्या आकाराच्या सहकारी संस्था स्थापन करणे.(सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या व कृषी बाजारपेठा)

४. सहकारी चळवळीच्या विकासासाठी विविध समित्या व अभ्यासगटांची निर्मिती करणे.

५. कर्मचारी प्रशिक्षणाची तरतूद करणे.

६. प्राथमिक शेती सहकारी संस्थांबरोबरच इतर सहकारी संस्थांचा विकास करणे.

७. सहकारी बँक रचनेची पुनर्ररचना करणे, की ज्यामुळे प्रत्येक जिल्हयासाठी एक मध्यवर्ती सहकारी बँक सक्षमपणे कार्य करु शकेल.[३३]

## १.१८.३ तिसरी पंचवार्षिक योजना (१९६०-६१ ते १९६५-६६)

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत असे नमूद करण्यात आले की, छोटे व्यवसाय, पाणीपुरवठा, शेती, प्रक्रिया संस्था, खरेदी-विक्री संस्था, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या संस्था, गृहनिर्माण संस्था यांसारख्या अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांत सहकारी संस्था ही प्रमुख संघटना ठरली तरच लोकशाही व समाजवाद अशी मूल्ये नियोजित असणारी अर्थव्यवस्था निर्माण होऊन त्या अर्थव्यवस्थेत सहकाराला महत्त्वाचे स्थान प्राप्त होऊ शकते.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत देशाचा आर्थिक विकास झपाट्याने व्हावा म्हणून सरकारने विविध योजना आखल्या होत्या. त्यापैकी ग्राहक, कामगार, शेतकरी यांच्या गरजा पुरविणाऱ्या सहकारी संस्थांची वाढ झपाट्याने व्हावी यावर तिसऱ्या योजनेत भर दिला गेला होता. ग्रामीण पतपुरवठा, उत्पादन, विक्री, साठवण, वितरण यांसारख्या

सर्व सेवा सहकारी संस्थामार्फत पुरवून ग्रामीण रोजगारात विविधता आणण्याचा प्रयत्न सहकारी संस्थामार्फत करावा असा दृष्टिकोन ठेवण्यात आला होता. या योजनेत सहकाराच्या विकासाकरीता ८० कोटी रुपयांची तरतूद केली गेली.

तिसऱ्या योजनेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे

१. प्राथमिक संस्थांच्या माध्यमातून ८२ टक्के गावे सहकारी क्षेत्राखाली आणणे.

२. शासनाने सर्व स्तरावर सहकाराच्या विकासासाठी कार्य करणे.

३. लघु उद्योगांचा विकास करणे, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ करणे.

४. दुग्धव्यवसाय, मत्स्योद्योग, शेती व गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या विकासावर भर देणे.

५. प्रक्रिया सहकारी संस्था व खरेदी-विक्री संस्था यांचा संबंध पतपुरवठ्याशी लावणे.

६. शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम राबविणारी यंत्रणा निर्माण करणे.[३४]

## १.१८.४ तीन वार्षिक योजना (१९६६-६८, १९६७-६८, १९६८-६९)

तिसरी योजना पूर्ण झाल्यानंतर पहिल्या तिन्ही योजनेतील अपूरी राहिलेली कामे पूर्ण करण्याचे सरकारने ठरविले त्यानुसार १९६६ ते १९६९ या काळात तीन वार्षिक योजना पूर्ण करण्यात आल्या. या तीन वार्षिक योजनेच्या काळात सरकारने सहकारी चळवळीच्या विकासासाठी अनुक्रमे रुपये ३३.५ कोटी, रुपये ३६.३ कोटी आणि रुपये ३४ कोटी खर्च केले. परिणामी सोसायट्यांच्या सभासद संस्थेत ३० दशलक्षपर्यंत वाढ झाली. शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या संस्था १५०० वरुन १६०० पर्यंत वाढल्या. याचप्रमाणे शहरी भागात सहकारी ग्राहक संस्थांच्या संस्थेत वाढ झाली. शेतीस पतपुरवठा करणाऱ्या संस्थांच्या दिलेल्या अल्पमुदतीच्या व दीर्घमुदतीच्या कर्जाच्या रकमेत समाधानकारक वाढ झाली. अल्पमुदतीच्या कर्जात ४५० कोटी तर दीर्घ मुदतीच्या कर्जात १०० कोटी रुपयापर्यंत वाढ झाली.[३५]

### १.१८.५ चौथी पंचवार्षिक योजना (१९६९-१९७४)

स्थैर्याधिष्ठित विकास हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून चौथी पंचवार्षिक योजना आखली होती. या योजनेत सरकारने सहकाराच्या विकासाकडे अधिक लक्ष दिले व त्यासाठी १७८.५८ कोटी रुपये खर्च करण्याचे ठरविले. तसेच सहकारी संस्था अर्थक्षम झाली यावर भर दिला गेला. चौथ्या योजनेत शेती व ग्राहक संस्थांवर अधिक भर दिला गेला होता. त्यादृष्टीने शेती उपयोगी वस्तू व सेवा यांवर अधिक लक्ष केंद्रित केले गेले. चौथ्या योजनेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे

१. सहकारी विपणन रचना मजबूत करणे.

२. नवीन ग्राहक सहकारी संस्था स्थापन करण्याऐवजी अस्तित्वात असलेल्या संस्था सक्षम करणे व गरजेनुसार अशा संस्थांचे एकत्रिकरण करण्यावर भर देण्यात आला.

३. लहान शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सहकारी पतपुरवठ्यात सुधारणा करणे व भूविकास बँकांचा विकास करणे.

४. थकीत कर्जे कमी करणे, ठेवी वाढविणे व सहकारी संस्थांची व्यवहार्यता वाढविण्याच्या दृष्टीने प्राथमिक सहकारी संस्थांचे पुर्नसंघटन करणे.[३६]

### १.१८.६ पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४- १९७९)

सामाजिक न्यायासह विकास हे पाचव्या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट होते. विकासाचे फायदे समाजातील सर्व थरातील लोकांना मिळावेत यादृष्टीने ५ वी योजना आखली गेली. नियोजनकारांच्या मते सहकार हेच एक साधन आहे की ज्याच्यामुळे ‘सामाजिक न्यायासह विकास’ या राष्ट्रीय तत्त्वाची अंमलबजावणी होऊ शकेल.

शेतकरी, कामगार व ग्राहकांच्या गरजा भागविणारे मजबूत व व्यवहार्य सहकारी क्षेत्र उभे करणे हे या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट होते. देशातील आर्थिक आणि

सामाजिक सुधारणेसाठी सहकार ही आवश्यक बाब आहे अशी भूमिका या योजनेच्या दस्तऐवजात नमूद केली होती.

पाचव्या योजनेची वैशिष्टये :-

१. शेती सहकारी संस्थांचे मजबूत जाळे देशभर निर्माण करणे.

२. ग्राहक सहकारी संस्थांना आर्थिकदृष्ट्या मजबूत करणे.

३. ग्रामीण भागातील लहान शेतकरी, भूमिहीन शेतमजूरांना लाभ देण्याच्या दृष्टीने संघटनेत बदल करणे.

४. सहकारी क्षेत्रातील प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी प्रयत्न करणे.

५. सहकारी क्षेत्रात खत कारखाना स्थापन करणे.[३७]

## १.१८.७ सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-१९८५)

सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये प्राथमिक संस्थांचे सक्षमीकरण करणे, दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी सहकाराच्या माध्यमातून प्रयत्न करणे, देशाच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात सहकाराला सहाव्या योजनेत महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.

सहाव्या योजनेची वैशिष्ट्ये

१. प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांना आर्थिकदृष्ट्या मजबूत करणे.

२. ग्रामीण गरीब जनतेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सहकारी धोरणाचे परिक्षण करणे.

३. सहकारी संघ संस्थांची पुनर्रचना करणे; त्याद्वारे दुग्ध व्यवसाय, पशुपालन, मत्स्यव्यवसाय, फळबागा, अन्नप्रक्रिया इत्यादी सहसंस्थांना विहित सेवा देणे.

४. व्यावसायिक व्यवस्थापक तयार करण्यावर भर देणे.[३८]

### १.१८.८ सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-१९९०)

सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सहकारी क्षेत्राच्या गुणात्मक वाढीकडे अधिक लक्ष देण्यात आले.

सातव्या योजनेची वैशिष्ट्ये

१. सहकारी चळवळ सर्व राज्यात पोहोचविणे.

२. ग्रामीण आणि शहरी भागातील सहकारी ग्राहक संस्था सक्षम करणे.

३. व्यावसायिक व्यवस्थापनाला उत्तेजन देणे.

४. बहुउद्देशिय संस्था म्हणून कार्य करण्यासाठी प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था वाढविणे.

५. समाजातील दुर्बल घटकांना विविध सेवा पुरविण्याच्या दृष्टीने सहकारी संस्थांचे धोरण आणि कार्यपध्दतीचा पुनर्विचार करणे.[३९]

### १.१८.९ आठवी पंचवार्षिक योजना (१९९२-१९९७)

१९९१ मध्ये सरकारने नव्या आर्थिक धोरणाचा स्विकार केला. भारताने जागतिक व्यापार संघटनेचे (Word Trade Organization) सभासदत्व स्विकारले व जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण ही तत्त्वे मान्य करण्यात आली. या पार्श्वभूमीवर सहकारी क्षेत्राने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडावी असे सरकारने स्पष्ट केले.

आठव्या योजनेची वैशिष्ट्ये

१. सहकारी संस्थांची कार्यक्षमता वाढविणे.

२. सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण करणे.

३. सहकारी संस्थांची कार्यशैली ग्राहकाभिमुख बनवणे.

४. काटकसर व परस्पर सहाय्यातून संस्थांचा विकास साध्य करणे.

५. सहकारी संस्था स्वंयपूर्ण होण्यासाठी संस्थांच्या अंतर्गत रचनेत योग्य बदल करणे[४०].

### १.१८.१० नववी पंचवार्षिक योजना (१९९७–२००२)

शेती आणि ग्रामीण विकासाला प्राधान्य देण्याच्या हेतूने नवव्या योजनेत सहकारी चळवळीच्या विकासावर भर देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले. रोजगार निर्मिती आणि दारिद्र्य निर्मूलन या हेतूने ग्रामीण विकासाला चालना देण्यात आली.[४१]

### १.१८.११ दहावी पंचवार्षिक योजना (२००२–२००७)

या योजनेमध्ये सहकारी चळवळीतील लोकांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात आला. तसेच समतोल आर्थिक विकासाच्या उद्दिष्ट पूर्ततेसाठी देशात शेती, उद्योग व मनुष्यबळाचा विकास घडवून दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण कमी करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले.[४२]

### १.१८.१२ अकरावी पंचवार्षिक योजना (२००७–२०१२)

जानेवारी २००६ मध्ये भारताच्या नियोजन मंडळाने अकराव्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार केला. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आर्थिक विकास साध्य करणे हे होते. नियोजनकारांनी २००७–२०१२ या अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये योजनेचा आर्थिक विकास दर ९ टक्के इतका साध्य करण्याचे निर्धारित केले. या योजनेमध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास दर १०.५ टक्के सेवाक्षेत्राचा विकास दर ९.९ टक्के तर कृषिक्षेत्राचा विकास दर ४ टक्के पर्यंत गाठण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले होते. [४३]

### १.१९ समारोप

भारतातील ग्रामीण व शहरी भागांमध्ये सहकारी संस्था विविधांगी भूमिका बजावत आहेत. गेल्या शतकामध्ये सहकारी क्षेत्रात झालेल्या वैविध्यपूर्ण बदलांमुळे

सहकारी क्षेत्राची वृध्दी झाली. स्वस्त दरात कर्जपुरवठा, बचत आणि बँकिंग व्यवसायात वाढ, रोजगारनिर्मितीस चालना, लघुउद्योगांचा विकास, सावकारी पाशातून मुक्तता, लोकशाही शिक्षणाचा प्रसार, समाज प्रबोधन, समाज परिवर्तन याबाबतीत सहकारी चळवळ महत्त्वपूर्ण ठरली आहे.

**संदर्भ :**


१) रायखेलकर, ए.आर.,ए.पी.डांगे (१९७८) : सहकार तत्त्वे व व्यवहार अजब पुस्तकालय, कोल्हापूर, पान क्र.८

२) तुपे सु.दा. (१९९२): सहकाराचे सिध्दांत आणि इतिहास, द्वारका प्रकाशन, पुणे, पान क्र.३ ते ५

३) तत्रैव, पान क्र.१

४) उ.नि.,रायखेलकर, ए.आर.ए.पी.डांगे, पान क्र.९ ते १२

५) तत्रैव, पान क्र. १६

६) तत्रैव, पान क्र. १८

७) तत्रैव, पान क्र. २०, २१

८) तत्रैव, पान क्र. १९, २०

९) तत्रैव, पान क्र. २२, २३

१०) तत्रैव, पान क्र. २४

११) तत्रैव, पान क्र. २५

१२) उ.नि., तुपे सु.दा. पान क्र.२०

१३) तत्रैव, पान क्र. २०

१४) तत्रैव, पान क्र. २०

१५) तत्रैव, पान क्र. २१

१६) तत्रैव, पान क्र. २१

१७) तत्रैव, पान क्र. २१

१८) तत्रैव, पान क्र. २१

१९) तत्रैव, पान क्र. २१

२०) तत्रैव, पान क्र. २२

२१) तत्रैव, पान क्र.१२, १३ उ.नि. रायखेलकर, ए.आर.ए.जी.डांगे पान क्र.२,३

२२) चौगुले व्ही.टी., के.जी.पठाण(१९७९) सहकाराची मूलतत्त्वे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पान क्र.५४, ५५

२३) सराफ मोहन, रमेश दापके (१९९१) : सहकार विद्या प्रकाशन, नागपूर, पान क्र.४७, ४८

२४) उ.नि.तुपे सु.दा.पान क्र.२३

२५) तत्रैव, पान क्र. २४

२६) तत्रैव, पान क्र. २५

२७) उ.नि., रायखेलकर, ए.आर., ए.पी.डांगे, पान क्र.८३, ८४

२८) उ.नि., तुपे सु.दा.पान क्र.२८

२९) तत्रैव, पान क्र. २९

३०) तत्रैव, पान क्र. ३0

३१) तत्रैव, पान क्र. ३३, ३४

३२) उ.नि., रायखेलकर, ए.आर., ए.जी.डांगे, पान क्र. ९४, ९५

३३) तत्रैव, पान क्र. ९७, ९८

३४) तत्रैव, पान क्र.९९, १00

३५) उ.नि., तुपे सु.दा.पान क्र.५१

३६) उ.नि.,रायखेलकर, ए.आर.,ए.जी.डांगे, पान क्र. १0२, १0३

३७) तत्रैव, पान क्र. १0३

३८) उ.नि., तुपे सु.दा.पान क्र.५६ ते ५८

३९) तत्रैव, पान क्र. ५९, ६०

४०) Ghanekar V.V.(2004) : Co-operative movement in India Institute of Rural Development and Education Pune pg.No.26

४१) देसाई स.श्री. मु.निर्मल भालेराव (२०१४) : भारतीय अर्थव्यवस्था निराली प्रकाशन, पुणे, पान क्र.१०.४८

४२) तत्रैव, पान क्र.१०.५१

४३) तत्रैव, पान क्र.१०.५४ व १०.५५

# प्रकरण दुसरे

## महाराष्ट्रातील सहकारी चळवळ

**प्रस्तावना**

२.१ सहकारी चळवळीतील महाराष्ट्राचे स्थान

२.२ महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे स्वरूप

२.३ महाराष्ट्रातील सहकारी पतपुरवठा संस्थांची रचना

२.४ समारोप

संदर्भ

# प्रकरण दुसरे

# महाराष्ट्रातील सहकारी चळवळ

## प्रस्तावना

'सहकार' या शब्दाचा अर्थ आणि सहकाराची तत्वे अभ्यासल्यानंतर असे लक्षात येते की सहकाराची तत्त्वे ही सहकाराची संकल्पनाच स्पष्ट करतात. सहकारी संस्थांच्या संचलनासाठी सहकाराची तत्त्वेच मार्गदर्शक आहेत. तसेच सहकारी चळवळीचा भारतातील व आंतरराष्ट्रीय पातळीवरील इतिहास आपण पूर्वीच्या प्रकरणामध्ये अभ्यासला आहे. सहकारी चळवळीला सुमारे दिडशे वर्षांचा इतिहास असून या प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा आढावा अभ्यासाद्वारे थोडक्यात मांडणार आहे.

## २.१ सहकारी चळवळीतील महाराष्ट्राचे स्थान

भारतातील सहकारी चळवळीच्या उगमाचा व विकासाचा आढावा पाहिल्यास या चळवळीस आजचे हे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्याचा फार मोठा वाटा त्यावेळच्या मुंबई प्रांताला व आजच्या महाराष्ट्राला मिळतो. भारतातील सहकारी चळवळीला उच्च स्थान असून देशातील इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा इतिहास अधिक समृद्ध आहे. महाराष्ट्र हे सहकार क्षेत्रातील पुढारलेले राज्य असून राज्यभरात सहकारी संस्थाचे मोठे जाळे पसरलेले आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेत सहकारी संस्थांनी महत्वाची भूमिका बजावलेली आहे. सहकारी कृषी पतसंस्था, बिगर कृषी पतसंस्था, विपणन संस्था, उत्पादक संस्था, गृहनिर्माण संस्था, समाजसेवी संस्था मोठया प्रमाणात कार्यरत आहेत. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला शंभर वर्षाहून अधिक काळाचा इतिहास आहे. इ.स.१८८९ मध्ये तेव्हाच्या मुंबई प्रांतात 'अन्योन्य साहाय्यकारी मंडळी' या नावाची सहकारी संस्था प्रा.विठ्ठल लक्ष्मण कवठेकर

यांनी स्थापन केली. १९०५ मध्ये पहिली प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था धारवाड जिल्ह्यात कनगीहाळ येथे स्थापन झाली. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्थेची स्थापना १९२३ मध्ये झाली. पुढे या बँकेचे राज्य शिखर बँकेत रूपांतर झाले.

मॅक्लेगन समितीच्या शिफारशीवरून महाराष्ट्रामध्ये सहकारी पतपुरवठ्याबाबत त्रिस्तरीय रचना स्विकारलेली आहे. प्राथमिक स्तरावर प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था, दुसऱ्या स्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तर उच्चस्तरावर राज्य सहकारी (शिखर बँक) बँक कार्य करते.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे उद्गाते म्हणून भाऊसाहेब हिरे, स्व. विठ्ठलराव विखे-पाटील,स्व. वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, स्व. वसंतदादा पाटील, स्व. यशवंतराव मोहिते स्व.भाऊसाहेब थोरात, जी.के. देवधर, डॉ. पंजाबराव देशमुख, स्व. बापूरावजी देशमुख यांचे सहकारी चळवळीतील कार्य ऐतिहासिक आहे.

या सहकारी चळवळीच्या वाढीत सामाजिक व सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा वाटा फार मोठा आहे. महात्मा ज्योतिराव फुले, न्या. रानडे, ना. गोखले, प्रा. कवठेकर या धुरिणांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. कै. विठ्ठलदास ठाकरसी, कै. लल्लूभाई सामळदास या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांतून निर्माण झालेली बॉम्बे अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी म्हणजेच आजची महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक होय. रावबहादूर कै. तालमाकी, कै.जी.के. देवधर, कै. भास्करराव जाधव यांनी चळवळीच्या शैक्षणिक अंगांचा विकास करण्यात पुढाकार घेतला. त्याचेच फळ म्हणजे आजचा 'महाराष्ट्र राज्य सहकारी संघ' होय. या संस्थेच्या पुढाकाराने वेळोवेळी परिषदा घेण्यात आल्या. त्यामधून सरकारला त्यांच्या धोरणात बदल करण्यास भाग पाडले व चळवळीस

येणाऱ्या अनेक अडचणींचे निराकरण केले. कै. लल्लूभाई सामळदास यांचा वारसा घेऊन आलेले त्यांचे सुपूत्र कै. वैकुंठभाई मेहता यांनी भारताच्या सहकारी चळवळीत आपले नाव अजरामर करून ठेवले. त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे सहकारी चळवळीला अनेक कार्यकर्ते भविष्यकाळात लाभले व सहकारी चळवळीचा ओघ पुढे नेण्यास सहाय्य झाले.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा जलद गतीने विकास झाला. स्वातंत्र्यानंतर १९५१ मध्ये धनंजयराव गाडगीळ व विठ्ठलराव विखे पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे प्रवरानगर सहकारी साखर कारखाना लि. प्रवरानगर, जि.अहमदनगर येथे महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन झाला.[१]

## २.२ महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे स्वरूप

सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली व महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मध्ये संमत झाला. या कायद्यानुसार सहकारी संस्थांचे नियमन व नियंत्रण केले जाते. सहकारी चळवळीच्या विकासामध्ये भारतात महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर आहे. सहकारी कारखानदारीच्या विकासामुळे महाराष्ट्रातील शेती क्षेत्राच्या विकासाला चालना मिळाली. परिणामी शेतकऱ्याच्या उत्पन्नामध्ये वाढ झाली. यामुळे शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावणे शक्य झाले. महाराष्ट्रामध्ये कृषी सहकारी पतपुरवठा संस्था, बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्था, विपणन सहकारी संस्था, प्रक्रिया सहकारी संस्था, कामगार सहकारी संस्था, वाहतूक सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, ग्राहक संस्था अशा विविध सहकारी संस्थांची स्थापना झाली. त्या यशस्वीपणे कार्यरत असल्यामुळे महाराष्ट्रातील सामान्य शेतकरी, नागरिक या ना त्या कारणामुळे सहकारी संस्थेच्या संपर्कात आला. परिणामी सहकारी संस्थांचा विकास

झाला.१९६१ मध्ये महाराष्ट्रात विविध प्रकारच्या ३१,५६५ सहकारी संस्था होत्या.२००५ मध्ये ही संख्या १,८४,३९० पर्यंत पोहोचली. तर मार्च २०११ अखेर ही संख्या २,२४,३०६ पर्यंत पोहोचली. तर मार्च २०१२ अखेर ही संख्या २,२७,९३८ पर्यंत पोहोचली आहे. सहकारी संस्थांच्या संख्येत जशी वाढ झाली. तशीच सहकारी संस्थांच्या सभासद भागभांडवल, कर्ज,पुरवठा, ठेवी व वसुलीमध्येही वाढ झाली.

**तक्ता क्र.२.१**

**महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती**

| तपशील ↓ वर्ष → | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २००५ | २००७ | २०१० | २०११ | २०१२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहकारी संस्था (संख्या) | ३१५६५ | ४२६०३ | ६०७४७ | १०४६२० | १५८०१६ | १८४३९० | २००७४० | २१८३२० | २२४३०६ | २२७९३८ |
| सभासद (लाखात) | ४२ | ८६ | १४८ | २७० | ४३० | ४५८ | ४७६ | ५४२ | ५३० | ५५१ |
| भागभांडवल (कोटीत रू.) | ५३ | २३८ | ६०० | १९५७ | ७५६० | १११८६ | १२५६५ | १५०१५ | २०५४३ | |
| ठेवी (कोटी रू.) | ७६ | ३१५ | १९३९ | ११०४८ | ७४४६२ | ११०९४३ | ९९७९२ | १२८५७९ | १३२४९० | |
| खेळते भागभांडवल (कोटी रू.) | ३२६ | १४९० | ५२१० | २४७१३ | १३४४४१ | १७९५०२ | २०२२०७ | २४६१६२ | २४८४३४ | २५५०४० |
| कर्ज पुरवठा (कोटी रू.) | ९५ | ३४८ | १११६ | ६३०० | ४३३९२ | ६२५९२ | ८२४५० | ७८१९० | १००६८१ | ११२७११ |

संदर्भ : महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात-२०१४, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

भारतात सहकारी चळवळ ग्रामीण भागातच सुरू झाली. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल अशा लोकांना माफक व्याजाच्या दराने कर्ज पुरवठा करणाऱ्या अनेक सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या. परंतु शहरी भागात राहणाऱ्या सामान्य लोकांच्या कल्याणासाठी सहकारी संस्था नसल्यामुळे त्यांच्या विविध गरजांची पूर्तता होत नव्हती. १९१५ मध्ये मॅक्लेगन समितीने शहरी भागातील सामान्य लोकांची गरज पूर्ण करण्यासाठी नागरी पतसंस्थेची स्थापना करण्यात यावी अशी शिफारस केली. १९३१ मध्ये नेमलेल्या मध्यवर्ती बँकिंग चौकशी समितीने देखील नागरी भागात पतसंस्थेची शिफारस केली. तसेच १९४६ मध्ये सहकार नियोजन समितीने अशा संस्थांची आवश्यकता प्रतिपादन केली.

विसाव्या शतकाच्या सुरवातीपासून नागरी पतसंस्थांच्या स्थापनेस सुरवात होऊ लागली होती. पण या पतसंस्थांच्या स्थापनेला दुसऱ्या महायुद्धानंतर गती प्राप्त झाली. युद्धकाळात झालेल्या किंमत वाढीच्या समस्येला तोंड देण्यासाठी या पतसंस्था उपयुक्त ठरू शकतील अशी खात्री पटल्याने त्यांच्या स्थापनेला अनुकूल परिस्थिती निर्माण झाली.

शहरी भागातील  लोकांना त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कर्ज देण्यास व्यापारी बँका फारशा उत्सुक नसत. अशा परिस्थितीत मध्यमवर्गीय लोकांना जास्त व्याजदराने सावकारी वर्गाकडून कर्ज घ्यावे लागत असे.म्हणून अशा परिस्थितीमुळे नागरी सहकारी बँकांची स्थापना होण्याची गरज निर्माण झाली. मध्यमवर्गीय लोकांना गरजेसाठी कर्जपुरवठा करणे, त्यांना काटकसर व बचतीची सवय लावणे या उद्‌दिष्टांतून नागरी सहकारी बँकांची स्थापना झाली.[२]

## तक्ता क्र.२.२

## महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती (क्षेत्रनिहाय)

| प्रकार ↓ वर्ष → | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २००५ | २०११ | २०१२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक कृषि पुरवठा सहकारी संस्था | १८९९८ | २००१४ | १८३८९ | १९४९१ | २०५२४ | २१०३७ | २०४३० | २०२१६ |
| प्राथमिक सहकारी बँका | – | २६५ | ३४५ | ३८१ | ६५४ | ६३७ | ५४१ | ५०९ |
| पगारदार नोकरांची सहकारी संस्था | – | २२२० | ४१८७ | ६११७ | ७०७९ | ७१५६ | ७३१७ | ७३७९ |
| इतर नागरी पतपुरवठा सहकारी संस्था | – | ४९४ | ९५२ | ४७८४ | १४२७७ | १८३४९ | १५५७५ | १४८४८ |
| प्राथमिक विपणन सहकारी संस्था | ३२७ | ३८४ | ३९१ | ९०१ | १०८८ | ९३३ | १४२१ | १६०२ |
| प्राथमिक दुग्ध पुरवठा सहकारी संस्था | ४३१ | २०२१ | ७८१९ | १४२८४ | २२४६६ | २६४९९ | २७११० | २५९१२ |
| प्राथमिक गृहनिर्माण सहकारी संस्था | १४९५ | ७४२५ | १५६४० | ३३९१३ | ५२३३० | ६३४७५ | ८५३३५ | ९४३७३ |
| पाणीपुरवठा सहकारी संस्था | ११९ | ३०१ | ११८८ | ३२२४ | ४७९६ | ८३०५ | १०१६२ | ५६४९ |
| कामगार सहकारी संस्था | ३७१ | १११५ | ३३३४ | ४४३४ | ८१२७ | १०१६३ | १११११३ | – |
| सहकारी साखर कारखाने | – | – | ७८ | १३८ | १९७ | २०२ | १६४ | १४५ |
| सहकारी सूत गिरण्या | ०३ | – | – | १२५ | २३३ | २०१ | १५६ | ९० |


संदर्भ : महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात-२०१४, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

## २.३ महाराष्ट्रातील सहकारी पतपुरवठा संस्थांची रचना

भारतातील सहकारी बँक व्यवसायाचा उगम आणि वाढ प्रामुख्याने शेती पतपुरवठा क्षेत्रात झाल्याने सहकारी बँकांचे शेती पतपुरवठा सहकारी बँका आणि बिगरशेती पतपुरवठा बँका असे वर्गीकरण करण्यात येते. शेती पतपुरवठ्यामध्ये अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जपुरवठ्याला महत्त्व असल्याने पतपुरवठा सहकारी बँकांमध्ये रचनात्मक फरक आढळतो.सहकारी पतपुरवठा बॅकांची रचना खालीलप्रमाणे आहे.

**आकृती क्र.२.१**

**महाराष्ट्रातील सहकारी पतपुरवठा संस्थांची रचना**



### २.३.१ शेती पत पुरवठा

वरील २.१ आकृतीचे निरीक्षण केल्यास असे लक्षात येते की शेती पतपुरवठा करणाऱ्यासंस्थांचे दोन प्रकार आहेत. अ) अल्पमुदत कर्जपुरवठा करणारी बँकरचना ब)दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणारी द्विस्तरीय बँकरचना या दोन प्रकारे पतपुरवठा केला जातो.

**अ अल्प व मध्यम मुदत कर्जपुरवठा करणारी बँकरचना**

**अ.१ प्राथमिक सहकारी पतपुरवठा सोसायटी**

या पतपुरवठा सोसायटीचा मुख्य उद्देश (खेडेगावातील) बँकांचे व्यवहार करणे हा होय. भारतामध्ये प्राथमिक विविध कार्यकारी सोसायट्या प्राथमिक सहकारी बँकांची कामे करतात. प्राथमिक सोसायटीच्या स्थापनेसाठी स्थानिक पातळीवरील ग्रामस्थ पुढाकार घेतात व सहकारी खात्याद्वारे या संस्थेची नोंदणी करतात. या पतपुरवठा सोसायट्या मर्यादित किंवा अमर्यादित देयता तत्त्वावर संघटित केल्या जातात. शेतकरी उत्पादक सभासदांना अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा उपलब्ध करून देणे तसेच सेवांचा पुरवठा या सोसायट्यांमार्फत केला जातो.[३]

**अ.२ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक**

जिल्हयातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा सोसायट्यांना कर्जपुरवठा करण्याचे कार्य जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक करते. ज्या जिल्हयात अशी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन झालेली नसेल अशावेळी एखाद्या कार्यक्षम सोसायटीला जिल्हा मध्यवर्ती बँकेचे कार्य करण्याचे आदेश असतात.

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक प्रमुख कामे**

तारणाने किंवा तारणाशिवाय कर्जे उभारणे, प्राथमिक सोसायट्यांना कर्ज देणे, हुंडया, प्रॉमिसरी नोटस्, कुपन्स, ड्राफ्टस्, डिबेंचर्स, सर्टिफिकेटस् यांच्या खरेदी विक्रीचे व्यवहार करणे, सरकार आणि सभासद व्यक्ती संस्था यांच्या व्यवहारातील प्रतिनिधी म्हणून काम करणे, प्राथमिक सोसायट्यांना कर्जवसुलीस मदत करणे, या प्रकारची कामे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून केली जातात[४].

**अ.३ राज्य सहकारी बँक**

राज्यातील उच्च स्तरावरील बँक म्हणजे राज्य सहकारी बँक होय. सरकारच्या धोरणानुसार राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती बँकांना राज्य सहकारी बँकेमार्फत पतपुरवठा केला जातो. ही बँक म्हणजे राज्यातील आर्थिक घडामोडींचा कणा होय. एक पालक संस्था म्हणून राज्यातील सहकारी पतसंस्था नियमित व नियंत्रित करण्याचे काम राज्य सहकारी बँक करते.

सरकारच्या सक्रीय उत्तेजनामुळे ग्रामीण पतपुरवठा चळवळ जसजशी वाढू लागली तसतसा सहकारी पतपुरवठ्याचा प्रश्न अधिक अवघड व गुंतागुंतीचा बनू लागला. अशा परिस्थितीत जिल्हा मध्यवर्ती बँकांना पतपुरवठा करण्यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी राज्य सहकारी बँकेची गरज भासली. राज्य सरकारकडून राज्य सहकारी बँकेची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागातील सहकारी चळवळ व शहरी भागातील पैशाचा बाजार या दोहोंत समतोल साधणारा घटक म्हणून राज्य सहकारी बँकेचे स्थान आहे.[५]

## ब दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणारी द्विस्तरीय बँकरचना

शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी तत्त्वावर भू-विकास बँका अस्तित्वात आलेल्या आहेत. भारतातील सहकारी भू-विकास बॅकांची रचना संघात्मक व द्विस्तरीय स्वरूपाची आहे.

१. प्राथमिक सहकारी भू-विकास बँका

२. राज्य सहकारी भू-तारण किंवा भू-विकास बँक.

## ब.१ प्राथमिक सहकारी भू-विकास बँका

प्राथमिक स्तरावरील भू-विकास बँका शेतकऱ्यांना हव्या असणाऱ्या दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या मागणीचा अंदाज करतात. कर्ज प्रकरणे करून प्राथमिक भू-विकास बँका उच्चस्तरावरील बँकेकडून प्रत्यक्ष कर्जपुरवठा करतात. प्राथमिक सहकारी भू-विकास बँका सावकारांकडे गहाण टाकलेल्या जमिनी सोडविण्यासाठी, शेतीत टिकाऊ स्वरूपाची सुधारणा करण्यासाठी, शेतकऱ्यांना कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी, विशिष्ट परिस्थितीत कायमच्या कुळांना जमिनी खरेदी करण्यासाठी दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करतात.[६]

## ब.२ राज्य सहकारी भूविकास बँक

सामान्यत: राज्यपातळीवर ही भू-विकास बँक असते. इतर व्यापारी बॅकांप्रमाणेच ही बँकसुद्धा सभासद संस्थांकडून भागभांडवल उभारते. पण मर्यादित सभासद, दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीवरील कमी व्याजदर आणि मर्यादित प्रमाणावर उलाढाल यामुळे शेअर्सची खरेदी-विक्री मोठया प्रमाणावर होत नाही. जमिनीच्या स्थावर जिंदगीच्या आधारे असलेली ऋणपत्रे यांचा भू-विकास बॅकांच्या भांडवलातील मोठा वाटा असतो.

राज्य सहकारी भूविकास बँका प्रामुख्याने शेती विकासास (जमीनसुधारणा, शेतीयंत्रे, जलसिंचन योजना वगैरे) दीर्घ मुदतीची कर्जे देतात. ग्रामीण भागातील पैशाचे संचलन वाढवतात. बँकेच्या कार्यक्षेत्रातील शेतीविकास प्रकल्प तयार करून त्यास पोषक धोरण आखतात. शेतकऱ्यांकडून येणाऱ्या कर्जप्रकल्पांची शक्यता पडताळून पाहतात. शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जावर देखरेख ठेवतात तसेच मार्गदर्शन करतात.[७]

## २.३.२ बिगर शेती पतपुरवठा संस्था

### अ.१ नागरी सहकारी बँका

बिगरशेती पतपुरवठा संस्थांमध्ये नागरी सहकारी बँकांना महत्वाचे स्थान आहे. व्यापारी बँका या शहरी भागातील उद्योजकांना त्यांच्या उत्पादन साधनांच्या तारणावर कर्जे देतात. छोटे व्यापारी, पगारदार लोक, लघुउद्योजक यांना व्यापारी बँकांकडून पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा केला जात नाही. म्हणून शहरी भागातील आर्थिक-दृष्ट्या दुर्बल लोकांना कर्जपुरवठा करण्यातील नागरी सहकारी बॅकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

सामान्यत: नागरी सहकारी बॅकांची रचना ही एकात्म स्वरूपाची आहे. सहकारी बॅकांप्रमाणेच लोकशाही व्यवस्थापन असते. सभासद व बिगर सभासद यांच्याकडून विविध मुदतीच्या ठेवी स्वीकारणे हे नागरी सहकारी बँकांचे महत्त्वाचे कार्य आहे. तसेच सभासदांना बचतीची सवय लावणे हे नागरी सहकारी बँकांचे उद्दिष्ट असते. नागरी सहकारी बँका प्रामुख्याने सभासदांच्या उपभोग्य गरजा भागविण्यासाठी अल्पमुदतीची कर्जे देतात. लघुउद्योग व व्यापार यासाठी अल्प व मध्यम मुदतीची कर्जे देतात.[८]

## अ.२ पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था

औद्योगिक क्रांतीच्या काळात कारखानदारीमध्ये वाढ होऊन शहरी भागात कामगार संख्या मोठया प्रमाणात वाढू लागली. त्यातून पगारदार नोकर तसेच मर्यादित पण निश्चित उत्पन्न मिळवणाऱ्या लोकांचा एक वर्ग निर्माण झाला. या व्यक्तींना त्यांच्या उपभोग गरजा भागविण्यासाठी, छोटे उद्योगधंदे सुरू करण्यासाठी, कर्ज पुरवठा करण्यासाठी व्यापारी बँका उत्सुक नसत. याच पार्श्वभूमीवर पगारदार नोकरदारांनी त्यांच्या सहकारी पतपेढ्यांची स्थापना केली. तसेच पगारदार नोकरांचे सावकारापासून होणारे शोषण थांबविण्यासाठी या पतपेढ्या स्थापन झाल्या. प्रामुख्याने मद्रास, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि आंध्रप्रदेश या राज्यातील शहरी भागांत अशा पतपेढ्यांची वाढ झाली.[९]

शहरी भागातील नोकरी करणाऱ्या लोकांची कर्जविषयक गरज या पतसंस्थाद्वारा भागविली जाते. कमी उत्पन्न गटातील पगारदार नोकरदारांना रास्त किंमतींनी कर्जपुरवठा करण्याची जबाबदारी अशा पतसंस्था पार पाडतात. उदा. प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, रेल्वे व पोस्ट खात्यातील कर्मचारी, विविध महामंडळातील कर्मचारी, शासकीय सेवेतील कर्मचारी इत्यादींनी अशा पतसंस्था स्थापन केल्याचे दिसून येते.

१. सभासदांना त्यांच्या वैयक्तिक जबाबदारीवर अल्पमुदतीचा कर्जपुरवठा करणे.

२. सभासदांत काटकसर, बचत व परस्परांमधील सहकार्य वाढीस लावणे.

३. सभासदांना जीवनावश्यक वस्तू रास्त किमतीने उपलब्ध करून देणे व त्यासाठी वस्तूंची खरेदी-विक्री करणे.

४. सभासदांना कर्ज दिल्यानंतर शिल्लक असलेल्या पैशाचा काही भाग व्यापारी बँकांकडे ठेवीच्या स्वरूपात किंवा सरकारी कर्जात गुंतविणे.

५. आापल्या सभासदांचे कल्याण साध्य करण्याच्या हेतूने त्यांची सावकारांच्या तावडीतून सुटका करणे. इत्यादी पगारदार नोकरांच्या पतसंस्थांची उद्दिष्टिये आहेत.[१०]

सहकारातील सर्वात सुरळीत चालणारा व कमीत कमी धोके असलेला संस्था प्रकार म्हणजे वेतनदारांच्या सहकारी पतपेढ्या होय. पगारातूनच कर्जाची परस्पर कपात होत असल्याने थकबाकीची व वसुलीची समस्या नसते. त्यासाठी खर्च नसतो. वेतनदार पतसंस्थांना स्वत:चे कार्यालय, इमारत अगर सेवकवर्ग यासाठी फारसा खर्च करावा लागत नाही. सभासदच मानद सचिवाचे काम पाहतो. वेतनदार जेथे नोकरीत आहे ते कार्यालय, कंपनी एखादे कपाट वा छोटीशी जागा संस्थेच्या कारभारासाठी पुरेशी असते. एकाच कंपनीत, कार्यालयात, एकमेकांच्या अधिक सहवासात काम करणाऱ्यांचा गट असल्याने सभासद अधिक सहकार्याने एकोप्याने व खेळीमेळीने संस्थेचे काम करतात.[११]

## ब. औद्योगिक सहकारी संस्था

बिगरशेती पतपुरवठा प्रकारातील महत्वाचा वाटा असणाऱ्या संस्था म्हणजे औद्योगिक सहकारी संस्था होय.

इंग्रजांच्या राजवटीत अनेक कुटिरोद्योग आणि लघुउद्योगांचा ऱ्हास झाला. अनेक कामगार बेकार झाले. नवीन पद्धतीने उत्पादन करण्यासाठीचे तांत्रिक ज्ञान व भांडवल त्यांच्याकडे नव्हते. परिणामी उपजीविकेसाठी त्यांनी शेती व्यवसाय स्वीकारला. त्यामुळे शेती व्यवसायावरील ताण वाढला. या परिस्थितीत मार्ग काढण्यासाठी आणि कुटिरोद्योग व लघुउद्योगांना पुनर्जीवन देण्यासाठी औद्योगिक सहकारी संस्थांची स्थापना झाली.

कारागीर, औद्योगिक कामगार किंवा छोटे उद्योजक यांनी एकत्र येऊन उत्पादक, विक्री आणि सेवा पुरविण्यासाठी स्थापन केलेल्या सहकारी संस्थेला औद्योगिक सहकारी संस्था असे म्हणतात.

औद्योगिक सहकारी संस्थांचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

१. सभासदांना कच्चामाल, यंत्रसामग्री, अवजारे, उपकरणे आणि इतर साधनसामग्री उपलब्ध करून देणे आणि पुरवठा करणे.

२. संस्थेच्या सभासदांसाठी पैसे, कर्ज उभारण्यास मदत करणे. तसेच कच्च्या व पक्क्या मालाच्या तारणावर कर्ज उपलब्ध करून देणे.

३. सभासदांना तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण देण्याची व्यवस्था करणे व वेळोवेळी मार्गदर्शन करणे.

४. सहकारी संस्थेने सरकार व इतर सार्वजनिक संस्थाकडून कामाचे आदेश मिळविणे आणि ते सभासदांकडून पूर्ण करून घेणे.[१२]

## २.४ समारोप

महाराष्ट्र राज्य हे सहकारी चळवळीच्या विकासातील देशातील महत्त्वाचे राज्य आहे. १९ व्या शतकात महाराष्ट्रातील सहकारी चळवळ सुरू झाली. सन १९०४ व १९१२ च्या सहकारी कायद्याने ती गतीशील झाली आणि १९६० च्या महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यामुळे अधिकाधिक विकास पावली. प्राथमिक पतपुरवठा सोसायट्या, जिल्हा सहकारी बँका, राज्य सहकारी बँक, प्राथमिक सहकारी भूविकास बँका, राज्य सहकारी भूविकास बँका, नागरी सहकारी बँका, पगारदारांच्या पतपेढ्या, औद्योगिक सहकारी संस्था, ग्राहक संस्था, साखर कारखाने, सूत गिरण्या, गृहनिर्माण संस्था इत्यादींमध्ये संख्यात्मक व गुणात्मक वाढ झाली म्हणूनच सहकारी क्षेत्रात पुढारलेले राज्य म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख केला जातो.

## संदर्भ


१. खोपडे चंद्रकांत, महाराष्ट्र को-ऑप. क्रेडिट न्यूज (ऑगस्ट २०१५), महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., पुणे, पान क्र.४,५

२. रायखेलकर ए.आर., ए.जी.डांगे (१९७८), सहकार: तत्वे व व्यवहार, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, पान क्र.१९२.

३. चौगुले व्ही.टी, के.जी. पठाण (१९७९), सहकाराची मूलतत्त्वे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पान क्र.१०२.

४. तत्रैव, पान क्र.१०४,१०५

५. तत्रैव, पान क्र.१०५,१०६

६. तत्रैव, पान क्र.१०८

७. तत्रैव, पान क्र.१०८,१०९

८. तत्रैव, पान क्र.११०, १११

९. तत्रैव, पान क्र.१११

१०. उ.नि.,रायखेलकर ए.आर.,ए.जी.डांगे, पान क्र.९४.

११. हावरे विलास, महाराष्ट्र को-ऑप. क्रेडिट न्यूज (जुलै-२०१५), महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.,पुणे, पान क्र.६.

१२. सराफ मोहन, रमेश दापके (१९९१), सहकार, विद्या प्रकाशन, पुणे, पान क्र.१७३, १७४.

## प्रकरण तिसरे

## संशोधन पध्दती

**प्रस्तावना**

३.१ संशोधनाचा विषय

३.२ संशोधनाची गरज

३.३ संशोधनाची व्याप्ती

३.४ संशोधनाची उद्दिष्टये

३.५ संशोधनाची गृहितके

३.६ संशोधन पध्दती

३.७ तथ्य संकलन पद्धती

३.८ नमुना निवड

३.९. विश्लेषण पध्दती

३.१० संशोधनाची मर्यादा

३.११ प्रकरण नियोजन

३.१२ समारोप

संदर्भ

# प्रकरण तिसरे

# संशोधन पध्दती

## प्रस्तावना

माणूस हा जिज्ञासू वृत्तीचा बुध्दीजीवी प्राणी असल्यामुळे तो नवनवीन गोष्टींचा शोध घेत असतो. तसेच निरीक्षणातून अनेक गोष्टींचा अभ्यास करत असतो यालाच संशोधन म्हणतात.

संशोधनातून नवीन कल्पना मांडल्या जातात. तसेच त्या अनुरोधाने सखोल पाहणी किंवा प्रयोग करून पूर्वीच्या अनुमानांना नवीन रूप दिले जाते. संशोधनातून अनेक सामाजिक समस्या सोडविल्या जातात.

''एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ'' या संत तुकारामांच्या उक्तीप्रमाणे एकमेकांना मदत करूनच आपण सर्व जण पुढे जात असतो. माणूस हा समाजशील प्राणी आहे. समाजात राहूनच, समाजातील इतर लोकांच्या मदतीनेच माणूस स्वत:चा विकास करू शकतो. यातूनच सहकार्य भावनेचा उदय झाला. सहकार्याच्या भावनेतून सहकारी चळवळीची स्थापना आणि प्रगती झाली.

भारतामध्ये १९ व्या शतकातील भीषण दुष्काळामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला होता. तर मध्यमवर्गीय नोकरदारही सावकारी पाशात अडकलेला असताना १९०४ च्या केंद्र सरकारच्या सहकारी कायद्याने सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली आणि पुढे सर्वांच्या सहकार्यातून ही चळवळ विकास पावली.

सहकारी चळवळीतून कृषी पतपुरवठा संस्था, बिगरकृषी पतपुरवठा संस्था, पणन संस्था, औद्योगिक संस्था, उत्पादक संस्था या संस्थांची निर्मिती

झाली. परिणामी विनाविलंब लोकांची आर्थिक गरज भागवली जाऊ लागली. सर्वांच्या सहकार्यातून निर्माण झालेल्या या पतपुरवठा संस्थांद्वारे स्वविकासाला चालना मिळाली आणि सावकार, जमिनदार यांच्या तावडीतून सर्वसामान्य माणूस, शेतकरी वर्गाची सुटका झाली.

सहकारी तत्वावर स्थापन झालेल्या बिगरकृषी पतपुरवठा करणाऱ्या संस्था या एक महत्वाच्या अर्थपुरवठा करणाऱ्या संस्था आहेत. शहरी भागात कामधंद्यासाठी आलेला तरूण वर्ग किंवा पगारदार नोकरदार यांना आर्थिक विकास करण्यासाठी पगारदार नोकरदारांच्या सहकारी पतसंस्थांची निर्मिती झाली. या पतसंस्थाद्वारे मध्यवर्गीय नोकरदार त्याची आर्थिक गरज भागवू लागला. पगारदार व्यक्तींना त्यांच्या गरजा भागविण्यासाठी उदा.वाहन खरेदी, टी.व्ही., फ्रिज खरेदी इ. कारणांसाठी सुलभरीत्या या पतपेढ्यांद्वारे कर्जपुरवठा केला जातो.

पगारदार नोकरदारांनी एकत्र येऊन स्वत:चा आर्थिक विकास करण्याच्या हेतूने स्थापन केलेल्या या पतसंस्थामुळे आर्थिक गरज भागवली जाते. लोकांना बचतीची सवय लागते. आर्थिक विकास करण्यासाठी चालना मिळते. राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी पाठबळ मिळते. म्हणूनच संशोधकाला या पगारदारांच्या पतसंस्थाचे योगदान विचारात घेणे तसेच त्याचे आर्थिक विश्लेषण करणे आवश्यक वाटते.

## ३.१ संशोधनाचा विषय

बिगरशेती पतपुरवठा संस्था प्रकारातील पगारदार नोकरदारांच्या पतसंस्था किंवा वेतनदारांच्या पतपेढ्यांची नोकरी करणाऱ्या मध्यवर्गीय

व्यक्तींच्या जीवनातील भूमिका महत्वपूर्ण आहे. या पतसंस्थाद्वारा पगारदार व्यक्तींना आर्थिक पाठबळ उभे करून दिले जाते.

प्राथमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सरकारकडून मिळणाऱ्या तुटपुंज्या पगारातून स्वत:च्या आर्थिक गरजा भागवणे, मुलांचे शिक्षण पूर्ण करणे. स्वत:ची आर्थिक प्रगती व जीवनमानाचा दर्जा उंचावणे यासाठी या पतसंस्था आधारवड ठरतात. तसेच पगाराच्या प्रमाणात आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जात असल्यामुळे पतसंस्थेला कमीत-कमी जोखिम उचलावी लागते आणि म्हणूनच या पतसंस्था कार्यक्षमपणे कार्यरत आहेत.म्हणूनच **'मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या वित्तीय कामगिरीचा अभ्यास'** या विषयाची निवड केलेली आहे.

## ३.२ संशोधनाची गरज

शासन मान्य अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांतील शिक्षक बंधू-भगिनींना त्यांची आर्थिक पत वाढविण्यासाठी, राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी सहाय्यभूत असणाऱ्या 'मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेला' कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्या समस्या जाणून घेऊन संशोधनातून येणाऱ्या निष्कर्षांच्या माध्यमातून त्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविणे, तसेच पतसंस्थेच्या वित्तीय कामगिरीचा आलेख उंचावेल, व्यावसायिक वाढ होईल या हेतूने शिफारशी कराव्यात यासाठी या विषयावरील संशोधनाची आवश्यकता आहे.

## ३.३ संशोधनाची व्याप्ती

संशोधकाने संशोधनासाठी मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था ही एकच संस्था आणि या संस्थेच्या सन १९९९-२००० ते

२०१३–२०१४ या पंधरा वर्षातील वित्तीय कामगिरीचा सखोल अभ्यास केलेला आहे.

पतसंस्थेच्या वित्तीय कामगिरीचा आलेख, कार्यपध्दती, हिशेबतपासणी, व्यवस्थापन, आर्थिक स्थिती अशी संशोधन कार्याची व्याप्ती आहे.

## ३.४ संशोधनाची उद्दिष्टये

संशोधनाचे उद्देश हे संशोधकाला योग्य दिशा दाखविण्याचे काम करत असतात म्हणूनच मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचा अभ्यास करताना पुढील उद्दिष्टये निश्चित केली आहेत.

१. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या सन १९९९–२००० ते २०१३–२०१४ पर्यंतच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेणे.

२. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या कार्याचे आर्थिक विश्लेषणाद्वारे मूल्यमापन करणे.

३. पतसंस्थेच्या आर्थिक, व्यावसायिक वाढीसाठी उपाययोजना सुचविणे.

## ३.५ संशोधनाची गृहितके

समुद्रातील जहाजांना मार्ग दाखविण्याचे कार्य प्रकाशस्तंभ करतात त्याप्रमाणे गृहितके ही संशोधकाला इतरत्र भटकण्यापासून वाचवितात आणि प्रकाशस्तंभासारखे मार्गदर्शन करण्याचे कार्य करतात. गृहितके हे संशोधकाच्या संशोधनाचे अनुमान असते. गृहितके ही वस्तुनिष्ठ निरीक्षणावर आधारित असतात आणि म्हणूनच ती संशोधनकार्य सुनियंत्रित करतात.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचा अभ्यास करताना पुढील गृहितके विचारात घेतली आहेत.

१. सहकारी तत्वानुसार अस्तित्वात आलेल्या मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची गेली १५ वर्षांची वाटचाल प्रगतिपथावर आहे.

२. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या कार्याचे आर्थिक निर्देशक समाधानकारक आहेत.

## ३.६ संशोधन पध्दती

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या वित्तीय कामगिरीचा अभ्यास करताना संशोधकाने व्यष्टी अध्ययन पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

व्यष्टी अध्ययन ही एक सखोल व सूक्ष्म अशी अध्ययन पध्दती आहे. म्हणून या पध्दतीला बर्जेस यांनी सामाजिक सुक्ष्मदर्शक यंत्र असे संबोधले आहे. या अध्ययनात एका विषयाच्या संबंधात अधिक माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. अध्ययन एकक व्यक्ती, समूह, सामाजिक संस्था किंवा समूदाय असो, त्याचे अध्ययन व्यष्टी अध्ययनात केले जाते. अध्ययनासाठी जो एकक निवडला जातो. त्या एककाचा नैसर्गिक इतिहास रेखाटणे हे व्यष्टी अध्ययन पद्धतीचे उद्दिष्ट आहे.[१]

व्यष्टी अध्ययनाची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### ३.६.१एक किंवा अधिक सामाजिक एककाचे अध्ययन

व्यष्टी अध्ययनात एक किंवा एकापेक्षा अधिक सामाजिक एककाचे अध्ययन केले जाते. हे एकक एक व्यक्ती, कुटुंब, संस्था, समूह असे असू शकते. व्यष्टी अध्ययनात सखोल आणि सूक्ष्म अध्ययनावर विशेष भर दिला जातो म्हणून व्यष्टी अध्ययनातील एककांची संख्या मर्यादित असते.

### ३.६.२ समस्यांचे सखोल अध्ययन

व्यष्टी अध्ययनात समस्येच्या संबंधित एककांचे सखोल व सूक्ष्म अध्ययन केले जाते. म्हणून हे अध्ययन बराच काळापर्यंत केले जाते. एककाच्या भूतकाळापासून वर्तमानकाळापर्यंतची माहिती संकलित केली जाते आणि तथ्यांचे सखोल अध्ययन केले जाते.

### ३.६.३ व्यक्तिगत अध्ययन

व्यष्टी अध्ययनात एककांचे म्हणजे व्यक्ती, कुटुंब, संस्था, समूह यांचे व्यक्तिगत पातळीवर अध्ययन केले जाते.

### ३.६.४ एककाचे संपूर्ण अध्ययन

व्यष्टी अध्ययनात एककाचे संपूर्ण अध्ययन केले जाते. त्याचे सामाजिक, मानसवैज्ञानिक, आर्थिक, धार्मिक, भौगोलिक, प्राणीशास्त्रीय या दृष्टीकोनातून अध्ययन केले जाते.

### ३.६.५ गुणात्मक अध्ययन

या पद्धतीत एककाचे गुणात्मक अध्ययन केले जाते आणि गुणात्मक तथ्यांचे संकलन केले जाते. निष्कर्ष काढण्यासाठी या पद्धतीत वर्णनात्मक विश्लेषण प्रस्तुत केले जाते.

### ३.६.६ ऐतिहासिक अध्ययन

व्यष्टी अध्ययनात एककाचे बराच काळापर्यंत अध्ययन केले जाते. ऐतिहासिक अध्ययनामुळे त्या एककाच्या वर्तमानावर कोणता परिणाम झाला हे लक्षात येते.[२]

म्हणूनच संशोधकाने ‘मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या वित्तीय कामगिरीचा अभ्यास’ सखोल, सुक्ष्मपणे करण्यासाठी व्यष्टी अध्ययन पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

### ३.७ तथ्य संकलन पद्धती

कोणतेही संशोधन करत असताना संशोधकाला प्रथम माहितीचे संकलन करावे लागते आणि माहिती व आकडेवारीच्या सहाय्याने उद्दिष्टांचे विश्लेषण करून गृहितकांची तपासणी (पडताळणी) करता येते.संशोधनासाठी संशोधकाने प्राथमिक व द्वितीयक स्त्रोतांचा उपयोग केला आहे.

#### ३.७.१ प्राथमिक स्त्रोत

जेव्हा संशोधक स्वत: अध्ययन क्षेत्रात जाऊन तथ्ये संकलित करतो. त्यास प्राथमिक स्त्रोत असे म्हणतात. निरीक्षण मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची इत्यादी प्राथमिक स्त्रोताची माध्यमे आहेत. संशोधकाने या ठिकाणी निरीक्षण या माध्यमाचा वापर केलेला आहे.

संशोधकाने मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था या संस्थेच्या कार्यालयाला भेट देऊन तेथील कार्यपद्धती, संगणकीकरण, कर्मचाऱ्यांची काम करण्याची पद्धत, सभासदांच्या सभा या बाबतीत निरीक्षणाद्वारे माहितीचे संकलन केले असून त्या माहितीचे विश्लेषण प्रस्तुत संशोधनात केले आहे.

#### ३.७.२ द्वितीयक स्त्रोत

संशोधकाने संशोधनासाठी प्रामुख्याने द्वितीयक स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे. प्रकाशित व अप्रकाशित माहिती ज्या विविध स्त्रोतांद्वारे संकलित केली जाते अशा स्त्रोतांना द्वितीयक स्त्रोत असे म्हणतात.

संशोधकाने पुढील द्वितीयक स्त्रोतांच्या आधारे तथ्यांचे संकलन केले आहे.

१. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे सन १९९९-२००० पासून सन २०१३-१४ पर्यंत १५ वर्षांचे वार्षिक अहवाल.
२. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर सहकारी पतसंस्था पुणे, आदर्श उपविधी, एप्रिल-२०१३.
३. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे,-महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.
४. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे सहकारी सभासद शिक्षण.
५. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टिक्षेपात-२०११
६. पुणे जिल्हा सहकारी बोर्ड मर्यादित, पुणे.(७८ वा वार्षिक अहवाल) सन २०१४-२०१५.
७. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबई वार्षिक अहवाल २०११-२०१२ / २०१३-२०१४
८. महाराष्ट्र को-ऑप. क्रेडिट न्यूज, जुलै-२०१५
९. महाराष्ट्र को-ऑप.क्रेडिट न्यूज, ऑगस्ट-२०१५
१०. सहकारी जगत् विशेषांक, पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मंडळ मर्यादित, पुणे, सप्टेंबर-२०१३
११. साथ सहकाराची प्रगती महाराष्ट्राची,लोकराज्य विशेषांक, सप्टेंबर-२०१२
१२. पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-२०१२-१३
१३. विविध संकेतस्थळांच्या आधारे द्वितियक तथ्यांचे संकलन केले आहे.

## ३.८ नमुना निवड

पुणे जिल्हयात नोकरदारांच्या ६९० पतसंस्था आहेत.[३] त्यातील सहकारी तत्त्वावर स्थापन झालेली-''मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी

पतसंस्था'' ही शासन मान्य अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आर्थिक पाठबळ पुरवणारी संस्था आहे. या पतसंस्थेद्वारा सभासद शिक्षकांना त्यांची आर्थिक गरज पूर्ण करणे, बचत करण्यासाठी प्रोत्साहन देणे, आर्थिक उन्नतीसाठी मदत करणे इत्यादीसाठी अनेक योजना राबविल्या जातात. उदा. लखपती योजना, मुलगी वाचवा रिकरिंग योजना, दामदुप्पट ठेव योजना या योजना पतसंस्थेद्वारा राबविण्यात आल्या. पतसंस्थेकडून तातडीचे कर्ज, फेस्टिव्हल कर्ज, मध्यम मुदत कर्ज पुरविले जाते. अशाप्रकारे प्राथमिक शिक्षकांच्या आर्थिक विकासात या पतसंस्थेची भूमिका उल्लेखनीय आहे.

१९९१ पासून सुरू झालेल्या जागतिकीकरणाच्या स्पर्धात्मक युगात तसेच रिझर्व्ह बँकेची धोरणे, सहकार कायदा यांच्या नियंत्रणानुसार कामकाज करताना या पतसंस्थेला कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. आधुनिकीकरणाचा कितपत वापर करता येईल तसेच कामकाजात व व्यवस्थापनात कोणते बदल अनुकूल आहेत याचा अभ्यास करणे या विचाराने संशोधकाने सहेतुक पणे या विषयावर संशोधन करण्याचे निश्चित केलेले आहे.

## ३.९ विश्लेषण पद्धती

संशोधकाने प्राथमिक आणि द्वितीयक स्त्रोतांच्या आधारे माहितीचे संकलन केलेले आहे. संशोधनाची उद्दिष्टे आणि गृहितके डोळयासमोर ठेऊन विविध स्त्रोतांच्या माध्यमातून माहिती संकलित केलेली आहे. संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण वस्तुनिष्ठ पद्धतीने होण्यासाठी संशोधकाने तक्ते, आलेख, वर्गीकरण, गुणोत्तरांचा वापर केलेला आहे.

गुणोत्तर विश्लेषण हे आर्थिक विश्लेषणाचे प्रभावी साधन आहे. A ratio is defined as " the indicated quotient of two mathamatical expresions " and as "the relationship between two or more things"[४] आर्थिक विश्लेषणामध्ये

संस्थेची व्यवहारिक स्थिती व योग्यता यांचे मूल्यमापन करण्यासाठी उत्कृष्ट मापक म्हणून गुणोत्तराचा उपयोग होत असतो. आर्थिक पत्रकांमध्ये असलेल्या संख्यात्मक आकडेवारीवरुन संस्थेच्या स्थितीबाबत अनुमान काढणे शक्य नसते. तथापि त्या आकडेवारीवरुन गुणोत्तर काढल्यास अचूक निष्कर्ष काढता येतात. म्हणून संशोधकाने खालील गुणोत्तरांच्या आधारे तथ्यांचे विश्लेषण केले आहे.

१. स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण काढण्यासाठी **'स्वनिधी ÷खेळते भांडवल X १००'**या सुत्राचा वापर केलेला आहे. हे प्रमाण किमान १०% असावे.

२. स्वनिधीमधील वाढीचे शेकडा प्रमाण काढण्यासाठी **'स्वनिधीमधील वाढ÷ मागील स्वनिधी X १००'**या सुत्राचा वापर केलेला आहे. ही वाढ ७.५% पेक्षा जास्त असावी.

३. ठेवींमधील वाढीचे शेकडा प्रमाण काढण्यासाठी **'ठेवीमधील वाढ÷ मागील ठेवी X १००'**या सुत्राचा वापर केलेला आहे. हे प्रमाण १०% पेक्षा जास्त असावे.

४) निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण काढण्यासाठी **'निव्वळ नफा ÷ खेळते भांडवल X १००'**या सुत्राचा वापर केलेला आहे. हे प्रमाण १% पेक्षा जास्त असावे. या गुणोत्तराच्या आधारे पतसंस्थेची नफाक्षमता तपासण्यास मदत झाली.

५) व्यवस्थापनात खर्चाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण काढण्यासाठी **'व्यवस्थापन खर्च ÷ खेळते भांडवल X १००'**या सुत्राचा वापर केलेला आहे. हे प्रमाण २.५% पेक्षा कमी असावे.

६) गुंतवणुकीचे ठेवीशी शेकडा प्रमाण काढण्यासाठी **'गुंतवणूक ÷ ठेवी X १००'**या सुत्राचा वापर केलेला आहे. हे प्रमाण ३०% पेक्षा जास्त असावे.[५]

$$\text{७) सी डी रेशो} = \frac{\text{येणे कर्ज–कर्ज वाटपास उपलब्ध स्वनिधी}}{\text{ठेवी + उभारलेले कर्ज}} \times १००$$

ठेवकर्जाचे प्रमाण काढण्यासाठीया सुत्राचा वापर केलेला आहे. ठेव कर्जाचे हे प्रमाण ६० ते ७० टक्क्यांच्या दरम्यान असणे आदर्श मानले जाते.

या गुणोत्तरांचा मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची आर्थिक स्थिती, आर्थिक स्थैर्य तपासण्यास मदत झाली.

## ३.१० संशोधनाची मर्यादा

१. ''मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था मर्या. पुणे : वित्तीय कामगिरीचा अभ्यास.'' या अभ्यासासाठी सन १९९९–२००० ते २०१३–२०१४ हा कालावधी लक्षात घेऊन संशोधकाने उपलब्ध माहितीच्या आधारे संशोधनकार्य पूर्ण केले आहे.

२. संशोधकाने प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण करून वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढलेले आहेत.

या मर्यादेत राहून संशोधकाने संशोधनकार्य पूर्ण केले आहे.

## ३.११ प्रकरण नियोजन

संशोधकाने संशोधन प्रबंध पूर्णत्त्वाला जाण्यासाठी व अभ्यास विषयाचे आकलन होण्यासाठी सात प्रकरणाद्वारे प्रबंधाची मांडणी केलेली आहे.

### प्रकरण–१ : सहकारी चळवळीचा इतिहास

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचा अभ्यास करत असताना सहकारी चळवळीचा इतिहास अभ्यासणे आवश्यक आहे, असे संशोधकाला वाटते. म्हणून पहिल्या प्रकरणात संशोधकाने सहकाराचा अर्थ, वैशिष्टये, तत्त्वे, सहकाराची गरज, महत्त्व, जागतिक सहकारी चळवळीचा इतिहास, आंतरराष्ट्रीय

सहकारी संघटनेचे कार्य, भारतीय सहकारी चळवळीचा इतिहास व प्रगती तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सहकार चळवळीचा विस्तार इत्यादी घटकांचा मागोवा घेतलेला आहे.

**प्रकरण–२: महाराष्ट्रातील सहकारी चळवळ**

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचा अभ्यास करत असताना महाराष्ट्रात सहकाराची मुहूर्तमेढ कशी रोवली गेली हे जाणून घेणेही आवश्यक आहे. म्हणून दुसऱ्या प्रकरणात संशोधकाने सहकारी चळवळीतील महाराष्ट्राचे स्थान, महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे स्वरूप, महाराष्ट्रातील सहकारी पतपुरवठा संस्था, पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था आणि महाराष्ट्रातील सहकारी चळवळ समृद्ध करणाऱ्या धुरिणांच्या कार्याचा आढावा घेतला आहे.

**प्रकरण–३ : संशोधन पद्धती**

एखादा सिध्दांत, समस्या किंवा प्रश्न यांकडे पाहण्याची शास्त्रशुद्ध पद्धती म्हणजे संशोधन होय.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचा हेतूपूर्वक अभ्यास करत संशोधन करत असताना संशोधकाला काही पायऱ्या डोळयासमोर ठेवाव्या लागल्या. संशोधकाने या प्रकरणात संशोधनाचा विषय, गरज, व्याप्ती, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पद्धती, संशोधनाची मर्यादा या पायऱ्यांच्या आधारे संशोधन कार्याची मांडणी केली आहे.

**प्रकरण–४ : साहित्याचा आढावा, सैध्दांतिक पार्श्वभूमी**

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या वित्तीय कामगिरीचा अभ्यास करत असताना संशोधन विषयाशी संबंधित विषयांचा आढावा

घेणे आणि सैध्दांतिक पार्श्वभूमी अभ्यासणे आवश्यक ठरते. या प्रकरणात संशोधकाने संशोधन विषयाशी संबंधित संदर्भ साहित्याचा आढावा घेतलेला आहे. तसेच केन्सचा व इतर बचतीचे सिध्दांत मांडलेले आहेत.

## प्रकरण–५ : पुणे जिल्हयाची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचा अभ्यास करत असताना अभ्यास क्षेत्राची सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी जाणून घेणे गरजेचे आहे. संशोधकाने या प्रकरणात पुणे जिल्हयाचे स्थान, प्राकृतिक रचना, खनिजे, नद्या, प्रशासकीय विभाग, हवामान, पर्जन्यमान, लोकसंख्या, जिल्हा उत्पन्न अंदाज, बाजारपेठा, स्थानिक स्वराज्य संस्था, बँका, सहकार, उद्योग, वार्षिक योजना या मुद्दयांच्या आधारे सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतलेला आहे.

## प्रकरण–६ : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची सद्य:स्थिती

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या वित्तीय कामगिरीचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यासाठी संशोधकाने पतसंस्थेची स्थापना, नोंदणी, कार्यक्षेत्र, सभासद व संघटनात्मक रचना, भागभांडवल, कर्जपुरवठा, ठेवी, उभारलेले कर्ज, अन्य बँकांमधील गुंतवणूक, कर्जवसूली व थकबाकी, उत्पन्न–खर्च व नफा, नफ्याची विभागणी व लाभांश, स्वनिधी, लेखापरिक्षण, आधुनिकीकरण या बाबींचा चिकित्सक अभ्यास केला आहे.

## प्रकरण–७ : निष्कर्ष आणि शिफारशी

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या वित्तीय कामगिरीचा अभ्यास करताना संशोधकाने या प्रकरणात संशोधनाचे निष्कर्ष दिले

आहेत. तसेच पतसंस्थेच्या व्यावसायिक वाढीस चालना मिळण्यासाठी उपाययोजना व शिफारशी दिल्या आहेत.

## ३.१२ समारोप

बिगरशेती पतपुरवठा संस्था प्रकारातील पगारदार नोकरदारांच्या पतसंस्था या विभागातील मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था या संस्थेची खाजगी प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या जीवनातील भूमिका महत्वपूर्ण आहे. प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या दैनंदिन आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी, तसेच शिक्षक-बंधू भगिनींना मानाने आर्थिक उन्नतीसाठी पाठबळ देणारी आणि सर्व सहकारी शिक्षकांच्या सहकार्यातून उभी राहिलेली ही पतसंस्था कार्यक्षमपणे कार्यरत आहे. अशा पतसंस्थेच्या कार्यपद्धतीचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. त्याद्वारे इतर पतसंस्थांना मार्गदर्शन मिळेल. त्यादृष्टीने प्रस्तुत संशोधन कार्य उपयोगी ठरणार आहे.

## संदर्भ


१. आगलावे प्रदिप, (२०१०) : सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, पान क्र.३१७

२. तत्रैव पान क्र. ३१८, ३१९

३. पुणे जिल्हा सहकारी बोर्ड मर्यादित, पुणे ७८ वा वार्षिक अहवाल सन २०१४-२०१५.

४. PANDEY I.M. , 2003, Essential of financial management, page no.62

५. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.१९ एप्रिल-२०१० चे परिपत्रक.

## प्रकरण चौथे

## संदर्भ साहित्याचा आढावा व सैध्दांतिक पार्श्वभूमी

**प्रस्तावना**

४.१ संदर्भ साहित्याचा आढावा

४.२ सैध्दांतिक पार्श्वभूमी

४.३ समारोप

संदर्भ

# प्रकरण चौथे

# संदर्भ साहित्याचा आढावा व सैध्दांतिक पार्श्वभूमी

## प्रस्तावना

संशोधनासाठी संशोधन विषयाची निवड करत असताना अतिशय महत्त्वाचा भाग म्हणजे संदर्भ साहित्याचा आढावा होय. संदर्भ साहित्य हे संशोधकाला दिशादर्शक ठरते. संशोधन विषयांची उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी संदर्भ साहित्याचा आढावा घेणे गरजेचे असते.मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचा अभ्यास करत असताना संशोधकाने संशोधन विषयाशी संबंधित नागरी सहकारी पतसंस्था व बँकावर आधारित शोधप्रबंधाचा आढावा घेतलेला आहे.

## ४.१ संदर्भ साहित्याचा आढावा

१) **प्रा. भगवंत क्षीरसागर (१९८९)** यांनी 'पुणे माध्यमिक शाळा शिक्षकेतर सहकारी पतपेढी पुणे, एक अभ्यास' या विषयावर अभ्यास केलेला आहे.

- या सहकारी पतसंस्थेचे कामकाज संस्थेच्या घटनेप्रमाणे आणि पोटनियमातील तरतुदीप्रमाणे चाललेले आहे का ? तपासणे.
- सभासदांच्या आर्थिक गरजांची पूर्तता कितपत होते, हे पाहणे.
- पतसंस्थेद्वारे सभासदांना उत्पन्न वाढीसाठी, बचतीसाठी कितपत मदत केली जाते.
- पतसंस्थेद्वारे राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा अभ्यास करणे.
- पतसंस्थेच्या १० वर्षांच्या वाटचालीचा अभ्यास करणे आणि आर्थिक कार्यक्षमतेच्या वृध्दीसाठी उपाययोजना सुचविणे.

इ. त्यांच्या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टये होती.

या अभ्यासासाठी संशोधकाने यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर केलेला आहे. पतसंस्थेच्या एकूण सभासदांपैकी १०% सभासदांच्या मुलाखती घेऊन माहिती गोळा केलेली आहे. नमुन्यातील अभ्यास घटकांकडून सामग्री संकलनासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर केलेला आहे. तसेच संस्थेच्या कार्यालयातून देखील माहिती मिळवली आहे. त्यांच्या संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत-

संस्थेने सभासदांना वाटलेल्या कर्जाचे वाढते प्रमाण हे संस्थेच्या आर्थिक प्रगतीचे मोजमाप आहे. संस्थेच्या संचालकांना स्वभांडवलातूनच पतमर्यादा वाढवून जास्तीत जास्त कर्जपुरवठा करावयाचा आहे. त्यादृष्टीने त्यांची योजना विचाराधीन आहे. पतसंस्थेला हिशोब तपासणीचे वेळी मिळालेला 'अ' दर्जा संस्थेच्या समाधानकारक वाटचालीचे द्योतक मानता येईल. १९७८-७९ मध्ये 'अ' दर्जात रूपांतर झाले आहे आणि ते अद्याप टिकून आहे.

लोकशाही प्रशासन हे सहकारी तत्त्व या संस्थेत अंगिकारलेले आहे. या पतसंस्थेतील निवडणुकांमध्ये सभासद सक्रियतेने सहभागी होत असतात. असे सर्वेक्षणात आढळले. मतदानाच्या दिवशी सर्वच सभासद उपस्थित असतात. असे सर्वेक्षणात आढळले. त्यातील सुमारे ७०% सभासद उमेदवाराचा प्रचार करण्यात गुंतलेले असतात. लोकशाही प्रशासन या संकल्पनेनुसार सभासदाने आणि संचालकाने जास्तीत जास्त बैठकांना उपस्थित राहणे आवश्यक असते. वार्षिक सर्वसाधारण सभेची उपस्थिती समाधानकारक नसली तरी प्रत्येक कार्यकारिणीच्या सभेस कार्यकारिणीचे सर्व सदस्य उपस्थित असतात ही समाधानाची बाब आहे.[१]

२) **प्रा.प्रभा आर. कोल्हे (१९८९)** यांनी 'महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँक, प्रामुख्याने भगिनी निवेदिता महिला सहकारी बँक पुणे, एक अभ्यास' या विषयावर अभ्यास केलेला आहे.

- महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्हा व पुणे शहरातील नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीपथावरील वाटचालीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
- भगिनी निवेदिता सहकारी बँकेच्या स्थापनेमागील ऐतिहासिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
- ज्या ध्येय आणि उद्दिष्टांचा विचार करून भगिनी निवेदिता सहकारी बँक अस्तित्वात आली. त्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यात बँकेला कितपत यश मिळाले याचा अभ्यास करणे.
- बँकेने राबविलेल्या अनेकविध प्रगती योजना आणि त्या योजना राबविताना आलेले अडथळे, त्यांवरील योजलेल्या उपायांचा अभ्यास करणे.
- सभासदांना कर्जपुरवठा करताना बँकेने अवलंबिलेल्या धोरणांचा अभ्यास करणे.
- थकबाकी वसुली संदर्भात चांगल्या उपाययोजनांची माहिती करून घेणे.
- बँकेच्या कार्यपद्धतीची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपाय सुचविणे.

इ. त्यांच्या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टये होती.

या अभ्यासासाठी संशोधकाने नमुना निवड पद्धतीचा वापर केलेला आहे. मुलाखतीसाठी १९८७ सालच्या भागभांडवलदारांच्या यादीतील १०% लोकांची सरसकट निवड करण्यात आली. तसेच संचालकमंडळातील ५०% म्हणजेच १६ पैकी ८ संचालकांची निवड करण्यात आली. त्याचपध्दतीने बँकेच्या ५० कर्मचाऱ्यांपैकी २५ कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली.

तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि द्वितीयक स्त्रोतांचा वापर केलेला आहे.त्यांच्या संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

- महाराष्ट्र राज्य, जिल्हा, विभाग पातळीवरील नागरी सहकारी बँकाच्या गुणात्मक प्रगतीच्या वाढीचा तुलनात्मक अभ्यास करता, भगिनी निवेदिता सहकारी बँकेचा गुणात्मक वाढीचा दर इतर बँकापेक्षा अधिक आहे.
- भारतातील महाराष्ट्र हे एकमेव प्रगतीशील राज्य असून महाराष्ट्रातील पुणे जिल्हा हा अधिक सुधारित जिल्हा आहे आणि या दोन्ही स्तरांवर नागरी सहकारी बॅकांना प्रगतीसाठी भरपूर वाव आहे.
- भगिनी निवेदिता बँक ही व्यापारीवर्ग व उदयोगपतींना कर्जपुरवठा करण्यास उत्सुक आहे आणि जवळपास ३८% कर्जपुरवठा बँकेने या वर्गाला केला आहे.
- भगिनी निवेदिता बँकेने ध्येयवादी व कार्यक्षम संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी व्यवस्थापक यांच्या सल्ल्याने वेगाने व सातत्यपूर्ण प्रगती केली आहे.इतर बँकांचे संचालक या बँकेच्या संचालकांचे अनुकरण करू शकतात.
- भगिनी निवेदिता महिला बँकेमध्ये ९५% महिला वर्ग कार्यरत आहेत. प्रामाणिक आणि एकनिष्ठ महिला कर्मचाऱ्यांमुळे बँकेचे कामकाज सुरळीतपणे सुरू आहे. भगिनी निवेदिता बँक ८०% कर्मचाऱ्यांना उत्तम वेतन देते. साधारण कर्मचाऱ्यांना महिन्याला १५०० रूपयांपेक्षा जास्त वेतन मिळते.[२]

३) **प्रा. महंमद रफीक उमराव मुलाणी (१९९०)** यांनी 'साधना सहकारी बँक, हडपसर' या बँकेच्या कार्यपध्दतीचा एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर अभ्यास केलेला आहे.

- साधना सहकारी बँकेचे कार्य तिच्या घटनेतील तरतूदीनुसार व सहकारी कायद्यातील तरतुदीनुसार चालले आहे किंवा कसे ते तपासणे.
- १९७५ पासूनच्या प्रगतीचा आढावा घेणे.
- नागरी सहकारी बँक म्हणून साधना सहकारी बँकेने समाजातील दुर्बल व मध्यमवर्गीयांसाठी विशेषत: स्वयंरोजगार हातगाडीवाले, फेरीवाले इ. साठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.
- कामकाजपध्दतीतील अडीअडचणींचा अभ्यास करून उपाययोजना सुचवणे. इत्यादी त्यांच्या अभ्यासाची उद्दिष्ट्ये होती.

या अभ्यासासाठी संशोधकाने प्रत्यक्ष मुलाखती घेऊन साधन सामग्री गोळा केलेली आहे. साधना सहकारी बँकेचे कर्जदार सभासद तसेच बँक पदाधिकारी यांच्याकडून मुलाखतीद्वारा माहिती मिळवली आहे. तसेच बँकेचे अहवाल, नियमावली, १ एप्रिल १९९० रोजी सहकार विश्व अधिवेशनास उपस्थित राहून संशोधकाने माहिती मिळवली आहे. त्यांच्या संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत–

- १९०४ च्या सहकारी कायद्यानंतर भारतात सहकार चळवळीस प्रारंभ झाला. या सहकारी संस्था रायफझन आणि शुल्झ यांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्थांच्या पध्दतीवर काम करीत आहे.
- नागरी सहकारी बँका शहरी व निमशहरी विभागात किमान रूपये ५०,००० वसूल भागभांडवल असलेली आणि बँकींग सुविधा उपलब्ध करून देणारी बँक होय.
- स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिकीकरणाची गती वाढली. औद्योगिक शहरे अस्तित्वात आली. औद्योगिकीकरणाच्या वित्तसमस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांबरोबर नागरी सहकारी बँकांनी महत्त्वाचा वाटा उचलेला आहे.

ही बँक ठेवी गोळा करणे, कर्जे देणे, अभिकर्ता म्हणून कार्य करते. सुरक्षा गृहाची व्यवस्था करते. औद्योगिकरणास मदत करते. दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटातील लोकांना मदत करते. त्याप्रमाणे स्त्रियांना मदत करते.[३]

४) **संगिता शिंदे (२००५)** यांनी 'आर्थिक पृथ:करणाद्वारे पुणे शहरातील नागरी सहकारी पतसंस्थांचा तुलनात्मक अभ्यास' या विषयावर अभ्यास केलेला आहे.

- नागरी सहकारी पतसंस्थांची व्यवस्थापन पद्धती अभ्यासणे.
- निवडलेल्या प्रत्येक पतसंस्थेच्या निवडक आर्थिक घटकांचा मागील ३ वर्षांचा अभ्यास करणे.
- आर्थिक घटक व त्यांचे पतसंस्थेच्या कारभारात स्थान किती महत्वाचे आहे ते पाहणे.
- अभ्यासासाठी निवडलेल्या १० संस्थांची सहकार खात्याने घालून दिलेल्या आदर्श प्रमाणाशी तुलना करून व रेशोच्या आधारे तुलना करून संस्थांची आर्थिक स्थिती व त्यामागची कारणे जाणून घेणे व त्यावरून निष्कर्ष काढणे.

इ. त्यांच्या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्ट्ये होती.

या अभ्यासासाठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला असून नमुना निवड करताना पुणे शहरातील २७२ संस्थांपैकी १० पतसंस्थांच्या निवडक आर्थिक घटकांचा अभ्यास करून त्याचे आर्थिक पृथ:करण केले आहे व त्यांचा आदर्श स्थिती व इतर संस्थांशी तुलना करून निष्कर्ष काढले आहेत. पतसंस्थांची आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी त्यांचे ३ वर्षांचे अहवाल, अध्यक्ष व व्यवस्थापकांची मुलाखत यांच्याद्वारे आर्थिक घटकांची माहिती मिळवली आहे. अभ्यासासाठी क्रेडीट डिपॉझिट रेशो, इन्व्हेस्टमेंट

डिपॉझिट रेशो, कॅश/बँक डिपॉझिट रेशो, ॲव्हरेज बोरोईग रेट, ॲव्हरेज लेडींग रेट इ. रेशोंचा वापर केला आहे.

संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. अभ्यासलेल्या १० पतसंस्थांपैकी ९ म्हणजेच ९०% पतसंस्थांची थकबाकी ही आदर्शप्रमाण म्हणजे ५% त्यापेक्षा जास्त आहे.

२. अभ्यासलेल्या संस्थांची मागील ३ वर्षांची सरासरी पाहता फक्त ५०% पतसंस्था अपेक्षेप्रमाणे ठेवीमध्ये वाढ घडवून आणण्यात यशस्वी झाल्या आहेत. तर ४०% पतसंस्थांच्या ठेवींमध्ये वाढ झाली असली तरी त्याचे प्रमाण अल्प आहे. आणि एका म्हणजे १०% पतसंस्थेच्या ठेवींमध्ये काहीच वाढ झालेली दिसत नाही.

३. आठ पतसंस्था म्हणजे ८०% पतसंस्था या दैनंदिन ठेवी गोळा करतात.

४. अभ्यासलेल्या पतसंस्थांचा विचार करता ६०% पतसंस्थांना कर्ज वाटपात यश मिळाले आहे; तर ४०% पतसंस्थांच्या कर्जवाटपात वाढ झाली असली तरी ती नगण्य आहे.

५. कर्जवाटपासाठी तज्ञ लोकांची समिती आवश्यक आहे. त्यामुळे योग्य कर्जवाटप तर होईलच व कर्जवाटपाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर असल्याने ते अधिक जागरूकपणे कर्जवाटप करतील.

६. अभ्यासलेल्या पतसंस्थांपैकी एका म्हणजे १०% पतसंस्थांच्या गुंतवणुकीचे प्रमाण योग्य आहे. ९०% पतसंस्थांपैकी २०% पतसंस्थांच्या गुंतवणूकीचे प्रमाण अतिशय कमी व ७०% पतसंस्थांच्या कर्जवाटपाचे प्रमाण कमी तर गुंतवणुकीचे प्रमाण जास्त दिसून येते.

७. अभ्यासलेल्या ४०% पतसंस्थांचे बँक व रोख शिलकीचे प्रमाण योग्य आहे. तर ५०% पतसंस्थांचे बँक व रोख शिलकीचे प्रमाण फार कमी आहे. त्यांना आपले व्यवहार भागविण्यासाठी बॉरोईंग करावे लागले आहे. तर एका

पतसंस्थेच्या म्हणजे १०% पतसंस्थेच्या (ठेवीचे) रोख व बँक शिलकीचे प्रमाण अतिशय जास्त आहे.

८. राखीव निधीबाबत ४०% पतसंस्थांचे राखीव निधीच्या वाढीचे प्रमाण उत्तम असून ६०% पतसंस्थांचे राखीव निधीच्या वाढीचे प्रमाण समाधानकारक आहे.

९. ९०% पतसंस्थांच्या सभासद संख्या वाढीचा वेग चांगला असून १००% पेक्षा जास्त आहे. परंतु एका म्हणजे १०% पतसंस्थांची सभासद संख्या घटत चालली आहे.

१०. अभ्यासलेल्या ३०% पतसंस्थांमध्ये पुरेशी कर्मचारी संख्या आढळली. इतर ७०% पतसंस्थांमध्ये कर्मचारी वर्गाचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा कमी आढळले, तर ८०% पतसंस्थांमधील कर्मचारी कुशल कर्मचारी आढळले तर २०% पतसंस्थांमध्ये कर्मचारी अकुशल आढळले.

११. १००% पतसंस्था प्रशिक्षण कार्यक्रमासाठी आपले कर्मचारी पाठविताना आढळले.

१२. अभ्यासलेल्या सर्वच पतसंस्था वेळेत आपले लेखापरिक्षण करून घेताना दिसल्या. त्यापैकी ६०% पतसंस्था लेखापरीक्षणात 'अ' वर्ग मिळवण्यात यशस्वी झाल्या आहेत. तर ४०% पतसंस्थांचा लेखापरिक्षण वर्ग अ,ब,क असा असल्याचे दिसून आले.

१३. सर्वच नागरी पतसंस्था आपापल्या परीने आर्थिक व्यवहाराबरोबर समाजकार्येही करत आहेत. समाजाचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. तसेच नियमितपणे कायदा व पोटनियमाप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभा व संचालक मंडळ सभा घेतल्याचे आढळून आले.[४]

तसेच नियमितपणे कायदा व पोटनियमाप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभा व संचालक मंडळ सभा घेतल्याचे आढळून आले.[४]

५) **प्रा.सोमनाथ रामचंद्र आंधळे (जून २००९)** यांनी 'नाशिक जिल्हयाच्या आर्थिक विकासातील नागरी सहकारी बँकांच्या भूमिकांचे मूल्यमापन विशेष संदर्भ-निफाड तहसिलमधील नागरी सहकारी बँका' या विषयावर संशोधन केलेले आहे.

या संशोधनासाठी संशोधकाने पुढील उद्दिष्ट्ये मांडली आहेत.

- भारतातील नागरी सहकारी बँकांची उद्दिष्ट्ये आणि सद्यस्थितीचा आढावा घेणे. विशेषत: नागरी सहकारी बॅकांच्या संदर्भातील रिझर्व्ह बँकेचे धोरण, बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ व महाराष्ट्र सहकारी कायदा-१९६० मधील तरतुदींची समीक्षा करणे.
- नाशिक जिल्हयातील आर्थिक विकासातील नागरी सहकारी बँकांच्या भूमिकेची चर्चा करणे.
- नाशिक जिल्हयात आर्थिकदृष्टया संपन्न आणि प्रगत समजल्या जाणाऱ्या निफाड तालुक्यातील नागरी सहकारी बँकांची भूमिका विश्लेषित करणे.
- निफाड तहसिलमधील नागरी सहकारी बँकांचे तुलनात्मक अध्ययन करणे.
- निफाड तहसिलमधील नागरी सहकारी बँकांच्या कार्याचे (ठेवी, कर्ज, गुंतवणूक, कर्जवसुली इ.) चे टीकात्मक परिक्षण करणे.
- निफाड तहसिलमधील नागरी सहकारी बँकांच्या व्यवस्थापनाची समीक्षा करणे.
- निफाड तहसिलमधील नागरी सहकारी बँकांनी केलेल्या सामाजिक कार्याचे विश्लेषण करणे.
- निफाड तहसिलमधील नागरी सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषण करणे.
- नागरी सहकारी बँकांच्या हिशेब तपासणीच्या पद्धतीचे विवेचन करणे.

- निफाड तहसिलमधील नागरी सहकारी बँकांनी केलेल्या कार्यामुळे झालेल्या विकासाचे अध्ययन करणे.
- निफाड तहसिलमधील नागरी सहकारी बँकांनी केलेल्या आधुनिकीकरणाचा अभ्यास करणे.

संशोधकाने तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांच्या आधारे माहितीचे संकलन केलेले आहे. प्राथमिक स्त्रोतांमध्ये मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण, इ.द्वारे अध्यक्ष, व्यवस्थापक, संचालक, कर्मचारी, ग्राहक यांच्याकडून माहिती मिळवली. तर भारतीय रिझर्व्ह बँक कायदा १९३५, बँकींग रेग्युलेशन अॅक्ट १९४९, महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा १९६०, नागरी सहकारी बँकांचे अहवाल, विविध संदर्भ ग्रंथ इत्यादींच्या आधारे माहितीचे संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर करून विश्लेषण केलेले आहे.

संशोधकाने अभ्यासातून खालील मुद्दयांच्या अनुषंगाने निष्कर्ष मांडले आहेत.

- नागरी सहकारी बँकांच्या कामकाजात शिस्त दिसून आली.
- आर्थिक विकासात नागरी सहकारी बँकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.
- आर्थिक गरज पूर्ण होण्यास मदत झाली.
- सहकारातून विकास होण्यास मदत झालेली आहे.
- नागरी सहकारी बँकांमधील व्यवस्थापन कार्यक्षम आहे.
- निफाड तहसिलमधील नागरी सहकारी बँकांच्या कार्यात वाढ झालेली आहे.
- नागरी सहकारी बँकाच्या ठेवीमध्ये वाढ दिसून आली.
- नागरी सहकारी बँकांनी केलेला कर्जपुरवठा सतत वाढत असल्याचे दिसून येते.
- नागरी सहकारी बँकांमधील गुंतवणूक रकमेत वाढ झाल्याचे दिसते.

- कर्जवसुली व थकबाकी - वाढत्या थकबाकीचे प्रमाण धोक्याची घंटा असल्याचे निर्देशक आहे.
- नागरी सहकारी बँकांकडून सामाजिक कार्यात सहभाग दर्शविला आहे.
- बँकांच्या व्यवस्थापनात विशिष्ट गटाचे वर्चस्व आहे.
- नागरी सहकारी बँकांची आर्थिक स्थिती उत्तम आहे.
- हिशेब तपासणी व ऑडिट वर्गपिंपळगाव मर्चंट को-ऑप.बँकेला 'अ' वर्ग तर ओझर मर्चंट, दि. निफाड अर्बन को-ऑप.बँकेच्या व्यवस्थापनाला कामकाजात सुधारणा करण्याचा इशारा.
- नागरी सहकारी बॅकांची सभासद संख्या बदलती असल्याचे दिसून येते.
- नागरी सहकारी बँकांचे भागभांडवल सातत्याने वाढत आहे.
- नागरी सहकारी बँकांचे स्वनिधी समाधानकारक असल्याचे दिसते.
- नागरी सहकारी बँकांचे आधुनिकीकरण केवळ संगणकीकरण एवढ्याच मर्यादेत झाल्याचे दिसते.
- नागरी सहकारी बँकांचा मर्यादित शाखा विस्तार दिसतो.
- नागरी सहकारी बँकांमधील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. मात्र वेतन बँकपरत्वे भिन्न आहे.
- लाभांश स्थिती १५% पेक्षा जास्त दराने लाभांश दिला जातो.[५]

६) **पराग प्रल्हाद कदम (डिसे.२०१०)** यांनी 'ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था कायम टिकवण्यासाठी अर्थशास्त्र सुधारणांच्या संदर्भात सहकारी चळवळीची भूमिका' या विषयावर अभ्यास केलेला आहे.

- सर्वसाधारणपणे भारतीय समाजातील बदलत्या सामाजिक, आर्थिक, स्थितीच्या संदर्भात सहकारी चळवळीची भूमिका आणि विशेषत: अहमदनगर जिल्हयाचा अभ्यास करणे.
- देशातील ग्रामीण भागातील विशेषत: अहमदनगर जिल्हयातील रोजगार, शिक्षण, आर्थिक प्रगती (पत) इ. च्या निर्मिती व त्यामध्ये स्थैर्य राखण्यासाठी सहकारी चळवळीची परिणामकारकता इ. चे मूल्यमापन करणे तसेच त्याचा अभ्यासक्षेत्रातील लोकांच्या बदलत्या सामाजिक आर्थिक पातळीवर होणारा प्रभाव पाहणे.
- सहकारांतर्गत कार्यान्वित असणाऱ्या अनेक सामाजिक आर्थिक उपक्रमांचा आणि त्यांच्या परिणामांचा अभ्यास करणे तसेच त्यांचा ग्रामीण जीवनातील बदलत्या सामाजिक आर्थिक पातळीवर आर्थिक सुधारणांचा परिणाम पाहणे.
- ग्रामीण अर्थव्यवस्थेची आर्थिक सुधारणांच्या संदर्भात आर्थिक स्थिती उत्तमरित्या राखण्यासाठी सहकारी संस्थांची शक्ती आणि क्षमतेचे मूल्यमापन करणे.
- अभ्यासक्षेत्रातील ग्रामीण समाजाचा जीवन निर्देशांकाचा कायापालट व देखरेख याबाबत सहकारी संस्थांचे महत्त्व, मूल्यांकन करणे.
- आर्थिक सुधारणांच्या काळात सहकारी, खाजगी, सार्वजनिक क्षेत्रांच्या तुलनात्मक क्षमतेचे मूल्यांकन करणे.
- माहितीच्या आधारे सहकारी चळवळीचे टिकात्मक मूल्यमापन करणे, आणि ग्रामीण अर्थव्यवस्था टिकवून ठेवण्यात सहकारी चळवळीची भूमिका आणि परिणामकारकतेचे परिक्षण करणे.

या अभ्यासासाठी संशोधकाने माहिती संकलनासाठी प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोतांचा वापर केलेला आहे. तसेच तक्ते त्यांचे अर्थ आणि विश्लेषण केलेले आहे. त्यांच्या संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

- अहमदनगर जिल्हयातील बहुसंख्य लोकसंख्या अशिक्षित आहे आणि जोपर्यंत समाज सुशिक्षित होत नाही तोपर्यंत सहकारी चळवळ यशस्वी होऊ शकत नाही.
- सहकारी संस्थातील सभासदांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देणे सहकारी चळवळीला चालना देण्यासाठी गरजेचे आहे.
- राजकिय हस्तक्षेप हा सहकारी चळवळीतील दोष आहे.
- आर्थिक सुधारणेच्या प्रक्रियेत सहकारी क्षेत्राविषयी योग्य विचार करणे गरजेचे आहे. कारण सहकार क्षेत्राची स्पर्धा व क्षमता वाढविल्याशिवाय अलिकडील आव्हाने पूर्ण करणे शक्य नाही.
- सहकारी संस्थांच्या प्रक्रिया विभागाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. उदा. कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा, अपुरा पतपुरवठा, अप्रशिक्षित व्यवस्थापन कर्मचारी सदोष किंमत धोरण.
- क्रेडीट सहकारी संस्था आणि इतर सहकारी संस्था यांमध्ये समन्वय आवश्यक आहे.
- आर्थिक सुधारणांमध्ये सहकारी संस्थांच्या विस्ताराऐवजी कमकुवत संस्थांची क्षमता वाढविण्यावर भर दिला पाहिजे.
- उत्पादक कारणासाठीच कर्जपुरवठा करायला हवा.

सहकारी क्षेत्राकडून त्यांच्या सभासदांचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा वाढविला जातो. त्यांच्या सभासदांचा आदर केला जातो. तसेच ग्रामीण

भागातील लोकांना चांगला राहणीमानाचा दर्जा मिळवून दिला जातो. सहकार क्षेत्राकडून सामाजिक मूल्यांची जोपासना केली जाते.[६]

७) **ए.जे. सकटे (जाने.२०११)** यांनी 'बिगर शेती सहकारी पतसंस्था विशेष संदर्भात सातारा जिल्हयातील कराड तालुका एक अभ्यास' या विषयावर अभ्यास केलेला आहे.

- कराड तालुक्यातील बिगर शेतकी सहकारी पतसंस्थांच्या संस्थात्मक पैलूंचा अभ्यास करणे.
- सादर केलेल्या संशोधन कार्यासंबंधित संदर्भ साहित्याचा आढावा घेणे.
- कराड तालुक्यातील बिगर शेतकी सहकारी पतसंस्थाच्या आर्थिक पैलूंचे विश्लेषण करणे.
- अभ्यास क्षेत्रातील बिगर शेतकी सहकारी पतसंस्थांच्या मानव संसाधनविषयक पैलूंचा अभ्यास करणे.
- निवडक बिगर शेतकी सहकारी पतसंस्थांच्या नफ्याची मोजणी करणे.
- कराड तालुक्यातील बिगर शेतकी सहकारी पतसंस्थांना तोंड द्याव्या लागणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
- बिगर शेतकी सहकारी पतसंस्थांच्या सुधारणेसाठी उपाय योजना सुचवणे.

इ. त्यांच्या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्ट्ये होती.

या अभ्यासासाठी संशोधकाने २१८ बिगर शेतकी सहकारी पतसंस्थांपैकी यादृश्चिक पद्धतीने १५.१३% म्हणजेच ३३ बिगर शेतकी सहकारी पतसंस्थांची निवड केली. सामग्री संकलनासाठी प्राथमिक, द्वितीय स्त्रोताचा वापर केलेला आहे. प्रश्नावली व निरीक्षणाद्वारा माहितीचे संकलन केले आहे.

तथ्यांचे विश्लेषण व अर्थ लावण्यासाठी प्रमाण आणि कल विश्लेषण, वाढ, सोपी आकडेवारी पध्दत, शेकडा प्रमाण, सरासरी तक्ते व आलेख इ. चा वापर केलेला आहे.

त्यांच्या संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

- करा‍ड तालुक्यातील बिगर शेतकी सहकारी पतसंस्थांचे खाजगी आणि सरकारी पातळीवरून लेखापरिक्षण केले जाते. तीन चतुर्थांश बिगर शेतकी सहकारी पतसंस्था या खाजगी आणि सरकारी अशा दोन्ही प्रकारचे लेखापरिक्षण करून घेतात. उरलेल्या २२.८६% पतसंस्था या फक्त सरकारी ऑडिट करून घेतात आणि ५.१७% पतसंस्था या फक्त खाजगी लेखापरिक्षण करून घेतात.
- सुमारे ३१.४२% पतसंस्थाकडे वार्षिक ठेवी या २० लाखापर्यंत आहेत. तर ५.७१% पतसंस्थांच्या ठेवी या २० लाख ते ३० लाखांपर्यंत आहेत. तसेच ५.७१% पतसंस्थांच्या ठेवी या ३० लाख ते ४० लाखापर्यंत आहेत. आणि ५.७१ पतसंस्थांच्या ठेवी या ४० लाख ते ५० लाखांपर्यंत आहेत. तर ५० लाख ते १ करोड ठेव असणाऱ्या २२.८७% पतसंस्था आहेत. तर १ करोड ते १० करोड ठेव असणाऱ्या २२.८७% पतसंस्था आहेत. तसेच ५.७१% पतसंस्थांची वार्षिक ठेव ही १० करोड पेक्षा जास्त आहे.
- कराड तालुक्यातील बिगर शेतकी सहकारी पतसंस्थांनी त्यांच्या ठेवी पायोनिअर हायर इन्स्टिटयुशन म्हणजेच डी.सी.सी. बँक आणि अर्बन बँक यांच्याकडून गोळा केल्या आहेत.
- कराड तालुक्यातील १०% बिगर शेतकी सहकारी पतसंस्था या त्यांच्या भागधारकांना लाभांश देत नाहीत. तर २५% बिगर शेतकी सहकारी पतसंस्था या त्यांच्या भागधारकांना लाभांश देतात.

- कराड तालुक्यातील बिगर शेतकी सहकारी पतसंस्थाकडे सर्व भौतिक सुविधा आहेत. उदा. संगणक, टेलिफोन, टायपिंग मशिन, पंखे इत्यादी.[७]

८) **अविनाश दि.कुलकर्णी (नोव्हें.२०११)** यांनी 'पुण्यातील नागरी सहकारी बॅकांचा (शेडयुल्ड सोडून) एन.पी.ए. संदर्भातील तुलनात्मक अभ्यास' या विषयावर अभ्यास केलेला आहे.

- पुण्यातील नागरी सहकारी बँकांचा एन.पी.ए. संदर्भात तुलनात्मक अभ्यास करून नागरी सहकारी बँकांवर एन.पी.ए.च्या संदर्भात होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
- एन.पी.ए.ची कारणमीमांसा व एन.पी.ए. कमी करण्यासंदर्भात उपाययोजनांचा अभ्यास करणे.
- एन.पी.ए.ची नागरी सहकारी बँकांच्या व्यवसायातील उपयुक्तता याविषयीचा अभ्यास करणे.
- पुण्यातील काही नागरी सहकारी बँकांचा निव्वळ नेट एन.पी.ए.०% आहे. त्याच्या संदर्भात माहिती देऊन इतरत्र एन.पी.ए.चे प्रमाण जास्त असणाऱ्या बँकांना मार्गदर्शन उपलब्ध करणे.
- एन.पी.ए.बाबत बँकेचे सर्वसामान्य सभासद, खातेदार, ठेवीदार, कर्जदार व इतर घटकांना एन.पी.ए.ची उपयुक्तता, परिणाम, उपाययोजना इत्यादी बाबतची माहिती उपलब्ध करून देणे.
- एन.पी.ए.अर्थात अनुत्पादक जिंदगी या संदर्भात असणारे शासकीय नियम व नियमन कार्यवाही यांचा अभ्यास करणे.

- एन.पी.ए. मुळे नागरी सहकारी बँकेच्या कर्ज व्यवहारांवर व इतर व्यवस्थापन यंत्रणेवर होणारे परिणाम यांचा अभ्यास करणे.
- अशा परिणामांचा कारणीभूत असणारे घटक त्यांची कारणमीमांसा, शोधणे व उपाय सुचविणे.
- एन.पी.ए.ची संकल्पना नागरी सहकारी बँकांना सन १९९३ पासून लागू केल्यानंतर त्याचे या बँकांवर प्रत्यक्षात कोणते परिणाम झाले ? होत आहेत? याचा अभ्यास करणे. इ. त्यांच्या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्ट्ये होती.

या अभ्यासासाठी संशोधकाने तुलनात्मक, विश्लेषणात्मक, वर्णनात्मक, अन्वेषणात्मक पद्धतीचा वापर केलेला आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे. अभ्यासकाने प्रश्नावली व मुलाखतीद्वारा माहिती मिळवली आहे. सांख्यिकीय तक्ते व आलेखांद्वारे माहितीचे वर्णन व विश्लेषण केलेले आहे. त्याच्या संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

- भारताच्या मिश्र अर्थव्यवस्थेतील सर्वसमावेशकता अर्थात समाजवादी तत्वांना जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या स्वागतार्थ तिलांजली देण्यात आली असून भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या दिशेने कूच करण्यात आले आहे.
- कर्जाची वसुली आणि सुरक्षितता या घटकाचा हा परिणाम आणि उद्देश असल्यास हा महत्त्वपूर्ण निष्कर्ष आहे.
- रिझर्व्ह बँकेचे छोट्या आकाराच्या नागरी सहकारी बँकांच्याबाबत असलेले पक्षपाती धोरण आणि शासनाची अनुरूप भूमिका हा महत्त्वपूर्ण निष्कर्ष आहे.[८]

९) **प्रा. नारायण भिकोबा टाक (२०१२)** यांनी 'पुणे जिल्हयातील प्राथमिक सहकारी शेती पतपुरवठा संस्थांचा अभ्यास' या विषयावर अभ्यास केला आहे.

- भारतातील सहकारी चळवळ ही एक पत चळवळ आहे. सहकारी चळवळीची सुरूवात सहकारी शेती पतपुरवठा संस्थांपासून झाली. या संस्था १०० वर्षे भारतात कार्य करीत आहेत. त्यांचा अभ्यास करणे.
- महाराष्ट्र राज्य हे सहकारी चळवळीबाबत आघाडीवर असलेले राज्य आहे. सहकारी चळवळीत सर्वांत जास्त विकास पतचळवळीचा झाला आहे. त्यामध्ये सहकारी शेती पतपुरवठा संस्था सर्वांत महत्त्वाच्या आहेत त्यांचा अभ्यास करणे.
- पुणे जिल्हयासारख्या सहकारी पतचळवळीत प्रथमपासून पुढाकार घेणाऱ्या जिल्हयातील प्राथमिक शेती पतपुरवठा संस्थांचा अभ्यास करणे, संस्थांचे सभासद, भांडवल, कर्जपुरवठा, थकबाकी इ. बाबतची आकडेवारी संकलित करणे व संस्थांचे कार्य, प्रगती, आर्थिक सक्षमता याबाबतचे विवेचन करणे व संस्थांचे मूल्यमापन करणे.
- प्रत्यक्ष कर्जपुरवठ्यातील अडचणी व कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणी समजावून घेणे. अडचणी कमी करण्यासाठी उपाय सुचवणे.

इ. त्यांच्या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टये होती.

या अभ्यासासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केलेला आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे.

अभ्यासकाने प्राथमिक शेती पतपुरवठा संस्थांचे कर्जदार सभासदांकडून मुलाखतीद्वारा माहिती मिळवली आहे. नमुन्यातील अभ्यास घटकांकडून

सामग्री संकलनासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर केलेला आहे. तसेच संदर्भग्रंथ, रिसर्च पेपर, वार्षिक अहवाल, मासिके, सरकारचे सहकारी संस्थांचे अहवाल, तज्ञांचे लेख इ. द्वारा देखील माहिती मिळवली आहे. त्यांच्या संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत–

- १९९०–९१ ते २००२–०३ या कालावधीत या संस्थांच्या संख्येत वाढ झाली नाही.
- आदिवासी सहकारी संस्था व जिल्हयातील इतर सर्वसाधारण संस्था यांच्यापेक्षा या संस्थांची प्रतिसंस्था सरासरी सभासद संख्या जास्त आहे.
- संस्था सभासदांमध्ये लहान सभासदांचे प्रमाण मोठ्या सभासदांपेक्षा जास्त आहे.
- धारणक्षेत्र, नसलेल्या इतर सभासदांचे प्रमाण एकूण सभासदांमध्ये ३८.८७% आहे. इतर सर्वसाधारण संस्था व आदिवासी संस्था यांचेपेक्षा हे प्रमाण जास्त आहे.
- संस्थांनी (इतर सर्वसाधारण संस्था व आदिवासी संस्था) सरासरी प्रति सभासद कर्ज जास्त प्रमाणात दिले आहे.
- प्रतिवर्षी एकूण सभासदांमधील सरासरी २०% सभासदच संस्थेकडून कर्ज घेतात ही बाब अयोग्य आहे. जास्तीत जास्त सभासदांना कर्ज वाटप करण्यात या संस्थांना अपयश आले आहे.
- संस्थांचा कर्जपुरवठा वाढत गेला आहे. त्यामुळे येणे कर्जात वाढ झाली आहे.
- थकबाकी ही या संस्थांची मुख्य समस्या आहे. अभ्यास कालावधीत जवळजवळ सरासरी २५% सभासद (कर्जदार सभासदांपैकी) थकबाकीदार होते.[९]

१०) **शिवाजी मुरलीधर काकडे (जाने.२०१४)** यांनी 'महाराष्ट्रातील महिला नागरी सहकारी बँकांचे अर्थप्रबंधन एक अभ्यास' या विषयावर अभ्यास केलेला आहे.

- महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांचा अभ्यास करणे.
- महाराष्ट्रातील महिला नागरी सहकारी बँकांच्या आर्थिक कामगिरीची आंतरप्रादेशिक तुलना करणे.
- तौलनिक स्थिती अभ्यासणे.
- विकासातील समस्यांचे अध्ययन करणे व सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

इ. त्यांच्या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्ट्ये होती.

या अभ्यासासाठी संशोधकाने एकूण लोकसंख्येच्या तथ्य संकलनासाठी अध्ययन पद्धतीचा वापर केलेला आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा वापर केलेला आहे. महाराष्ट्रातील २७ महिला नागरी सहकारी बँकेच्या २,५२,९०० सभासदांपैकी ०.१% म्हणजे २५३ सभासदांची साध्या यादृश्चिक पद्धतीने निवड करून मुलाखत व अनुसूचीचा वापर करून माहिती मिळवली.

बँकांचे भागभांडवल, राखीव निधी, खेळते भांडवल, ठेवी, कर्जे, गुंतवणूक, थकबाकी, एन.पी.ए. मिळालेले व्याज, दिलेले व्याज, नफा, तोटा या घटकांचे आर्थिक संख्यात्मक वर्गीकरणाच्या आधारे, संख्याशास्त्रीय मोजमापाच्या आधारे विश्लेषण केलेले आहे.

त्यांच्या संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

- महाराष्ट्रातील महिला नागरी सहकारी बँकांमुळे महाराष्ट्रात सहकाराची मुहूर्तमेढ रोवली गेली. नागरी सहकारी संस्थांची संख्या, कोअर सिस्टिमसंदर्भात

महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक या तीन राज्यांव्यतिरिक्त इतर राज्यातील नागरी बँकांचा विकास अल्प आहे.

- नागरी सहकारी बँकांच्या संख्यात्मक वाढीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. भाग-भांडवल, सदस्यसंख्या, महिला बॅकांच्या शाखांची संख्या, बँकातील व्यवस्थापन समितीतील सदस्य त्यांची शैक्षणिक पातळी, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची टक्केवारी, कामकाज, राखीव निधीतील सरासरी वाढ (३.४० ते ७७.६४%), ठेवींचे प्रमाण, गुंतवणूक चढउतार, कर्जवाटप प्रक्रिया, खेळते भांडवल, कर्जावर मिळणारे व्याज व ठेवींवर द्यावे लागणारे व्याज, यांमधील सरासरी वाढीचे प्रमाण समाधानकारक आहे.
- महिला सहकारी बँकांचे भागभांडवल, राखीव निधी, ठेवी, गुंतवणूक,कर्जे, खेळते भांडवल, मिळालेले व्याज, दिलेले व्याज, नफा-तोटा इ. आर्थिक घटकांमध्ये प्रगती झालेली आहे.
- महिला सहकारी बँकांमुळे आर्थिक विकास होत आहे.
- एफ चाचणी प्रमाण ४१.१० ते ८१.३०% दरम्यान आहे.[१०]

## ४.२ सैध्दांतिक पार्श्वभूमी

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या वित्तीय कामगिरीचा अभ्यास करताना संशोधकाने केन्सचा उपभोगाचा मानसशास्त्रीय नियम, निरपेक्ष उत्पन्न परिकल्पना, सापेक्ष उत्पन्न परिकल्पना, स्थायी उत्पन्न परिकल्पना या सिद्धांताचा आधार घेतलेला आहे.

### ४.२.१ केन्सचा उपभोगाचा मानसशास्त्रीय नियम

सामान्य मनुष्य सर्वसाधारण परिस्थितीत कसा वागतो. याचे दर्शन या सिद्धांतात घडते. सामान्यतः मनुष्याची नैसर्गिक प्रवृत्ती अशी असते की, उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर त्याच्या खर्चात तेवढीच वाढ होत नाही. म्हणजेच माणसाची सहजप्रवृत्ती आहे की उत्पन्नापेक्षा आपला खर्च कमी करतात व काही ना काही उत्पन्न, खर्च न करता बचतीच्या रूपाने बाजूला टाकतात. केन्सच्या सिद्धांतातील महत्त्वाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१) उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर एकूण उपभोग वाढतो पण उपभोगात होणारी वाढ उत्पन्नापेक्षा कमी असते. उत्पन्नाच्या वाढीबरोबर व्यक्तीच्या आवश्यक सुखद व चैनीच्या गरजांची पूर्तता होत जाते. म्हणजेच उत्पन्नातील वाढीबरोबर उपभोग वाढतो. पण खर्चाचे उत्पन्नाशी असलेले प्रमाण घटत जाते.

२) समाजाचे उत्पन्न = समाजाचा खर्च नसतो. व्यक्तीचे किंवा समाजाचे उत्पन्न उपभोग आणि बचत यांच्यात विभागले जाते म्हणून उत्पन्न = उपभोग + बचत

३) उत्पन्नात होणारी वाढ उपभोग आणि बचतीत वाढ करते. उत्पन्नात होणाऱ्या वाढीमूळे उपभोग किंवा बचत कमी होत नाही, तर ती दोहोंतही वाढ करते. उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर उपभोगात वाढ होते, पण वाढ ही घटत जाणारी असते. म्हणजे बचतीत होणारी वाढ वाढत्या प्रमाणात असते.

**उपभोग फल तक्ता (आकडे कोटीत)**

| उत्पन्न | उपभोग | बचत |
|---|---|---|
| ५० | ५० | ० |
| १०० | ८० | २० |
| १५० | ११० | ४० |
| २०० | १४० | ६० |

उत्पन्नात होणारी वाढ रू. ५० कोटी असताना उपभोगातील वाढ रू. ३० कोटी असते. उत्पन्न अनुक्रमे रू ५०,१००,१५०,व २०० कोटी असताना उपभोग अनुक्रमे रू५०, ८०, ११०, १४० कोटी असतो.

व्यक्तीचे उत्पन्न उपभोग आणि बचत यांच्यात विभागले जाते. उदा. उत्पन्न रू १०० कोटी असताना उपभोग रू. ८० कोटी, बचत रू २० कोटी असते. उत्पन्न अनक्रमे रू. ५०,१००,१५०,व २०० कोटी अनुक्रमे रू. ५०, ८०, ११०, १४० कोटी असतो व बचत अनुक्रमे रू. ०,२०,४०,६० कोटी असते. उत्पन्नातील वाढीमुळे उपभोग व बचतीत वाढ होते. तथापि घट होत नाही.[११]

### ४.२.२निरपेक्ष उत्पन्न परिकल्पना

केन्सच्या मते एकूण मागणी व एकूण पुरवठा अल्पकाळात परस्परांच्या बरोबर जेव्हा असतात तेव्हा त्यात संतुलन होते. विशिष्ट राष्ट्रीय उत्पन्नाच्या पातळीला अर्थव्यवस्थेत होणारे संतुलन विविध घटकांवर अवलंबून असते. केन्सच्या मते मागणी ही एकूण उपभोग व एकूण गुंतवणुकीवर अवलंबून असते. तसेच एकूण उपभोग किंवा उपभोग फल हे उत्पन्न आणि उपभोग यांतील संबंध स्पष्ट करते. इतर परिस्थिती कायम असताना वस्तूंच्या किंमतीत होणाऱ्या बदलाच्या व्यस्त मागणीत बदल होतो. त्याचप्रकारे उपभोक्त्याची उपभोग्य वस्तू व सेवांची मागणी भिन्न उत्पन्नाला भिन्न असते.

केन्सच्या मते उपभोक्त्यांचा उपभोग हा त्यांच्या निरपेक्ष उत्पन्नावर अवलंबून असतो. निरपेक्ष उत्पन्न म्हणजे व्यक्तीचे श्रम व जिंदगीपासून मिळणारे एकूण उत्पन्न होय. केन्सच्या मते उपभोग हा उत्पन्नाचे फल होय. $C = f(y)$

Y = प्रचलित उत्पन्न पातळी (निरपेक्ष उत्पन्न)

C = एकूण उपभोग

अल्पकालीन उपभोग फल समीकरण किंवा रेषा खालील समीकरणाने दर्शवली जाते, याला रेषीय उपभोग फल म्हणतात.

$C = a + by$

a = स्थिर उपभोग, जो उत्पन्नाशी संबंधीत नसतो.

b = प्रेरित स्थिर उपभोग प्रमाण जे उत्पन्नाशी निगडीत असते.

केन्सची निरपेक्ष उत्पन्न परिकल्पना खालील उदाहरणाने स्पष्ट होते.

| **उत्पन्न (कोटीत)** | **उपभोग (कोटीत)** |
|---|---|
| ० | २५ |
| ५० | ५० |
| १०० | ७५ |
| १५० | १०० |

वरील तक्त्यात उत्पन्न ० असताना उपभोग रू. २५ कोटींचा असतो असे दर्शवले आहे.(जो उपभोग उत्पान्नाशी निगडीत नसतो) उत्पन्न रू. ५० कोटी असताना उपभोगही रू. ५० कोटीचा असतो. त्यामुळे उत्पन्न पातळीला उत्पन्न = उपभोग आहे. यानंतर उत्पन्नात जेव्हा वाढ होते. तेव्हा उत्पन्न रू. १०० कोटींचे असताना उपभोग रू. ७५ कोटीचा असतो. अशाप्रकारे उत्पन्नात होणाऱ्या बदलानुसार उपभोग बदलतो. उपभोगाचे प्रमाण कमी-कमी होत जाते तसे बचतीचे प्रमाण वाढते.[१२]

### ४.२.३ सापेक्ष उत्पन्न परिकल्पना

सापेक्ष उत्पन्न परिकल्पना जेम्स ड्यूसेनबेरी या अर्थशास्त्रज्ञाने १९४९ मध्ये त्याच्या Income, Saving and the theory of Conownner या पुस्तकात मांडली. ड्यूसेनबेरीच्या मते उत्पन्न आणि उपभोग यांतील बदलाचा संबंध व्यस्त नसून, स्थिर असतो.

सापेक्ष उत्पन्नाची परिकल्पना स्पष्ट करताना ड्यूसेनबेरी असे मानतो, की मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. त्यामुळे तो ज्या समाजात राहतो, त्या समाजाचा त्याच्या उपभोगावर परिणाम होतो. त्यामुळे कमी उत्पन्नाच्या व हलक्या राहणीमानाच्या व्यक्तीचा हा सतत प्रयत्न असतो, की आपल्यापेक्षा उच्च राहणीमानाच्या व्यक्तीसारखे जीवन जगले पाहिजे. त्यासाठी व्यक्ती उत्पन्नाचा जास्तीत जास्त भाग उपभोगवार खर्च करतो व उच्चभ्रू लोकांसारखे जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. याचा अर्थ असा की, अशा व्यक्तींचा उपभोग हा त्यांच्या स्वतःच्या निरपेक्ष उत्पन्नावरून ठरत नाही तर तो शेजाऱ्यांच्या उत्पन्न व उपभोगावरून ठरतो.

समाजातील दुसरा एक वर्ग असा असतो, की त्याला आपण समाजात सर्वश्रेष्ठ आहोत हे दाखविण्यात अभिमान वाटतो. आणि जेव्हा आजूबाजूचे लोक त्याच्यासारखे जीवनमान जगू लागतात तेव्हा अशा व्यक्ती समाजातील आपले वेगळेपण सिद्ध करण्यासाठी आपल्या उपभोगात किंवा राहणीमानात आणखी वाढ करतात. त्यातून त्यांचा उपभोग खर्च वाढतो.

म्हणजेच उपभोग फल हे निरपेक्ष उत्पन्नाचे स्वतंत्र फल नसून ते इतरांच्या उत्पन्न व उपभोगाचे फल होय. त्यामूळे उपभोग हा स्वतंत्र नसतो. तो विसंबित असतो. अल्पकाळात अर्थव्यवस्थेत घसरण झाली व त्यामूळे समाजाचे उत्पन्न कमी झाले, तर समाजाचा उपभोग उत्पन्नाच्या घटीच्या प्रमाणात कमी होत नाही. समाजातील सर्वच व्यक्तीचे उत्पन्न कमी झाल्यामुळे, श्रीमंत वर्ग आपली बचत कमी करून उपभोग कायम ठेवतो. त्यामुळे त्यांच्या एकूण उपभोगात फारसा फरक पडत

नाही फक्त बचत कमी होते. दुसरे कारण असे की, घसरणीमुळे कमी उत्पन्नाच्या व्यक्तींच्या उत्पन्नात घट होते. तरी पण त्यांचा उपभोग कमी होत नाही. कारण त्यांना विशिष्ट राहणीमानाची सवय झालेली असते. त्यामुळे लोक त्या राहणीमानाच्या खाली उतरण्यास तयार नसतात. त्यासाठी हा समाज पूर्वीची बचत प्रचलित उपभोगासाठी उपयोगात आणतो व आपले राहणीमान टिकवून ठेवतो. म्हणजेच उत्पन्न कमी होऊनही एकूण उपभोगात त्याच प्रमाणात घट होत नाही. तर व्यक्ती उपभोगासाठी बचत कर्ज, उसनवारी यांसारख्या मार्गांचा अवलंब करतात. पण राहणीमान टिकवून ठेवतात. जेव्हा उत्पन्नात वाढ होते. तेव्हा व्यक्ती वाढलेले उत्पन्न उपभोगावर खर्च करून, पूर्वीच्या राहणीमानात वाढ करतात.

### ४.२.४ स्थायी उत्पन्न परिकल्पना

स्थायी उत्पन्न परिकल्पना प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ मिल्टन फ्रिडमन याने त्याच्या A Theory of Consumption या पुस्तकात १९५७ मध्ये मांडली. फ्रिडमन स्थायी उत्पन्नाची परिकल्पना स्पष्ट करताना प्रचलित उत्पन्न (Current Income), दर्शनी उत्पन्न (Observed Income), प्रत्यक्ष उत्पन्न (Actual Income), स्थायी उत्पन्न (permanent Income) यात फरक करतो.

फ्रिडमनच्या मते, ''आशावादी उपभोग निराशावादी उपभोगाने निष्क्रिय ठरतो. याउलट उपभोक्त्याचा उपभोग मात्र त्याच्या अपेक्षित उत्पन्नाने प्रभावित होतो.''

१९५१ च्या Fedral Reserve Bulletin मध्ये प्रकाशित झालेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले आहे, की २६% उपभोक्त्यांनी आपले उत्पन्न वाढेल, ६% उपभोक्त्यांनी आपले उत्पन्न कमी होईल, तर ६६% उपभोक्त्यांनी आपले उत्पन्न बदलणार नाही असा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे आशावादी उपभोग निराशावादी उपभोगाने निष्क्रिय ठरतो असे नाही. याशिवाय सांख्यिकीय पुराव्यांनी असे दाखवून देता येते,

की अपेक्षित उत्पन्नाचा उपभोगावर परिणाम होतो. फ्रिडमनने दोन प्रकारचे वास्तविक उपभोग मांडले.

१) स्थायी उपभोग (Permanent Consumption)

२) संक्रमक उपभोग (Transitory Consumption)

C = Cp = Ct

C = वास्तविक उपभोग (Actual Consumption)

cp = स्थायी उपभोग (Permanent Consumption)

ct= संक्रमक उपभोग (Transitory Consumption)

ज्या उपभोगाचा अंदाज बांधता येतो त्यास अपेक्षित उपभोग तर जो अनपेक्षित पूर्ण करावा लागतो  त्यास अनपेक्षित उपभोग असे म्हणतात. फ्रिडमनच्या मते व्यक्तीचा वास्तविक उपभोग हे वरील दोन्ही उपभोगांचे एकत्रीकरण असते.

फ्रिडमनच्या मते, स्थायी उत्पन्न आणि स्थायी उपभोग यांच्यातील संबंध दीर्घकाळात प्रमाणशील असतो. दीर्घकाळात अनपेक्षित उत्पन्नात होणारी वाढ ही अनपेक्षित उत्पन्नात होणाऱ्या घटीमुळे निष्क्रिय ठरते. त्यामुळे स्थायी उपभोगात होणारा बदल स्थायी उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर स्थायी उपभोगात वाढ होते व स्थायी उत्पन्नात घट झाली असता, स्थायी उपभोगात घट होते.

CP = F (YP)

CP = K (YP)

K= स्थायी उपभोगाचे स्थायी उत्पन्नाशी असलेले प्रमाण किंवा गुणक होय. यालाच उपभोक्त्याची स्थायी सरासरी उपभोग प्रवृत्ती असेही म्हणतात.

फ्रिडमनने १९०५ ते १९५१ या काळातील उपभोक्त्यांच्या स्थायी उत्पन्न आणि स्थायी उपभोग यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला, की हे प्रमाण ०.८८ एवढे असते. याचा अर्थ स्थायी उपभोग रू. ८८ एवढा असतो. म्हणजेच उपभोक्त्यांची स्थायी सरासरी उपभोग प्रवृत्ती ही ०.८८ किंवा ८८% असते.

∴ C = ०.८८YP असतो.

फ्रिडमनच्या स्थायी उत्पन्न परिकल्पनेनुसार उपभोगाचे उत्पन्नाशी असलेले प्रमाण K स्थिर असल्यामुळे दीर्घ काळातील समाजाची सरासरी उपभोग प्रवृत्ती व सीमांत उपभोग प्रवृत्ती परस्परांच्या बरोबर असते. (APC=MPC) उपभोगाचे उत्पन्नाशी असलेले प्रमाण (k) हे अर्थव्यवस्थेतील व्याजदर, मानवेतर संपत्ती व उपभोग प्रवृत्ती यांवर अवलंबून असते.

$K = F(r,w,u)$

$CP = F(YP)$

$CP = K(r,w,u)\, YP$

r = व्याजदर

w= मानवेतर संपत्तीचे मानवी संपत्तीशी असलेले प्रमाण

u = उपभोग प्रवृत्ती

k = स्थायी सरासरी उपभोग प्रवृत्ती

थोडक्यात, उपभोगात होणारा बदल हा स्थायी उत्पन्नात होणाऱ्या बदलाच्या प्रमाणात असतो. याचाच अर्थ असा की स्थायी उत्पन्नात वाढ झाली असता, स्थायी उपभोग वाढतो. याउलट स्थायी उत्पन्नात होणाऱ्या घटीमुळे स्थायी उपभोगात घट होते. स्थायी उपभोगात होणारा बदल स्थायी उत्पन्नाच्या बदलाच्या प्रमाणात असतो.

परिकल्पनेची गृहिते पुढीलप्रमाणे आहेत.

१) स्थायी उत्पन्न आणि संक्रमक उत्पन्न यांत कसलाही सहसंबंध नसतो .

$b\ (Yp\ yt) = 0$

२) स्थायी उपभोग व संक्रमक उपभोग संबंध नसतो.

$b\ (cpct) = 0$

३) संक्रमक उत्पन्न व संक्रमक उपभोग यांतही कसलाच संबंध नसतो.

$b\ (Ytct) = 0$

फ्रिडमनच्या मते, वास्तविक उत्पन्न हे उपभोक्त्यांच्या स्थायी उत्पन्नापेक्षा जास्त किंवा कमी असू शकते. कारण संक्रमक उत्पन्न किंवा अनपेक्षित उत्पन्न हे

जेव्हा धन (+) असते, तेव्हा वास्तविक उत्पन्न हे स्थायी उत्पन्नापेक्षा जास्त असते. (Y>Y) याउलट संक्रमक उत्पन्न जेव्हा (-) असते, तेव्हा वास्तविक उत्पन्न हे स्थायी उत्पन्नापेक्षाकमी होत. (Y>YP) संक्रमक उत्पन्न म्हणजे अनपेक्षितपणे मिळणारे उत्पन्न होय.

फ्रिडमनच्या मते, अर्थवस्थेतील अनपेक्षित मिळणारे उत्पन्न बचतीवर परिणाम करते. त्याच्या मते संक्रमक उत्पन्नात जेवढी वाढ होते तेवढी बचतीत वाढ होते. त्यामुळे संक्र मक उत्पन्न व संक्रमक उपभोग स्वतंत्र असतात ते परस्परांवर अवलंबून नसतात.[१४]

### ४.२.५ जीवनचक्र परिकल्पना (Life Cycle Hypothesis)

जीवनचक्र परिकल्पना अर्थशास्त्रज्ञ एल एंडो आणि एफ मोदिगिलानी यांनी त्यांच्या 'The Life cycle Hypothesis of Saving, Aggregate, Implication & Tests' या निबंधात १९६३ मध्ये मांडली.

या सिद्धांतानुसार उपभोग हा जीवनातील अपेक्षित उत्पन्नाचे फल होय. व्यक्तीचा उपभोग हा त्याच्या उत्पन्नाचे मार्ग, भांडवली संपत्तीवर मिळणारा मोबदला, खर्चाचे नियोजन आणि ज्या वयात नियोजन केले जाते ते वय यांवर अवलंबून असतो. व्यक्तीचे उत्पन्न म्हणजे त्याला त्याच्या संपत्तीवर मिळणारे उत्पन्न व त्याचे वास्तविक उत्पन्न आणि अपेक्षित उत्पन्न यांचे एकत्रीकरण असते. ही परिकल्पना पुढील गृहीतांवर आधारित आहे.

१) व्यक्तीच्या आयुष्यात वस्तूंच्या किमतीत बदल नाही.

२) व्याजाचा दर स्थिर आहे.

३) उपभोक्त्याकडे वडिलोपार्जित संपत्ती नाही. जी संपत्ती आहे, ती त्याच्या बचतीचे फल होय.

प्रत्येक व्यक्ती त्याच्याकडे असलेल्या उत्पन्नाच्या मार्गातून आयुष्यात जास्तीत जास्त समाधान, आनंद मिळविण्याचा प्रयत्न करते. तसेच त्याच्या उत्पन्नात,

त्याच्या जीवनात चक्रीय बदल होतात. असे ही परिकल्पना गृहीत धरते. सुरवातीच्या काळात तुलनात्मकदृष्ट्या व्यक्तीचे उत्पन्न कमी असते. मध्यकाळात अधिक, तर शेवटच्या काळात ते कमी असते. व्यक्तीच्या जीवनचक्रात बदल होत असला, तरी त्याच्या उपभोगाचे उत्पन्नाशी असलेले प्रमाण स्थिर असते. उपभोग व उत्पन्न यांतील संबंध परिकल्पनेनुसार खालील समीकरणाने दाखविला जातो.

C1 = व्यक्तीचा प्रचलित उपभोग

K = उपभोगाचे उत्पन्नाशी असलेले प्रमाण

Vt = व्यक्तीच्या आयुष्यात मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रचलित मूल्य.

:. C1 = kvt

व्यक्तीचे सरासरी उत्पन्न सुरवातीच्या काळात व आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात कमी असते. कारण सुरवातीच्या काळात मनुष्याच्या अनेक गरजा पूर्ण झालेल्या नसतात. म्हणून त्याची बचत कमी असते. त्याच्याकडे उत्पन्नाची साधने कमी असतात. शेवटच्या टप्प्यात श्रमउत्पन्न कमी असते. याचा परिणाम सुरवातीच्या व शेवटच्या टप्प्यांत उत्पन्न कमी होण्यावर होतो. याउलट आयुष्याच्या मध्यान्हीला त्याचे उत्पन्न अधिक असते. कारण त्याने संग्रहित केलेल्या जिंदगीपासून उत्पन्न मिळू लागते. तसेच श्रमउत्पन्न अधिक असते. व्यक्तीचा उपभोग हा सुरवातीच्या काळात अनेक गरजांची पूर्तता झालेली नसते म्हणून अधिक असतो. मध्यान्हीला उच्च राहणीमानाच्या सवयीमुळे जास्त असतो. तर शेवटच्या टप्प्यात जबाबदारी काढली असल्यामुळे अधिक असतो. या सर्वांचा परिणाम व्यक्तीच्या आयुष्यभराचा उपभोग जवळपास सारखाच असतो. [१५]

## ४.३ समारोप

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या प्रगतीमध्ये नागरी सहकारी बँका आणि पतसंस्थांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. बँका आणि पतसंस्थांद्वारा त्यांच्या

सभासदांची आर्थिक उन्नती आणि पत उंचावण्यासाठी प्रयत्न केले जातात. तसेच या संदर्भ ग्रंथामध्ये नागरी सहकारी बँका आणि पतसंस्थांच्या आर्थिक व्यवहारांवर प्रकाश टाकलेला आहे. सभासद संख्या, ठेवी, कर्जपुरवठा, भागभांडवल, स्थिती संस्थांचे व्यवस्थापन, लेखापरिक्षण वर्ग, इत्यादी अनुषंगाने अभ्यास केलेला आहे.

सदर मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेत्तर सहकारी पतसंस्थेच्या वित्तीय कामगिरीचा अभ्यास या शोधनिबंधात संशोधकाने पतसंस्थेची सभासदसंख्या, भागभांडवल, ठेवी, कर्जपुरवठा, स्वनिधी, नफा इत्यादी आर्थिक बाबींविषयी आदर्श गुणोत्तरे मांडली आहेत. जेणेकरून सदर पतसंस्थेची आर्थिक स्थितीबाबत गुणात्मक निष्कर्ष काढता येईल आणि हीच बाब या शोधनिबंधाचे वेगळेपण आहे.

## संदर्भ


१. क्षीरसागर भगवंत (१९८९), पुणे माधयमिक शाळा शिक्षकेतर सहकारी पतपेढी पुणे: एक अभ्यास, एम्.फील. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

२. कोल्हे प्रभा आर. (१९८९), महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँक, प्रामुख्याने भगिनी निवेदिता महिला सहकारी बँक पुणे: एक अभ्यास, एम्.फील. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

३. मुलाणी महंमद रफीक उमराव (१९९०), साधना सहकारी बँक हडपसर, या बँकेच्या कार्यपध्दतीचा एक चिकित्सक अभ्यास, एम्.फील. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

४. शिंदे संगिता (२००५), आर्थिक पृथ:करणाद्वारे पुणे शहरातील नागरी सहकारी पतसंस्थांचा तुलनात्मक अभ्यास, एम्.फील.प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. आंधळे सोमनाथ रामचंद्र (२००९), नाशिक जिल्हयाच्या आर्थिक विकासातील नागरी सहकारी बॅकांच्या भूमिकांचे मूल्यमापन (विशेष संदर्भ–

निफाड तहसिलमधील नागरी सहकारी बँका), पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे.

६. कदम पराग प्रल्हाद (२०१०), ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था कायम टिकवण्यासाठी अर्थशास्त्र सुधारणांच्या संदर्भात सहकारी चळवळीची भूमिका, पीएच.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

७. सकटे ए.जे. (२०११), बिगर शेती सहकारी पतसंस्था विशेष संदर्भ सातारा जिल्हयातील कराड तालुका: एक अभ्यास, पीएच.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

८. कुलकर्णी अविनाश दि. (२०११), पुण्यातील नागरी सहकारी बँकांचा (शेडयुल सोडून) एन.पी.ए. संदर्भातील तुलनात्मक अभ्यास, पीएच.डी.प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

९. टाक नारायण भिकोबा (२०१२),पुणे जिल्हयातील प्राथमिक सहकारी शेती पतपुरवठा संस्थांचा अभ्यास, पीएच.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

१०. काकडे शिवाजी मुरलीधर (२०१४), महाराष्ट्रातील महिला नागरी सहकारी बँकांचे अर्थप्रबंधन एक अभ्यास, पीएच.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

११. Ghosh Chandan , Ambar Ghosh , 2011 , Macro economics PHI learning Private Limted , New Delhi pg.No.268

१२. Ahuja H.L. 1986 Macroeconomics Theory and Policy S. Chand And Company Private Limited New Delhi pg.No.146

१३. तत्रैव पान क्र. १५७ – १५९

१४. Ghosh Chandan , Ambar Ghosh , 2011 , Macro economics PHI learning Private Limted , New Delhi pg.No.278 - 280

१५. तत्रैव पान क्र. २७४

# प्रकरण पाचवे

# पुणे जिल्ह्याची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी

**प्रस्तावना**

५.१ जिल्ह्याचे स्थान व प्राकृतिक रचना

५.२ खनिजे

५.३ नद्या

५.४ प्रशासकीय विभाग

५.५ हवामान व पर्जन्यमान

५.६ शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व पर्यटन स्थळे

५.७ लोकसंख्या

५.८ लोकसंख्येची घनता

५.९ नागरी व ग्रामीण लोकसंख्या

५.१० जिल्हा उत्पन्न अंदाज

५.११ पुणे जिल्ह्यातील बाजारपेठा

५.१२ स्थानिक स्वराज्य संस्था

५.१३ बँका

५.१४ पिकांचे स्वरुप

५.१५ मुख्य पिकांचे उत्पादन

५.१६ जमिनीचा वापर

५.१७ सिंचन

५.१८ जमीन धारणा

५.१९ सहकार

५.२० उद्योग

५.२१ वार्षिक योजना

५.२२ समारोप

संदर्भ

## प्रकरण पाचवे

## पुणे जिल्ह्याची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी

### प्रस्तावना

पुणे जिल्हा हा ऐतिहासिक वारसा असलेला जिल्हा आहे. पुणे जिल्हा हा महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखला जातो. छत्रपती शिवरायांपासून या शहराला ऐतिहासिक परंपरा आहे. पेशवाई आणि इंग्रजांच्या काळातही पुणे अनेक क्षेत्रात नावाजलेले होते. पूर्वीच्या काळी या शहराला कसबे पुणे, पुण्यपूर, पुण्यविषय, पुनवडी इत्यादी नावाने ओळखले जात होते.[१]

### ५.१ जिल्हयाचे स्थान व प्राकृतिक रचना

पुणे जिल्हा १७.५° व १९.२° उत्तर अक्षांश आणि ७३.२° व ७५.१° पूर्व रेखांशमध्ये वसला आहे. पुणे जिल्हयाच्या उत्तर आणि पूर्व बाजूस अहमदनगर जिल्हा, दक्षिणेला सातारा व पश्चिमेला रायगड जिल्हा आहे. आग्नेय दिशेला सोलापूर जिल्हा असून वायव्येला ठाणे जिल्हा आहे.

पुणे जिल्हयाचे क्षेत्रफळ १५६४२ चौरस किलो मीटर असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५% आहे. जिल्हयाच्या जमिनीचे उंच सखलपणामुळे घाटमाथा, मावळ आणि पठार असे तीन स्वाभाविक विभाग पडतात. जुन्नर, आंबेगाव, मावळ, मुळशी, वेल्हे व भोर हे तालुके घाटमाथ्यावर आहेत तर उर्वरित ८ तालुके व मावळ तालुक्याचा काही भाग हा पठारी आहे. पुणे जिल्हयाचे पठार हे समपातळीवर नाही. पठाराचा पश्चिम कडा उंच आहे. सहयाद्री पर्वताच्या मोठया रांगा उत्तरेकडून दक्षिणेस पसरल्या आहेत. जिल्हयात १) हरिश्चंद्र पर्वत २) जीवधान ३) ढाक आहुपे या महत्वाच्या डोंगर रांगा आहेत.

घाटमाथ्यावरील जमीन हलकी व तांबडया रंगाची आढळते. जिल्हयाच्या इतर भागातील जमीन काळी, तांबडी व किरमीजी रंगाची असून त्यात काही ठिकाणी वाळू व चुनखडी यांचे मिश्रण आढळते. पश्चिमेकडून जसजसे पूर्वेकडे जावे तसतशी जमीन कसदार व सुपीक आढळते. पश्चिमेकडील तालुक्यात ती तांबडी व हलकी आहे.[२]

## ५.२ खनिजे

इमारतीला लागणाऱ्या मजबूत काळया दगडाच्या खाणी जिल्हयात आहेत. एरंडवणे, पाषाण या भागात शिरगोळे, गारेचे दगड सापडतात. तसेच रंगासाठी लागणारी लोणारी व गेरूची लाल माती जिल्हयात सापडते. जिल्हयाच्या पूर्वभागात चूनखडी सापडते.[३]

## ५.३ नद्या

भीमा नदी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी आहे. ती पुणे जिल्ह्याच्या पश्चिमेस सह्याद्री पर्वतातील भिमाशंकर येथे उगम पावते. जिल्ह्यातून दक्षिणपूर्व वाहत जाऊन भीमा नदी सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करते. भीमा नदीच्या डाव्या बाजूस वेळू, घोड आणि उजव्या बाजूस भामा, इंद्रायणी, मुळा व मुठा अशा उपनद्या आहेत. पुणे जिल्ह्याच्या दक्षिण सरहद्दीवर नीरा नदी आहे. कऱ्हा, कुकडी, पवना, मीना, गुंजवणी, पुष्पवती, शिवगंगा अशा अन्य नद्या पुणे जिल्ह्यातून वाहतात. या सर्व नद्या पावसाळ्यात दुथडी भरून वाहतात तर उन्हाळ्यात कोरड्या पडतात. पुणे जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यातून किमान एक तरी नदी वाहते.[४]

## ५.४ प्रशासकीय विभाग

पुणे जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्य ठिकाण पुणे येथे आहे. हे ठिकाण राज्याच्या मुंबई या राजधानीपासून रेल्वेने १९२ कि.मी. तर रस्त्याने १६० कि.मी. अंतरावर असून मुंबई, बंगलोर या राष्ट्रीय महामार्गावर आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या ९४.२९ लाख असून ती महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ८.३९ टक्के आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटरला ६०३ व्यक्ती अशी आहे. राज्याची लोकसंख्येची घनता ३६५ आहे.

पुणे जिल्ह्यात १४ तहसिल असून ते पुढीलप्रमाणे आहेत. १. जुन्नर २. आंबेगाव ३. शिरूर ४. खेड ५. मावळ ६. मुळशी ७. हवेली ८.पुणेशहर ९. दौंड १०. पुरंदर ११. वेल्हे १२. भोर १३. बारामती १४. इंदापूर या तालुक्यांच्या क्षेत्रफळाची जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळाशी तुलनात्मक टक्केवारी पाहिली असता असे आढळते की, शिरूर तालुक्याचे क्षेत्र सर्वात मोठे म्हणजे १०% तर पुणे शहर तालुक्याचे सर्वात कमी म्हणजे १% इतके आहे. आंबेगाव, पुरंदर, मुळशी व मावळ या तालुक्यांचे क्षेत्र प्रत्येकी ७%, दौंडचे ८% इंदापूर, बारामती, हवेली, खेड व जुन्नर यांचे क्षेत्र प्रत्येकी ९% तर भोर व वेल्हा तालुक्यांचे क्षेत्र अनुक्रमे ६% व ३% इतके आहे.

पुणे जिल्ह्यात पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिका असून पुणे, खडकी, देहूरोड येथे कटकमंडळे आहेत. त्याचप्रमाणे खेड तालुक्यात आळंदी, पुरंदरमध्ये सासवड व जेजूरी, मावळमध्ये तळेगाव दाभाडे व लोणावळा आणि भोर, दौंड, बारामती, शिरूर, जुन्नर व इंदापूर तालुक्यांमध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे जिल्हयात एकूण अकरा नगरपालिका आहेत. पुणे शहर तालुका वगळता उर्वरीत १३ तालुक्यात पंचायत समित्या आहेत. जिल्ह्यात

एकूण १८६६ खेडी आहेत. त्यापैकी १८ खेडी ओसाड आहेत. पुणे जिल्ह्यात डिसेंबर २०१३ अखेर १४०७ ग्रामपंचायती आहेत.[५]

## ५.५ हवामान व पर्जन्यमान

पुणे जिल्ह्याचे हवामान हे सर्वसाधारणपणे उष्ण असले तरी पश्चिमेकडील भागात हवामान थंड तर मध्य भागात ते कोरडे असल्याचे आढळते. पूर्वेकडील इंदापूर, बारामती, दौंड तालुक्यात हवा उष्ण व कोरडी असते. जिल्ह्यात बहुतांशी पाऊस नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांपासून पडतो. काही तालुक्यात ईशान्य मान्सून वाऱ्यापासूनही पाऊस पडतो. जिल्ह्यात पश्चिमेकडून जसजसे पूर्वेकडे जावे तसतसे पावसाचे प्रमाण कमी-कमी होत जाते. पश्चिमेस १००० मिली मीटरपेक्षा जास्त पाऊस पडतो तर अतिपूर्व भागात ६०० ते ७०० मिलीमीटर पाऊस पडतो.[६]

## ५.६ शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व पर्यटन स्थळे

जिल्ह्यातील पुणे विद्यापीठ, भारती विद्यापीठ, सिम्बॉयसीस संस्था, सिंहगड इन्स्टिटयुट इ. संस्थांमधून कला, वाणिज्य, शास्त्र, वैद्यकिय, अभियांत्रिकी व संगणक शाखेत केवळ याच राज्यातील नव्हे तर देशातील तसेच परदेशातील विद्यार्थीही शिक्षण घेत आहेत. याशिवाय महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, छऊअ लष्करी संस्था, सी-डॅक, आयुका, भारतीय शिक्षण संस्था, प्रकाशन व साहित्य संस्था, भांडारकर संस्था, बालभारती, गोखले अर्थशास्त्र संस्था, इत्यादी संस्थाही पुणे शहरात संशोधनाचे व विद्यादानाचे कार्य करीत आहेत.

जिल्ह्यामध्ये पर्यटकांना आकर्षित करणारी अनेक ठिकाणे आहेत. त्यापैकी खंडाळा, लोणावळा ही थंड हवेची ठिकाणे, शिवनेरी, सिंहगड,

पुरंदर, राजगड, तोरणा, लोहगड, विसापूर इत्यादी ऐतिहासिक महत्त्व असलेले किल्ले, मावळ तालुक्यातील कार्ला व भाजे लेणी, धार्मिकदृष्ट्या महत्त्व असलेले अष्टविनायकांपैकी मोरगाव, रांजणगाव, थेऊर, ओझर, लेण्याद्री येथील पाच गणपती, जेजुरीचा खंडोबा, ज्ञानेश्वरांची आळंदी, तसेच तुकाराम महाराजांनी ज्या ठिकाणाहून सदेह वैकुंठ गमन केले असे देहू क्षेत्र, चिंचवडचे मोरया गोसावी समाधी स्थळ, बारा ज्योतिर्लिगांपैकी श्रीक्षेत्र भिमाशंकर,दत्ताचे ठिकाण असलेले नारायणपूर, सोमयाचे कारंजे व नव्याने पुरंदर तालुक्यात उभारण्यात आलेले केतकावळे येथील बालाजी मंदिर हे याच जिल्ह्यात आहे.

तर पुणे शहरातील कसबा गणपती, सारसबाग गणपती, दगडूशेठ गणपती, मंडई गणपती, जंगली महाराज मंदिर, चतुश्रृंगी देवीचे मंदिर, चांदणी चौकातील वेदभवन, पर्वती टेकडी व मंदिर, पाताळेश्वर गुंफा, विश्रामबागवाडा, शनिवारवाडा, लालमहाल, केसरीवाडा, आगाखान राजवाडा, कस्तुरबा गांधी स्मारक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वस्तू संग्रहालय, महात्मा फुले वस्तू संग्रहालय, आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय, राजा केळकर संग्रहालय इत्यादी स्थळांना राज्यातून, परराज्यातून तसेच परदेशातून आलेले अनेक पर्यटक भेटी देतात.

पुणे जिल्ह्यात बालेवाडी परिसरात श्री शिवछत्रपती स्टेडियम उभारण्यात आलेले आहे. पुणे शहरालगत हिंजवडी, हडपसर येथे माहिती तंत्रज्ञान पार्क (I.T. Park) उभारण्यात आलेले आहे. तसेच पुणे, पिंपरी चिंचवड, आकुर्डी, चाकण, पिरंगुट, रांजणगाव, कुरकुंभ व बारामती इत्यादी ठिकाणी औद्योगिक वसाहती उभारण्यात आलेल्या आहेत.[७]

## ५.७ लोकसंख्या

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ९४.२९ लाख असून यामध्ये ४९.२४ लाख पुरूष व ४५.०५ लाख स्त्रिया आहेत. जिल्ह्यातील २००१-२०११ या दशकातील दशवार्षिक लोकसंख्या वाढीचे प्रमाण ३०.३७% आहे. पुणे जिल्ह्यातील पुणे शहर व हवेली या तालुक्यांची नागरी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या अनुक्रमे ९९.०९% व ७४.८९% आहे. जिल्ह्याच्या या दोन तालुक्यांमध्ये उद्योगधंदे, शिक्षणसंस्था व व्यापाराचे केंद्रीकरण मोठया प्रमाणावर झाल्यामुळे या तालुक्याच्या नागरी भागाकडे लोकसंख्येचा लोंढा आला आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ३५% लोकसंख्या पुणे शहर तालुक्यात आहे. हवेली तालुक्यात २६% आहे. बारामती, इंदापूर, जुन्नर, दौंड व खेड या तालुक्यांत २२%, मावळ व शिरूर तालुक्यात ८% आंबेगाव व पुरंदर तालुक्यात ५%, भोर व मुळशी तालुक्यात ४% आहे. वेल्हे येथे ती सर्वात कमी आहे.[८]

## ५.८ लोकसंख्येची घनता

२००१ च्या जनगणनेप्रमाणे जिल्ह्याची लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटर मागे ४६२ माणसे एवढी आहे. नागरी भागात ती ६७६५ आहे. ग्रामीण भागात ती २०२ आढळते. जिल्ह्यात पुणे शहर तालुक्याची घनता सर्वात जास्त म्हणजे १४६५२ एवढी आहे. वेल्हे तालक्यात सर्वात कमी म्हणजे ११२ आहे. लोकसंख्या घनतेनुसार पुणे जिल्ह्याचा राज्यात दुसरा क्रमांक येतो.[९]

## ५.९ नागरी व ग्रामीण लोकसंख्या

सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या ३९% लोकसंख्या ग्रामीण भागात तर ६१% लोकसंख्या नागरी भागात आहे. जिल्ह्याच्या नागरी भागाच्या लोकसंख्येपैकी जवळजवळ ८९% लोकसंख्या पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महानगरात सामावलेली आहे.[१०]

### ५.९.१ स्त्री-पुरूष प्रमाण

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील दर हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या ९१५ आहे. ग्रामीण व शहरी भागात ती अन्नुक्रमे ९३२ व ९०४ आहे.[११]

### ५.९.२ अनुसूचित जाती/जमाती

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या ११.८० लाख व अनुसूचित जमातीची लोकसंख्या ३.४९ लाख एवढी होती. एकूण लोकसंख्येशी तुलना करता अनुसूचित जातीची लोकसंख्या १२.५२% व अनुसूचित जमातीची लोकसंख्या ३.७०% आहे.[१२]

### ५.९.३ साक्षरता

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात ७१.७१ लाख म्हणजेच ७६.०६% लोक साक्षर होते. साक्षरतेचे प्रमाण (० ते ६ वयोगट वगळता) नागरी व ग्रामीण भागात अनुक्रमे ७९ व ७१% आहे.[१३]

### ५.९.४ कामकरी

२०११ च्या जनगणनेनुसार कामकऱ्यांची संख्या ४०.४९ लाख आढळते. ही संख्या एकूण लोकसंख्येच्या ४२.९४% आहे. एकूण

कामकऱ्यांच्या संख्येपैकी ८.८७% लाख शेतकरी व ४.१४ लाख शेतमजूर हाते. याशिवाय १०५७११ कामकरी घरगुती उद्योगधंद्यात काम करीत होते. उर्वरित २६.४२ लाख कामकरी उद्योग, वाहतुक, बांधकाम, व्यापार यात काम करीत होते. [१४]

## ५.१० जिल्हा उत्पन्न अंदाज

जिल्हा स्तरावरील उत्पन्नाचे अंदाज करण्यासाठी उत्पन्न स्त्रोत पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. जिल्हा उत्पन्नाचे अंदाज तयार करण्याकरीता लागणारी मुलभूत माहिती समाधानकारकरित्या उपलब्ध नसल्याकारणाने, तसेच ज्या क्षेत्रांकरिता जिल्हा स्तरावरील आकडेवारी उपलब्ध नाही, त्या क्षेत्रांकरीता जिल्ह्यावर अनुरूप असे निर्देशांक वापरून त्याआधारे राज्य स्तरावरील उत्पन्नाची जिल्ह्यांमध्ये विभागणी करण्यात येते. अशाप्रकारे आकडेवारीच्या उपलब्धतेचा अभाव, अनुसरून निर्देशांकाचा वापर तसेच पद्धतीतीलअंगभूत उणीवा इ. कारणांमुळे जिल्ह्याचे अचूक उत्पन्न काढण्यात मर्यादा येतात.

- सन २०१०-११ व २०११-१२ या सालासाठी चालू किंमतीनुसार निव्वळ जिल्हा उत्पन्न अनुक्रमे रुपये १,०४,१९६ कोटी व रुपये १,२२,२७४ कोटी आहे.
- सन २०१०-११ व २०११-१२ या सालासाठी दरडोई उत्पन्न अनुक्रमे रु.१,२१,७१२ व रू.१,४०,५७० एवढे आहे. तसेच राज्य उत्पन्नातील पुणे जिल्हयाची निव्वळ उत्पन्नाची टक्केवारी सन २०१०-११ व २०११-१२ यावर्षी अनुक्रमे ११.१५% व ११.२९% अशी आहे. [१५]

## ५.११ पुणे जिल्ह्यातील बाजारपेठा

जिल्ह्यात ११ नियंत्रित कृषि उत्पन्न बाजार समित्या आहेत. या नियंत्रित बाजार समित्यांखेरीज खेड, वेल्हे, सासवड, तळेगाव-ढमढेरे, सुपा, निरा व चाकण याठिकाणी उपबाजार समित्या आहेत. जिल्ह्यातील या समित्यांमध्ये कृषी-उत्पन्न मालाची आवक होते. प्रामुख्याने या समित्यांमध्ये अन्नधान्य व सर्वप्रकारच्या फळांची आवक होते. त्यापैकी निम्म्याहून जास्त आवक पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये होते. [१६]

## ५.१२ स्थानिक स्वराज्य संस्था

जिल्ह्यात पुणे येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यालय आहे तर १३ ठिकाणी पंचायत समिती कार्यालये आहेत. जिल्हा परिषदेचे २०१२-१३ चे प्रत्यक्ष निव्वळ उत्पन्न ८७१.६५ कोटी रूपये आहे. तर खर्च रूपये ६६१.३० कोटी झाला आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड येथे महानगरपालिका असून देहूरोड, पुणे लष्कर, खडकी येथे कटकमंडळे आहेत. याशिवाय जिल्हयात ११ नगरपालिका आहेत. महानगरपालिका, कटक मंडळे व नगरपालिका यांचे २०१२-१३ यावर्षी ६७३९.४५ कोटी रूपये निव्वळ उत्पन्न होते. त्याच वर्षी ५९१०.४३ कोटी रूपये निव्वळ खर्च होता. [१७]

## ५.१३ बँका

१ मार्च २०१३ रोजी जिल्ह्यात १५९ ठिकाणी (शहरे व खेडी धरून) बँका कार्यरत आहेत. सन १९८२ मध्ये राष्ट्रीयीकृत व अनुसूचित बँकेच्या एकूण ३५७ शाखा कार्यरत होत्या. तर ३१ मार्च २०१३ अखेरीस ही संख्या

९२६ इतकी आहे. जिल्हयातील राष्ट्रीयीकृत,अनुसूचित व व्यापारी बँकांमध्ये ३१ मार्च २०१३ अखेर १,२५,९३,५१४ लाख रूपये ठेवी होत्या. [१८]

## ५.१४ पिकांचे स्वरूप

पुणे जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीनुसार पुणे जिल्ह्यात वेगवेगळी पिके घेतली जातात. पुणे जिल्ह्यात तालुकानिहाय प्रामुख्याने पुढील पिके घेतली जातात.

| अ.क्र. | तालुका | पिकाचे नाव |
|---|---|---|
| १ | जुन्नर | भात, बटाटा,भुईमूग, कांदा, केळीच्या बागा, फुलांचे मळे, द्राक्षे |
| २ | आंबेगाव | भात, बटाटा, भुईमूग |
| ३ | शिरूर | कांदा, संत्री व मोसंबी |
| ४ | खेड | भात, बटाटा, भुईमूग |
| ५ | मावळ | भात |
| ६ | मुळशी | भात |
| ७ | हवेली | ऊस |
| ८ | पुणे शहर | भाजीपाला, कांदा |
| ९ | दौंड | ज्वारी, कांदा, संत्री व मोसंबी |
| १० | पुरंदर | ज्वारी, अंजीर, डाळींब, सीताफळ |
| ११ | वेल्हे | भात |
| १२ | भोर | भात |
| १३ | बारामती | कापूस, ज्वारी, संत्री व मोसंबी, द्राक्षे, ऊस |
| १४ | इंदापूर | ज्वारी, संत्री व मोसंबी, ऊस |

अशाप्रकारे पुणे जिल्ह्यात पिकांच्या लागवडीमध्ये विविधता असली तरी जिल्ह्यात ज्वारी हे महत्वाचे पीक आहे. तसेच जिल्ह्यात आंबेमोहर, जिरेसाळ, इंद्रायणी या भाताच्या जाती प्रसिद्ध आहेत. पुणे जिल्ह्यात सन २००१-२००२ मध्ये खालील पिकांचे एकूण पिकाखालील क्षेत्र पुढीलप्रमाणे होते. [१९]

| | |
|---|---|
| ज्वारी | ४१% |
| बाजरी | ९% |
| भात व गहू | ५% |
| तृणधान्ये | ६३% |
| कडधान्ये | ८% |

## ५.१५ मुख्य पिकांचे उत्पादन

जिल्ह्यातील पिकांचे स्वरूप हे शेतकरी वर्गाचा शेतीविषयक बदलता दृष्टिकोन, हवामानातील बदल, वाढत्या सिंचन सुविधा, बदलते आधुनिक तंत्रज्ञान इ.मुळे बदलत आहे.

सन २०१२-१३ मध्ये कृषि संचलनालयाने दिलेल्या माहितीनुसार असे दिसून येते की, सन २०११-१२ च्या तुलनेत गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरीच्या पीक उत्पादनामध्ये घट झालेली दिसून येते. मका, नाचणी, हरभरा, तूर, मूग, भुईमूग इ. पिकांच्या उत्पादनामध्ये वाढ झालेली आहे.[२०]

## ५.१६ जमिनीचा वापर

पुणे जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ हे १५६४२ चौरस किलोमीटर असून ते महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५%आहे. जिल्ह्यातील जमिनीच्या उंच सखलपणामुळे घाटमाथा, मावळ आणि पठार असे तीन स्वाभाविक विभाग पडतात. असे असले तरी जिल्ह्यातील एकूण जमिनीचे क्षेत्र हे जंगलाखालील क्षेत्र, बिगरशेती क्षेत्र, लागवडीखाली येऊ शकणारे क्षेत्र, पिकाखालील निव्वळ क्षेत्र, दुबार व तिबार पिकाखालील क्षेत्र असे विभागलेले आहे. त्याची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष | जमिनीचा वापर | टक्केवारी |
|---|---|---|
| १९९९-२००० | बिगरशेती | ४% |
| २००१-२००२ | जंगलाखाली | ११% (१.७१ लाख हेक्टर) |
| २००१-२००२ | लागवडीखाली येऊ शकणारे क्षेत्र | ६५% (१२२१५१३ हेक्टर) |
| २००१-२००२ | पिकाखालील निव्वळ क्षेत्र | १०२१५८३ हेक्टर |
| २००१-२००२ | दुबार व तिबार पिकाखालील क्षेत्र | १८११६५ हेक्टर |

म्हणजेच एकूण पिकाखालील क्षेत्र २००१-०२ मध्ये ११७२९५२ हेक्टर होते.[२१]

## ५.१७ सिंचन :

भारत देश हा शेतीप्रधान देश आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेतील महत्वाचा वाटा शेतीक्षेत्राचा आहे. शेतीच्या विकासातील महत्वाचा भाग म्हणजे सिंचनसुविधा होय. जेवढ्या सिंचनाच्या अधिकाधिक सुविधा उपलब्ध होतील. तितके अधिक क्षेत्र ओलिताखाली आणता येते. परिणामी पिकांचे वाढते उत्पादन, वाढता रोजगार, वाढती निर्यात, वाढते परकिय चलन आणि कृषीक्षेत्राचा विकास होण्यास मदत होते.

परिणामी अधिकाधिक सिंचन स्त्रोत उपलब्ध होणे आवश्यक आहे. पुणे जिल्ह्यात सन २००२-०३ या वर्षात सिंचन विहिरींची संख्या ९१६६९ इतकी होती, वापरात असलेल्या विहिरीवरील वीज पंपाची संख्या १,५१४५९ इतकी होती आणि त्यामुळे १,४५,५४३ हेक्टर इतके क्षेत्र भिजले आहे.[२२]

## ५.१८ जमीन धारणा

जिल्ह्याच्या लोकसंख्येचा विचार करता जिल्ह्यातील जमीन धारण करणाऱ्या लोकांची संख्या कृषीगणना २००१ च्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात एकूण ७,४३,२३९ वहिती खाती होती व त्याखाली १०,१०,६६७ हेक्टर क्षेत्र होते. यापैकी ७,३२,३३७ वहिती खाती वैयक्तिक खाती होती. उर्वरित संयुक्त संस्थेची ९३०९ वहिती खाती व संस्थाधारणखाती १५९३ होती.[२३]

## ५.१९ सहकार

शेतकऱ्याला खाजगी सावकारांच्या तावडीतून सोडविण्यासाठी आपल्या देशात सहकार चळवळीचा जन्म झाला. गरजेपोटी जन्मलेल्या या चळवळीचे पाहता-पाहता विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सहकार चळवळीचा शिरकाव झाला. त्यामुळे सहकारी चळवळीतील वातावरण निकोप, पारदर्शक राहण्याच्या दृष्टीने शासन विविध माध्यमातून प्रयत्न करीत आहे.

''सहकारी चळवळ ही भारताच्या अर्थव्यवस्थेची एक जीवनदायिनी आहे. सर्वसामान्य जनतेसाठी देखील सहकारी चळवळ अत्यावश्यक आहे. म्हणून ही चळवळ टिकली पाहिजे. जोपासली पाहिजे. वाढली पाहिजे या सर्व गोष्टींचा सखोल विचार करून आदरणीय नामदार शरदचंद्र पवार यांनी ९७ वी घटना दुरूस्ती करून सहकारी चळवळीचा घटनेत अंतर्भाव केला व त्या अनुषंगाने सहकार कायद्याची चौकट आखून त्यांच्या अधिन राहून प्रत्येक राज्याने सहकारी कायदा करण्याचे आदेश सरकारने दिले.''[२४] सहकारासंबंधातील ९७ वी घटनादुरूस्ती १२ जानेवारी २०१२ रोजी जारी झाली आहे आणि आंतरराष्ट्रीय सहकार वर्षातील ही सर्वात महत्वाची घटना होय.

पुणे जिल्ह्यात देखील सहकार चळवळीचे जाळे मोठया प्रमाणात पसरलेले आहे. विविध सहकारी संस्थांची स्थापना झालेली आहे. या चळवळीने बँकिंग क्षेत्राशिवाय कृषी पतपुरवठा, पणन, प्रक्रिया, घरबांधणी, पर्यटन, विमा, मासेमारी आणि रोजगारनिर्मिती उत्पादनापासून ते विपननापर्यंत तसेच प्रक्रिया क्षेत्रात देखील उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. पुणे जिल्ह्यात ३१ मार्च २०१५ अखेर एकूण सर्व प्रकारच्या एकूण २७,२७४ सहकारी संस्था आहेत.[२५]

## ५.२० उद्योग

उद्योगधंदे हे देशाच्या प्रगतीचे, विकासाचे इंजिन होय. जेवढे उद्योगधंदयांचे जाळे विस्तृत झालेले असते. तेवढ्या अधिक प्रमाणात पायाभूत सुविधांचा विकास झालेला आढळतो. तसेच त्या उद्योगधंद्यांमधून मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध होत असतो. जिल्ह्यामध्ये शेतीची अवजारे, नांगर, पंप व इंजिने, कापड गिरण्या, औषधे, रबरी व प्लॅस्टिकच्या वस्तू, साबण, नायलॉन, बिस्किटे, विजेचे सामान, भांडी, लाकडाची खेळणी असे अनेक छोटे-मोठे कारखाने आहेत. १९४८ च्या फॅक्टरी ॲक्ट या कायद्यानुसार जिल्ह्यात डिसेंबर २०१३ अखेर ५३७६ कारखाने नोंदलेले आहेत. त्यापैकी ४४५२ चालू होते आणि त्यामधून ४,२६,२७३ कामगार काम करीत होते.

जुन्नर येथे हातकागद बनविला जातो. खडकी व देहूरोडला केंद्र सरकारचा दारूगोळा बनविण्याचा कारखाना आहे. पिंपरी येथे पेनिसिलीन, तळेगाव-दाभाडे येथे काचसामान व थर्मास, चिंचवड येथे रिक्षा, ट्रक, स्कूटर, लोणी-काळभोर व पिंपरी येथे रेडिओ कारखाना आहे. जिल्ह्यात छोट्या उद्योगांचे प्रमाण वाढत आहे. तसेच मेंढरे पाळून त्यांच्या लोकरीपासून घोंगड्या विणणे, भुईमुगाचे तेल काढणे, बिड्या वळणे, दोर बांधणे, कोंबड्या राखणे हे उद्योग मोठ्या प्रमाणावर चालतात. जिल्ह्यामध्ये एकूण १७ साखर कारखाने कार्यरत

आहेत. तसेच पुणे (हडपसर, गुलटेकडी, पर्वती), बारामती, भोर, लोणावळा याठिकाणी औद्योगिक वसाहती आहेत. याशिवाय औद्योगिक विकास महामंडळाने पिंपरी-चिंचवड, भोसरी क्षेत्रात मोठे औद्योगिक क्षेत्र विकसित केले आहे. बारामती, जेजूरी, कुरकुंभ येथे औद्योगिक वसाहती विकसित केल्या आहेत.[२६]

## ५.२१ वार्षिक योजना

आपल्या देशाने स्वातंत्र्यानंतर नियोजनबद्ध आर्थिक विकास हे धोरण अवलंबिले. त्याअंतर्गत शासन स्तरावरून जनतेच्या आर्थिक विकासासाठी अनेक योजना यशस्वीपणे राबविण्यात येतात.

पुणे जिल्ह्यात २०१२-१३ या वर्षी राबविण्यात येणाऱ्या विविध विकास योजनांचा विचार केला असता असे दिसते की, सर्वसाधारण, अनुसूचित जाती, विशेष घटक योजना, आदिवासी व बिगर आदिवासी मिळून ४२८.९३ कोटी रूपये खर्च करण्यात आला. यापैकी आदिवासी विकास योजनांवर झालेला खर्च रूपये ४९.३३ कोटी होता.

२०१२-१३ या आर्थिक वर्षात जिल्हा नियोजन मंडळाकडील (सर्वसाधारण/विघयो/आदिवासी विकास) सर्व योजनांचा खर्च विचारात घेतला असता त्यातील उपशिर्षवार योजनांची एकूण खर्चाशी टक्केवारी.

अ) कृषी व संलग्न सेवा - १६.८१%

ब) ग्रामीण विकास - ४.५३%

क) पाटबंधारे व पूर नियंत्रण - ४.३८%

ड) विद्युत विकास - ३.०६%

इ) उद्योग व खाणकाम - ०.५५%

ई) वाहतुक व दळणवळण - २३.३५%

उ) सामान्य आणि आर्थिक सेवा - ३.४३%

ऊ) सामाजिक व सामूहिक सेवा - ३९.९0%

ए) सामान्य सेवा - ३.१0%

- ग्रामीण भागामध्ये रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाकडून रोजगार हमी योजना राबविण्यात आली.
- सन २0१२-१३ मध्ये पुणे जिल्ह्यात रोजगार हमी योजनेखाली ४९३७ कामे घेण्यात आलेली होती. कामावर झालेला खर्च ४२0८.३२ लाख इतका होता तर रोजगार निर्मिती १८.२४ (मनुष्यदिवस लाखात) इतकी होती.
- सन २0१२-१३ मध्ये एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमावर उल्लेख केल्याप्रमाणे ४९.३३ कोटी इतका खर्च झालेला आहे.
- सन २0१२-१३ या वर्षासाठी मागासवर्गीयांसाठी राबविण्यात आलेल्या विशेष घटक योजनेसाठी रूपये ७0.९३ कोटी इतका खर्च झालेला आहे.
- नवीन वीस कलमी कार्यक्रमांतर्गत २0१२-१३ यावर्षी सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेचा १६८२ लाभार्थींना फायदा मिळाला. तसेच ९५१९ अनुसूचित जातीच्या व ३३७७ अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना सहाय्य मिळाले. जिल्ह्यात संदर्भ वर्षात ९0६ बायोगॅस संयंत्र बसविण्यात आले तर संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना कार्यक्रम बंद करण्यात आलेला आहे. तसेच संदर्भवर्षात २७७१२ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आल्या.[२७]

अशाप्रकारे लोकहितासाठी व जनतेच्या आर्थिक प्रगतीसाठी शासनस्तरावरून अनेकविध योजना यशस्वीरित्या राबविण्यात येतात आणि त्याचा लाभ जनतेला होत असतो.

## ५.२२ समारोप

सहकारी चळवळीचा अभ्यास करताना स्थानिक परिस्थितीचा सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्याचे विकास कितपत आहे याची या विश्लेषणाद्वारे आपणास माहिती मिळते. स्थानिक परिस्थितीच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्याची स्थिती चांगली आहे. त्यामुळे या जिल्ह्याचा सहकार चळवळ वृध्दींगत करण्यामध्ये वरचा क्रमांक लागतो.

## संदर्भ


१. महाराष्ट्र शासन २०१३, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०१३), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पान क्र.१

२. तत्रैव, पान क्र.१

३. तत्रैव, पान क्र.१

४. तत्रैव, पान क्र.१

५. तत्रैव, पान क्र.२

६. तत्रैव, पान क्र.२

७. तत्रैव, पान क्र.२, ३

८. तत्रैव, पान क्र.३

९. तत्रैव, पान क्र.३

१०. तत्रैव, पान क्र.४

११. तत्रैव, पान क्र.४

१२. तत्रैव, पान क्र.४

१३. तत्रैव, पान क्र.४

१४. तत्रैव, पान क्र.४

१५. तत्रैव, पान क्र.५

१६. तत्रैव, पान क्र.५

१७. तत्रैव, पान क्र.६

१८. तत्रैव, पान क्र.६

१९. तत्रैव, पान क्र.६

२०. तत्रैव, पान क्र.६

२१. तत्रैव, पान क्र.७

२२. तत्रैव, पान क्र.७

२३. तत्रैव, पान क्र.७

२४. खोपडे चंद्रकांत, जुलै (२०१५), महाराष्ट्र को-ऑप. क्रेडिट न्यूज, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. पुणे, पान क्र.५

२५. पुणे जिल्हा सहकारी बोर्ड, मर्यादित, पुणे,७८वा वार्षिक अहवाल-(२०१४-१५).

२६. उ.नि., जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०१३), पान क्र.९

२७. तत्रैव, पान क्र.१०,११.

# प्रकरण सहावे

## मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची सद्य:स्थिती


प्रस्तावना

६.१ मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची स्थापना

६.२ मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची विहित पध्दतीने नोंदणी

६.३ मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे कार्यक्षेत्र

६.४ मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची उद्दिष्टे

६.५ संघटनात्मक रचना

६.६ सभासद

६.७ भागभांडवल

६.८ कर्जपुरवठा

६.९ ठेवी

६.१० उभारलेले कर्ज

६.११ अन्य बँकामधील गुंतवणूक

६.१२ कर्ज वसूली व थकबाकी

६.१३ उत्पन्न – खर्च व नफा

६.१४ नफ्याची विभागणी व लाभांश

६.१५ स्वनिधी

६.१६ लेखापरिक्षण (ऑडिट)

६.१७ लेखापरिक्षणाच्या निर्धारित निकषांप्रमाणे मूल्यमापन

६.१८ सी डी रेशो (ठेव कर्जाचे प्रमाण )

६.१९ आधूनिकीकरण

६.२० समारोप

संदर्भ

# प्रकरण सहावे

## मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची सद्य:स्थिती

**प्रस्तावना**

सहकाराचे तत्त्व मानवी संस्कृतीइतकेच प्राचीन आहे. जगातील सर्वप्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये सहकाराने ठसा उमटविला आहे. सहकारी चळवळीचे स्वरुप, सहकारी चळवळीची प्रगती, आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहकाराची भूमिका यांबद्दलची चर्चा आधीच्या प्रकरणांमध्ये केलेली आहे. या प्रकरणामध्ये मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची स्थापना, संघटन, आर्थिक व्यवहार इत्यादी घटकांची सद्य:स्थिती यांबद्दल सविस्तर चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्यायोगे एका दृष्टिक्षेपात समर्पक ज्ञान प्राप्त होईल व विषयाचे आकलन सोपे होईल.

संशोधकाने संशोधनासाठी ''मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था मर्यादित, पुणे.'' पत्ता: १२५४, सद्भाव सदनिका, निंबाळकर तालीम समोर, सदाशिव पेठ, पुणे -४११०३०. या पतसंस्थेची निवड केलेली आहे.

### ६.१ मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची स्थापना

कोणत्याही प्रदेशाचा, राष्ट्राचा, व्यक्तीचा सर्वांगीण समतोल आणि जलद आर्थिक विकास साध्य करायचा असेल तर मुबलक पतपुरवठ्याची आवश्यकता असते. औद्योगिक क्रांतीच्या काळात कारखानदारीमध्ये वाढ होऊन शहरांमध्ये पगारदार नोकर तसेच निश्चित उत्पन्न असणाऱ्या लोकांचा वर्ग निर्माण झाला.त्यांच्या उपभोग गरजा भागविण्यासाठी आणि छोटे उद्योग-व्यवसाय करण्यासाठी आवश्यक कर्जपुरवठा करण्यास, अशा लोकांजवळ पुरेसे तारण नसल्याकारणाने व्यापारी बँका तयार नसत. तसेच सावकारांकडून

होणारे शोषण थांबविण्यासाठी पगारदार नोकरांच्या सहकारी पतपेढ्या निर्माण झाल्या.[१]

'प्रत्येकजण सर्वांसाठी आणि सर्वजण प्रत्येकासाठी' या सहकाराच्या तत्त्वाप्रमाणे पुणे शहरातील वेगवेगळया संस्थाद्वारे चालविण्यात येणाऱ्या शासन मान्य अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने एकत्र येऊन आपली आर्थिक गरज भागविण्यासाठी, ''मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था मर्यादित, पुणे.'' या नावाने पतसंस्थेची स्थापना केली.

पतसंस्थेच्या प्रथम अध्यक्षा शशिकला भट यांनी पहिला वार्षिक अहवाल सादर करताना पतसंस्थेच्या स्थापनेविषयी मनोगत व्यक्त करताना म्हटले आहे की, ''पुणे शहर व परिसरामध्ये आपल्या मान्य खाजगी प्राथमिक शाळा कार्यरत आहेत. प्राथमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू या संस्थेमध्ये सभासद आहेत. या सभासदांच्या अडीअडचणी ओळखून आर्थिक अडचण दूर करण्याची व खाजगी सावकारांच्या पाशातून सोडवणुकीसाठी या संस्थेची स्थापना केलेली आहे. ह्या एका महत्त्वाच्या सामाजिक कार्यात संस्थेने अभिमानाने पाऊल टाकले आहे. महागाईच्या काळात रोजच्या गरजांबरोबर शैक्षणिक, आर्थिक विवंचना दूर करण्यासाठी भक्कम आर्थिक पाठिब्यांची आवश्यकता असते. ही गरज लक्षात घेऊन संस्था उभी केली आहे.''[२]

या पतसंस्थेच्या स्थापनेमध्ये श्री. पंढरीनाथ शिंदे, श्री. रमेश शिंदे, श्री. प्रकाश खासनिस, श्री. सतिश टेमगिरे, सौ. प्रतिभा पाटणकर, सौ. सुनंदा कुलकर्णी, सौ.उमा साने, श्री. राजेश बेल्हेकर, सौ. सुधा बोडस, सौ. अरूंधती सहस्त्रबुध्दे, सौ. स्मिता पुजारी इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे.

सन १९९२-९३ या पहिल्या वर्षी पतसंस्थेची सभासद संख्या २०८ होती.[३] तर पतसंस्थेचे अधिकृत भागभांडवल रू. ५,००,०००/- होते. आणि ३१ मार्च १९९३ अखेर पतसंस्थेचे वसूल भागभांडवल ४६०००/- रूपये इतके होते. सन १९९२-९३ या प्रथमवर्षी पतसंस्थेने सभासद कर्जदाराची गरज, कर्जाचे कारण आणि कर्जफेडीची क्षमता इत्यादी बाबींचा विचार करून सभासदांना १९९२-९३ साली रू.३०,००० कर्जवाटप केलेले होते.[४]

## ६.२ मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची विहित पध्दतीने नोंदणी

कोणत्याही संस्थेला कायदेशीर स्वरुप प्राप्त होण्यासाठी तिची नोंदणी करणे आवश्यक असते. सहकार हा विषय राज्य शासनाच्या अखत्यारीत असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९९० मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थेची नोंदणी करावी लागते.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम-१९६१ मधील तरतुदीप्रमाणे जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्याकडे विहित नमुन्यात अर्ज करुन 'मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था मर्यादित पुणे' या नावाने पतसंस्थेची नोंदणी केलेली आहे.

पतसंस्थेचा नोंदणी क्रमांक 'पीएनए/(पीएनए)/ आरएसआर/ सीआर/ ८४७/ ९२-९३ दिनांक २० जानेवारी १९९३' असा आहे.[५]

## ६.३ मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे कार्यक्षेत्र

१९९३ साली मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची विहित पद्धतीने नोंदणी करताना पतसंस्थेचे कार्यक्षेत्र 'पुणे व पिंपरी

चिंचवड महानगरपालिका' हद्दीइतके मर्यादित होते. पतसंस्थेचा जसा जसा विकास होत गेला तसे मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्थेची सभासद संख्या वाढू लागली. पतसंस्थेच्या भागभांडवलात वाढ होऊ लागली. त्यामुळे जास्तीत जास्त मान्य खाजगी प्राथमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ व्हावा या हेतूने पतसंस्थेचे कार्यक्षेत्र जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे यांच्या परवानगीने संपूर्ण 'पुणे जिल्हा' करण्यात आले आहे. सद्यस्थितीत ते 'पुणे जिल्हा' इतके आहे.[६]

## ६.४ मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची उद्दिष्टये

कोणत्याही संस्थेच्या यशस्वी वाटचालीमध्ये उद्दिष्टांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. उद्दिष्टे ही दिशादर्शक म्हणून काम करतात. म्हणूनच मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचा अभ्यास करत असताना पतसंस्थेची खालील उद्दिष्टे अभ्यासणे गरजेचे आहे.

१. सभासदांना काटकसर, स्वावलंबन व सहकाराचा प्रसार करण्यास प्रोत्साहन देणे, सभासदांना स्वत:च्या उत्पन्नाचा काही भाग सुरक्षित व सुलभरित्या जतन करण्यास सहाय्य करणे, सभासदांकडून भागभांडवल व ठेवी स्वीकारणे, सभासदांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी विविध उपक्रम हाती घेणे.

२. बाहेरील कर्ज काढणे व निधी उभारणे, सभासदांना वाजवी शर्तीवर जामिनावर कर्ज देणे व वसुली करणे.

३. संस्थेच्या उपयोगासाठी मालकी हक्काने किंवा भाडयाने जागा किंवा इमारत खरेदी करणे. सहकारी कायदा कलम २० व २०अ अंतर्गत संस्थांची भागीदारी व संस्थांकडून सहयोग करता येईल.[७]

## ६.५ संघटनात्मक रचना

सहकारी संस्थेच्या रचनेत १) सभासद २) सभासदांनी निवडून दिलेली व्यवस्थापन समिती ३) व्यवस्थापन समितीने निवडलेले अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार यांचेसारखे उपविधीतील तरतुदीस अनुसरून निवडावयाचे पदाधिकारी ४) व्यवस्थापन समितीने नेमलेले पगारी सेवक या सर्व घटकांचा अंतर्भाव असतो. या सर्व घटकांच्या कामकाजात सुसूत्रता असणे हे पतसंस्थेच्या हिताच्या दृष्टीने अत्यावश्यक असते.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार व पतसंस्थेच्या पोटनियमतातील तरतुदीप्रमाणे शासन मान्य खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्थेचे कायम सभासद होत असतात. या कायम सभासदांमधून प्रत्येक पाच वर्षांनी निवडणुकीद्वारे संचालक निवडण्याची प्रक्रिया पार पाडली जाते. संचालक मंडळ हे सभासदांनी निवडून दिलेले व सभासदांसाठी काम करणारे मंडळ असते. संचालक मंडळाची व्यवस्थापन समिती ही अधिमंडळाचे वार्षिक बैठकीस जबाबदार असते. म्हणूनच अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीने ठरवून दिलेल्या धोरणाप्रमाणे व कार्यकक्षेच्या मर्यादेतच त्यांनी काम करणे अनिवार्य असते. संस्थेचे नैमित्तिक व दैनंदिन कामकाज पगारी सेवक करतात व ते व्यवस्थापन समितीस जबाबदार असतात.[८]

### अ. व्यवस्थापक समितीची कामे व जबाबदाऱ्या

- नवीन सभासदांना प्रवेश देणे, गाऱ्हाणी ऐकणे व त्यासंबंधी योग्य ती कार्यवाही करणे.

- संस्थेच्या सर्व पगारी नोकरांची नेमणूक करणे, वेतन व भत्ते ठरविणे, सेवेत कायम करणे, प्रसंगी तात्पुरते कामावरून दूर करणे, दंड करणे किंवा बडतर्फ करणे, नोकरांकडून जामिन आणि त्यांच्या श्रेणी व जामिनकीच्या रकमा ठरविणे. पगारवाढ, फंड, ग्रॅच्युईटी, बढती, साधारण सभेच्या संमतीने नोकरांकरिता सेवा नियम, भविष्य निर्वाह निधीचे नियम तयार करणे.
- कर्जासाठी आलेल्या अर्जाचा विचार करून कर्ज मंजूर/नामंजूर करणे. ठेवीवरील आणि कर्जावरील व्याजदर ठरविणे. थकबाकी व अन्य येणे रकमा वसूलीसाठी कायदेशीर कारवाई करणे.
- हिशोबावर देखरेख ठेवणे व पडताळून पाहणे. संस्थेकडे आलेल्या रकमा नियमितरित्या बँकेत भरणा केल्या जातात का नाही ते पाहणे. सहकार खात्याने मागितलेले अहवाल व इतर माहिती वेळेत पाठविण्याची व्यवस्था करणे. कायद्याच्या चौकटीत राहून संस्थेच्या वतीने दावे दाखल करणे, प्रतिवादी म्हणून दावे चालविणे आणि त्याबाबतीत तडजोड घडवून आणणे. संस्थेच्या वतीने भाग, सरकारी आणि इतर रोखे विकणे, हस्तांतरण किंवा अन्य रितीने त्याबाबतीत व्यवहार करणे. नेमणूक केलेल्या अंतर्गत हिशोब तपासणीसाकडून प्रत्येक तीन महिन्यांनी संस्थेचे हिशोब तपासून घेणे. मागील सहकार वर्षाचा (१ एप्रिल ते ३१ मार्च) वार्षिक अहवाल ताळेबंद, जमाखर्च पत्रक, नफा तोटा पत्रक आणि नफ्याची विभागणी इत्यादीचा अहवाल तयार करणे व त्यास मंजूरी देऊन वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी ठेवणे.
- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० वा त्याखाली तयार केलेले नियम आणि उपविधी यांच्या तरतुदीनुसार उभारलेल्या विभिन्न निधीचा विनियोग करणे.

- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ नियम ५४ व ५५ च्या तरतुदीच्या उपबंधास अधिन राहून संस्थेच्या निधीची गुंतवणूक करणे. संस्थेचे लेखापरिक्षण करून घेऊन त्याचे अहवाल वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवणे.
- संस्थेचे कामकाज आवश्यकतेनुसार पदाधिकाऱ्यांत वाटून घेणे. म.स.नियम १९६१ चा नियम १०७ सी मधील अटीस अधिन राहून व्यवस्थापक / सचिव / सेवक यांच्या हाती रोख रक्कम किती असावी याची मर्यादा ठरविणे. विशेष कामाकरीता समित्या व उपसमित्या नेमणे आणि व्यवस्थापक समितीला योग्य वाटतील असे अधिकार त्यांना सुपूर्त करणे. संस्थेच्या कामकाजाची धोरणे ठरविणे, सभासदांच्या व आम जनतेच्या हितसंबंधास बाधा न आणता संस्थेचा कारभार चालविणे. समितीच्या सर्व सदस्यांची सेवा विनामूल्य राहील. परंतू नियमाप्रमाणे सभा भत्ता, दैनिक भत्ता व प्रवासभत्ता घेता येईल तसेच व्यवस्थापक समितीने ठरविल्याप्रमाणे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना मानधन घेता येईल. तज्ञ सल्लागार, कायदा सल्लागार व चौकशी अधिकारी अथवा याबाबत कामे करणारी संस्था यांना संस्थेच्या व्यवहारासंबंधी कराराने नेमणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.[९]

निवडणूक प्रकियेमधून निवडून आलेल्या सदस्यांमधून अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार, यांची निवड केली जाते. व्यवस्थापन समितीच्या सर्व सभांचे अध्यक्ष पद अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष भूषवतात. अध्यक्ष पतसंस्थेच्या संपूर्ण व्यवहारावर लक्ष ठेवतात. म्हणजेच लोकशाही तत्वांचे पालन करतात.

**ब. अध्यक्षांची प्रत्यक्ष कामे**

- कर्ज मागणी अर्ज, तातडीचे कर्ज मागणी अर्ज, फेस्टिव्हल कर्ज मागणी अर्ज, ठेवीवरील कर्ज मागणी अर्ज, ठेवीचे अर्ज, आवर्तक ठेव/मासिक ठेव अर्ज, सभासदत्वाचे अर्ज इत्यादी अर्ज तपासणे व सहया करणे.
- ठेवीच्या पावत्यांवर सहया करणे.
- चेकवर सह्या करणे, रजिस्टर तपासून सह्या करणे. जमा-नावे पत्रक तपासणे, रोख शिल्लक रकमा तपासणे, रजिस्टरवरील नोंदी तपासणे, पगार रजिस्टर तपासणे, कर्मचाऱ्यांचे हजेरी रजिस्टर तपासणे. घेतलेल्या रजा मासिक सभेत मंजूर करणे. बँकेचे दैनंदिन व्यवहारांचे स्टेटमेंट तपासणे. मासिक सभा व साधारण पत्रव्यवहार करणे. थकबाकीदारांचा अहवाल तपासणे व सभेपुढे मांडणे. विक्री अर्ज व शिल्लक अर्जाचा तपशील पतसंस्थेकडे आवक-जावक पत्रव्यवहारासंबंधीची नोंद घेणे, रोजकिर्द, कॅशबुकवर सह्या करणे, मासिक सभा उपस्थिती पत्रकावर सह्या करणे, कर्ज समिती रजिस्टर तपासणे सही करणे.[१०]

## ६.६ सभासद

सामूहिक हिताची जपणूक होण्यासाठी व आपल्या आर्थिक गरजांची पूर्तता होण्याच्यादृष्टीने भागांच्या स्वरुपात पैसा उभा करुन सहकारी संस्थेची निर्मिती करणाऱ्या लोकांना सभासद असे म्हणतात. सभासद हे सहकारी संस्थांचे सामुहिकरित्या मालक असतात. सर्वसाधारपणे सभासदाचे दोन गट केले जातात.

१) कायम किंवा नियमित सभासद

२) नाममात्र किंवा तात्पुरता सभासद

### ६.६.१ कायम किंवा नियमित सभासद

सहकारी पतसंस्थांचे मालक या नात्याने पतसंस्थेच्या नियमाप्रमाणे भाग धारण करणारे सभासद हे कायम सभासद मानले जातात. कायम सभासदांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० कलम २२ नुसार काही अधिकार प्राप्त होतात. कायम सभासदत्त्व मिळविण्यासाठी सभासदाला पुढील अटींची पूर्तता करणे आवश्यक असते. त्या अटी पुढीलप्रमाणे :-

१) पतसंस्थेच्या कार्यक्षेत्रातील व्यक्ती

२) करार करण्यास पात्र असणारी व्यक्ती

३) फौजदारी अथवा नैतिकतेच्या संबंधी शिक्षा न झालेली व्यक्ती

४) पतसंस्थेच्या संबंधी समांतर धंदा न करणारी व्यक्ती

५) पतसंस्थेची नोकर नसणारी व्यक्ती

६) सभासदांसाठी केलेला अर्ज संचालकमंडळाने मान्य केलेली व्यक्ती

७) पतसंस्थेच्या उपविधीप्रमाणे भाग धारण करणारी व्यक्ती

कायम सभासदत्त्व धारण करणाऱ्या व्यक्तीला निवडणुकीत उभे राहण्याचा, मतदान करण्याचा, हिशोबपत्रके पाहण्याचा, वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्याचा, शिल्लक नफ्यातून लाभांश मिळण्याचा अधिकार मिळतो.[११]

### ६.६.२ नाममात्र किंवा तात्पुरता सभासद

पतसंस्थेचा निधी वाढवण्यासाठी ठेवी ठेवणाऱ्या व्यक्तीस पतसंस्थेकडून नाममात्र किंवा तात्पुरता सभासद करुन घेतले जाते. ठेव काढून घेतल्यानंतर सदर व्यक्तीचे सभासदत्त्व आपोआप संपुष्टात येते. नाममात्र किंवा तात्पुरते सभासद होण्यासाठी खालील अटींची पूर्तता करावी लागते.

१. ठेवीदार व्यक्ती

२. पतसंस्थेची कर्मचारी व्यक्ती

३. नाममात्र विनापरतीची फी भरणारी व्यक्ती

४. नाममात्र सभासदांसाठी केलेला अर्ज संचालक मंडळाने मान्य केलेली व्यक्ती

नाममात्र सभासदाला संस्थेच्या कारभारात भाग घेण्याचा, मतदान करण्याचा अथवा लाभांश मिळण्याचा, निवडणूकीत उभे राहण्याचा अधिकार नसतो.[१२]


मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची वर्षनिहाय सभासद स्थिती पुढे दिल्याप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.१ कायम सभासद**

| क्र. | वर्ष | कायम सभासद | मागील वर्षापेक्षा झालेली वाढ | वाढीचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | ४४५ | -- | -- |
| २ | २०००-२००१ | ४६९ | २४ | ५.३९ |
| ३ | २००१-२००२ | ४८५ | १६ | ३.४१ |
| ४ | २००२-२००३ | ५०९ | २४ | ४.९४ |
| ५ | २००३-२००४ | ५३७ | २८ | ५.५ |
| ६ | २००४-२००५ | ५५८ | २१ | ३.९१ |
| ७ | २००५-२००६ | ५५१ | -७ | -०.०१ |
| ८ | २००६-२००७ | ५७२ | २१ | ३.८१ |
| ९ | २००७-२००८ | ६०२ | ३० | ५.२४ |
| १० | २००८-२००९ | ६७३ | ७१ | ११.७९ |
| ११ | २००९-२०१० | ७२७ | ५४ | ८.०२ |
| १२ | २०१०-२०११ | ७४५ | १८ | २.४७ |
| १३ | २०११-२०१२ | ८०९ | ६४ | ८.५९ |
| १४ | २०१२-२०१३ | ८५४ | ४५ | ५.५६ |
| १५ | २०१३-२०१४ | ८८२ | २८ | ३.२७ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल (१९९९-२००० ते २०१३-२०१४)

### आलेख क्रमांक ६.१




**स्त्रोत : तक्ता क्र.६.१**

**विश्लेषण :**

१) सभासदांमधील सर्वात जास्त वाढआर्थिक वर्ष २००८-२००९, २००९-२०१० व २०११-२०१२ मध्ये झालेली दिसते. या वर्षांतसभासद होण्यातील वाढ मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे ११.७९, ८.०२ व ८.५९ टक्के इतकी आहे. अभ्यासाच्या कालावधीमध्ये सभासदांची संख्या २००५-२००६या एकाच वर्षी कमी झाली.

२) आर्थिक वर्ष २००५-२००६ मध्ये सभासद होण्यातील वाढ मागील वर्षाच्या तुलनेत ऋण म्हणजे -०.०१ टक्के इतकी आहे. तथापि या वर्षात सभासद होण्याचे प्रमाण अत्यल्प असून राजीनामा अथवा सेवानिवृत्तीच्या कारणांमुळे

सभासदत्त्व संपुष्टात येण्याचे प्रमाण अधिक असल्याने ही वाढ ऋण झाल्याचे दिसून येते. सभासद संख्या १३ वर्षात वाढली. त्याचे सरासरी शेकडा प्रमाण ५.१ % आहे.

३) सन १९९९ ते २०१४ या पंधरा वर्षांच्या काळात पतसंस्थेच्या सभासदांच्या वाढीचे प्रमाण ५ वर्षांमध्ये ० ते ४ टक्के आहे. दुसऱ्या ५ वर्षांमध्ये ५ ते ८ टक्के आहे. तर ३ वर्षे ८ ते १२ टक्के आहे.

४) अभ्यास कालावधीतील प्रत्येक पाच वर्षांची तुलना करता सन १९९९-२००० ते २००३-२००४ या पाच वर्षांत पतसंस्थेची सभासद संख्या ९२ इतकी वाढली आहे. वाढीचा सरासरी दर ४.८१ टक्के इतका आहे. सन २००४-२००५ ते २००८-२००९ या पाच वर्षांच्या काळात १३६ ने सभासद संख्येत वाढ झाली असून त्याच्या सरासरी वाढीचे प्रमाण ४.९१ टक्के इतके आहे. सन २००९-२०१० ते २०१३-२०१४ या पाच वर्षांमध्ये २०९ इतकी सभासद संख्या वाढली असून वाढीचे सरासरी शेकडा प्रमाण ५.५८ टक्के इतके आहे. एकूण पंधरा वर्षामध्ये सभासद संख्या ४३७ ने वाढली असून त्याचे सरासरी शेकडा प्रमाण ५.१ टक्के इतके आहे.

## ६.७ भागभांडवल

कोणतीही सहकारी पतसंस्था स्थापन करताना तयार केलेल्या उपविधीत भागभांडवलाबाबतची तरतुद अथवा रुपरेखा निश्चित करावी लागते. आपल्या अधिकृत भागभांडवलासंबंधीच्या कमाल मर्यादेचा स्पष्ट उल्लेख उपविधीमध्ये करावा लागतो. भागभांडवल हे पतसंस्थेची सांपत्तिक स्थिती दर्शवित असते. पतसंस्थेला भागभांडवल उभे करण्याची कमाल मर्यादा ठरवून दिलेली असल्याने त्यापेक्षा जास्त रकमेचे भागभांडवल उभे करता येत नाही. भागभांडवलाला पतसंस्थेचा पाया मानले जात असल्याने पतसंस्थेद्वारे दोन प्रकारे भागभांडवलाची उभारणी केली जाते.१.

सभासदांकडून वसूल केलेले अधिकृत भागभांडवल २. सभासदांच्या मागणीनुसार भाग विक्रीस काढून उभे केलेले भागभांडवल. या भागभांडवलाचा उपयोग पतसंस्थेकडून पुढील संपत्ती उभी करण्यासाठी केला जातो.

पोटनियमात प्रत्येक भागाची दर्शनी किंमत निश्चित केलेली असते. सभासदाला परवडेल अशी भागाची किंमत असल्याने सभासद आपापल्या कुवतीप्रमाणे भाग खरेदी करतो. सभासदाची भाग खरेदी करण्याची वैयक्तिक मर्यादाही पोटनियमात नमूद केलेली असते.

कायद्यात झालेल्या बदलाप्रमाणे किंवा सहकार आयुक्त यांनी काढलेल्या परिपत्रकाप्रमाणे पतसंस्था आपल्या पोटनियमात दुरुस्ती करुन अधिकृत व वैयक्तिक भागभांडवलाच्या कमाल मर्यादेत वाढ करत असतात.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने आपल्या पोटनियमात अधिकृत व वैयक्तिक धारण करावयाच्या कमाल भागभांडवलाची मर्यादा निश्चित करुन घेतलेली आहे. सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात पतसंस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये ५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लाख फक्त) इतके होते. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात पतसंस्थेचे अधिकृत भागभांडवल मर्यादा रुपये ५,००,००,०००/- (अक्षरी रुपये पाच कोटी फक्त) पर्यंत वाढविण्यात आल्याचे दिसून येते.

सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात पतसंस्थेचे वैयक्तिक भागभांडवल धारण करण्याची कमाल मर्यादा रुपये २०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) इतकी होती. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात पतसंस्थेचे वैयक्तिक भागभांडवल धारण करण्याची कमाल मर्यादा रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख फक्त) पर्यंत वाढविण्यात आल्याचे दिसून येते.पतसंस्थेच्या प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रुपये १०/- (रुपये दहा) इतकी आहे.[१३]


मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची वर्षनिहाय वसूल भागभांडवलाची स्थिती पुढीलप्रमाणे :-

## तक्ता क्रमांक ६.२ वसूल भागभांडवल

| क्र. | वर्ष | वसूल भागभांडवल (रुपयांमध्ये) | मागील वर्षापेक्षा झालेली वाढ (रुपयांमध्ये) | वाढीचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | ३१,४०,३५० | -- | -- |
| २ | २०००-२००१ | ३९,८७,३०० | ८,४६,९५० | २६.९६ |
| ३ | २००१-२००२ | ४६,०६,७०० | ६,१९,४०० | १५.५३ |
| ४ | २००२-२००३ | ६१,२८,५५० | १५,२१,८५० | ३३.०३ |
| ५ | २००३-२००४ | ७८,६९,८०० | १७,४१,२५० | २८.४१ |
| ६ | २००४-२००५ | ९४,५९,६५० | १५,८९,८५० | २०.२० |
| ७ | २००५-२००६ | १,०८,६०,८५० | १४,०१,२०० | १४.८१ |
| ८ | २००६-२००७ | १,२४,२७,९०० | १५,६७,०५० | १४.४२ |
| ९ | २००७-२००८ | १,४०,७२,२५० | १६,४४,३५० | १३.२३ |
| १० | २००८-२००९ | १,५७,५३,२०० | १६,८०,९५० | ११.९४ |
| ११ | २००९-२०१० | १,७९,३०,९०० | २१,७७,७०० | १३.८२ |
| १२ | २०१०-२०११ | १,९९,९८,९५० | २०,६८,०५० | ११.५३ |
| १३ | २०११-२०१२ | २,२९,१३,०७५ | २९,१४,१२५ | १४.५७ |
| १४ | २०१२-२०१३ | २,९९,३२,१९५ | ७०,१९,१२० | ३०.६३ |
| १५ | २०१३-२०१४ | ३,४३,४८,०९५ | ४४,१५,९०० | १४.७५ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल (१९९९-२०१४)

## आलेख क्रमांक ६.२




**स्त्रोत : तक्ता क्र.६.२**

**विश्लेषण :**

१) आर्थिक वर्ष २००२-२००३ व २०१२-२०१३ मध्ये भागभांडवलात झालेली वाढ मागील वर्षाच्या तुलनेत सर्वाधिक म्हणजे ३३.०३ व ३०.६३ टक्के इतकी आहे.

२) पतसंस्थेच्या भागभांडवलातील वाढ ही अधिकतर वर्षात (प्रतिवर्षी सरासरी) ११ ते १५ टक्के इतकी दिसून येते.

३) सभासदांच्या गरजा लक्षात घेऊन पतसंस्थेने वेळोवेळी आपल्या अधिकृत व वैयक्तिक भागभांडवलात मर्यादा वाढ करुन सांपत्तिक स्थिती मजबूत करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

४) अभ्यासाच्या पहिल्या वर्षी भागभांडवल रु.३१.४ लाख, २००५-०६ मध्ये म्हणजे पहिल्या ६ वर्षात १ कोटींच्यावर, त्यानंतर ६ वर्षांनी २ कोटींच्यावर,(२०११-१२) आणि पुढच्या दोनच वर्षात ३ कोटीच्या वर भागभांडवलात वाढ झाली आहे.

५) अभ्यास कालावधीतील प्रत्येक पाच वर्षांची तुलना करता सन १९९९-२००० ते २००३-२००४ या पाच वर्षांच्या कालावधीत भागभांडवलाच्या वाढीचे सरासरी शेकडा प्रमाण २५.९८ टक्के इतके असून या पाच वर्षांमध्ये रुपये ४७,२९,४५०/- इतकी वाढ झाली आहे. तसेच सन २००४-२००५ ते २००८-२००९ या पाच वर्षांमध्ये भागभांडवलात रुपये ७८,८३,४००/- इतकी वाढ दिसून येते. त्याचे सरासरी शेकडा प्रमाण १४.९२ टक्के आहे. सन २००९-२०१० ते २०१३-२०१४ या पाच वर्षात भागभांडवलात सर्वाधिक वाढ म्हणजे रुपये १,८५,९४,८९५/- इतकी वाढ झाली आहे. त्याचे सरासरी शेकडा प्रमाण १७.०६ टक्के आहे.

**६)** एकंदरीत पंधरा वर्षामध्ये वसूल भागभांडवलातील वाढीचे सरासरी शेकडा प्रमाण १८.८४ टक्के इतके आहे.

## ६.८ कर्जपुरवठा

लोकांच्या गरजांची पूर्तता करणे हा पतसंस्थांच्या हेतूमधील मुख्य हेतू मानला जातो. पतसंस्था आपल्या कार्यक्षेत्रातील सभासदांची आर्थिक गरज खालील प्रकारची कर्जे देऊन भागवतात.

१) तारण कर्ज

२) मुदत कर्ज

३) विनागहाण कर्ज

४) वैयक्तिक कर्ज

५) इतर कर्ज

वरील कर्जाचे कालावधीनुसार १. दीर्घ मुदत कर्ज २. अल्प मुदत कर्ज असे दोन प्रकार पडतात. अशी कर्जे देताना पतसंस्था त्यावर व्याज आकारतात.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेकडून आपल्या सभासदांना खालील प्रकारची कर्जे दिली जातात.

१) सर्वसाधारण (मुदत कर्ज)

२) तातडीचे कर्ज

३) फेस्टिव्हल कर्ज

४) ठेव तारण कर्ज

५) सेवक कर्ज

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम–१९६० नुसार विहित पद्धतीने नोंदणी झालेली संस्था असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम–१९६० नुसार व पतसंस्थेच्या पोटनियमातील तरतुदीप्रमाणे वरील प्रकारची कर्जे सभासदांना दिली जातात.[१४] असे दिसून आले आहे. पतसंस्थेच्या पोटनियमातील तरतुदीप्रमाणे वरील प्रकारच्या कर्जाचा व्याज दर निश्चित करण्यात आला असून कर्ज परतफेडीचा कालावधीही निश्चित केलेला आहे.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था ही पगारदार सेवकांची पतसंस्था आहे. पतसंस्थेच्या सभासदांना कर्जपुरवठा करताना वेतनाचाआधार घेतला जातो. त्यानुसार सभासदांना कर्जाचा पुरवठा केला जातो. सभासदांच्या कर्जाची वाढती गरज लक्षात घेऊन कर्जाच्या मर्यादेत वाढ करण्यात आल्याचे दिसते. सन १९९९-२००० यावर्षी कर्जाची मर्यादा रुपये २,००,०००/-(अक्षरी रुपये दोन लाख) इतकी होती. ती सन २०१२-१३ यावर्षी रुपये ८,५०,०००/-(अक्षरी रुपये आठ लाख पन्नास हजार) इतकी झाल्याचे दिसते.[१५]


मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची वर्षनिहाय कर्जपुरवठ्याची स्थिती पुढीलप्रमाणे :-

**तक्ता क्रमांक ६.३ कर्जपुरवठा**

| क्र. | वर्ष | कर्ज पुरवठा (रुपयांमध्ये) | मागील वर्षापेक्षा झालेली वाढ (रुपयांमध्ये) | वाढीचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | ८४,४८,५५४ | -- | -- |
| २ | २०००-२००१ | १,१०,१३,०६३ | २५,६४,५०९ | ३०.३५ |
| ३ | २००१-२००२ | १,२१,१३,६२५ | ११,००,५६२ | ९.९९ |
| ४ | २००२-२००३ | १,७२,३५,३६६ | ५१,२१,७४१ | ४२.२८ |
| ५ | २००३-२००४ | २,०५,००,३१४ | ३२,६४,९४८ | १८.९४ |
| ६ | २००४-२००५ | २,२७,९२,५२३ | २२,९२,२०९ | ११.१८ |
| ७ | २००५-२००६ | २,६८,०७,८०३ | ४०,१५,२८० | १७.६१ |
| ८ | २००६-२००७ | ३,१३,६९,५६३ | ४५,६१,७६० | १७.०१ |
| ९ | २००७-२००८ | ४,२७,३९,०७३ | १,१३,६९,५१० | ३६.२४ |
| १० | २००८-२००९ | ४,९४,८८,२६६ | ६७,४९,१९३ | १५.७९ |
| ११ | २००९-२०१० | ६,०८,३१,४३५ | १,१३,४३,१६९ | २२.९२ |
| १२ | २०१०-२०११ | ७,६८,४३,१८८ | १,६०,११,७५३ | २६.३२ |
| १३ | २०११-२०१२ | १०,४४,३२,२४२ | २,७५,८९,०५४ | ३५.९० |
| १४ | २०१२-२०१३ | १२,१४,१२,६८२ | १,६९,८०,४४० | १६.२५ |
| १५ | २०१३-२०१४ | १२,७४,६९,८९८ | ६०,५७,२१३ | ४.९८ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (१९९९-२०१४)

### आलेख क्रमांक ६.३




**स्त्रोत तक्ता क्र.६.३**

**विश्लेषण :**

१) आर्थिक वर्ष २००२-२००३, २००७-२००८ व २०११-२०१२ मध्ये कर्जपुरवठा मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे ४२.२८, ३६.२४ व ३५.९० टक्के जास्त केलेला आहे. ही वाढ इतर वर्षाच्या तुलनेत सर्वाधिक आहे.

२) आर्थिक वर्ष २०१३-२०१४ मध्ये कर्ज पुरवठ्यातील वाढ मागील वर्षाच्या तुलनेत सर्वात कमी म्हणजे ४.९८ टक्के इतकी आहे. प्रत्यक्ष कर्जाची रक्कम २०१३-१४ मध्ये सर्वात जास्त होती पण वाढीचा दर कमी झाला आहे.

३) कर्जाची प्रत्यक्ष रक्कम दरवर्षी वाढली आहे.

४) अभ्यास कालावधीतील प्रत्येक पाच वर्षांची तुलना करता सन १९९९-२००० ते २००३-२००४ या कालावधीत पतसंस्थेने सभासदांना केलेल्या कर्जपुरवठ्यात रुपये १,२०,५१,७६० इतकी वाढ झाली आहे. त्याचे सरासरी शेकडा प्रमाण २५.३९ टक्के इतके आहे. सन २००४-२००५ ते २००८-२००९ या पाच वर्षांच्या काळात पतसंस्थेने सभासदांना केलेला कर्जपुरवठ्यात रुपये २,८९,८७,९५२ इतकी वाढ झाली आहे. सन २००७-२००८ साली कर्जपुरवठ्यातील वाढ ही ३६.२४ टक्के ही सर्वाधिक असली तरी सरासरी शेकडा वाढ मात्र १९.५६ टक्के आहे. सन २००९-२०१० ते २०१३-१४ या पाच वर्षांच्या कालावधीत कर्जपुरवठ्यातील वाढ रुपये ७,७९,८१,६३२/- इतकी असली तरी शेकडा वाढ मात्र २१.२७ टक्के इतकीच दिसते. म्हणजे पहिल्या ५ वर्षात वाढीचा दर जास्त आहे.

५) वाढीचा दर कमीजास्त झालेला आहे. वाढीच्या दरात सलग वाढ दिसत नाही.

## ६.९ ठेवी

सभासदांना बचतीसाठी प्रोत्साहन देणे हा पतसंस्थेचा महत्त्वाचा हेतू आहे. त्याचबरोबर सभासद व सामान्य लोकांकडून ठेवी स्वीकारुन गरजू सभासदांना त्याच्या मागणीनुसार कर्जपुरवठा करणे हेही महत्त्वाचे काम पतसंस्थांना करावे लागते. सभासदाची आर्थिक गरज भागविण्यासाठी पतसंस्थेकडे पुरेसा निधी उपलब्ध असणे आवश्यक असते. असा निधी संकलित करण्यासाठी ठेवी गोळा केल्या जातात. कोणताही ठेवीदार आपल्या ठेवी विश्वसनीय बँकेत ठेवत असतो. आपल्या पतसंस्थेत जास्तीत जास्त सभासदांनी ठेवी ठेवण्यासाठी संचालक मंडळ व कर्मचाऱ्याकडून पतसंस्थेची विश्वासार्हता वाढविण्याासाठी प्रयत्न केला जातो. त्यासाठी योग्य ती खबरदारी घेतली जाते.

सर्वसाधारणपणे सर्वच पतसंस्थांमध्ये १. मुदत ठेव २. आवर्तक (रिकरिंग) ठेव ३. बचत ठेव ४. चालू ठेव ५. दैनंदिन ठेव इत्यादी प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. बँकांकडून ठेवीदारांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या नावांनी ठेवीच्या योजना ठेवीदारांपुढे आणल्या जातात. यामुळे लोकांना बचतीची सवय लागते. गरजू लोकांच्या आर्थिक गरजेची पूर्तता होऊन राष्ट्रविकासाला हातभार लागतो. ठेवींमुळे पतसंस्थेची सांपत्तीक स्थिती मजबूत होण्यास मदत होते.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था आपल्या सभासदांकडून १. मुदत ठेव २. आवर्तक ठेव ३. दामदुप्पट ठेव या योजनांद्वारे ठेवी गोळा करत आहे.[१६] सन १९९९-२००० साली रुपये १८,००,१६०/-(रुपये अठरा लाख एकशे साठ फक्त) इतकी ठेव पतसंस्थेकडे होती. तर सन २०१३-२०१४ साली पतसंस्थेकडे रुपये ५,२६,९४,६२४/- (रुपये पाच कोटी सव्वीस लाख चौऱ्याण्णव हजार सहाशे चोवीस फक्त) इतकी ठेव पतसंस्थेने गोळा केल्याचे दिसून येते.

पतसंस्थेने सामाजिक उपक्रम म्हणून 'मुलगी वाचवा रिकरिंग ठेव योजना' सन २०११-२०१२ साली सुरु केली होती.[१७] या योजनेचा लाभ २७ सभासदांनी घेतला. त्याचबरोबर 'लखपती योजना' सुरु करुन जास्तीत जास्त सभासदांना बचत करण्यासाठी प्रोत्साहन दिले, ही गौरवाची बाब आहे. या योजनांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या ठेवीदारास इतर ठेवीपेक्षा जास्त व्याज देण्यात आले होते.


मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची वर्षनिहाय ठेवींची स्थिती पुढीलप्रमाणे :-

**तक्ता क्रमांक ६.४ ठेवी**

| क्र. | वर्ष | ठेवी (रुपयांमध्ये) | मागील वर्षापेक्षा झालेली वाढ/घट (रुपयांमध्ये) | वाढ/घट शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | १८,००,१६० | -- | -- |
| २ | २०००-२००१ | २७,०१,०२६ | ९,००,८६६ | ५०.०४ |
| ३ | २००१-२००२ | ५१,७३,१२७ | २४,७२,१०१ | ९१.५२ |
| ४ | २००२-२००३ | ८६,२९,७९३ | ३४,५६,६६६ | ६६.८१ |
| ५ | २००३-२००४ | १,०९,८४,९८५ | २३,५५,१९२ | २७.२९ |
| ६ | २००४-२००५ | १,२६,१०,५०६ | १६,२५,५२१ | १२.८९ |
| ७ | २००५-२००६ | १,३६,१५,८१४ | १०,०५,३०८ | ७.९८ |
| ८ | २००६-२००७ | १,५६,५८,०३७ | २०,४२,२२३ | १४.९९ |
| ९ | २००७-२००८ | १,५०,८४,५३७ | -५,७३,५०० | -३.६६ |
| १० | २००८-२००९ | १,६६,६१,२६१ | १५,७६,७२४ | १०.४५ |
| ११ | २००९-२०१० | २,३२,५१,१०४ | ६५,८९,८४३ | ३९.५५ |
| १२ | २०१०-२०११ | ३,५०,९०,९८७ | १,१८,३९,८८३ | ५०.९२ |
| १३ | २०११-२०१२ | ४,०९,८७,४०१ | ५८,९६,४१४ | १६.८० |
| १४ | २०१२-२०१३ | ४,५७,८६,२५७ | ४७,९८,८५६ | ११.७० |
| १५ | २०१३-२०१४ | ५,२६,९४,६२४ | ६९,०८,३६७ | १५.०८ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९ ते २०१४)

## आलेख क्रमांक ६.४




**स्त्रोत: तक्ता क्र.६.४**

**विश्लेषण :**

१) आर्थिक वर्ष २००१-२००२, २००२-२००३ व २०१०-२०११ मध्ये ठेवी ठेवण्याच्या प्रमाणात मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे ९१.५२, ६६.८१ व ५०.९२ टक्के इतकी वाढ झालेली दिसून येते. ही वाढ इतर वर्षाच्या तुलनेत सर्वाधिक आहे.

२) आर्थिक वर्ष २००७-२००८ मध्ये ठेवी जमा होण्याचे प्रमाणात मागील वर्षाच्या तुलनेत सर्वात कमी म्हणजे -३.६६ टक्के इतके आहे.

३) अभ्यास कालावधीमध्ये प्रत्येक पाच वर्षांचा तुलनात्मक अभ्यास करता सन १९९९-२००० ते २००३-२००४ या पाच वर्षात ठेवीमध्ये सरासरी ५८.८१

टक्के इतकी वाढ झाली असून पुढील पाच वर्षात म्हणजे २००४–२००५ ते २००८–२००९ या काळात ठेवीमधील सरासरी वाढ ८.५३ टक्के पर्यंत खाली आल्याचे दिसते. त्यानंतर सन २००९–२०१० ते २०१३–२०१४ या कालावधीमध्ये पतसंस्थेमध्ये ठेवी ठेवण्याचे प्रमाणात वाढ होऊन हे प्रमाण २६.८१ टक्क्यापर्यंत वाढत गेले आहे. सन २००३–२००४ या वर्षी रुपये १.०९ कोटी, सन २००८–२००९ या वर्षी रुपये १.६६ कोटी तर २०१३–२०१४ या वर्षी रुपये ५.२६ कोटी इतकी ठेव होती. तुलनेने शेवटच्या पाच वर्षात ठेवीमधील वाढ सर्वाधिक आहे.

## ६.१० उभारलेले कर्ज

आपल्या सभासदांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी सभासदांकडून जमा झालेले वसूल भाग भांडवल, जमा झालेल्या ठेवी व स्वनिधी (वसुल भागभांडवल + राखीव निधी+ इमारत निधी+लाभांश समीकरण निधी + चालू वर्षातील नफा + इमारत घसारा निधी) यांचा उपयोग केला जातो. रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे व निर्बंधामुळे ठेवीच्या विशिष्ट रक्कम पतसंस्थेला जवळ बाळगावी लागते. त्याचबरोबर पतसंस्थेकडे असणारे निधी व शिल्लक असणाऱ्या रकमा पतसंस्थेच्या नियमाप्रमाणे इतर बँकांमध्ये गुंतवाव्या लागतात. गरज पडल्यास गुंतविलेल्या रकमेवर अतिरिक्त उचल करण्याची मुभा पतसंस्थांना असते. त्यामुळे कर्जाऊ रक्कम घेण्याचा प्रसंग पतसंस्थांवर सहसा येत नाही.

काही वेळेस मात्र वसूल भागभांडवल, स्वनिधी व गोळा केलेल्या ठेवींद्वारे उभा केलेला निधी सभासदाची आर्थिक गरज भागविण्यासाठी अपुरा पडतो. अशा वेळेस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम–१९६० व पतसंस्थेच्या पोटनियमातील नियमांच्या अधिन राहून कर्जाची उभारणी करता येते. त्यातून सभासदांची आर्थिक

गरज भागवता येते. मात्र सभासदांना दिलेल्या कर्जाचा व्याज दर उभारलेल्या कर्जाच्या व्याज दरापेक्षा जास्त असावा लागतो.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या सभासदांची आर्थिक गरज भागविण्यासाठी पतसंस्थेकडील वसूल भागभांडवल, स्वनिधी व संकलित केलेल्या ठेवींचा उपयोग केला जातो. तसेच पतसंस्थेने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून विनागहाण (कॅश क्रेडिट) कर्ज मंजूर करुन घेतले आहे. या कर्जामुळे सभासदांची जास्तीत जास्त आर्थिक गरज भागविणे पतसंस्थेला शक्य झाले आहे. तरी सहकारी संस्था कायद्यातील निर्बंधामुळे उचललेल्या कर्जाच्या व्याज दरापेक्षा जास्त व्याज दराने सभासदांना कर्जाचे व्याज भरावे लागत आहे.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने पुणे जिल्हा सहाकरी बँकेकडून प्रतिवर्षी विनागहाण (कॅश क्रेडिट) कर्जाद्वारे उभी केलेली रक्कम पुढील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.


## तक्ता क्रमांक ६.५

## उभारलेले कर्ज

| क्र. | वर्ष | मंजूर कर्जातून उचललेली रक्कम (रुपयांमध्ये) | मागील वर्षापेक्षा झालेली वाढ/घट (रुपयांमध्ये) | वाढ/घट शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | ३८,२१,६५२ | -- | -- |
| २ | २०००-२००१ | ४४,८२,४३३ | ६,६०,७८१ | १७.२९ |
| ३ | २००१-२००२ | २३,३३,२९० | -२१,४९,१४३ | -४७.९४ |
| ४ | २००२-२००३ | १८,१७,०४१ | -५,१६,२४९ | -२२.१२ |
| ५ | २००३-२००४ | २,८५,४८७ | -१५,३१,५५४ | -८४.२८ |
| ६ | २००४-२००५ | ५,६१,९९८ | २,७६,५११ | ९६.८५ |
| ७ | २००५-२००६ | २७,२१,०२८ | २१,५९,०३० | ३८४.१७ |
| ८ | २००६-२००७ | १८,५५,८१५ | -८,६५,२१२ | -३१.७९ |
| ९ | २००७-२००८ | १,०४,६५,१६१ | ८६,०९,३४६ | ४६३.९१ |
| १० | २००८-२००९ | १,४२,८८,२३० | ३८,२३,०६९ | ३६.५३ |
| ११ | २००९-२०१० | १,६६,००,५४७ | २३,१२,३१७ | १६.१८ |
| १२ | २०१०-२०११ | १,६६,६९,५५९ | ६९,०१२ | ०.४१ |
| १३ | २०११-२०१२ | ३,२७,२९,२६० | १,६०,५९,७०१ | ९६.३४ |
| १४ | २०१२-२०१३ | ३,८२,७८,४८८ | ५५,४९,२२८ | १६.९५ |
| १५ | २०१३-२०१४ | ३,४८,३१,५८७ | -३४,४६,९०१ | -९.०० |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९ ते २०१४)

## आलेख क्रमांक ६.५




**स्त्रोत तक्ता क्र.६.५**

**विश्लेषण :**

१) आर्थिक वर्ष २००३-२००४ मध्ये पतसंस्थेने सर्व वर्षाच्या तुलनेत जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कमीत कमी कर्जाची उचल केलेली आहे.

२) आर्थिक वर्ष २००५-२००६ व २००७-२००८ मध्ये पतसंस्थेने मागील वर्षाच्या तुलनेत जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून अनुक्रमे ३८४.१७ व ४६३.९१ टक्के जास्त कर्जाची उचल केलेली आहे.

३) अभ्यास कालावधीमधील प्रत्येक पाच वर्षांचा विचार करता पतसंस्थेकडून सन १९९९-२००० ते २००३-२००४ या कालावधीतील सन २०००-२००१ मध्ये कर्जाची उचल १७.२९ टक्के अधिक आहे. या उचल केलेल्या कर्ज रकमेपैकी सन २०००-२००१ मध्ये पतसंस्थेने रुपये ४४,८२,४३३ इतकी

रक्कम उचललेली दिसते तर सन २००३-२००४ मध्ये ही रक्कम २,८५,४८७ इतकी रक्कम उचललेली दिसते. सन २००१-२००२ मध्ये रु.२१,४९,१४३, सन २००२-२००३ मध्ये रु.५,१६,२४९, तर २००३-२००४ मध्ये १५,३१,५५४ इतकी रकम परतफेड केल्याचे दिसते. म्हणजेच या पाच वर्षात पतसंस्थेने घेतलेले कर्ज परतफेड केलेले आहे. सन २००४-२००५ ते २००८-२००९ या कालावधीत पतसंस्थेकडून रुपये १.४२ कोटीपर्यंत उचल झाल्याचे दिसते. शेवटच्या पाच वर्षांच्या कालावधीत ही रक्कम रुपये ३.४८ कोटीपर्यंत वाढल्याचे दिसते.

## ६.११ अन्य बँकामधील गुंतवणूक

पतसंस्थांना निश्चित उत्पन्न मिळवण्याच्यादृष्टीने आपल्याकडील स्वनिधी व संकलित केलेल्या ठेवीतील शिल्लक रकमांपैकी काही रक्कम ठेवीच्या रुपाने अन्य बँकांमध्ये गुंतवण्याचे बंधन रिझर्व्ह बँकेने घातलेले आहे. अर्थात या गुंतवणूका करताना सुरक्षितता व लाभप्रदता या गोष्टींकडे विशेषत: लक्ष देणे आवश्यक असते. ऑडिट वर्ग अ असलेल्या कोणत्याही मध्यवर्ती बँकेत अथवा राज्य सहकारी बँकेत अशी गुंतवणूक करण्याचे बंधन महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्याने घातलेले आहे.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने पोटनियमातील तरतूदीच्या अधिन राहून स्वनिधी, संकलित केलेल्या ठेवी व इतर निधींची गुंतवणूक पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत केलेली आहे.


पतसंस्थेची गुंतवणूक दर्शविणारा तक्ता पुढीलप्रमाणे :-

**तक्ता क्रमांक ६.६**
**गुंतवणूक**

| क्र. | वर्ष | पतसंस्थेची गुंतवणूक (रुपयांमध्ये) | मागील वर्षापेक्षा झालेली वाढ/घट (रुपयांमध्ये) | वाढ/घट शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | ६,५५,९०० | -- | -- |
| २ | २०००-२००१ | ८,५५,९०० | २,००,००० | ३०.४९ |
| ३ | २००१-२००२ | १०,२३,५०० | १,६७,६०० | १९.५८ |
| ४ | २००२-२००३ | १६,.७३,५०० | ६,५०,००० | ६३.५० |
| ५ | २००३-२००४ | २३,९७,००० | ७,२३,५०० | ४३.२३ |
| ६ | २००४-२००५ | ४७,५६,००० | २३,५९,००० | ९८.४१ |
| ७ | २००५-२००६ | ६५,६१,००० | १८,०५,००० | ३७.९५ |
| ८ | २००६-२००७ | ५२,७५,००० | -१२,८६,००० | -१९.६० |
| ९ | २००७-२००८ | ६१,१९,००० | ८,४४,००० | १६ |
| १० | २००८-२००९ | ७१,३९,००० | १०,२०,००० | १६.६६ |
| ११ | २००९-२०१० | ६७,११,००० | -४,२८,००० | -५.९९ |
| १२ | २०१०-२०११ | ७३,८६,००० | ६,७५,००० | १०.०५ |
| १३ | २०११-२०१२ | १,०२,३१,००० | २८,४५,००० | ३८.५१ |
| १४ | २०१२-२०१३ | १,१२,६७,००० | १०,३६,००० | १०.१२ |
| १५ | २०१३-२०१४ | १,६२,०८,८८३ | ४९,४१,८८३ | ४३.८६ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९ ते २०१४)

## आलेख क्रमांक ६.६




**स्त्रोत तक्ता क्र.६.६**

**विश्लेषण :**

१) पतसंस्थेच्या गुंतवणूकीत कमी अधिक वाढ झालेली दिसून येते.

२) आर्थिक वर्ष २००४-२००५ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत सर्वाधिक गुंतवणूक झालेली दिसून येते.

३) आर्थिक वर्ष २००६-२००७ व २००९-२०१० मध्ये गुंतवणूकीतील रकमा काढून घेण्यात आल्याचे दिसते.

४) अभ्यास कालावधीतील पंधरा वर्षांमध्ये गुंतवणूकीतल्या वाढीचेसरासरी शेकडा प्रमाण २८.७६ टक्के आहे.

५) अभ्यास कालावधीतील पहिल्या पाच वर्षातील गुंतवणूकीच्या वाढीचे शेकडा प्रमाण २३.९५ टक्के असून त्यात रुपये १७,४१,१०० इतकी वाढ झालेली आहे. सन २००४-२००५ ते २००८-२००९ या पाच वर्षांच्या कालावधीत गुंतवणूकीचे शेकडा प्रमाण २९.८८ टक्के आहे. या पाच वर्षांच्या कालावधीत मागील पाच वर्षांपेक्षा रुपये ४७,४२,००० इतकी वाढ झाल्याचे दिसून येते. तर शेवटच्या पाच वर्षांत म्हणजे सन २००८-२००९ ते २०१३-२०१४ या कालावधीत गुंतवणूकीत वाढ ही १९.३१ टक्के असून सन २००४-२००५ ते २००८-२००९ या कालावधीत गुंतवणूकीतील वाढ सर्वाधिक आहे.

## ६.१२ कर्ज वसूली व थकबाकी

सभासदाची आर्थिक गरज भागविण्यासाठी कर्जपुरवठा करणे हे जसे पतसंस्थेचे कार्य आहे तसे दिलेले कर्ज वसूल करणे हे त्याहूनही महत्वाचे कार्य आहे. दिलेल्या कर्जाची १०० टक्के वसूली करणे हे उत्तम व्यवस्थापन व प्रशासनाचे लक्षण आहे. बँकांची कर्ज वसूली ही येणे कर्जाशी थकबाकीचे शेकडा प्रमाण कसे आहे यावर अवलंबून असते.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था ही पगारदार सेवकांची पतसंस्था असल्याने पगारातून हप्त्याची कपात करुन कर्जाची परतफेड केली जाते. त्यामुळे पतसंस्थेच्या कर्ज वसूलीचे प्रमाण उत्तम आहे, असे असले तरी काही प्रमाणात थकबाकी असल्याचे दिसून येते. मात्र हे प्रमाण अत्यल्प आहे. थकबाकी असण्याची कारणे पुढीलप्रमाणे :-

१) शासनाकडून वेतन वेळेत न झाल्यामुळे पगारातून केलेली कपात पतसंस्थेकडे वेळेत येत नाही.

२) एखाद्या कर्मचाऱ्याला शाळा व्यवस्थापनाने कामावरुन काढून टाकल्यास त्याचे वेतन बंद होते.

३)	पगारातून कपात केलेले कर्जाचे हप्ते शाळा प्रमुखांकडून पतसंस्थेकडे वेळेत न पाठविणे.

४)	एखाद्या सभासदाचा मृत्यू झाल्यास त्याचे हप्ते वसूल करण्यासाठी कायदेशीर कारवाई पूर्ण होईपर्यंत थकबाकी राहते.

एकंदरीत कर्ज वसूलीची स्थिती चांगली असली तरी पतसंस्था व्यवस्थापनाने वेळीच दखल घेऊन कर्ज वसूलीची यंत्रणा प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे.

## ६.१३ उत्पन्न – खर्च व नफा

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास संशोधकाने केलेला आहे. पतसंस्थेची आर्थिक स्थिती ही पतसंस्थेने केलेल्या दैनंदिन आर्थिक व्यवहारावर अवलंबून असते. कर्ज वाटपावर आधारित मिळालेल्या उत्पन्नातून पतसंस्थेचा दैनंदिन खर्च केला जातो. खर्च वजा जाता शिल्लक उत्पन्नाला 'नफा' असे म्हणतात. तथापि उत्पन्नापेक्षा खर्चाचे प्रमाण जास्त असल्यास 'तोटा' होत असतो. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, पतसंस्थेला प्रतिवर्षी नफा झालेला आहे.

### ६.१३.१ पतसंस्थेला खालील बाबींद्वारे उत्पन्न मिळते

१)	पतसंस्थेने वाटप केलेल्या कर्जावरील व्याज
२)	पतसंस्थेने केलेल्या गुंतवणूकीवरील व्याज
३)	पी.डी.सी.सी. बँकेकडून मिळणारा लाभांश
४)	कर्ज देताना आकारलेली प्रोसेसिंग फी
५)	अर्ज विक्री करुन मिळालेले उत्पन्न
६)	दाखला फी
७)	राखीव निधीवर मिळालेले व्याज
८)	कर्ज नुतनीकरण फी

**मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची वर्षनिहाय उत्पन्नाची स्थिती पुढीलप्रमाणे**


**तक्ता क्र. ६.७ :**

**उत्पन्न**

| क्र. | वर्ष | उत्पन्न रूपयांमध्ये | मागील वर्षापेक्षा झालेली वाढ रूपयांमध्ये | वाढ/घटशेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | ११,३०,३१७ | - | - |
| २ | २०००-२००१ | १७,५५,३३३ | ६,२५,०१६ | ५५.२९ |
| ३ | २००१-२००२ | २०,२१,३३० | २,६५,९९७ | १५.१५ |
| ४ | २००२-२००३ | २३,३४,५८४ | ३,१३,२५४ | १५.४९ |
| ५ | २००३-२००४ | ३१,६९,०९५ | ८,३४,५११ | ३५.७४ |
| ६ | २००४-२००५ | २९,२५,७०६ | -२,४३,३८९ | -७.६८ |
| ७ | २००५-२००६ | ३४,९०,७४९ | ५,६५,०४३ | १९.३१ |
| ८ | २००६-२००७ | ३९,६८,६३४ | ४,७७,८८५ | १३.६९ |
| ९ | २००७-२००८ | ५३,३८,९४८ | १३,७०,३१४ | ३४.५२ |
| १० | २००८-२००९ | ६३,९९,४८१ | १०,६०,५३३ | १९.८६ |
| ११ | २००९-२०१० | ७६,१३,५९७ | १२,१४,११६ | १८.९७ |
| १२ | २०१०-२०११ | ९३,०५,३१७ | १६,९१,७२० | २२.२१ |
| १३ | २०११-२०१२ | १,२४,०६,३१९ | ३१,०१,००२ | ३३.३२ |
| १४ | २०१२-२०१३ | १,५७,६५,८९६ | ३३,५९,५७७ | २७.०७ |
| १५ | २०१३-२०१४ | १,६६,१७,९०४ | ८,५२,००८ | ५.४० |

**स्त्रोत :** मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वार्षिक अहवाल (१९९९-२०१४)

## आलेख क्र. ६.७




**स्त्रोत : तक्ता क्र. ६.७**

**विश्लेषण :**

१) पतसंस्थेच्या उत्पन्नात प्रतिवर्षी वाढ झाली आहे.

२) सन २००७-२००८ व सन २०११-२०१२ या वर्षांमध्ये उत्पन्नाच्या वाढीचे प्रमाण मागील वर्षांच्या तुलनेत अनुक्रमे ३४.५२ व ३३.३२ टक्के आहे.

३) सन २००४-२००५ या वर्षी पतसंस्थेला रु.२९,२५,७०६ इतके उत्पन्न मिळाले असले तरी हे उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत- ७.६८ टक्के कमी आहे.

४) पाच वर्षांची तुलना करता पतसंस्थेच्या उत्पन्नात १९९९-२००० ते २००३-०४ या पाच वर्षांच्या कालावधीत सरासरी शेकडा २४.२३ टक्के इतकी वाढ झाली आहे. सन २००४-०५ ते २००८-०९ या पाच वर्षांच्या कालावधीत उत्पन्न वाढीचे शेकडा प्रमाण १५.९४ % आहे तर २००९-१० ते २०१३-१४ या वर्षांमध्ये ही वाढ २१.३९% इतकी आहे. १९९९-२००० ते २०१३-१४ या पंधरा वर्षांच्या कालावधीत पतसंस्थेच्या उत्पन्नातील वाढीचे सरासरी शेकडा प्रमाण २०.५५% आहे.

## ६.१३.२ पतसंस्थेला खालील बाबींवर खर्च करावा लागतो.

१) घेतलेल्या कर्जावरील व ठेवीवरील व्याज

२) कर्मचारी खर्च (पगार, पी.एफ्., ग्रॅच्युईटी, सानुग्रह अनुदान इ.)

३) इमारत खर्च (देखभाल, दुरुस्ती, मेंटेनन्स, कर, वीज, साफसफाई, घसारा इ.)

४) सभा खर्च (मासिक, सर्वसाधारण सभा, सभा भत्ता इ.)

५) लेखापरिक्षण खर्च (वैधानिक, अंतर्गत, टॅक्स इ.)

६) टेलिफोन व प्रवास, टपाल व पोस्टेज खर्च

७) स्टेशनरी व छपाई खर्च

८) कायदेशीर सल्ला व कारवाई फी

९) संगणक खर्च (प्रणाली व देखभाल)

१०) इतर खर्च (किरकोळ, शिक्षण निधी, व्यवसाय कर, मानधन, बँक चार्जेस इ.)

११) वर्धापनदिन खर्च, सभासद व संचालक भेटवस्तू खर्च

१२) निवडणूक खर्च

**मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची वर्षनिहाय खर्चाची स्थिती पुढीलप्रमाणे**


**तक्ता क्र. ६.८**

**खर्च**

| **वर्ष** | **खर्च रूपयांमध्ये** | **मागील वर्षापेक्षा वाढ किंवा घट रूपयांमध्ये** | **वाढ/घट शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १९९९-२००० | ७,३५,५३४ | - | - |
| २०००-२००१ | १०,९०,८४१ | ३,५५,३०७ | ४८.३० |
| २००१-२००२ | १२,४२,५४५ | १,५१,७०४ | १३.९० |
| २००२-२००३ | १४,३६,३७१ | १,९३,८२६ | १५.६० |
| २००३-२००४ | १७,३४,८२५ | २,९८,४५४ | २०.७७ |
| २००४-२००५ | १९,०८,७८७ | १,७३,९६२ | १०.०२ |
| २००५-२००६ | २२,३६,०५८ | ३,२७,२७१ | १७.१४ |
| २००६-२००७ | २६,०१,८२९ | ३,६५,७७१ | १६.३५ |
| २००७-२००८ | ३२,६१,२९२ | ६,५९,४६३ | २५.३४ |
| २००८-२००९ | ४१,१४,४०१ | ८,५३,१०९ | २६.१५ |
| २००९-२०१० | ४९,१७,४८१ | ८,०३,०८० | १९.५१ |
| २०१०-२०११ | ५९,२६,४५३ | १०,०८,९७२ | २०.५१ |
| २०११-२०१२ | ८३,१८,५३६ | २३,९२,०८३ | ४०.३६ |
| २०१२-२०१३ | १,०५,२०,३१८ | २२,०१,७८२ | २६.४६ |
| २०१३-२०१४ | १,०९,९६,६३५ | ४,७६,३१७ | ४.५२ |

**स्त्रोत :** मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वार्षिक अहवाल (१९९९-२०१४)

### आलेख क्र.६.८




**स्त्रोत: तक्ता क्र.६.८**

**विश्लेषण:**

१) पतसंस्थेच्या खर्चात सातत्यपूर्ण वाढ झालेली आहे.

२) सन १९९९-२००० या वर्षी पतसंस्थेचा सर्व बाबींवरील खर्च रु.७,३५,५३४ तर सन २०१३-१४ मध्ये १,०९,९६,६३५ इतका आहे.

३) पाच वर्षांची तुलना करता १९९९-२००० ते २००३-२००४ या पाच वर्षांमध्ये खर्चाचे सरासरी शेकडा प्रमाण १९.७१ टक्के होते; तर २००४-०५ ते २००८-२००९ या वर्षांमध्ये खर्चाचे सरासरी शेकडा प्रमाण १९ % आहे. सन-२००९-२०१० ते २०१३-१४ या पाच वर्षांच्या खर्चाचे सरासरी शेकडा प्रमाण २२.२७ टक्के असून पंधरा वर्षांच्या कालावधीतील हे प्रमाण सर्वाधिक आहे.

### ६.१३.३ सदर पतसंस्थेला झालेला नफा व त्याचा उपयोग

मिळणाऱ्या उत्पन्नातून खर्चाची वजावट केल्यास  राहणारी शिल्लक म्हणजे नफा होय. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने प्रतिवर्षी नफा मिळविलेला दिसतो. या नफ्याचा उपयोग सभासदांना लाभांश देण्यासाठी व इतर निधींच्या तरतुदींसाठी केला जातो.


मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने मिळविलेल्या नफ्याची स्थिती खालीलप्रमाणे.

**तक्ता क्रमांक ६.९ नफ्याची स्थिती**

| क्र. | वर्ष | मिळविलेला नफा (रुपयांमध्ये) | मागील वर्षापेक्षा झालेली वाढ/घट (रुपयांमध्ये) | वाढ/घट शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | ३,९४,८७३ | -- | -- |
| २ | २०००-२००१ | ६,६४,४९२ | २,६९,७०९ | ६८.६१ |
| ३ | २००१-२००२ | ७,७८,७७८ | १,१४,२८६ | १७.१९ |
| ४ | २००२-२००३ | ८,९८,२१३ | १,१९,४३५ | १५.३३ |
| ५ | २००३-२००४ | १४,३४,२७० | ५,३६,०५६ | ५९.६८ |
| ६ | २००४-२००५ | १०,१६,९१९ | -४,१७,३५१ | -२९.०९ |
| ७ | २००५-२००६ | १२,५४,६९१ | २,३७,७७१ | २३.३८ |
| ८ | २००६-२००७ | १३,६६,८०५ | १,१२,११४ | ८.९३ |
| ९ | २००७-२००८ | २०,७७,६५६ | ७,१०,८५१ | ५२.०० |
| १० | २००८-२००९ | २२,८५,०८० | २,०७,४२४ | ९.९८ |
| ११ | २००९-२०१० | २६,९६,११६ | ४,११,०३६ | १७.९८ |
| १२ | २०१०-२०११ | ३३,७८,८६४ | ६,८२,७४८ | २५.३२ |
| १३ | २०११-२०१२ | ४०,८७,७८३ | ७,०८,९१८ | २०.९८ |
| १४ | २०१२-२०१३ | ५२,४५,५७८ | ११,५७,७९५ | २८.३२ |
| १५ | २०१३-२०१४ | ५६,२१,२६९ | ३,७५,६९१ | ७.१६ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९ ते २०१४)

## आलेख क्रमांक ६.९ नफ्याची स्थिती




**स्त्रोत तक्ता क्र.६.७**

**विश्लेषण :**

१) आर्थिक वर्ष २०००-२००१ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत सर्वाधिक म्हणजे ६८.६१ % इतका नफा मिळाला आहे.

२) आर्थिक वर्ष २००४-२००५ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत कमी म्हणजे -२९.०९ % इतका नफा मिळाला आहे.

३) आर्थिक वर्ष २००४-२००५ पासून पतसंस्थेच्या नफ्यात सातत्याने वाढ झालेली आहे.

४) वाढीच्या प्रमाणात चढ–उतार झालेला दिसतो.

५) मिळविलेल्या नफ्याची पाच वर्षांची तुलनात्मक आकडेवारी पाहता सन १९९९–२००० ते २००३–०४ या पाच वर्षांत सरासरी शेकडा प्रमाण ३२.१६ टक्के, २००४–२००५ ते २००८–२००९ या पाच वर्षांत सरासरी शेकडा प्रमाण १३.०४% व २००९–१० ते २०१३–१४ या पाच वर्षांत सरासरी शेकडा प्रमाण १९.९५% इतके आहे.

## ६.१४ नफ्याची विभागणी व लाभांश

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व रिझर्व्ह बँकेच्या धोरणाप्रमाणे पतसंस्थेला झालेल्या नफ्याची विभागणी करणे बंधनकारक असते. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर पतसंस्थेने प्रतिवर्षी नफा मिळविलेला आहे. संशोधकाला पतसंस्थेने मिळविलेल्या नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे केलेली आढळली.

१) राखीव निधी(२५ टक्के)

२) संशयित व बुडीज कर्ज निधी

३) सभासद कल्याण निधी

४) सेवक उपादान निधी

५) लाभांश समीकरण निधी

६) लाभांश

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व पतसंस्थेच्या पोटनियमाप्रमाणे पतसंस्थेला झालेल्या नफ्यातून २५ टक्के इतका राखीव निधी वेगळा केलेला आहे. त्याची गुंतवणूक पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत केलेली आहे.

नफ्यातून सर्व निधींसाठी रक्कम वर्ग केल्यानंतर शिल्लक राहिलेला नफा लाभांश म्हणून सभासदांना दिला जातो. सभासदाला द्यावयाचा लाभांश हा सभासदाने

धारण केलेल्या भागांच्या किंमतीवर आधारित असतो. वसूल भागभांडवलानुसार लाभांशाचा दर निश्चित केला जातो. पतसंस्थेने दिलेल्या लाभांशाचा दर दरवर्षी बदललेला आहे.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने प्रतिवर्षी सभासदांना दिलेला लाभांश व त्याचा दर खालीलप्रमाणे :-


## तक्ता क्रमांक ६.१०

## लाभांश

| क्र. | वर्ष | लाभांश म्हणून वाटलेली रक्कम (रुपयांमध्ये) | लाभांशाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | २,७०,९१२ | ११ |
| २ | २०००-२००१ | ३,९९,३६६ | १२ |
| ३ | २००१-२००२ | ४,८३,००३ | १२ |
| ४ | २००२-२००३ | ५,३२,२२५ | ११ |
| ५ | २००३-२००४ | ७,१४,३०६ | ११ |
| ६ | २००४-२००५ | ५,५८,१२७ | ७ |
| ७ | २००५-२००६ | ९,२५,६७३ | १० |
| ८ | २००६-२००७ | १०,५३,३४८ | १० |
| ९ | २००७-२००८ | १४,५१,५२८ | ११.५० |
| १० | २००८-२००९ | १६,१८,३५२ | ११.५० |
| ११ | २००९-२०१० | १९,१८.९०९ | १२ |
| १२ | २०१०-२०११ | २३,०९,८४८ | १३ |
| १३ | २०११-२०१२ | २८,०४,७७२ | १३.२५ |
| १४ | २०१२-२०१३ | ३६,२६,६७८ | १४ |
| १५ | २०१३-२०१४ | ४१,२७,३२२ | १३.५० |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९-२०१४)

## आलेख क्रमांक ६.१०




**स्त्रोत : तक्ता क्र.६.१०**

**विश्लेषण :**

पतसंस्थेने सभासदांना सन २००४-२००५ यावर्षी ७ टक्के दराने लाभांशाचे वाटप केले असून ते इतर वर्षाच्या तुलनेत सर्वांत कमी आहे. तसेच सन २०१२-२०१३ यावर्षी १४ टक्के दराने लाभांशाचे वाटप केले असून ते इतर वर्षाच्या तुलनेत सर्वात जास्त आहे.

## ६.१५ स्वनिधी

पतसंस्थेची स्वत:ची आर्थिक पत ही तिच्याकडे असलेल्या निधींवर अवलंबून असते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व पोटनियमातील तरतुदीनुसार पतसंस्था आपला स्वनिधी निर्माण करते. प्रतिवर्षी होणाऱ्या नफ्यातून काही रकमा निधींमध्ये वर्ग केल्या जातात. राखीव निधी वगळता पतसंस्थेकडे असणारे वसूल भाग भांडवल, राखीव निधी, इमारत निधी, संशयीत व बुडित कर्ज निधी, लाभांश समीकरणनिधी, इमारत घसारा निधी यांचा मिळून स्वनिधी तयार होतो.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने पुढील बाबींद्वारे स्वनिधी उभा केला आहे.

१) वसूल भागभांडवल

२) इमारत निधी

३) राखीव निधी

४) निव्वळ नफा

५) लाभांश समीकरण निधी

६) इमारत घसारा निधी

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेकडे सन १९९९-२००० या वर्षी रुपये ४०,३८,५९८/- (रुपये चाळीस लाख अडतीस हजार पाचशे अठ्ठाण्णव) इतका स्वनिधी जमा होता. तसेच सन २०१३-२०१४ या वर्षी रुपये ४,९६,१५,८८८/- (रुपये चार कोटी शहाण्णव लाख पंधरा हजार आठशे अठ्याऐंशी) इतका स्वनिधी जमा झाला आहे असे पतसंस्थेच्या वार्षिक अहवालावरुन दिसून येते. सन १९९९-२००० ते सन २०१३-२०१४ या १५ वर्षांच्या कालावधीत पतसंस्थेच्या स्वनिधीत १२.२८ पटीने वाढ झाली आहे. (संदर्भ: तक्ता क्र. ६.१३)

## ६.१६ लेखापरिक्षण (ऑडिट)

कोणत्याही संस्थेची सांपत्तीक स्थिती अजमावण्यासाठी त्या संस्थेच्या हिशेब पुस्तकांची बुध्दिचातुर्याने व साधक बाधक विचार करुन उपलब्ध दस्तऐवज व कागदपत्रे यांच्या आधारे त्रयस्थामार्फत केलेली छाननी म्हणजे लेखापरिक्षण होय.

सर्वसाधारपणे सहकारी बँकांचे ऑडिट करताना याच पध्दतीचा अवलंब केला जातो. सहकारी बँकेचे लेखापरिक्षण प्रामुख्याने सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदी विचारात घेऊन केले जाते. बँकेच्या आर्थिक स्थितीचे त्रयस्थामार्फत मूल्यमापन केल्यास व्यवहारातील अनियमितता, लबाडी, चुका, वेळीच उघड होतात. त्यामुळे हिशेब पुस्तके काळजीपूर्वक लिहिली जाऊन चुकांचे निरसन वेळीच होते.

लेखापरिक्षणात जे दोष दाखविले जातात किंवा सूचना केलेल्या असतात त्यांची पूर्तता करुन अथवा दोष दुरुस्त करुन तसा अहवाल निबंधक सहकारी संस्था यांना द्यावा लागत असल्याने व्यवहारात पारदर्शकता येण्यास मदत होते. याशिवाय लेखापरिक्षण अहवाल व वार्षिक लेखापत्रके सर्वसाधारण सभेत मंजूर करुन घ्यावी लागत असल्याने व्यवस्थापक मंडळाकडून हिशेबपत्रके काटेकोरपणे ठेवली जातात.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने स्थापनेपासून आपल्या आर्थिक व्यवहाराचे लेखापरिक्षण करुन घेतले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८१(अ) नुसार सहकारी संस्थांचे निबंधकांनी मान्यताप्राप्त लेखापरिक्षकाची नेमणूक करुन वैधानिक लेखापरिक्षण करुन घेतले आहे. तसेच ९७ व्या घटना दुरुस्तीने लेखापरिक्षण करुन घेण्याची जबाबदारी व्यवस्थापक मंडळावर टाकली असून पतसंस्थेच्या व्यवस्थापक मंडळाने मान्यताप्राप्त यादीतील लेखापरिक्षकाची नेमणूक करुन वैधानिक लेखापरिक्षण करुन घेतले आहे.

दैनंदिन व्यवहारात चूका राहू नयेत म्हणून मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या व्यवस्थापक मंडळाने अंतर्गत लेखापरिक्षकाची

नेमणूक केलेली आहे. प्रत्येक सहामाही व्यवहाराचे लेखापरिक्षण झाल्याने पतसंस्थेच्या दैनंदिन व्यवहारात होणाऱ्या दोषांचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या लेखापरिक्षणासंबंधीची स्थिती खालीलप्रमाणे :-

**तक्ता क्रमांक ६.११**

| क्र. | वर्ष | लेखापरीक्षकांचे नाव | लेखापरिक्षणाचा वर्ग |
|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | सी.एन.ढगे | अ |
| २ | २०००-२००१ | - | अ |
| ३ | २००१-२००२ | एस.एन.गांधी | अ |
| ४ | २००२-२००३ | | अ |
| ५ | २००३-२००४ | सी.आर.यार्दी | अ |
| ६ | २००४-२००५ | सी.आर.यार्दी | अ |
| ७ | २००५-२००६ | एस.ए.जोशी | अ |
| ८ | २००६-२००७ | माधव पोळ | अ |
| ९ | २००७-२००८ | - | अ |
| १० | २००८-२००९ | दिपक जवंजाळ | अ |
| ११ | २००९-२०१० | - | अ |
| १२ | २०१०-२०११ | विकास दगडू बानखेले | अ |
| १३ | २०११-२०१२ | विकास दगडू बानखेले | अ |
| १४ | २०१२-२०१३ | सुजाता लक्ष्मण गुंजाळ | अ |
| १५ | २०१३-२०१४ | बी.जी.गायकवाड ॲण्ड कंपनी | अ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९ ते २०१४)

**विश्लेषण :**

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदीनुसार पतसंस्थेने दरवर्षी लेखापरिक्षण करुन घेतले आहे.

२) पतसंस्थेला सातत्यपूर्ण ऑडिट वर्ग 'अ' मिळाला आहे.

## ६.१७ लेखापरीक्षणाच्या निर्धारित निकषांप्रमाणे मूल्यमापन

संस्थेच्या सभासदाला अहवाल वर्षात लाभांश किती टक्के दराने मिळेल याबाबत उत्सुकता असते. याउलट ठेवीदारांना ठेवींचा व्याजदर इतर संस्थांच्या तुलनेत जादा हवा असतो. तर कर्जदारांना इतर संस्थांच्या तुलनेने कर्जावर कमी व्याजदर असावा असे वाटत असते. या तीन घटकांबरोबरच इतर खातेदारांना संस्थेची थकबाकी,एन.पी.ए., लेखापरिक्षणाचा वर्ग, झालेला नफा, आर्थिक उलाढाल, संस्थेची गुंतवणूक, स्वनिधी, भांडवलाचा दर्जा इत्यादीबाबत माहिती हवी असते. ज्याद्वारे संस्थेप्रती विश्वासार्हता टिकविता येते. संस्थेच्या आर्थिक पत्रकांवरुन सांपत्तिक स्थितीचे विवेचन किंवा आर्थिक स्थितीचा मागोवा घेताना आर्थिक प्रगतीचा आलेख समोर येण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे सहकार आयुक्त यांनी दिनांक २९ एप्रिल २०१० रोजी परिपत्रक काढून पगारदार पतसंस्थांचे लेखापरिक्षण वर्गवारीबाबत काही निकष निर्धारित केले आहेत.

या पत्रकांतील निर्धारित निकषांप्रमाणे मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे मूल्यमापन संशोधकाने केले आहेत.

### ६.१७.१ स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक अहवालाचा अभ्यास केला असता 'स्वनिधी' हा वसूल भागभांडवल, राखीव निधी, इमारत निधी, लाभांश समीकरण निधी, चालू वर्षातील नफा व इमारत घसारा निधी

यांचा मिळून तयार होतो. तसेच ताळेबंदाची बेरीज हे 'खेळते भांडवल' होय. स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण निश्चित करताना 'स्वनिधी ÷खेळते भांडवल ×१००' या सुत्राचा वापर केला आहे.


**तक्ता क्रमांक ६.१२**

**स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण**

| वर्ष | स्वनिधी रुपयांमध्ये | खेळते भागभांडवल रुपयांमध्ये | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १९९९-२००० | ४०,३८,५९८ | ९८,३६,०१० | ४१.०५ |
| २०००-२००१ | ५३,४४,५६९ | १,२७,८२,८०४ | ४१.८१ |
| २००१-२००२ | ६३,२२,८५३ | १,४३,२२,८३२ | ४४.१४ |
| २००२-२००३ | ८२,५६,४०६ | १,९८,९६,२०० | ४१.४९ |
| २००३-२००४ | १,०८,७२,६३२ | २,३८,९८,३०४ | ४५.४९ |
| २००४-२००५ | १,२५,५१,५६५ | २,८२,२०,३७२ | ४४.४७ |
| २००५-२००६ | १,३३,०७,१७९ | ३,४०,९७,५३७ | ३९.०२ |
| २००६-२००७ | १,६६,४६,२४३ | ३,७३,३९,४१० | ४४.५८ |
| २००७-२००८ | १,९४,३६,०३४ | ४,९५,२८,७७३ | ३९.२४ |
| २००८-२००९ | २,२०,२२,८९० | ५,७२,७५,८७५ | ३८.४५ |
| २००९-२०१० | २,५३,३२,९६३ | ६,८१,७३,२७२ | ३७.१५ |
| २०१०-२०११ | २,८९,६९,८४८ | ८,४८,५१,६७४ | ३४.१४ |
| २०११-२०१२ | ३,३७,७०,५१५ | ११,५२,५८,३८२ | २९.२९ |
| २०१२-२०१३ | ४,३२,५०,४२६ | १३,३२,८०,५९२ | ३२.४५ |
| २०१३-२०१४ | ४,९६,१५,८८८ | १४,४२,५३,४३९ | ३४.३९ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९ ते २०१४)

## आलेख क्रमांक ६.११




स्त्रोत : तक्ता क्र. ६.१२

**विश्लेषण :**

वरील तक्ता क्रमांक ६.१२ चे अवलोकन केल्यास असे लक्षात येते की सन १९९९-२००० ते सन २०१३-२०१४ या १५ वर्षामध्ये स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी असणारे प्रमाण सरासरी ३९ ते ४५ टक्के इतके राहिले आहे. सन १९९९-२००४ या पाच वर्षांच्या काळात स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण सरासरी ४२.७९ टक्के आहे. सन २००४-२००९ या कालावधीत ४१.१५ टक्के आहे आणि सन २००९-२०१४ या कालावधीत ३३.४८ टक्के आहे. शासकीय परिपत्रकाप्रमाणे हे प्रमाण किमान १० टक्के इतके असावे असे निश्चित केले आहे.

स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी असणारे प्रमाण निश्चित प्रमाणापेक्षा ३ ते ४ पट जास्त आहे. यावरुन हे प्रमाण निश्चितपणे उत्कृष्ट आहे.

### ६.१७.२ स्वनिधीमधील वाढीचे शेकडा प्रमाण

मागील आर्थिक वर्षांच्या तुलनेत चालू वर्षी स्वनिधीत किती वाढ व्हावी याचे निश्चित प्रमाण काढण्यासाठी 'स्वनिधीमधील वाढ÷मागील वर्षाचा स्वनिधी ×१००' या सूत्राचा वापर केलेला आहे. सन १९९९-२००० ते सन २०१३-२०१४ यावर्षामध्ये मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेकडे असणाऱ्या स्वनिधीची स्थिती तक्ता ६.१३ वरुन लक्षात येईल.


## तक्ता क्रमांक ६.१३

## स्वनिधीमधील वाढीचे शेकडा प्रमाण

| वर्ष | चालू स्वनिधी रुपयांमध्ये | मागील स्वनिधी रुपयांमध्ये | मागील वर्षापेक्षा वाढ रुपयांमध्ये | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १९९९-२००० | ४०,३८,५९८ | २९,७७,२०६ | १०,६१,३९२ | ३५.६५ |
| २०००-२००१ | ५३,४४,५६९ | ४०,३८,५९८ | १३,०५,९७१ | ३२.३३ |
| २००१-२००२ | ६३,२२,८५३ | ५३,४४,५६९ | ९,७८,२८४ | १८.३० |
| २००२-२००३ | ८२,५६,४०६ | ६३,२२,८५३ | १९,३३,५५३ | ३०.५८ |
| २००३-२००४ | १,०८,७२,६३२ | ८२,५६,४०६ | २६,१६,२२६ | ३१.६८ |
| २००४-२००५ | १,२५,५१,५६५ | १,०८,७२,६३२ | १६,७८,९३३ | १५.४४ |
| २००५-२००६ | १,३३,०७,१७९ | १,२५,५१,५६५ | ७,५५,६१४ | ६.०२ |
| २००६-२००७ | १,६६,४६,२४३ | १,३३,०७,१७९ | ३३,३९,०६४ | २५.०९ |
| २००७-२००८ | १,९४,३६,०३४ | १,६६,४६,२४३ | २७,८९,७९१ | १६.७५ |
| २००८-२००९ | २,२०,२२,८९० | १,९४,३६,०३४ | २५,८६,८५६ | १३.३० |
| २००९-२०१० | २,५३,३२,९६३ | २,२०,२२,८९० | ३३,१०,०७३ | १५.०३ |
| २०१०-२०११ | २,८९,६९,८४८ | २,५३,३२,९६३ | ३६,३६,८८५ | १४.३५ |
| २०११-२०१२ | ३,३७,७०,५१५ | २,८९,६९,८४८ | ४८,००,६६७ | १६.५७ |
| २०१२-२०१३ | ४,३२,५०,४२६ | ३,३७,७०,५१५ | ९४,७९,९११ | २८.०७ |
| २०१३-२०१४ | ४,९६,१५,८८८ | ४,३२,५०,४२६ | ६३,६५,४६२ | १४.७१ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९ ते २०१४)

## आलेख क्रमांक ६.१२




स्त्रोत : तक्ता क्र ६.१३

**विश्लेषण :**

वरील तक्ता क्रमांक ६.१३ चे अवलोकन करता असे लक्षात येते की, सन १९९९-२००० ते सन २०१३-२०१४ या १५ वर्षांच्या कालावधीत स्वनिधीमधील वाढ निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. शासकीय परिपत्रकाप्रमाणे हे प्रमाण ७.५ टक्के पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. स्वनिधीतील वाढ सन १९९९-२००० या सालात सर्वाधिक म्हणजे ३५.६५ टक्के इतकी असून सन २००५-२००६ या वर्षी सर्वांत  कमी म्हणजे ६.०२ टक्के इतकी आहे. सन १९९९ ते २००४ या

पाच वर्षांच्या काळात ही वाढ सरासरी २९.७० टक्के आहे. सन २००४ ते २००९ या कालावधीत १५.३२ टक्के इतकी वाढ असून सन २००९ ते २०१४ या कालावधीत ही वाढ १७.७४ टक्के इतकी आहे. यावरुन स्वनिधीमधील वाढीचे प्रमाण हे शासनाने निर्धारित केलेल्या प्रमाणापेक्षा २ ते ३ पटीने अधिक आहे, हे अनुमान काढता येते.

### ६.१७.३ ठेवींमधील वाढीचे शेकडा प्रमाण

पतसंस्थेकडून निधींची उभारणी करण्यासाठी ठेवी गोळा केल्या जातात. ठेवी १.अल्प व २.दीर्घ मुदतीसाठी घेऊन त्यावर पतसंस्थेला नफा मिळत असतो. अल्प मुदतीच्या ठेवीवर कमी व्याजदर असल्याने पतसंस्थेचा त्यावर कमी खर्च होत असला तरी व्यवहारिक किंमत (मनुष्यबळ व स्टेशनरी खर्च) जास्त असते. मात्र दिर्घ मुदत ठेवींवर जास्त व्याजदर असल्याने पतसंस्थेचा त्यावरील खर्च जास्त होत असला तरी व्यवहारिक किंमत कमी असते. मात्र संस्थेला याच रुपाने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत असून त्यांच्या विनियोगातून संस्थेस अधिक उत्पन्न मिळत असते. त्यामुळे विनियोगावर व वापरावर नियंत्रण असणे गरजेचे असते. शासकीय परिपत्रकातील निर्धारित निकषाप्रमाणे ठेवीमधील वाढीचे शेकडा प्रमाण १० टक्क्यांपेक्षा जास्त असावे असे निश्चित केले आहे. ठेवींमधील वाढीचे शेकडा प्रमाण निश्चित करण्यासाठी 'ठेवींमधील वाढ÷मागील वर्षीची ठेव ×१००' या सूत्राचा वापर केला आहे. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेकडे सन १९९९-२००० ते २०१३-२०१४ या वर्षामध्ये असणाऱ्या ठेवी तक्ता क्रमांक ६.१४ वरुन लक्षात येतील.


**तक्ता क्रमांक ६.१४**

**ठेवीमधील वाढीचे शेकडा प्रमाण**

| वर्ष | चालू ठेवी रुपयांमध्ये | मागील ठेवी रुपयांमध्ये | मागील वर्षापेक्षा वाढ रुपयांमध्ये | वाढीचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १९९९-२००० | १८,००,१६० | ७,८३,००० | १०,१७,१६० | १२९.९० |
| २०००-२००१ | २७,०१,०२६ | १८,००,१६० | ९,००,८६६ | ५०.०४ |
| २००१-२००२ | ५१,७३,१२७ | २७,०१,०२६ | २४,७२,१०१ | ९१.५२ |
| २००२-२००३ | ८६,२९,७९३ | ५१,७३,१२७ | ३४,५६,६६६ | ६६.८१ |
| २००३-२००४ | १,०९,८४,९८५ | ८६,२९,७९३ | २३,५५,१९२ | २७.२९ |
| २००४-२००५ | १,२६,१०,५०६ | १,०९,८४,९८५ | १६,२५,५२१ | १४.७९ |
| २००५-२००६ | १,३६,१५,८१४ | १,२६,१०,५०६ | १०,०५,३०८ | ७.९७ |
| २००६-२००७ | १,५६,५८,०३७ | १,३६,१५,८१४ | २०,४२,२२३ | १४.९९ |
| २००७-२००८ | १,५०,८४,५३७ | १,५६,५८,०३७ | -५,७३,५०० | -३.६६ |
| २००८-२००९ | १,६६,६१,२६१ | १,५०,८४,५३७ | १५,७६,७२४ | १०.४५ |
| २००९-२०१० | २,३२,५१,१०४ | १,६६,६१,२६१ | ६५,८९,८४३ | ३९.५५ |
| २०१०-२०११ | ३,५१,८६,५८७ | २,३२,५१,१०४ | १,१९,३५,४८३ | ५१.३३ |
| २०११-२०१२ | ४,२६,९६,५०१ | ३,५१,८६,५८७ | ७५,०९,९१४ | २१.३४ |
| २०१२-२०१३ | ४,५७,८६,२५७ | ४,२६,९६,५०१ | ३०,८९,७५६ | ७.२३ |
| २०१३-२०१४ | ५,२६,९४,६२४ | ४,५७,८६,२५७ | ६९,०८,३६७ | १५.०८ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९ ते २०१४)

## आलेख क्रमांक ६.१३




स्त्रोत: तक्ता क्र.६.१४

**विश्लेषण :**

वरील तक्त्याचे अवलोकन करता असे लक्षात येते की, सन २००७-०८ मध्ये ठेवीमधील वाढ ही ऋण झालेली आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण -३.६६ टक्के इतकी आहे. तसेच सन २००५-०६ या वर्षीही निर्धारित निकषांपेक्षा कमी म्हणजे ७.९७ टक्के इतकी वाढ आहे. या दोन वर्षांमध्ये ठेवीदारांकडून ठेवी काढून घेतल्याचे दिसते असे असले तरी सन १९९९ ते २०१४ या पंधरा वर्षांच्या कालावधीत सन १९९९-२००० या वर्षी मागील वर्षांच्या तुलनेत १२९.९० टक्क्यांनी झालेली वाढ ही सर्वाधिक आहे. तथापि पतसंस्थेच्या एकूण ठेवींच्या

वाढीचे सरासरी प्रमाण ३६.३० टक्के इतके असून ही वाढ समाधानकारक आहे. सन १९९९ ते २००४ या पाच वर्षांच्या कालावधीत पतसंस्थेच्या एकूण ठेवींच्या वाढीचे सरासरी प्रमाण ७३.११ टक्के आणि सन २००९ ते २०१४ या कालावधीत २६.९० टक्के आहे. तथापि सन २००४-०५ ते २००८-२००९ या पाच वर्षांचे सरासरी शेकडा प्रमाण ८.९० टक्के इतके असून निश्चित प्रमाणापेक्षा १.१० टक्केनी कमी आहे.

### ६.१७.३ निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण

पतसंस्थांच्या व्यवसायाची वृध्दी, दर्जा व कार्यक्षमता मोजण्याचे साधन म्हणजे नफाक्षमता होय. या नफ्याचे खेळत्या भांडवलाशी असणारे शेकडा प्रमाण १ टक्के पेक्षा जास्त असावे असे सहकार आयुक्तांनी २९ एप्रिल २०१० रोजी काढलेल्या परिपत्रकाने निश्चित केले आहे. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने प्रतिवर्षी मिळविलेला नफा व संस्थेचे खेळते भांडवल तक्ता क्रमांक ६.१५ मध्ये दर्शविण्यात आले आहे.


## तक्ता क्रमांक ६.१५

## निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण

| वर्ष | निव्वळ नफा रुपये | खेळते भाग भांडवल रुपये | वाढीचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १९९९-२००० | ३,९४,७८३ | ९६,३६,०१० | ४.०१ |
| २०००-२००१ | ६,६४,४९२ | १,२७,८२,८०४ | ५.१९ |
| २००१-२००२ | ७,७८,७७८ | १,४३,२२,८३२ | ५.४३ |
| २००२-२००३ | ८,९८,२१३ | १,९८,९६,२०० | ४.५१ |
| २००३-२००४ | १४,३४,२७० | २,३८,९८,३०४ | ६.०० |
| २००४-२००५ | १०,१६,९१९ | २,८२,२०,३७२ | ३.६० |
| २००५-२००६ | १२,५४,६९१ | ३,४०,९७,५३७ | ३.६७ |
| २००६-२००७ | १३,६६,८०५ | ३,७३,३९,४१० | ३.६६ |
| २००७-२००८ | २०,७७,६५६ | ४,९५,२८,७७३ | ४.१९ |
| २००८-२००९ | २२,८५,०८० | ५,७२,७५,८७५ | ३.९८ |
| २००९-२०१० | २६,९६,११६ | ६,८१,७३,२७२ | ३.९५ |
| २०१०-२०११ | ३३,७८,८६४ | ८,४८,५१,६७४ | ३.९८ |
| २०११-२०१२ | ४०,८७,७८३ | ११,५२,५८,३८२ | ३.५४ |
| २०१२-२०१३ | ५२,४५,५७८ | १३,३२,८०,५९२ | ३.९३ |
| २०१३-२०१४ | ५६,२१,२६९ | १४,४२,५३,४३९ | ३.८९ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९ ते २०१४)

### आलेख क्रमांक ६.१४




**स्त्रोत : तक्ता क्र.६.१५**

**विश्लेषण :**

वरील तक्ता क्रमांक ६.१५ चे अवलोकन करता पतसंस्थेचे सन १९९९ ते २०१४ या पंधरा वर्षात निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी असणारे सरासरी शेकडा प्रमाण ४ टक्के इतके असून निर्धारित प्रमाणाच्या चार पट आहे. ही स्थिती निश्चितपणे सभासदामध्ये विश्वासार्हता निर्माण करणारी आहे.

### ६.१७.४ व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण

पतसंस्थेचे दैनंदिन व्यवहार करण्यासाठी आस्थापना व व्यवस्थापन खर्च होत असतो. त्यामुळे पतसंस्थेचा दस्तऐवज तयार होतो. सेवा व सुविधा तयार होत असतात. ग्राहकांना सेवा देण्यासाठी या सुविधा उपयोगी पडतात. व्यवस्थापन खर्चामध्ये कर्मचाऱ्यांचा पगार, बोनस व भत्ते तसेच प्रिंटींग, स्टेशनरी, टेलिफोन, संचालक मंडळ भत्ते, जाहिराती, पोस्टेज, सभासमारंभ, प्रशिक्षण, कायदा फी, घसारा व लेखापरिक्षण फी इत्यादी खर्चांचा समावेश होत असतो.


सहकार आयुक्तांच्या परिपत्रकातील निकषांप्रमाणे व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी असणारे शेकडा प्रमाण २.५ टक्के पेक्षा कमी असावे असे निर्धारित केले आहे. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी असणारे शेकडा प्रमाण स्थिती तक्ता क्रमांक ६.१६ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

## तक्ता क्रमांक ६.१६
## व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भागभांडवलाशी शेकडा प्रमाण

| वर्ष | व्यवस्थापन खर्च रुपये | खेळते भागभांडवल रुपये | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १९९९-२००० | १,४७,९६४ | ९८,३६,०१० | १.५० |
| २०००-२००१ | १,६८,८४० | १,२७,८२,८०४ | १.३२ |
| २००१-२००२ | ३,१५,५८२ | १,४३,२२,८३२ | २.२० |
| २००२-२००३ | ३,७२,२०६ | १,९८,९६,२०० | १.८७ |
| २००३-२००४ | २,८०,३२८ | २,३८,९८,३०४ | १.१७ |
| २००४-२००५ | ३,७४,३७१ | २,८२,२०,३७२ | १.३२ |
| २००५-२००६ | ४,५८,०४७ | ३,४०,९७,५३७ | १.३४ |
| २००६-२००७ | ६,६५,३०८ | ३,७३,३९,४१० | १.७८ |
| २००७-२००८ | ५,५९,८०२ | ४,९५,२८,७७३ | १.१३ |
| २००८-२००९ | ७,६५,८५७ | ५,७२,७५,८७५ | १.३३ |
| २००९-२०१० | ८,९०,९०९ | ६,८१,७३,२७२ | १.३० |
| २०१०-२०११ | १०,४८,२१२ | ८,४८,५१,६७४ | १.२३ |
| २०११-२०१२ | ११,६८,२३४ | ११,५२,५८,३८२ | १.०१ |
| २०१२-२०१३ | १४,०४,७६६ | १३,३२,८०,५९२ | १.०५ |
| २०१३-२०१४ | १४,९२,३६३ | १४,४२,५३,४३९ | १.०३ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९ ते २०१४)

### आलेख क्रमांक ६.१५




**स्त्रोत: तक्ता क्र. ६.१६**

**विश्लेषण:**

वरील तक्ता क्रमांक ६.१६चे अवलोकन करता पतसंस्थेचे सन १९९९ ते २०१४ या कालावधीत पतसंस्थेच्या व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी असणारे शेकडा प्रमाण सरासरी १.३७ टक्के इतके आहे. शासकीय परिपत्रकाने निर्धारित केलेल्या प्रमाणापेक्षा १.१३ टक्के कमी आहे. एकंदरीत सर्व पंधरा वर्षांच्या कालावधीत खर्चाचे प्रमाण प्रतिवर्षी कमी जास्त असले तरी सरासरी शेकडा प्रमाण कमी कमी होत गेले आहे.

### ६.१७.५ ठेवीचे गुंतवणूकीशी शेकडा प्रमाण


ठेवीचे गुंतवणूकीशी शेकडा प्रमाण निश्चित केल्याने संस्थेची तरलता लक्षात येते. शासकीय परिपत्रकाप्रमाणे तरलतेचे शेकडा प्रमाण ३० टक्के पेक्षा जास्त असणेआवश्यक आहे. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे ठेवीचे गुंतवणूकीशी असणारे शेकडा प्रमाण तक्ता ६.१७ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ६.१७**
**ठेवीचे गुंतवणूकीशी शेकडा प्रमाण**

| वर्ष | गुंतवणूक रु. | ठेव रुपये | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १९९९-२००० | ६,५५,९०० | १८,००,१६० | ३६.४३ |
| २०००-२००१ | ८,५५,९०० | २७,०१,०२६ | ३१.६८ |
| २००१-२००२ | १०,२३,५०० | ५१,७३,१२७ | १९.७८ |
| २००२-२००३ | १६,७३,५०० | ८६,२९,७९३ | १९.३९ |
| २००३-२००४ | २३,९७,००० | १,०९,८४,९८५ | २१.८२ |
| २००४-२००५ | ४७,५६,००० | १,२६,१०,५०६ | ३७.७१ |
| २००५-२००६ | ६५,६१,००० | १,३६,१५,८१४ | ४८.१८ |
| २००६-२००७ | ५२,७५,००० | १,५६,५८,०३७ | ३३.६८ |
| २००७-२००८ | ६१,१९,००० | १,५०,८४,५३७ | ४०.५६ |
| २००८-२००९ | ७१,३९,००० | १,६६,६१,२६१ | ४२.८४ |
| २००९-२०१० | ६७,११,००० | २,३२,५१,१०४ | २८.८६ |
| २०१०-२०११ | ७३,८६,००० | ३,५१,८६,५८७ | २०.९९ |
| २०११-२०१२ | १,०२,३१,००० | ४,२४,९६,५०१ | २४.०७ |
| २०१२-२०१३ | १,१२,६७,००० | ४,५७,८६,२५७ | २४.६० |
| २०१३-२०१४ | १,६२,०८,८८३ | ५,२६,९४,६२४ | ३०.७६ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९ ते २०१४)

## आलेख क्रमांक ६.१६




**स्त्रोत: तक्ता क्र. ६.१७**

### विश्लेषण :

वरील तक्ता क्र.६.१७ चे अवलोकन करता सन २००४–२००५ ते २००८–२००९ या वर्षांमध्ये ठेवींचे गुंतवणुकीशी असणारे शेकडा प्रमाण हे निर्धारित निकषांप्रमाणे असल्याचे दिसून येते. तथापि अभ्यासकालावधीतील ठेवींचे गुंतवणूकीशी सरासरी शेकडा प्रमाण ३०.७५ टक्के आहे.

### ६.१७.६ थकबाकीचे येणे कर्जाशी शेकडा प्रमाण

पतसंस्थांचा मुख्य हेतू सभासदांची कर्जाच्या रुपाने आर्थिक गरज भागवणे हा आहे. कर्जाचे वितरण केल्यानंतर त्याची वसूली करणे ही महत्त्वाची जबाबदारी पतसंस्थांवर असते. कर्जाची थकबाकी जितकी अधिक तितकी पतसंस्थेची आर्थिक स्थिती ढासळलेली असते. तथापि मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था ही पगारदार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पतसंस्था असल्यामुळे सभासदांच्या कर्जाचे हप्ते पगारातून कपात होऊन पतसंस्थेकडे जमा होतात. थकबाकीचे येणे कर्जाशी शेकडा प्रमाण ० टक्के ते ५ टक्के इतके योग्य मानले जाते. सदर पतसंस्थेची अभ्यास काळातील १० वर्षांची थकबाकीची आकडेवारी उपलब्ध असून त्यांचे येणे कर्जाशी असणारे प्रमाण तक्ता क्रमांक ६.१८ मध्ये दर्शविण्यात आले आहे. थकबाकीचे येणे कर्जाशी असणारे शेकडा प्रमाण काढण्यासाठी ‘थकबाकी ÷ येणे कर्ज द १००’ या सूत्राचा वपर केला आहे.


## तक्ता क्रमांक ६.१८

## थकबाकी शेकडा प्रमाण

| वर्ष | थकबाकी कर्ज रुपयांमध्ये | येणे कर्ज रुपयांमध्ये | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| २००५-२००६ | ६,३४,१७१ | २,६८,०७,८०३ | २.३६ |
| २००६-२००७ | ४,१०,२४६ | ३,१३,६९,५६३ | १.३० |
| २००७-२००८ | ६,७८,०८४ | ४,२७,३९,०७३ | १.५८ |
| २००८-२००९ | ५,२७,६३८ | ४,९४,८८,२६६ | १.०६ |
| २००९-२०१० | ८,७७,०१६ | ६,०८,३१,४३५ | १.४४ |
| २०१०-२०११ | ४,६६,१३४ | ७,६८,४३,१८८ | ०.६० |
| २०११-२०१२ | ५,२६,६३८ | १०,४४,३२,२४२ | ०.५० |
| २०१२-२०१३ | ३,३४,६४९ | १२,१४,१२,६८२ | ०.५७ |
| २०१३-२०१४ | १५,८७,६३६ | १२,७४,६९,८९८ | १.२४ |

स्त्रोत : मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९ ते २०१४)

## आलेख क्रमांक ६.१७




**स्रोत : तक्ता क्र. ६.१८**

**विश्लेषण:**

वरील तक्ता क्रमांक ६.१८ चे अवलोकन करता सन २००५-०६ मध्ये थकबाकीचे येणे कर्जाशी असणारे शेकडा प्रमाण २.३६ टक्के इतके होते. त्यानंतर प्रतिवर्षी हे प्रमाण कमीत कमी होत गेले असून सन २०१३-१४ मध्ये त्यात वाढ झालेली दिसते. एकंदरीत थकबाकीचे येणे कर्जाशी असणारे शेकडा प्रमाण निर्धारित निकषांप्रमाणे असून कर्जवसूलीचे प्रमाण योग्य असल्याचे नमूद करावेसे वाटते.

### ६.१८ सी डी रेशो (ठेव कर्जाचे प्रमाण )

पतसंस्थेला कोणत्याही वेळी येणे असलेली कर्जाचे रक मेचा त्यावेळी पतसंस्थेक डे असणाऱ्या ठेवींशी क ाय प्रमाण आहे यात अभिप्रेत आहे केवळ कर्ज येणे बाकीचा विचार न करता कर्ज व्यवहारासाठी संस्थेचे निधी किती उपलब्ध आहेत याचा विचार या प्रमाणात करत असताना कायदेशीर निर्बंध व्यावसायिक धोके व अन्य निर्बंध यांचाही

विचार करावा लागतो. पतसंस्थेच्या ठेव कर्जाचे प्रमाण खालील सूत्राद्वारे निश्चित केले आहे.

$$\text{सी डी रेशो} = \frac{\text{येणे कर्ज–कर्ज वाटपास उपलब्ध स्वनिधी}}{\text{ठेवी + उभारलेले कर्ज}} \times १००$$

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या सी डी रेशो चे प्रमाण पुढीलप्रमाणे.

## तक्ता क्रमांक:६.१९
## सी डी रेशो (ठेव कर्जाचे प्रमाण)

| वर्ष | येणे कर्ज रुपयांत | कर्ज वाटपास उपलब्ध स्वनिधी | ठेवी+उभारलेले कर्ज | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १९९९-२००० | ८४,४८,५५४ | २८,८७,२१४ | ५,६२,१८,०१२ | ९८.९२ |
| २०००-२००१ | १,१०,१३,०६३ | ३९,९२,०७७ | ७१,८३,४५९ | ९७.७३ |
| २००१-२००२ | १,२१,१३,६२५ | ४८,०१,०४८ | ७,५०,६४,०१७ | ९७.४१ |
| २००२-२००३ | १,७२,३५,३६६ | ६५,३९,४९७ | १,०४,४६,८३४ | १०२.३८ |
| २००३-२००४ | २,०५,००,३१४ | ८९,३०,८०७ | १,१२,७०,४७२ | १०२.६५ |
| २००४-२००५ | २,२७,९२,५२३ | १२,९१,१७,७२३ | १,३१,७२,५०४ | ७५.०१ |
| २००५-२००६ | २,६८,०७,८०३ | १,०७,५१,६८७ | १,६३,३६,८४२ | ९८.२८ |
| २००६-२००७ | ३,१३,६९,५६३ | १,३३,७५,१०१ | १,७५,१३,८५२ | १०२.७४ |
| २००७-२००८ | ४,२७,३९,०७३ | १,५३,२२,६५२ | २,५५,४९,६९८ | १०७.३० |
| २००८-२००९ | ४,९४,८८,२६६ | १,६८,८९,०८३ | ३,०९,४९,४९१ | १०५.३३ |
| २००९-२०१० | ६,०८,३१,४३५ | १,९६,२७,०९४ | ३,९८,५१,६५१ | १०३.३९ |
| २०१०-२०११ | ७,६८,४३,१८८ | २,२५,८९,३७८ | ५,१८,५६,१४६ | १०४.६२ |
| २०११-२०१२ | १०,४४,३२,२४२ | २,४५,३०,६१४ | ७,५४,२५,७६१ | १०५.९३ |
| २०१२-२०१३ | १२,१४,१२,६८२ | ३,२४,८४,३६२ | ८,४०,६४,७४५ | १०५.७८ |
| २०१३-२०१४ | १२,७४,६९,८९८ | ३,७०,३५,५१० | ८,७५,२६,२११ | १०३.३२ |

**स्त्रोत :** मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल. (सन १९९९ ते २०१४)

**विश्लेषण :**

वरील तक्ता क्रमांक ६.१९ चे अवलोकन केल्यास असे लक्षात येते कीमान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचेठेव कर्जाचे प्रमाण हे योग्य नसल्याचे दिसून येते ठेव कर्जाचे हे प्रमाण ६० ते ७० टक्क्यांच्या दरम्यान असणे आदर्श मानले जाते मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचेठेव कर्जाचे प्रमाण १०० टक्क्यांच्या पुढे आहे. सी डी रेशो चे हे प्रमाण योग्य प्रमाणात ठेवण्यासाठी पतसंस्थेचे ठेवींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्याची आवश्यकता आहे.

## ६.१९ आधुनिकीकरण

१९९१ नंतर जागतिकीकरण आणि उदारीकरणाचे वारे वाहू लागले. त्यामुळे सर्वच क्षेत्रात स्पर्धा सुरु झाली. बँकींग क्षेत्रही याला अपवाद राहिले नाही. स्पर्धेच्या युगात आपले अस्तित्व टिकवणे व समोरच्या स्पर्धकांशी समर्थपणे स्पर्धा करण्यासाठी बँकांकडून आपल्या ग्राहकांना सुविधा पुरविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला. यातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे संगणकीकरण होय. बँकांच्या या सुविधेमुळे ग्राहकाला जास्तीत जास्त चांगली सेवा पुरविण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. त्याचबरोबर या सुविधेमुळे खर्चात काटकसर होऊ लागली. वेळेची बचत होऊ लागली. कामात तत्परता व काटेकोरपणा येऊ लागला. एकूणच संपूर्ण व्यवहार पारदर्शी होण्यास मदत झाली. यामुळे ग्राहक आधुनिक सुविधा देणाऱ्या बँकांकडे आकृष्ठ होऊ लागला.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे कार्यक्षेत्र तुलनेने लहान असले तरी स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी आपल्या सभासदांना जास्तीत जास्त उत्तम सेवा पुरविण्याच्या दृष्टीने सन २००४ पासून पतसंस्थेचे संगणकीकरण करण्यात आले आहे. पतसंस्था संगणकीकरणाच्या माध्यमातून आपल्या सभासदांना खालीलप्रकारे सेवा पुरवते.

१) संगणकीय पावत्या देणे.

२) सभासदाच्या वार्षिक व्यवहाराचा संगणकीय खाते उतारा देणे.

३) संगणकीय तंत्रप्रणालीद्वारे दैनंदिन हिशेब पूर्ण करणे.

४) विविध शासकीय कार्यालयांना सादर करावयाची माहिती संगणकीय पत्रकाद्वारे देणे.

५) टेलिफोनद्वारे सभासदाने विचारलेली माहिती पुरवणे.

६) सभासदांनी मागितलेली माहिती संगणकाच्या माध्यमातून तात्काळ उपलब्ध करुन देणे.

वरीलप्रमाणे सुविधा पतसंस्थेद्वारे पुरविल्या जात असल्या तरी ई–मेल, एस्.एम्.एस्., इंटरनेट बँकींगचा वापर पतसंस्थेकडून केला जात नसल्याचे दिसून येते.

**६.२० समारोप**

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने सहकार क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. शासनमान्य अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या पतसंस्थेचे सभासद आहेत. या सभासदांच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीचे उद्दिष्ट डोळयांसमोर ठेवून ही संस्था कार्यरत आहे. म्हणूनच संशोधकाने या संस्थेच्या प्रगतीचा संख्यात्मक व गुणात्मक अंगाने चिकित्सक अभ्यास केला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील नियमानुसार या पतसंस्थेची स्थापना होऊन नोंदणी करण्यात आली आहे. पतसंस्थेची संघटनात्मक रचनेचा आढावा घेत संशोधकाने पतसंस्थेच्या आर्थिक व्यवहाराचे गणितीय सुत्राच्या आधारे मूल्यमापन करुन गेल्या पंधरा वर्षाच्या आर्थिक प्रगतीचा गुणात्मक अभ्यास मांडला आहे.

**संदर्भ :-**


१. चौगुले व्ही.टी., के. जी. पठाण, १९७९, सहकाराची मूलतत्त्वे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे. पान क्र. १११

२. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था, वार्षिक अहवाल पहिला, १९९२-९३, पान क्र. २

३. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था, वार्षिक अहवाल दुसरा ,१९९३-९४, पान क्र. २

४. तत्रैव, पान क्र. २

५. उ.नि., वार्षिक अहवाल पहिला, १९९२-९३

६. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्ता मर्यादित, पुणे, आदर्श उपविधी, एप्रिल २०१३, पान क्र.१

७. तत्रैव, पान क्र.७

८. जोगदंड आनंद ब., सहकारी सभासद शिक्षण, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे, पान क्र.४०

९. उ.नि., आदर्श उपविधी, एप्रिल-२०१३, पान क्र. १८ ते २१

१०. तत्रैव ,पान क्र. २४ , ४०

११. उ.नि., जोगदंड आनंद ब., पान क्र. २२

१२. उ.नि., आदर्श उपविधी, एप्रिल -२०१३ , पान क्र. ९

१३. तत्रैव, पान क्र. ३

१४. तत्रैव, पान क्र. २१

१५. तत्रैव ,पान क्र. २२

१६. तत्रैव ,पान क्र. २४

१७. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था मर्यादित,पुणे, २० वा वार्षिक अहवाल, २०११-२०१२

- मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे वर्षनिहाय वार्षिक अहवाल सन १९९९-२००० ते २०१३-२०१४.
- सहकार आयुक्त व सहनिबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक २९ एप्रिल २०१० चे परिपत्रक

# प्रकरण सातवे

# निष्कर्ष, गृहितकांची पडताळणी व शिफारशी

**प्रस्तावना**

७.१ निष्कर्ष

७.२ गृहितकांची पडताळणी

७.३ शिफारशी

७.४ समारोप

# प्रकरण सातवे

# निष्कर्ष, गृहितकांची पडताळणी व शिफारशी

## प्रस्तावना

सन १९०४ साली भारतात पहिला सहकारी कायदा अस्तित्वात आला. सामान्य माणसाला सावकार, जमीनदार आणि अडते यांच्या बंधनातून मुक्त करण्याच्या दृष्टीने उचललेले हे पहिले पाऊल होय. शेती करणारा शेतकरी जसा सावकारी पाशात अडकला होता तसाच शहरी भागात राहणारा मध्यमवर्गीय व मजूर वर्गही सावकारी पाशात अडकला होता. त्यातून सुटका होण्यासाठी सहकारी कायद्याची निर्मिती झाली. या कायद्यानुसार शेतकऱ्यांसाठी सहकारी तत्त्वावर आधारित आर्थिक संस्था निर्माण झाल्या. पुढे १९१२ साली कायद्यात झालेल्या दुरुस्तीमुळे बिगरशेती आर्थिक संस्थांची निर्मिती होऊ लागली. त्यामुळे भारतात सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र वाढण्यास मदत झाली.

१९६० मध्ये महाराष्ट्र शासनाने सहकारी संस्थांच्या कारभारात सुसुत्रता आणण्याच्या दृष्टीने सहकारी संस्था अधिनियम तयार केला. त्या कायद्यामुळे बँकेच्या कारभारात थेट सभासद लक्ष घालू लागले. तसा सभासदाला अधिकार प्राप्त झाला. त्यामुळे विविध समाजगटातील लोक एकत्र येऊन सहकारी संस्था सुरु करु लागले. महाराष्ट्रात सहकारी संस्थांचे व्यापक जाळे तयार झाले.

सन १९९१ साली भारताने उदारीकरणाचे तत्त्व अंगिकारल्यामुळे सर्व क्षेत्रांबरोबर बँकींग क्षेत्रात स्पर्धा निर्माण झाली. या स्पर्धेमुळे बँकाकडून ग्राहकांना चांगल्या सेवा देण्यास सुरुवात झाली. बँकिंग मध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरु झाला. जास्तीत जास्त पैसा सभासदाला मिळू लागल्याने आर्थिक विकासाचे वारे जोमाने वाहू लागले.

या काळात १९९३ मध्ये मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचा उदय झाला. या पतसंस्थेच्या निर्मितीमुळे खाजगी अनुदानित

प्राथमिक शाळांतील शिक्षकांचा आर्थिक विकास किती झाला? पतसंस्थेच्या आर्थिक विकासा संबंधी असणाऱ्या समस्या, त्यावरील उपाय योजना काय असाव्यात याचा वस्तुनिष्ठ पद्धतीने अभ्यास करण्यासाठी संशोधकाने मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्यावित्तिय कामगिरीचा चिकित्त्सक अभ्यास या विषयाची निवड केली. त्यानुसार मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची ध्येय धोरणे, कर्जपुरवठा, ठेवी, गुंतवणूका इत्यादी घटकांचा साधकबाधक अभ्यास संशोधकाने प्रस्तुत शोधनिबंधात मांडला आहे.

पतसंस्थेच्या विविध घटकांचा अभ्यास करताना अभ्यासकाच्या समोर काही निष्कर्ष आले आहेत. तसेच कामकाजात काही समस्याही जाणवल्या आहेत. त्यावरील उपाय संशोधकाने सुचविण्याच्या दृष्टीने केलेल्या शिफारशी प्रस्तुत प्रकरणात संशोधकाने समाविष्ट केल्या आहेत.

## ७.१ निष्कर्ष

वस्तुनिष्ठ पध्दतीने संशोधन करताना संशोधकाने उपलब्ध माहिती व आकडेवारी बरोबरच विविध संदर्भांचा विचार केलेला आहे. प्रस्तुत विषयावरील संशोधन करताना उपलब्ध माहितीचे व आकडेवारीचे तर्कसंगत विश्लेषण संशोधकाने केले असता काही निष्कर्ष हाती आले आहेत. तथापि माहिती व आकडेवारीमध्ये बदल झाल्यास या निष्कर्षांमध्ये बदल होऊ शकतो.

### ७.१.१ सभासद

पतसंस्थेचा सभासद हा मुख्य घटक आहे. सभासदांनी केलेल्या व्यवहारावर पतसंस्थेची प्रगती घडून येत असते. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची सभासद संख्या प्रतिवर्षी वाढलेली

दिसते. सन १९९९-२००० पासून सन २०१३-१४ या पंधरा वर्षांमध्ये सभासद संख्येत ४३७ ने वाढ झाली. या वाढीचे सरासरी शेकडा प्रमाण ५.१ टक्के इतके आहे. सभासद वाढीचा आलेख सातत्यपूर्ण वाढ दाखवित असला तरी सन २००९-१० ते २०१३-१४ या पाच वर्षांत सभासद वाढीचे प्रमाण सर्वाधिक आहे.

### ७.१.२ वसूल भागभांडवल

पतसंस्थेच्या एकूण व्यवहारात वसूल भागभांडवलाला अनन्य साधारण महत्व असते. वसूल भागभांडवलामुळे पतसंस्थेची व्यवहारिक पत निश्चित होत असते. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने आपले वसूल भागभांडवल वाढविण्यासाठी प्रतिवर्षी प्रयत्न केलेला आहे. सन १९९९-२००० ते २०१३-१४ या पंधरा वर्षांच्या कालावधीत वसूल भागभांडवलात रू.३१.४० लाख रूपयांवरून ३.४३ कोटीपर्यंत वाढ झालेली आहे. याच पंधरा वर्षांमध्ये वसूल भागभांडवलातील सरासरी शेकडा वाढ १८.८४ टक्के इतकी आहे. वसूल भाग भांडवलातील वाढ सन २००२-०३ व सन २०१२-१३ या वर्षात अनुक्रमे ३३.०३ व ३०.६३ टक्के असून ही वाढ इतर वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक आहे. वसूल भागभांडवल वाढीचा आलेख सतत उंचावत राहिलेला दिसतो.

### ७.१.३ कर्जपुरवठा

आपल्या सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण होण्याच्या दृष्टीने पतसंस्थेने कर्जपुरवठा केलेला आहे. अभ्यास कालावधीतील वर्षांमध्ये पतसंस्थेने केलेले कर्जवाटप सभासदांची गरज पूर्ण करणारे ठरले आहे. पतसंस्थेने सन १९९९-२००० मध्ये रू.८४.४८ लाख इतके कर्जवाटप केलेले होते. तर सन २०१३-

१४ मध्ये रू.१२.७४ कोटी कर्जवाटप केलेले दिसते. म्हणजेच १५ वर्षांच्या कालावधीत कर्जपुरवठा रू.११.९० कोटींनी वाढलेला दिसतो. या वाढीचे सरासरी शेकडा प्रमाण २०.३८ टक्के आहे. सभासदांच्या गरजा लक्षात घेऊन पतसंस्थेने कर्जपुरवठ्यात वेळोवेळी वाढ केलेली आहे.

### ७.१.४ ठेवी

आपल्या सभासदांना बचतीची सवय लावणे हा ही एक प्रधान हेतू पतसंस्थांचा असतो. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सह पतसंस्थेने आपल्या सभासदांना बचतीची सवय लावण्यासाठी मुदत ठेव, आवर्तक ठेव, दाम दुप्पट ठेव या योजनांची आखणी केली. या योजनांमध्ये पतसंस्थेच्या सभासदांनी ठेवी ठेवून उत्पन्न मिळविले आहे. अभ्यास कालावधीच्या प्रथम वर्षी म्हणजे १९९९–२००० मध्ये पतसंस्थेकडे रू.१८ लाख इतकी ठेव होती तर शेवटच्या वर्षी म्हणजे सन २०१३–१४ मध्ये रू.५.२६ कोटींच्या ठेवी होत्या. पंधरा वर्षांच्या कालावधीत पतसंस्थेकडील ठेवींमध्ये रू.५.०८ कोटी इतकी वाढ झालेली दिसते. या पंधरा वर्षांच्या कालावधीत ठेवींचा आलेख चढता–उतरता असला तरी ठेवींमधील वाढीचे सरासरी शेकडा प्रमाण २७.४९ टक्के आहे. लेखापरीक्षणाच्या निकषांप्रमाणे ठेवींमधील वाढ ही मागील वर्षांच्या तुलनेत १० टक्के पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. याचाच अर्थ सभासदांनी आर्थिक स्थिती उंचावल्याने आपल्याकडील अतिरिक्त पैसा पतसंस्थेत ठेवींच्या रूपाने बचत म्हणून ठेवला आहे.

### ७.१.५ उभारलेले कर्ज

आपल्या सभासदांची जास्तीत जास्त कर्जाची गरज भागविण्यासाठी मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने पुणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेकडून कर्ज उचललेले आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेकडून कर्ज घेऊन त्याचे सभासदांना कर्जरूपाने वाटप केलेले आहे. अभ्यास कालावधीतील वर्षांच्या विचार करता पतसंस्थेने सन १९९९-२००० यावर्षी रू.३८.२१ लाख इतके कर्ज उचललेले दिसते. तर सन २०१३-१४ यावर्षी हे कर्ज रू.३.४८ कोटींवर गेलेले दिसते. पतसंस्थेच्या उचल कर्जाचा आलेख वाढ दर्शवित असला तरी सन २००१-०२, २००२-०३, २००३-०४, २००६-०७ व २०१३-१४ या वर्षी मागील वर्षांच्या तुलनेत कर्ज उचल कमी झाल्याचे दर्शवित आहे. अभ्यास वर्षांच्या कालावधीत २००७-२००८ या वर्षी सर्वात अधिक कर्ज उचललेले दिसते.

### ७.१.६ गुंतवणूक

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सह. पतसंस्थेने निश्चित असे उत्पन्न मिळविण्याच्या दृष्टीने आपल्याकडील स्वनिधी व ठेवींमधील काही रक्कम पुणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेत गुंतवणूक केलेली आहे. त्यामुळे पतसंस्थेला निश्चित असे उत्पन्न मिळत आहे. लेखापरीक्षणाच्या निकषांप्रमाणे गुंतवणूकीचे ठेवींशी असलेले शेकडा प्रमाण ३० ते ३५ टक्के असणे आवश्यक असते. अभ्यास वर्षांच्या कालावधीत सन १९९९-२००० या वर्षी पतसंस्थेची गुंतवणूक रू.६.५५ लाख इतकी तर सन २०१३-२०१४ या वर्षी १.६२ कोटी इतकी गुंतवणूक केलेली दिसते. या पंधरा वर्षांच्या कालावधीत पतसंस्थेने केलेल्या गुंतवणूकीत रू.१.५५ कोटी इतकी वाढ झालेली असून गुंतवणूकीचा आलेख चढता उतरता असला तरी गुंतवणूकीतील सरासरी

शेकडा वाढीचे प्रमाण २८.७६ टक्के आहे. लेखापरीक्षणाच्या निकषाप्रमाणे हे प्रमाण कमी असून त्यात वाढ करणे आवश्यक आहे.

### ७.१.७ उत्पन्न

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेला कर्ज वाटपावर आधारित व केलेल्या गुंतवणूकीद्वारे उत्पन्न मिळत आहे. मिळालेल्या उत्पन्नातूनच पतसंस्थेची आर्थिक स्थिती मजबूत झालेली दिसते. सन १९९९-२००० मध्ये पतसंस्थेने रू.११,३०,३१७ इतके उत्पन्न मिळविले होते. तर २०१३-१४ मध्ये पतसंस्थेचे उत्पन्न रू.१,६६,१७,९०४ पर्यंत वाढलेले दिसते. एकंदरीत पंधरा वर्षांच्या कालावधीत पतसंस्थेने प्रतीवर्षी आपल्या उत्पन्नात सातत्यपूर्ण वाढ केलेली दिसते. सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात पतसंस्थेचे उत्पन्नात मागील वर्षाच्या तुलनेत ७.६८ टक्के घट झाली. सन २००४-०५ या आर्थिक वर्षाचा अपवाद वगळता पतसंस्थेच्या उत्पन्नाचा आलेख चढता-उतरता राहिला आहे. उत्पन्न वाढीचे सरासरी शेकडा प्रमाण २०.४ टक्के इतके आहे.

### ७.१.८ खर्च

कर्ज वाटप व केलेल्या गुंतवूकीवर आधारित पतसंस्थेला उत्पन्न मिळत आहे. याच उत्पन्नातून पतसंस्थेचा दैनंदिन खर्च भागवला जातो. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेला कर्मचारी पगार, सभा भत्ता, लेखापरीक्षण, स्टेशनरी, संगणक प्रणाली, वर्धापनदिन, टेलिफोन, लाईट, स्विकारलेल्या ठेवी व घेतलेल्या कर्जावरील व्याज इत्यादी बाबींवर खर्च करावा लागतो. सन १९९९-२००० साली हा खर्च रू.७.३५ लाख इतका होता. तर २०१३-१४ या वर्षी हा खर्च रू.१.०९ कोटी पर्यंत

पोहचला. ठेवींमध्ये झालेली वाढ व पुणे जिल्हा मध्य.सह. बँकेकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज या खर्चात वाढ झाल्याने खर्चात वाढ झाली असली तरी यामुळे उत्पन्नातही वाढ होण्यास मदत झाली आहे.

### ७.१.९ नफा

उत्पन्न व खर्चावर आधारित नफा किंवा तोटा निश्चित होत असतो. उत्पन्नापेक्षा खर्च अधिक असल्यास 'तोटा' तर उत्पन्नापेक्षा खर्च कमी असल्यास 'नफा' होतो. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेला प्रतिवर्षी नफा झालेला आहे. याचाच अर्थ पतसंस्थेचा खर्च उत्पन्नापेक्षा कमी आहे. पतसंस्थेच्या नफ्यातील वाढीत चढ-उतार झालेला असला तरी सन २०००-०१ मध्ये सर्वाधिक नफा मिळालेला आहे. तर सन २००४-२००५ मध्ये मागील वर्षांच्या तुलनेत नफा झाला असला तरीही नफ्यात घट झालेली आहे. पतसंस्थेच्या नफ्यात २००५-०६ पासून सातत्याने वाढ झालेली आहे.

### ७.१.१० लाभांश

पतसंस्था ही प्रतिवर्षी होणाऱ्या नफ्यातून काही रक्कम सभासदांना लाभांश म्हणून वाटप करते. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सह. पतसंस्थेने प्रतिवर्षी आपल्या सभासदांना त्यांनी धारणा केलेल्या भागांवर आधारित लाभांश दिलेला आहे. प्रतिवर्षी पतसंस्थेला होणाऱ्या नफ्यावर लाभांशाचा दर निश्चित केला जातो. पतसंस्थेकडून सन २००४-२००५ वर्षी ७% दराने म्हणजे सर्वात कमी दराने लाभांश दिला गेला, तर सन २०१२-१३ या वर्षी सर्वाधिक म्हणजे १४% दराने लाभांश दिला आहे. लाभांश वाटपाचे प्रमाण कमी-अधिक असल्याचे दिसून येते.

### ७.१.११ स्व निधी

स्वनिधी म्हणजे पतसंस्थेकडील वसुल भागभांडवल, इमारत निधी, राखीव निधी, निव्वळ नफा, लाभांश समीकरण निधी, इमारत घसारानिधी यांद्वारे निर्माण झालेला निधी होय. स्वनिधी हा पतसंस्थांना विनामोबदला मिळणारा निधी असतो. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सह.पतसंस्थेकडे सन १९९९–२००० या वर्षी रू.४०.३८ लाख तर सन २०१३–१४ या वर्षी रू.४.९६ कोटी इतका स्वनिधी जमा झाल्याचे दिसते. लेखापरीक्षणाच्या निकषाप्रमाणे स्वनिधीतील वाढीचे प्रमाण ७.५ टक्क्यांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. स्वनिधीमधील वाढ ही सन १९९९–२००० मध्ये सर्वाधिक म्हणजे ३५.६५ टक्के तर सन २००५–०६ या वर्षी सर्वात कमी म्हणजे ६.०२ टक्के इतकी असून पंधरा वर्षांच्या कालावधीत स्वनिधीतील सरासरी शेकडा वाढ ही २०.९२ टक्के आहे. एकंदरीत स्वनिधीतील सरासरी शेकडा वाढ निर्धारित निकषांपेक्षा ३ पटीने अधिक आहे.

### ७.१.१२ लेखापरीक्षण

लेखापरीक्षण हा पतसंस्थेचा आरसा मानला जातो. कोणत्याही संस्थेची सांपत्तिक स्थिती निश्चित करण्यासाठी त्रयस्थामार्फत व्यवहारांची छाननी करणे म्हणजे लेखापरीक्षण होय. लेखापरीक्षणामुळे व्यवहारातील अनियमितता, लबाडी, चुका वेळीच उघड होतात. हिशेब पत्रके काळजीपूर्वक लिहिली जातात. त्यामुळे दोषांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. पतसंस्थेच्या व्यवहाराचा दर्जा निश्चित करण्यासाठी लेखापरीक्षक गुण दोषांच्या आधारे लेखापरीक्षण वर्ग निश्चित करत असतात. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेला सातत्यपूर्ण ऑडिट वर्ग 'अ' मिळालेला आहे. यावरूनच पतसंस्थेच्या व्यवहाराचा दर्जा लक्षात येतो.

### ७.१.१३ स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण

वसुल भागभांडवल, राखीव निधी इमारत निधी, लाभांश समीकरण निधी, चालू वर्षातील नफा व इमारत घसारा निधी यांचा मिळून स्वनिधी तयार होतो. तर ताळेबंदाची बेरीज म्हणजे खेळते भागभांडवल होय. लेखापरीक्षणाच्या निकषाप्रमाणे स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी असणारे प्रमाण हे १०% इतके असावे असे निश्चित केलेले आहे. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सह. पतसंस्थेचे सन १९९९-२००० ते २०१३-२०१४ या पंधरा वर्षांच्या कालावधीतील स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी असणारे शेकडा प्रमाण ३९ ते ४५ टक्के इतके राहिलेले आहे. यावरून हे प्रमाण निश्चित निकषांपेक्षा ३ ते ४ पट अधिक आहे.

### ७.१.१४ निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण

पतसंस्थेच्या व्यवसायाचा दर्जा, वाढ व कार्यक्षमता मोजण्याचे साधन म्हणजे नफाक्षमता होय. या नफ्याचे खेळत्या भांडवलाशी असणारे शेकडा प्रमाण १% पेक्षा जास्त असावे असा लेखापरीक्षणाचा निकष आहे. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सह.पतसंस्थेच्या निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी असणारे शेकडा प्रमाण हे सरासरी ४ टक्के इतके असून निर्धारित निकषांपेक्षा ४ पट जास्त आहे. ही स्थिती सभासदांमध्ये विश्वास निर्माण करणारी आहे.

### ७.१.१५ व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सह.पतसंस्थेकडून दैनंदिन व्यवहार करण्यासाठी आस्थापना व व्यवस्थापन खर्च होत असतो. या व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी असणारे शेकडा प्रमाण हे २.५

टक्क्यांपेक्षा कमी असणे आवश्यक मानले जाते. सन १९९९-२००० ते २०१३-२०१४ या पंधरा वर्षांच्या काळात व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी असणारे सरासरी शेकडा प्रमाण १.३७ टक्के आहे. पंधरा वर्षांच्या कालावधीत हे प्रमाण कमी जास्त होत असले तरी निर्धारित निकषांपेक्षा कमी आहे.

### ७.१.१६ थकबाकीचे येणे कर्जाशी असणारे शेकडा प्रमाण

थकबाकीचे येणे कर्जाशी असणारे शेकडा प्रमाण लेखापरीक्षणाच्या निकषाप्रमाणे ० ते ५% असणे आवश्यक आहे. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सह.पतसंस्थेचे सन २००५-०६ ते २०१३-१४ या कालावधीतील थकबाकीचे सरासरी शेकडा प्रमाण १.१८ टक्के आहे. सन २००५-०६ या वर्षात थकबाकीचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे २.३६ टक्के आहे. त्यानंतर थकबाकीत घट झाली आहे. पतसंस्थेचे थकबाकीचे येणे कर्जाशी असणारे शेकडा प्रमाण हे निर्धारित निकषांपेक्षा कमी आहे.

### ७.१.१७ सी डी रेशो चे प्रमाण

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचेठेव कर्जाचे प्रमाण हे योग्य नसल्याचे दिसून येते ठेव कर्जाचे हे प्रमाण ६० ते ७० टक्क्यांच्या दरम्यान असणे आदर्श मानले जाते मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचेठेव कर्जाचे प्रमाण १०० टक्क्यांच्यापुढे आहे.सी डी रेशो चे हे प्रमाण योग्य प्रमाणात ठेवण्यासाठी पतसंस्थेचे ठेवींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्याची आवश्यकता आहे.

### ७.१.१८कामकाजात शिस्त :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० नुसार सहकारी पतसंस्थांची नोंदणी, सभासद करुन घेण्याची पध्दती, दैनंदिन कामकाजात हिशेब व्यवस्थापन तसेच विशिष्ट मुदतीत पाठवावयाची कागदपत्रे व आदेश, लाभांश वाटपाचे धोरण, राखीव व इतर निधीचे धोरण निश्चित झाल्याने बँकांच्या अथवा पतसंस्थांच्या कामकाजात शिस्त आल्याचे दिसते. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेस दिलेल्या भेटी दरम्यान दैनंदिन कामकाजात तत्परता व शिस्त दिसून आली.

### ७.१.१९ पतसंस्थेच्या एकूण कार्यात वाढ

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या सर्वच घटकांमध्ये काही वर्षांचा अपवाद वगळता वाढ झालेली दिसून येत. सभासद, भागभांडवल, ठेवी, कर्जवाटप, लाभांश, गुंतवणूक या घटकांमध्ये सातत्यपूर्ण वाढ झाल्याचे संशोधकास दिसून आले आहे. एकूणच कार्यातील वाढ ही प्रशंसनीय आहे.

## ७.२. गृहितकांची पडताळणी

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचा अभ्यास करताना संशोधकाने खालील गृहितके डोळयासमोर ठेवून संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

**७.२.१सहकारी तत्त्वानुसार अस्तित्त्वात आलेल्या मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची गेली १५ वर्षांची वाटचाल प्रगतीपथावर आहे.** संशोधकाचे हे पहिले गृहितक आहे. त्यासाठी संशोधकाने पतसंस्थेच्या खालिल आर्थिक घटकांचे विश्लेषण केले आहे.

**सभासद**

अभ्यास कालावधीच्या १५ वर्षांचा विचार करता, सन १९९९-२००० या वर्षी सभासद संख्या ४४५ होती तर सन २०१३-२०१४ या वर्षी सभासद संख्या ८८२ इतकी झाली. सभासदसंख्येत ४३७ इतकी वाढ झाली.

**वसूल भागभांडवल**

वसूल भागभांडवलामुळे पतसंस्थेची पत निश्चित होते. अभ्यास कालावधीत सन १९९९-२००० या वर्षी वसूल भागभांडवल रू. ३१,४०,३५० इतके होते तर त्यामध्ये वाढ होऊन सन २०१३-१४ पर्यंत वसूल भागभांडवलात रू. ३,४३,४८,०९५ पर्यंत वाढ झाली.

**कर्ज पुरवठा**

सभासदांच्या आर्थिक गरजांची पूर्तता करण्यासाठी कर्ज पुरवठा करणे हा पतसंस्थांचा मुख्य हेतू असतो. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने सभासदांची आर्थिक गरज लक्षात घेऊन कर्ज पुरवठयामध्ये वाढ केली आहे. पतसंस्थेने सन १९९९-२००० मध्ये रू. ८४,४८,५५४ इतके कर्ज वाटप केले होते. यामध्ये सातत्याने वाढ होऊन सन २०१३-१४ मध्ये पतसंस्थेने रू. १२,७४,६९,८९८ इतका कर्ज पुरवठा केला आहे.

**ठेवी**

आपल्या सभासदांना बचतीची सवय लावणे तसेच सभासदांच्या आर्थिक मालमत्तेचे संरक्षण करणे हे पतसंस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या ठेवींमध्ये वाढ झालेली आहे. ठेवींच्या वाढीमध्ये संचालक मंडळ व कर्मचारी वर्गाची विश्वासार्हता अत्यंत महत्त्वाची

असते. सन १९९९-२००० मध्ये पतसंस्थेकडे रू. १८,००,१६० इतकी ठेव होती. त्यामध्ये प्रतिवर्षी सातत्याने वाढ होऊन सन २०१३-२०१४ मध्ये रू. ५,२६,९४,६२४ इतकी ठेव पतसंस्थेकडे आहे. १५ वर्षांच्या कालावधीत ठेवींमध्ये रू. ५,०८,९४,४६४ एवढी वाढ झाली.

### उभारलेले कर्ज

सभासदांची आर्थिक गरज पूर्ण करण्यासाठी पतसंस्थेने पुणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेकडून विनागहाण (कॅश क्रेडिट) कर्ज मंजूर करून घेऊन सभासदांना कर्ज पुरवठा केलेला आहे.  पतसंस्थेने सन १९९९-२००० यावर्षी रू. ३८.२१ लाख इतके कर्ज उचललेले दिसते तर सन २०१३-१४ यावर्षी हे कर्ज रू. ३.४८ कोटींवर गेलेले दिसते.

### गुंतवणूक

पतसंस्थांना निश्चित उत्पन्न मिळविण्याच्या दृष्टीने त्यांच्याकडील स्वनिधी व ठेवींमधील काही रक्कम ठेवीच्या रूपाने अन्य बँकांमध्ये गुंतवणे बंधनकारक असते. त्याप्रमाणे मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेने सन १९९९-२००० यावर्षी रू. ६.५५ लाख तर सन २०१३-१४ यावर्षी रू. १.६२ कोटी इतकी गुंतवणूक केल्याची दिसते. अभ्यास कालावधीच्या १५ वर्षाच्या काळात पतसंस्थेने केलेल्या गुंतवणूकीत रू. १.५५ कोटी इतकी वाढ झालेली दिसते.

### उत्पन्न

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेला कर्ज वाटपावर आधारित व गुंतवणूकीद्वारे उत्पन्न मिळते. सन १९९९-२००० मध्ये पतसंस्थेने रू. ११,३०,३१७ इतके उत्पन्न मिळविले होते. तर २०१३-१४ मध्ये

पतसंस्थेचे उत्पन्न रू. १,६६,१७,९०४ पर्यंत वाढलेले दिसते. एकंदरीत पंधरा वर्षांचा विचार करता पतसंस्थेने मिळविलेल्या उत्पन्नामध्ये रू. १,५४,८७,५८७ इतकी वाढ झालेली आहे.

### खर्च

पतसंस्थेला कर्ज वाटप व गुंतवणूकीवर आधारित उत्पन्न मिळते, याच उत्पन्नातून पतसंस्थेचा दैनंदिन खर्च भागविला जातो. 'मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेला कर्मचारी पगार, सभा भत्ता, लेखापरीक्षण, स्टेशनरी, संगणक प्रणाली, वर्धापनदिन, टेलिफोन, लाईट, स्विकारलेल्या ठेवी व घेतलेल्या कर्जावरील व्याज इत्यादी बाबींवर खर्च करावा लागतो.' सन १९९९–२000 साली खर्च रू. ७.३५ लाख इतका होता तर सन २०१३–१४ यावर्षी हा खर्च रू. १.०९ कोटी पर्यंत पोहचला. पतसंस्थेच्या खर्चात वाढ झाली असली तरी यामुळे पतसंस्थेच्या उत्पन्नात व व्यवसायात वाढ झालेली आहे.

### नफा

अभ्यास कालावधीचा विचार करता मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेला प्रतिवर्षी नफा झालेला आहे. सन १९९९–२000 यावर्षी रू. ३.९४ लाख इतका नफा झाला होता. तर सन २०१३–१४ यावर्षी रू. ५६.२१ लाख इतका नफा झाला आहे. अभ्यास कालावधीच्या पंधरा वर्षात नफ्यामध्ये रू. ५२.२६ लाख इतकी वाढ झालेली आहे.

### लाभांश वाटप

पतसंस्था प्रतिवर्षी मिळालेल्या नफ्यातून सर्व निधीसाठी रक्कम वर्ग केल्यानंतर उर्वरीत नफा हा सभासदांना लाभांश म्हणून वाटप करते. अभ्यासकालावधीच्या पंधरा

वर्षांचा विचार करता सन २००४-०५ या वर्षी ७% दराने लाभांश वाटण्यात आला तर सन २०१२-१३ यावर्षी सर्वाधिक १४% दराने लाभांश वाटण्यात आला.

**स्वनिधी**

पतसंस्थेची आर्थिक पत ही तिच्याकडील निधींवरून ठरते. पतसंस्था या आपला स्वनिधी स्वतः निर्माण करतात. पतसंस्थेकडे असलेले वसूल भागभांडवल, इमारत निधी, संशयीत व बुडित कर्ज निधी, लाभांश समीकरण निधी, इमारत घसारा निधी यांचा मिळून स्वनिधी तयार होतो. सन १९९९-२००० यावर्षी रूपये ४०,३८,५९८ इतका स्वनिधी जमा होता तर सन २०१३-१४ या वर्षी रूपये ४,९६,१५,८८८ इतका स्वनिधी जमा झाला आहे. पंधरा वर्षांचा विचार करता स्वनिधी मध्ये रू. ४,५५,७७,२९० इतकी वाढ झालेली आहे.

**लेखापरिक्षण**

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेला अभ्यास कालावधीच्या पंधरा वर्षांचा विचार करता सातत्याने लेखापरिक्षणात 'अ' वर्ग मिळालेला आहे.

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या वरील सर्व मुलभूत आर्थिक घटकांचा अभ्यास करता या सर्व आर्थिक घटकांमध्ये सातत्याने वाढ झाल्याचे निदर्शनास येते. यावरून **"सहकारी तत्त्वानुसार अस्तित्त्वात आलेल्या मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची गेली पंधरा वर्षांची वाटचाल प्रगतीपथावर आहे. "** हे गृहितक सिध्द होते.

**७.२.२ मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या कार्याचे आर्थिक निर्देशक समाधानकारक आहेत.** हे दुसरे गृहितक असून यासंदर्भाने संशोधकाने मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या वित्तीय कामगिरीचा अभ्यास करताना तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी खालील गुणोत्तरांचा वापर केलेला आहे.

**स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण**

लेखापरीक्षणाच्या निकषाप्रमाणे स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी असणारे प्रमाण १०% इतके असावे असे निश्चित केलेले आहे. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे सन १९९९-२००० ते २०१३-२०१४ या पंधरा वर्षांच्या कालावधीतील स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी असणारे शेकडा प्रमाण हे ३९ ते ४५ टक्के इतके आहे.

**निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण**

नफ्याचे खेळत्या भांडवलाशी असणारे शेकडा प्रमाण हे १% पेक्षा जास्त असावे असा लेखापरीक्षणाचा निकष आहे. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी असणारे शेकडा प्रमाण हे सरासरी ४% इतके आहे.

**व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण**

व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी असणारे शेकडा प्रमाण हे २.५ टक्क्यांपेक्षा कमी असणे आवश्यक असते. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या सन १९९९-२००० ते २०१३-२०१४ या पंधरा वर्षांच्या काळात व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी असणारे सरासरी शेकडा प्रमाण १.३७ टक्के आहे.

### थकबाकीचे येणे कर्जाशी असणारे शेकडा प्रमाण

थकबाकीचे येणे कर्जाशी असणारे शेकडा प्रमाण लेखापरीक्षणाच्या निकषाप्रमाणे ० ते ५% असणे आवश्यक आहे. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेकडून थकबाकी संदर्भात उपलब्ध झालेल्या सन २००५-०६ ते सन २०१३-१४ या वर्षांच्या आकडेवारीनुसार या कालावधीतील थकबाकीचे सरासरी शेकडा प्रमाण १.१८ टक्के आहे.

### स्वनिधीमधील वाढीचे शेकडा प्रमाण

लेखापरीक्षणाच्या निकषाप्रमाणे स्वनिधीतील वाढीचे प्रमाण ७.५ टक्क्यांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. पंधरा वर्षांच्या कालावधीतील स्वनिधीतील सरासरी शेकडा वाढ ही २०.९२ टक्के आहे.

### ठेवींमधील वाढीचे शेकडा प्रमाण

लेखापरीक्षणाच्या निकषांप्रमाणे ठेवींमधील वाढ ही मागील वर्षांच्या तुलनेत १०% पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. पंधरा वर्षांच्या कालावधीत ठेवींचा आलेख चढता-उतरता असला तरी ठेवींमधील वाढीचे सरासरी शेकडा प्रमाण २७.४९ टक्के आहे.

## सी डी रेशो चे प्रमाण :

मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचेठेव कर्जाचे प्रमाण हे योग्य नसल्याचे दिसून येते ठेव कर्जाचे हे प्रमाण ६० ते ७० टक्क्यांच्या दरम्यान असणे आदर्श मानले जाते मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी तसंस्थेचेठेव कर्जाचे प्रमाण १००टक्क्यांच्या पुढे आहे.सी डी रेशो चे हे प्रमाण योग्य प्रमाणात ठेवण्यासाठीपतसंस्थेचे ठेवींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्याची आवश्यक्ता आहे.

**गुंतवणुकीचे ठेवीशी शेकडा प्रमाण**

लेखापरीक्षणाच्या निकषांप्रमाणे गुंतवणुकीचे ठेवीशी असलेले शेकडा प्रमाण हे ३० ते ३५ टक्के असणे आवश्यक आहे. मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या पंधरा वर्षातील गुंतवणुकीचे ठेवीशी असलेले शेकडा प्रमाण ३०.७५% आहे.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या कार्याचे आर्थिक निर्देशक हे लेखापरीक्षणाच्या निर्धारित निकषांचे पालन करत आहेत. **यावरून मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या कार्याचे आर्थिक निर्देशक समाधानकारक आहेत** हे गृहितक सिध्द होते.

**७.३ शिफारशी :**

प्रस्तुत विषयावर संशोधकाने संशोधन केल्यानंतर असे लक्षात आले की, खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विकासात मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची भूमिका महत्त्वाची आहे. तरीही काही समस्या निदर्शनास आल्याने संशोधकाने काही उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने काही शिफारशी केल्या आहेत.

१) पुणे जिल्ह्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांतील जास्तीत जास्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सभासद होण्यासाठी संधी द्यावी. त्यासाठी संपर्क करण्याची व्यवस्था निर्माण करावी.

२) आपल्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ होण्यासाठी पतसंस्थेच्या शाखा सुरु करण्यात याव्यात.

३) स्पर्धेच्या युगात आपले अस्तित्व टिकविण्यासाठी पतसंस्थेने आपल्या व्यवहारात ईमेल, इंटरनेट, एस.एम.एस. यासारख्या आधुनिक सेवा देण्याविषयी प्रयत्न करावा.

४) खुले आर्थिक धोरण व जागतिकीकरणामुळे पतसंस्थेने आपले अस्तित्व टिकविण्यासाठी इतर बँकांशी स्पर्धा करावी. ग्राहकांना तत्परतेने व आपुलकीने सेवा पुरविणे, आधुनिकीकरणाच्या अनेक सुविधांचा वापर करणे, कामकाजात पारदर्शकता आणून स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी तयार व्हावे.

५) महाराष्ट्र शासनाचे धोरण, सहकारी संस्था कायदा व दैनंदिन कामकाज याबाबतचे अद्ययावत ज्ञान कर्मचारी व संचालक मंडळाला असावे यासाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करावे किवा इतर ठिकाणच्या प्रशिक्षणासाठी उपस्थित रहावे.

६) सध्या सगळीकडे बँक व्यवसायातील घोटाळे वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होत असल्याने बँकाबाबत जनमानसात साशंकता निर्माण होऊन विश्वासार्हता कमी होऊ लागली आहे. त्यादृष्टीने कामकाजात पारदर्शकता, आपुलकी, कामातील तत्परता व समानता, व्यवहारातील सुरक्षितता व लाभप्रदता याकडे व्यवस्थापन मंडळ व कर्मचारी यांनी लक्ष देऊन पतसंस्थेबद्दल विश्वासार्हता निर्माण करावी.

७) कर्जपुरवठा करताना कर्जदराची परतफेडीची क्षमता लक्षात घेऊनच कर्जपुरवठा करण्यात यावा.

८) पतसंस्थेच्या सभासदांना अन्य बँकाकडून गृहकर्ज घ्यावे लागत असल्याने सभासदांसाठी गृहकर्ज योजना राबवावी.

९) नैसर्गिक, आकस्मित आपत्तीमुळे काही वेळेस सभासदांकडून कर्जफेड केली जात नाही. अशावेळी थकबाकीची समस्या निर्माण होत असल्याने ही समस्या सोडविण्यासाठी थकबाकी विमा योजना राबविण्यात यावी.

१०) पतसंस्थेने सी डी रेशो चे प्रमाण योग्य ठेवणे आवश्यक आहे.

११) पतसंस्थेनेसभासदांना विम्याची सोय उपलब्ध करुन द्यावी.

**७.४ समारोप :**

देशाच्या आर्थिक विकासात सहकारी बँकांनी व पतसंस्थांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सहकार चळवळ ही लोक चळवळ आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर लोकांच्या गरजा भागविणे, लोकांच्या बचतीस प्रोत्साहन देणे, स्वयंरोजगारास चालना देणे, लोकांच्या राहणीमानात व जीवनमानात उत्कर्ष घडवून आर्थिक विकासास चालना देणे हे हेतू साध्य होण्यास मदत होते.

संशोधकाने प्रस्तुत संशोधनात पुणे जिल्ह्यातील मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या कामकाजाचे व विकासाचे अध्ययन करुन काही निष्कर्ष काढले आहेत. तसेच संशोधकाने संशोधन करताना निदर्शनास आलेल्या काही समस्या व त्यादृष्टीने उपाययोजनेसाठी शिफारशी केल्या आहेत. त्यातून सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना, पतसंस्थेच्या सभासदांना, व्यवस्थापक मंडळाला व कर्मचाऱ्यांना कामकाजाची व त्यातून होणाऱ्या विकासाची माहिती मिळेल. त्यादृष्टीने हे संशोधन उपयुक्त ठरेल.

वरील निष्कर्ष, समस्या व उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने केलेल्या शिफारशी या प्रथमदर्शनी उपलब्ध माहितीवरील विश्लेषणातून केलेल्या आहे. हे संशोधकाचे वैयक्तिक मत आहे. यातून इतर संशोधकांना संशोधन करण्याची प्रेरणा मिळेल अशी संशोधकाची अपेक्षा आहे.

**सदर्भ ग्रंथसूची**

१) पुस्तके

२) एम.फिल./ पीएच. डी. प्रबंध सूची

३) शासकीय अहवाल व परिपत्रके

४) इतर अहवाल

**परिशिष्ठ**

१) सभासद शाळांची यादी

२) सहकार आयुक्त व निबंधक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे दि.२९ एप्रिल २०१० चे परिपत्रक.

# संदर्भ ग्रंथसूची

## पुस्तके

१) आगलावे प्रदीप, २०१०, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२) चौगुले व्ही.टी., के. जी. पठाण, १९७९, सहकाराची मुलतत्त्वे,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

३) तुपे सु.दा., १९९२, सहकाराचे सिध्दांत आणि इतिहास, द्वारका प्रकाशन, पुणे.

४) देसाई स.श्री., मु. निर्मल भालेराव, २०१४, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे.

५) रायखेलकर ए.आर., ए.जी.डांगे, १९७८, सहकारः तत्त्वे व व्यवहार, अजब पुस्तकालय, कोल्हापूर.

६) सराफ मोहन, रमेश दापके, १९९१, सहकार, विद्या प्रकाशन, पुणे.

७) Ghanekar V.V., 2004, Co-operative movement in Indian, Institute of Rural Development and Education, Pune.

८) PANDEY I. M., 2003, Essential of financial management.

९) Ghosh Chandan, Ambar Ghosh, 2011, Macroeconomics PHI learning Private Limited, New Delhi, pg. No. 268.

१०) Ahuja H.L. 1986 Macroeconomics Theory and Policy S. Chand And Company Private Limited, New Delhi, pg. No. 146.

## एम्. फिल्. / पीएच्.डी. प्रबंध

१) **आंधळे सोमनाथ रामचंद्र,** २००९, नाशिक जिल्ह्याच्या आर्थिक विकासातील नागरी सहकारी बँकांच्या भूमिकांचे मूल्यमापन (विशेष संदर्भ–निफाड तहसिलमधील नागरी सहकारी बँका), पीएच्.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे.

२) **कदम पराग प्रल्हाद,** २०१०, ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था कायम टिकविण्यासाठी अर्थशास्त्र सुधारणांच्या संदर्भात सहकारी चळवळीची भूमिका, पीएच्.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

३) **काकडे शिवाजी मुरलीधर**, २०१४, महाराष्ट्रातील महिला नागरी सहकारी बँकांचे अर्थप्रबंधन एक अभ्यास, पीएच्.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

४) **कुलकर्णी अविनाश** दि. २०११, पुण्यातील नागरी सहकारी बँकांचा (शेडयुल्ड सोडून) एन्.पी.ए. संदर्भातील तुलनात्मक अभ्यास, पीएच्.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५) **कोल्हे प्रभा आर.** १९८९, महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँक, प्रामुख्याने भगिनी निवेदिता महिला सहकारी बँक पुणेः एक अभ्यास. एम्.फील. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.

६) **टाक नारायण भिकोबा**, २०१२, पुणे जिल्हयातील प्राथमिक सहकारी शेती पुतपुरवठा संस्थांचा अभ्यास, पीएच्.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

७) **मुलाणी महमंद रफीक उमराव,** १९९०, साधना सहकारी बँक हडपसर या बँकेच्या कार्यपद्धतीचा एक चिकित्सक अभ्यास, एम्.फिल. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

८) **शिंदे संगिता,** २००५, आर्थिक पृथःकरणाद्वारे पुणे शहरातील नागरी सहकारी पतसंस्थांचा तुलनात्मक अभ्यास, एम्.फिल. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

९) **सकटे ए.जे.,** २०११, बिगर शेती सहकारी पतसंस्था (विशेष संदर्भ सातारा जिल्हयातील कराड तालुका)ः एक अभ्यास, पीएच्.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

१०) **क्षीरसागर भगवंत,** १९८९, पुणे माध्यमिक शाळा शिक्षकेतर सहकारी पतपेढी पुणे : एक अभ्यास, एम्. फिल. प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

**शासकीय अहवाल व परिपत्रके**

१) सहकार आयुक्त व निबंधक महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. २९ एप्रिल २०१० चे परिपत्रक.

२) महाराष्ट्र शासन (२०१३) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०१३) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६०, जानेवारी २०१४, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे.

**इतर अहवाल**

१) मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था, पुणे वार्षिक अहवाल- १९९९-२000 ते २०१३-१४.

२) महाराष्ट्र को-ऑप. क्रेडिट न्यूज, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., पुणे- जुलै-२०१५.

३) जिल्हा सहकारी बोर्ड मर्या., पुणे (सन २०१४-२०१५) ७८ वा वार्षिक अहवाल

# परिशिष्ठ

## मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था मर्यादीत, सभासद शाळांची यादी

| क्र. | सभासद शाळांची नावे | पत्ता |
|---|---|---|
| १ | प्रा. नाथ हरी पुरंदरे प्राथमिक शाळा | सिमला ऑफिस समोर, शिवाजीनगर, पुणे-५ |
| २ | भारत मराठी विद्यालय प्राथमिक शाळा | शेठ हिरालाल प्रशाला, ७८४, बुधवार पेठ, पुणे-२. |
| ३ | नुतन भारत मराठी विद्यालय प्राथमिक शाळा | ५७९, बुधवार पेठ, नाना वाडा, पुणे२ |
| ४ | बाल जीवन विकास प्राथमिक शाळा | १२५५, भवानी पेठ, पुणे-४२ |
| ५ | बी.टी. शहाणी नवीन हिंद प्राथमिक स्कुल | ७७४, भवानी पेठ, पुणे-४२ |
| ६ | बापुसाहेब पवार प्राथमिक शाळा | ३८० ड, भवानी पेठ, पुणे-४२ |
| ७ | विद्या विकास विद्यालय प्राथमिक शाळा | स.नं.७६ ते ८१, २१९०, २१९१, सहकारनगर नं.१, पर्वती, पुणे-९ |
| ८ | श्री. जिजाई शिक्षण मंदिर प्राथमिक शाळा | जहांगिरनगर सव्वातेरानळी, हडपसर, पुणे-१३ |
| ९ | नुतन समर्थ विद्यालय प्राथमिक शाळा | ८९८, बुधवार पेठ, पुणे-२ |
| १० | सेंट हिल्डाज प्रायमरी स्कुल | पंचहौद चौक, ५ गुरूवार पेठ, पुणे-४२ |
| ११ | अभिनव विद्यालय मराठी प्राथमिक शाळा | कर्वे रोड, नळ स्टॉप, पुणे-४ |
| १२ | नवीन मराठी शाळा | ३४२, शनिवार पेठ, पुणे-३० |
| १३ | साने गुरूजी प्राथमिक शाळा | सिंहगड रस्ता, पर्वती पायथा, पुणे३० |
| १४ | बाल विकास मंदीर प्राथमिक शाळा | लोकमान्यनगर, पुणे-३० |

| क्र. | सभासद शाळांची नावे | पत्ता |
|---|---|---|
| १५ | कै. श्री. वसंतराव वैद्य प्राथमिक शाळा | सेनादत्त पेठ, राजेंद्रनगर, पुणे-३० |
| १६ | आदर्श विद्यालय मराठी प्राथमिक शाळा | १३६७/६८, नातुबाग, शुक्रवार पेठ, पुणे. |
| १७ | बाल विकास शिक्षण संस्था प्राथमिक शाळा | ४२३, सोमवार पेठ, पुणे-११ |
| १८ | रॅ.र.पु. परांजपे (हुजुरपागा) प्राथमिक शाळा | लक्ष्मी रोड, पुणे-३० |
| १९ | सौ.गुलाबबाई कटारिया प्राथमिक विद्या मंदिर | २७२, पर्वती पुणे-९. |
| २० | स.ल.रास्ते प्राथमिक विद्यालय | ५०१, रास्ता पेठ, रास्तेवाडा, पुणे-११ |
| २१ | प्राथमिक शिक्षण मंडळ शिक्षण संस्था प्राथमिक शाळा | ३५१, रास्ता पेठ, पुणे-११ |
| २२ | सेंट एडवर्ड मुलांची प्राथमिक शाळा | ७७५, गुरूवार पेठ, पंचहौद चौक, पुणे-२ |
| २३ | डॉन बॉस्को प्राथमिक शाळा | डॉन बॉस्को मार्ग, येरवडा, पुणे-६ |
| २४ | हाजी सॉलेह मोहम्मद हाजी उस्मान उर्दु प्राथमिक शाळा | २४१०, इस्ट स्ट्रीट, पुणे-१ |
| २५ | प्रो.ए. सोसायटीचे प्राथमिक विद्या मंदिर | जंगली महाराज रोड, शिवाजीनगर,पुणे-५ |
| २६ | शारदा विद्या मंदिर प्राथमिक शाळा | आपटे रोड, डेक्कन पुणे-४ |
| २७ | सेंट पेट्रीक्स प्रायमरी स्कुल | १बी, प्रिन्स वेल्स ड्राईव्ह एम्प्रेस गार्डन जवळ, पुणे-१ |
| २८ | सेनादत्त मंडळ प्राथमिक विद्या मंदीर | सेनादत्त पेठ, (पोलीस चौकी मागे), पुणे-३० |
| २९ | सेंट जोसेफ प्राथमिक शाळा | घोरपडी गाव, पुणे-१, |
| ३० | ज्ञान प्रबोधिनी प्राथ. विद्या मंदिर | ससाणेनगर, हडपसर, पुणे-२८ |
| ३१ | बाबुभाई उर्दु प्राथमिक शाळा | १९९, गणेश पेठ, दिल्ली स्टोअर्सच्या मागे, पुणे-२ |

| क्र. | सभासद शाळांची नावे | पत्ता |
|---|---|---|
| ३२ | सेंट क्रिस्पिन्स होम्स प्रा. शाळा | कर्वे रोड, पुणे-४. |
| ३३ | आलेगावकर प्राथमिक शाळा | डॉ. बाबसाहेब आंबेडकर रोड, खडकी बाजार, खडकी, पुणे-३ |
| ३४ | अरण्येश्वर विद्या मंदिर | स.नं. ७५, सहकानगर, पद्मावती, पर्वती, पुणे-९. |
| ३५ | महाराष्ट्र गर्ल्स सोसा. (हुजुरपागा कात्रज) | राजस सोसायटी, कात्रज, पुणे-४६ |
| ३६ | अंजुमन ए फैजल इस्लाम उर्दु प्राथमिक शाळा | ५६५, रास्ता पेठ, पुणे-११ |
| ३७ | रेजिमेंटल चिल्ड्रन स्कुल | कॉलेज ऑफ मिलीटरी इंजिनिअरींग सी.एम.ई. दापोडी, पुणे-३१ |
| ३८ | कै.पै.हिरामण बनकर विद्यालय (प्राथमिक विभाग) | सुखसागरनगर, कात्रज,पुणे-४६ |
| ३९ | आर.शिंदे प्राथमिक शाळा | १२९, नाना पेठ, पुणे-२ |
| ४० | चंद्रकांत दरोडे प्राथमिक विद्यालय | स.नं.८४३ प्लॉट नं.१७९, शिवाजीनगर, पुणे-५, बी.एम.सी.सी कॉलेज शेजारी. |
| ४१ | सरस्वती निकेतन हिन्दी प्राथमिक शाळा | गोळीबार मैदान चौक, फेअरा मार्ग, पुणे-४० |
| ४२ | मिलिटरी फार्म प्राथमिक शाळा | खडकी, पुणे-३. |
| ४३ | एथेल गार्डन प्रॅक्टिसिंग स्कुल | ४२४, रास्ता पेठ, पुणे-११. |
| ४४ | सरीता विद्यालय प्राथमिक शाळा | ४८४/१०९, मित्र मंडळ चौक, पर्वती, पुणे-९ |

| क्र. | सभासद शाळांची नावे | पत्ता |
|---|---|---|
| ४५ | प्रो.ए.सो.चे मॉडर्न प्राथमिक विद्या मंदिर | सेक्टर नं.२१, एल. आय. सी. ऑफिस जवळ यमुनानगर, निगडी, पुणे-४४ |
| ४६ | प्राथमिक विद्या मंदिर (गणेश खिंड) | गणेश खिंड, पुणे-५६ |
| ४७ | शिवराज विद्यालय प्राथमिक शाळा | सोमनाथनगर, वडगाव शेरी, पुणे-१४ |
| ४८ | हाजी गुलाम मो. आजम उर्दु प्राथमिक शाळा | ६४६, हरकारनगर, भवानी पेठ, पुणे-४२ |
| ४९ | ब.रा. अग्रवाल हिंदी प्राथमिक शाळा | १०८८, रविवार पेठ, पुणे. |
| ५० | नेहरू शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा | गोरा कुंभार हायस्कुल जवळ, कॉसमॉस बँकेसमोर, पाषाण, पुणे. |
| ५१ | दि पुना इस्लामिया उर्दु प्राथमिक शाळा | २०१५, बी गफ्फार बेग स्ट्रीट, कॅम्प-१ पुणे. |
| ५२ | चक्रधर प्राथमिक विद्यालय | दत्तनगर आंबेगाव बु., पुणे-४६ |
| ५३ | सौ. प्रतिभा पवार प्राथमिक शाळा | ४८/१अ, एरंडवणा, पुणे-३८ |
| ५४ | गगनगिरी प्राथमिक शाळा | संतोषनगर, संतोषीमाता मंदिरामागे, कात्रज, पुणे-४६. |
| ५५ | नूतन प्राथमिक शाळा, वानवडी | वानवडी टॅनरी, पुणे-४० |
| ५६ | ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय | कदम वाकवस्ती, पुणे सोलापुर रोड, लोणी कोळभोर, पुणे-४ |
| ५७ | कै.सौ. पद्मावतीबाई बनहट्टी प्राथमिक शाळा | २५/२०, कर्वेरोड, पुणे-४. |
| ५८ | बसंत प्राथमिक शाळा | ७६/१, घोरपडी गाव, पुणे-१. |
| ५९ | प्रेरणा प्राथमिक विद्यालय | स.नं.२१, आंबेगावबु.,गावशिव,पुणे-४६ |

| क्र. | सभासद शाळांची नावे | पत्ता |
|---|---|---|
| ६० | शेठ मोतीचंद जेठाभाई गुजराती विद्यामंदिर | ८०, रविवार पेठ, पुणे-२ |
| ६१ | यशोदिप प्राथमिक शाळा | वारजे माळवाडी, पुणे-२४ |
| ६२ | श्री शिवछत्रपती प्राथमिक शाळा | स.नं. ५९, साईनगर, कोंढवा पुणे-४८ |
| ६३ | हिंदुस्थान ॲन्टिबायोटिक्स स्कुल प्राथमिक शाळा | एच.ए. कॉलनी पिंपरी, पुणे-१८ |
| ६४ | आयडियल पूर्ण प्राथमिक शाळा | ५११, शनिवार पेठ, पुणे-३० |
| ६५ | वल्लिमोहम्मद दोस्तमोहम्मद पीरमोहम्मद उर्दु प्राथ. शाळा | २५, बंड गार्डन रोड, पुणे-१ |
| ६६ | कमला नेहरू प्राथमिक शाळा | चिंचवड स्टेशन, पुणे-१९ |
| ६७ | आदिनाथ बाल मंदिर प्राथमिक शाळा | टिंगरेनगर, विश्रांतवाडी, पुणे-१५ |
| ६८ | बाल विकास विद्या मंदिर | नानवीज ता. दौंड, जि. पुणे |
| ६९ | सरस्वती विद्यालय इंग्रजी प्राथमिक शाळा | १५३, घोरपडी गांव, पुणे-१ |
| ७० | समर्थ विद्या मंदिर प्राथमिक शाळा | खामकर गार्डन मागे, अप्पर बिबवेवाडी, पुणे-३७ |
| ७१ | बाल शिशु मंदिर प्राथमिक शाळा | अप्पर बिबवेवाडी, पुणे-३७ |
| ७२ | व्ही.पी.एस. प्राथमिक विद्यालय | लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे. |
| ७३ | श्री समर्थ श्रीपती बाबा जनता प्राथमिक शाळा | ताडीवाला रोड, पुणे-१ |
| ७४ | श्री सोमनाथ प्राथमिक शाळा | वडगाव शेरी, पुणे-१ |
| ७५ | सद्‌गुरू साईबाबा प्राथमिक आश्रमशाळा | मु.पो. भांडगाव, ता. पारनेर, जि. अहमदनगर |
| ७६ | श्रीम. शांताबाई काळूराम ठोंबरे प्राथमिक विद्यालय | गोपाळवाडी रोड, ता. दौंड, जि. पुणे |
| ७७ | प्रियदर्शनी शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा | इंदिरानगर सुपर, बिबवेवाडी, पुणे-३७ |

| क्र. | सभासद शाळांची नावे | पत्ता |
|---|---|---|
| ७८ | एस. गायकवाड प्राथमिक शाळा | ५९५, महात्मा फुले गंज पेठ, पुणे-४२ |
| ७९ | विकास प्राथमिक शाळा | बोराटे वस्ती, खराडी, पुणे-१४ |
| ८० | प्रियदर्शिनी विद्या मंदिर प्राथमिक शाळा | धनकवडी, पुणे-४३ |
| ८१ | सेंट मार्गारेट प्राथमिक शाळा | २, जनरल भगत मार्ग, पुणे-०१ |
| ८२ | श्रीमती गोदावरी हिंदी प्राथमिक शाळा | मुंबई-पुणे रोड, चिंचवड,पुणे-१९ |
| ८३ | श्री रासाईदेवी प्राथमिक आश्रमशाळा | मु.पो. वरवंड, ता. दौंड, जि. पुणे |
| ८४ | समता बालक मंदिर प्राथ. शाळा | म.हौ.बोर्ड, येरवडा, पुणे. |
| ८५ | उज्वला विद्या निकेतन | पद्मावती, पुणे-९ |
| ८६ | कै. भिकोबा तांबे प्राथमिक शाळा | रहाटणी, पुणे-१७ |
| ८७ | ज्ञानज्योती विद्यामंदिर प्राथमिक शाळा | किवळे, ता. हवेली, जि. पुणे |
| ८८ | नवभारत ज्ञानवर्धिनीचे प्राथमिक विद्यामंदिर | स.नं.१३६, त्रिमुर्ती सोसा., वारजे माळवाडी, पुणे-५८ |
| ८९ | रामराज्य शि.संस्था कै.सौ.शांताबाई ना.शेलार प्राथमिक शाळा | राजीव गांधी नगर, अप्पर बिबवेवाडी, पुणे-३७ |
| ९० | सुंदरबाई मराठे प्राथमिक शाळा | ३७/२अ/२ब, खराडी, पुणे-१४ |
| ९१ | आदर्श प्राथमिक विद्यामंदिर | स.नं.५४, बी.टी.कवडे रोड, दळवीनगर, मुंढवा, पुणे-३७ |
| ९२ | कै. धोंडीबा जाधव आदर्श विद्यालय | जाधव वस्ती, बी. एफ.सी.रोड, मुंढवा, पुणे-३६ |
| ९३ | विमलाबाई लुंकड प्राथमिक शाळा | डायस फ्लाट, गुलटेकडी, पुणे-३८ |
| ९४ | गेनबा सोपानराव मोझे प्राथमिक शाळा | महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, येरवडा, पुणे-६ |

| क्र. | सभासद शाळांची नावे | पत्ता |
|---|---|---|
| ९५ | डी.एस. बारी स्कुल | ३४२, महात्मा फुले पाराची तालीम, पुणे-४२ |
| ९६ | बांदोडकर प्राथमिक शाळा | २१०, नारायण पेठ, पुणे-३० |
| ९७ | इंदिरा प्राथमिक विद्यामंदिर | महादेव नगर, मांजरी रोड, ता. हवेली,जि. पुणे |
| ९८ | आदर्श बालमंदिर प्राथमिक शाळा | स्वारगेट, शंकरशेठ रोड, पुणे-३७ |
| ९९ | संत गोरोबा बाल विद्यानिकेतन | विमाननगर, पुणे-नगर रोड, पुणे-१४ |
| १०० | नवमहाराष्ट्र शिक्षण संस्था प्राथमिक शाळा | सर्व्हे नं. ३/१६ब, १ हिल टॉप सोसा., धनकवडी, पुणे-४३ |
| १०१ | सेवासदन कै.ध.रा. पोंक्षे सराव पाठशाळा | ७७७, सदाशिव पेठ, बाजीराव रोड, पुणे-३० |
| १०२ | श्री सयाजीनाथ महाराज प्राथमिक विद्यालय | आळंदी रोड, साईमंदिर जवळ, वडमुखवाडी, पुणे-१५ |
| १०३ | आदर्श बालक मंदिर प्राथमिक शाळा | बिजलीनगर, चिंचवड, पुणे-३३ |
| १०४ | नवयुग प्राथमिक शाळा | भिमनगर, दौंड, जिल्हा-पुणे |
| १०५ | अब्दुल वाहेद प्रायमरी स्कुल | ११३३, अ सैफी स्ट्रिट रोड, पुणे-१ |
| १०६ | सेंट अँथनी प्रायमरी स्कुल | सोलापुर बाजार, पुणे-१ |
| १०७ | एम.आय.टी. चे श्री शारदा प्राथमिक शाळा | स.नं.१२७/१अ, पौड रोड, कोथरूड, पुणे-३८ |
| १०८ | कन्या शिक्षण मंडळ, श्री. ना.दा. ठाकरसी कन्याशाळा | ५९१, नारायण पेठ, पुणे-३० |
| १०९ | शिशुविहार प्राथमिक शाळा एरंडवणा शाखा | |
| ११० | म.ए.सो. बाल शिक्षण मंदिर | डेक्कन जिमखाना, पुणे. |

| क्र. | सभासद शाळांची नावे | पत्ता |
|---|---|---|
| १११ | अल जदिद उर्दु प्रायमरी स्कूल | गुलाम अलीनगर, हडपसर, पुणे-२८ |
| ११२ | श्रीमती शांताताई आठवले प्राथमिक शाळा | कर्वे रोड, शीतल हॉटेलमागे, कर्वे पुतळयाजवळ, कोथरूड, पुणे. |
| ११३ | शिशु विकास मंदिर | दौंड रेल्वे कोर्टासमोर, ता. दौंड, जि. पुणे-०१ |
| ११४ | पंडीत जवाहरलाल नेहरू प्राथमिक विद्या मंदिर | स.नं.११७, पॉप्युलनगर नवीन मुंबई बंगलोर रोड, वारजे, पुणे-५८ |
| ११५ | स्व. रामभाऊ म्हाळगी फौ. प्राथमिक शाळा | राजन सोसा. कात्रज, पुणे-४६ |
| ११६ | रेंजहिल्स मराठी प्राथमिक शाळा | रेंजहिल्स, खडकी, पुणे-२० |
| ११७ | रेंजहिल्स प्राथमिक शाळा | रेंजहिल्स, खडकी, पुणे-२० |
| ११८ | कै. गणपतराव गोविंद थिटे प्राथमिक विद्यालय | थिटे वस्ती, खराडी, पुणे-१४ |
| ११९ | रेंजहिल्स इंग्लिश प्राथमिक शाळा | रेंजहिल्स इस्टेट, खडकी, पुणे-२० |
| १२० | श्री स्वामी विवेकानंद प्राथमिक शाळा | यमुनानगर, निगडी, पुणे-४४ |
| १२१ | शेठ हकमचंद ईश्वरदास गुजराती प्राथमिक शाळा | १४३३, कसबा पेठ, पुणे-११ |
| १२२ | जीवन शिक्षण विद्या मंदिर प्राथमिक शाळा | आनंदग्राम सोसायटी, डुडुळगाव, ता. हवेली, जि. पुणे. |
| १२३ | विद्या विकास एज्युकेशन प्राथमिक शाळा | स.नं. ६१, महानंदा सोसायटीच्या मागे कोंढवा बु., पुणे-४८ |
| १२४ | श्री गोपाळ प्राथमिक शाळा | १३४७ ब, सदाशिव पेठ, पुणे-३० |
| १२५ | मदरसा ए फुरकानिया उर्दु प्राथमिक शाळा | वानवडी बाजार, पुणे. |
| १२६ | समता प्राथमिक विद्यालय | चक्रपाणी वसाहत, संभाजी चौक, भोसरी, पुणे-३९ |
| १२७ | कै.सौ.कमलाबाई शि. दामले प्राथमिक शाळा | वीर सावरकरनगर गुलटेकडी, पुणे-३७ |